# दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई

**भ्रष्टाचार मुक्त भारतासाठी**

# जन लोकपाल

**प्रा. डॉ. बालाजी कोंपलवार**

उपाध्यक्ष भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास राळेगणसिद्धि,

ता. पारनेर, जि. अहमदनगर

सदैव सैनिका पुढेच जायचे,

न मागुती तुवा कधी फिरायचे ।।धृ।।

सदा तुझ्यापुढे उभी असे निशा,

सदैव काजळी दिसायच्या दिशा ।

मधून मेघ हे नभास ग्रासती,

मध्येच या विजा भयाण हासती ।

दहा दिशांतूनी तूफान व्हायचे,

सदैव सैनिका पुढेच जायचे ।।



**रामलीला मैदान**

**दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई...**
**भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी**
**जन लोकपाल**

**लेखक :**
प्रा. डॉ. बालाजी धोंडीबा कोंपलवार
सरस्वती नगर, धर्माबाद, जि. नांदेड
भ्रमणभाष : ९९७००३३१२५
Email : balajikompalwar@gmail.com

**मुद्रक व प्रकाशक :**
भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन (न्यास), राळेगणसिद्धी
फोन : ०२४८८-२४०४०१, २४०५८१
visit us : www.annahazare.org
Email : bvjralegan@gmail.com

**मुद्रण स्थळ :**
प्रभात प्रिंटिंग वर्क्स
४२७, गुलटेकडी, पुणे - ४११ ०३७

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

प्रथम आवृत्ती - २०१२

**मुखपृष्ठ :** संतोष घोंगडे, नांदेड

**किंमत :** २५/- रुपये

# समर्पण

या देशातील जनतेचा पोशिंदा असलेल्या ज्या अन्नदाता बळीराजाने गळफास घेतला त्या वीर शेतकऱ्यांना...

देशाच्या खाणीत, कारखान्यात, शेतात रात्रंदिवस घाम गाळताना देह ठेवलेल्या निर्भय साथींना...

भारत मातेचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सीमेवर लढताना ज्यांना हौतात्म्य प्राप्त झाले त्या शूर जवानांना.....

भ्रष्टाचारमुक्त भारताच्या लढाईत शहीद झालेल्या ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांना...

व

भ्रष्टाचारमुक्त व सक्षम भारताच्या निर्मितीसाठी आपले संपूर्ण जीवन अर्पित केलेल्या मा. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या राष्ट्रसेवेस

समर्पित...

{{ दाण्याचे भरघोस कणीस
हवे असल्यास,
एका दाण्याला अगोदर
मातीत गाडून घ्यावे लागते.
आज समाजाला व देशाला
मातीत गाडून घेणाऱ्या
दाण्याची (कार्यकर्त्याची) गरज आहे. }}

- अण्णा हजारे

{{ स्वावलंबी, स्वयंपूर्ण
खेडी निर्माण झाल्याशिवाय
बलशाली भारताचे
स्नप्न साकार होणार नाही
अशी खेडी उभी करण्यासाठी,
सामाजिक बांधिलकीची
जाणीव असलेला माणूस
प्रथम उभा करावा लागेल. }}

- अण्णा हजारे

{{ मी अहिंसावादी आहे.
लोकपाल विधेयकासाठीचा लढा
राष्ट्रीय संपत्तीची हानी न करता
अहिंसेच्या मार्गाने लढणार आहे. }}

- अण्णा हजारे

# प्रस्तावना

**भ्र**ष्टाचाराने संपूर्ण देशात थैमान घातले आहे. सामान्य माणसांना जीवन जगणे अशक्य झालेले आहे, कुठंही गेला तरी पैसे दिल्याशिवाय कामच होत नाही. असं क्षेत्र राहिलं नाही की तिथे भ्रष्टाचार नाही. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर कायदे करून त्याची योग्य अंमलबजावणी केली तरच भ्रष्टाचाराला काही प्रमाणात आळा बसू शकेल. परंतु सरकारने मागील ६२ वर्षात असे कठोर कायदे करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यासाठी राज्यात जनतेच्या सहभागाने जन आंदोलने उभारली. त्यामुळे राज्यात माहितीचा अधिकार, ग्रामसभा, दप्तर दिरंगाई, बदल्यांचा कायदा यासारखे कायदे झाले. स्वातंत्र्यानंतर माहिती अधिकाराचा कायदा म्हणजे नागरिकांना प्राप्त झालेले शस्त्र आहे. नागरिकांना आवश्यक वाटणारी माहिती मिळवून देत आहे, त्यामुळे भ्रष्टाचार केव्हा, कुणी, कुठे, कसा व किती केला यासारखी माहिती नागरिकांना मिळू लागली आहे. अनेक ध्येयवादी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी माहितीच्या अधिकाराचा उपयोग करून जनहित डोळ्यासमोर ठेऊन अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणली. परंतु भ्रष्ट व्यक्तीला जेलमध्ये पाठविण्याची, कठोर शिक्षा करण्याची शक्ती माहिती अधिकार कायद्यामध्ये नाही. त्यामुळे अनेक भ्रष्ट पुढारी, भ्रष्ट अधिकारी, कर्मचारी, बडे भांडवलदार सहीसलामत सुटू लागले. अशा भ्रष्टांना आजन्म कारावासाची (जन्मठेप) शिक्षा करणे. जेवढ्या रक्कमेचा भ्रष्टाचार केला आहे ती रक्कम, त्यांची संपत्ती जप्त करून, विक्री करणे व सरकारी तिजोरीत जमा करण्याची कुवत सशक्त जनलोकपाल विधेयकात आहे. त्यासाठी केंद्रात जनलोकपाल व राज्यात लोकआयुक्त करणे व नागरिकांच्या सनदेचा समावेश करणे या मुख्य मागण्या सरकारने देशातील ऐतिहासिक, अहिंसक जनतेच्या लोकलढ्यामुळे तत्त्वत: मंजूर केल्या. परंतु सरकारने लोकसभेत मंजूर केलेल्या लोकपाल विधेयकात या बाबीचा समावेश केला नाही. त्यामुळे सरकारने जनतेचा विश्वासघात केला आहे. सशक्त जनलोकपाल विधेयकाच्या मागणीसाठी हा लोकलढा चालूच ठेवावा लागेल.

भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी सशक्त जनलोकपाल विधेयकासाठीच्या या लढ्याची ज्योत आम्ही पेटवली. युवकांनी त्यांचे मशालीत रूपांतर केले. संपूर्ण देश जागा झाला. जनलोकपाल विधेयकामुळे देशातील संपूर्ण भ्रष्टाचार दूर होईल असे नाही. पण काही प्रमाणात निश्चित आळा बसेल. प्रबोधनाची चळवळ आहे. व्यवस्था परिवर्तनाचा लढा आहे. यासाठी, सतत जनशक्तीच्या बळावर लढे लढावे लागतील. त्यासाठी युवकांना माझे आवाहन आहे, 'इस मशाल को बुझने मत देना, यह जलती ही रहनी चाहिए।'

जनलोकपाल विधेयक या विषयावर दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई-भ्रष्टाचार मुक्त भारतासाठी - जनलोकपाल हे डॉ. बालाजी कोंपलवार यांनी साध्या सरळ व सोप्या भाषेत पुस्तक लिहिले. यात काही मर्यादाही असतील परंतु जनतेला व कार्यकर्त्यांना यामुळे निश्चित माहिती मिळेल असा विश्वास वाटतो. त्यांच्या या प्रयत्नास शुभेच्छा.....!

कि. बा. हजारे (अण्णा)

**– कि. बा. हजारे (अण्णा)**

# मनोगत

**आ**ज भ्रष्टाचाराने सार्वत्रिक रूप धारण केले आहे. भ्रष्ट व्यवस्थेमुळे सामान्य माणूस हतबल झाला आहे. त्याचे जगणे कठीण झाले आहे. ऋषी व कृषी संस्कृतीचा वारसा असलेल्या शाहू, फुले, म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा वसा घेतलेल्या देशात स्वातंत्र्यानंतर नवीन चंगळवादी ऊर्वशी संस्कृती उदयाला येत आहे. स्वातंत्र्याच्या ६३ वर्षानंतरही लोकशाहीऐवजी धनदांडगेशाहीस मोठ्या प्रमाणावर प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. स्वैराचार, दुराचार व भ्रष्टाचारामुळे भारतीय संविधानातील आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक समता प्रस्थापित करण्याच्या तत्वास काळिमा फासली जात आहे.

देशात सात हजाराहून अधिक कायदे आहेत. या सर्व कायद्यांची अंमलबजावणी होत नाही. देशात व राज्यात सशक्त कायदे करावेत व त्याची योग्य अंमलबजावणी व्हावी यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अनेक आंदोलने केली. देशाला माहितीचा अधिकार मिळवून दिला. माहिती अधिकारामुळे जनसामान्यांच्या हाती अमोघ अस्त्र आले. कर्मचारी, उच्च अधिकारी, बडे भांडवलदार व प्रस्थापित राजकीय पुढारी यांची अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली. परंतु या भ्रष्ट व्यक्तींना पुढे कठोर शासन करण्यासाठी विद्यमान सशक्त कायदा नाही. विद्यमान कायद्यातील मर्यादा व न्यायप्रक्रियेतील विलंबामुळे भ्रष्टाचारी सही सलामत बाहेर पडतात. अशा भ्रष्ट व्यक्तींना कठोर शिक्षा व्हावी. सामान्यातील सामान्य व्यक्तीला योग्य वेळी न्याय मिळावा. सुदृढ व सशक्त लोकशाहीसाठी जनलोकपाल विधेयकाची गरज वेळोवेळी मा. अण्णा हजारे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

भारतात लोकशाही पद्धतीने कायद्यांवर आधारलेले राज्य साकार करणे हा भारतीय संविधानाचा हेतू आहे. तो साध्य करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली जनलोकपाल विधेयक मंजूर करण्यासाठी देशात ऐतिहासिक लोकलढा उभा राहिला. संपूर्ण देश जागृत झाला. स्वातंत्र्याच्या ६४ वर्षानंतर एखाद्या राष्ट्रीय प्रश्नावर सत्तेबाहेर असलेल्या किंबहुना कोणतीही सत्ता नसलेल्या गांधीवादी अण्णा हजारेसारख्या एका नि:स्पृह समाजसेवकांचं नेतृत्व स्वीकारून भारतातील बहुसंख्य जनता रस्त्यावर उतरली. तब्बल १२ दिवस ऐतिहासिक असा अहिंसात्मक लोकलढा निर्माण झाला. जनतेला आपला वाटणारा एक जननायक मिळाल्याचा आनंद

होतो. परिवर्तनाची पहाट होत असल्याचा आशावाद दृढ होऊ लागतो. ही एक चांगली सुरुवात झाली आहे.

देशातील बुद्धिवंतांनी, राजकीय नेत्यांनी अण्णांच्या आंदोलनांवर टीका केली, व्यक्तिगत, अत्यंत खालच्या पातळीवरही टीका झाली. चळवळीमध्ये काही मर्यादा असतीलही. चळवळीच्या मर्यादा स्पष्ट करणाऱ्या टीका पुढे व्यक्तिवादी बनत गेल्या. त्यामुळे जनलोकपालचा मुख्य मुद्दा बाजूला पडतो. अशी भीती वाटू लागली. लोकपालास जातवर्गीय, धार्मिक रंग चढवले जाऊ लागले. येथील प्रस्थापितांनी फोडा व झोडा नीतीचा अवलंब केला. त्यामुळे अनेक वर्षानंतर जनलोकपालाच्या निमित्ताने व्यवस्था परिवर्तनाच्या विरुद्ध उभी राहिलेली एक लोकचळवळ मागे जाणार नाही. यासाठी या देशातील युवक, महिला व प्रत्येक नागरिकांनी लोकपाल हा व्यवस्था परिवर्तनाच्या लढाईतील एक टप्पा आहे हे समजून या लोकलढ्यात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. यासाठी लोकपालाच्या संबंधी मा. अण्णांचा सहकारी म्हणून या लोकचळवळीत सहभाग घेतला. वेळोवेळी अण्णांशी झालेल्या चर्चेतून, अनुभवातून कार्यकर्त्यांना व सामान्य जनतेला लोकपाल विधेयकाची तोंडओळख व्हावी म्हणून हा छोटासा प्रयत्न केला आहे.

जनलोकपाल हे पुस्तकरूपाने येण्यासाठी आदरणीय अण्णा हजारे, अल्लाउद्दीन शेख, अशोक सब्बन, ज्येष्ठ संपादक सुधाकरराव डोईफोडे, डॉ. व्यंकटेश काब्दे, श्री. सदाशिवराव पाटील, प्रा. डॉ. लक्ष्मण कोत्तापले, ॲड्. गोविंद कोत्तावार, दत्ता अनंतवार, डॉ. कुंभारे, दत्तात्रय पप्पुलवाड, प्राचार्य डॉ. एम. जी. मेहत्रे, प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले, उपप्राचार्य डॉ. एच. आर. भेलोंडे, डॉ. तसनीम पटेल, डॉ. अशोक सिद्देवाड, अनिल शर्मा, सुरेश पठारे, दत्ता आवारी, मोतीराम पाटील क्षीरसागर, ॲड्. धोंडीबा पवार, पुरूषोत्तम अमिलकंठवार, स्वामी आर. एन., मोतीराम पवार, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. श्रीराम गव्हाणे, संतोष घोंगडे, प्रा. आनंदा थोरात, डॉ. बाजीराव वडवळे, प्रा. व्ही. टी. दहिफळे, पत्रकार जी. पी. मिसाळे, माझे वडील धोंडीबा कोंपलवार, आई सौ. पार्वतीबाई कोंपलवार, सुलोचनाबाई अलसटवार, माझी पत्नी डॉ. ललीता अलसटवार, सौ. शशिकला नरतावाड, चिनागकृष्णा, कु. जयलक्ष्मी, कु. गंगोत्री, चि. शौनक, प्रा. कल्पना जाधव, सत्यशिला कल्हाळीकर व जिल्ह्यातील संघटनेचे सर्व कार्यकर्ते आदींनी व इतर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या हितचिंतकांचे सहकार्य विसरता येणार नाही.

**- बालाजी कोंपलवार**

प्रकरण : पहिले

# जन लोकपाल : ऐतिहासिक पार्श्वभूमी

## पार्श्वभूमी :

**जा**गतिकीकरणानंतर देशातील हजारो वर्षांपासून उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा व संसाधनांचा अमर्याद वापर केल्याने देशाचा विकास झाला हे नाकारता येत नाही. दरडोई उत्पन्न वाढले. आर्थिक विकासाचा दर वाढला. देशी व विदेशी गुंतवणुकीत वाढ झाली. २०२० मध्ये जगात आमचा इंडिया आर्थिक महासत्ता बनेलही, परंतु मूठभर धनिकांचा **''शायनिंग आयपीएल इंडिया''** तर दुसरीकडे कोट्यावधी भूमिहीन, धनहीन, शेतकरी कामगारांचा **''बीपीएल भारत''** असे विसंगतीने भरलेले चित्र असणार आहे. पूज्य विनोबाच्या मते साधनांचा विकास झाला. माणसांचा विकास नाही.

आज लोकशाहीच्या नावाखाली भांडवलशाहीचे समर्थन करणारी व्यवस्था आली आहे. बड्या देशी व विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी कारखाने काढले. कुटिर, ग्रामीण, लघुउद्योग नामशेष झाले. सरकारी, खाजगी व संघटित, असंघटित क्षेत्रातील कोट्यावधी लोकांना रोजगारास मुकावे लागले आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तूंची महागाई ३० ते ८० पटींनी वाढली आहे. पायाभूत क्षेत्रात मोठी व दीर्घकालीन गुंतवणूक करण्याची जबाबदारी सरकारवर सोपवून, देशातील नैसर्गिक व सार्वजनिक संपत्तीचा वारेमाप वापर करून झटपट नफ्याची क्षेत्रे खाजगी उद्योजकांनी पटकावली आहेत. देशातील अब्जाधीशांची संख्या वाढत आहे. सहकार सम्राट, मद्यसम्राट, साखर सम्राट, शिक्षण सम्राट, उद्योग सम्राट, राजकीय सम्राटांनी देशातील साधनसंपत्तीवर स्वामित्व निर्माण केले आहे. तर दुसरीकडे योजना व अनुदानाच्या नावाखाली २५ टक्के सवलती देऊन शंभर टक्के हक्क नाकारले जाणारी व्यवस्था निर्माण केली. इतरांसाठी व देशासाठी

लढण्याकरिता जिवाची बाजी लावून उभी राहणारी श्रमजीवी शक्ती सवलतीत अडकवून ठेवली आहे.

सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या कृषिक्षेत्रातील अर्थसंकल्पीय तरतूद केवळ २.५ टक्के तर सिंचनासाठी ०.३५ टक्के इतकी नाममात्र तरतूद होते, तर दूरसंचार क्षेत्रासाठी मात्र पाच टक्के तरतूद केली जाते. त्यामुळे शंभर कोटी लोकांकडे मोबाईल आले. कोट्यावधी दुचाकीचे उत्पादन, मोटार गाड्यांचे उत्पादनात वाढ, चैनीच्या व चंगळवादी वस्तूच्या उत्पादनात वाढ, शहरातील चकचकीत विमानतळ, फाईव्ह स्टार हॉटेल्स, ई-शॉप, ई-बँकिंग, ई-मार्केटींग, देशी विदेशी मालाची रेलचेल असलेली मॉल्स, इ.मुळे भौतिक प्रगती झाली. मात्र उन्नती झाली नाही. देशाला सर्वांचे हित साधणाऱ्या चिरंतन विकासाची गरज आहे.

आज भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवणाऱ्या सीबीआय, व्हिजीलंस कमीटी, लोकायुक्तासारख्या यंत्रणा आहेत. परंतु या स्वायत्त नसून त्या सरकारच्या दावणीला बांधल्या गेल्या आहेत. त्यामुळे जनतेचा त्यांच्यावरचा विश्वास उडलेला आहे. म्हणून घोटाळेबाजांना जन्मठेप, फाशीसारख्या सजा देणारी, सरकारच्या नियंत्रणाबाहेर काम करणारी निष्पक्ष संस्था निर्माण केल्याशिवाय भ्रष्टाचाराला आळा बसणार नाही. यासाठी सरकारचे नियंत्रण नसणारी स्वतंत्र-स्वायत्त असणारी लोकपालासारखी संस्था कायद्याच्या आधाराने निर्माण करावी. यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली ज्येष्ठ विधितज्ज्ञ शांती भूषण, अरविंद केजरीवाल, किरण बेदी, न्या. संतोष हेगडे, प्रशांत भूषण, इ.च्या सहकार्याने लोकपालासाठी लोकलढा उभारण्यात आला. त्यांचे रूपांतर ऐतिहासिक अशा जनचळवळीत झाले.

## लोकपालाचा इतिहास :

स्कॅन्डिनेव्हियन देशातील अम्बुडसूमन या संस्थेशी साधर्म्य सांगणारी भारतीय व्यवस्थेतील संस्था म्हणजे लोकपाल होय. सर्वप्रथम स्वीडनमध्ये १८०९ साली लोकपाल संस्था उदयास आली. या संस्थेचा पुढे २० व्या शतकात अनेक देशांनी स्वीकार केला. मनमानी स्वरूपाच्या प्रशासकीय यंत्रणेविरुद्ध उदयाला येऊ पाहणाऱ्या लोकशाही शासन यंत्रणेचे प्रतीकात्मक रूप म्हणून लोकपाल ही संस्था नावारूपास येत आहे.

लोकपाल हा शब्द 'अम्बुडसूमन' या शब्दाचे भारतीय भाषांतर आहे. अम्बुडस्मन हा मूळ स्वीडिश शब्द असून त्याचा अर्थ प्रशासकीय व न्यायिक कृतीबाबतच्या तक्रारीची हाताळणी करण्यासाठी कायदेमंडळाद्वारे नियुक्त केलेला अधिकारी होय. सद्य:स्थितीत शासनाच्या कार्यकारी व न्यायिक शाखेसंबंधीच्या उच्चस्तरीय तक्रारीची दखल घेण्याचे कार्य लोकपाल ही संस्था करते.

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकानंतर भारतीय राजकीय व्यवस्थेत भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली. पुढे भ्रष्टाचाराची प्रकरणे वाढल्याने, भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सशक्त लोकपाल संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय सरकारने घेतला व १९६६ साली स्थापन केलेल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने केंद्रीय पातळीवर लोकपाल आणि राज्य पातळीवर लोकायुक्त पद निर्माण करण्याची शिफारस केली.

**उद्देश :**

१) लोकांना जलद आणि किफायतशीर स्वरूपात न्याय मिळवून देणे.

२) शासन, प्रशासन यंत्रणेतील भ्रष्ट, बेकायदेशीर व गैरप्रकार तसेच मनमानी निर्णयपद्धतीस प्रतिबंध घालणे.

३) स्वच्छ, पारदर्शक, जबाबदार व लोकशाही शासन-प्रशासन व्यवस्था निर्माण करणे.

भारतात सर्वप्रथम १९६८ साली श्री मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखालील प्रशासकीय सुधारणा समितीने केलेल्या शिफारशीनुसार हे विधेयक लोकपाल आणि लोकायुक्त यांच्या स्थापनेसाठी लोकसभेत सादर करण्यात आले. लोकसभेत ते मंजूर करण्यात आले, परंतु लोकसभा विसर्जित झाल्यावर ते विधेयकही संपले.

१९७१ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात भारत सरकारने प्रशासकीय भ्रष्टाचार रोखण्यासाठी राज्यांकरिता लोकायुक्त व केंद्रासाठी लोकपालाची स्थापना करण्यासाठी विधेयक संसदेत सादर करण्यात आले होते. त्यानुसार लोकायुक्त विधेयक मंजूर करण्यात आले, परंतु लोकपाल विधेयक पारित होऊ शकले नाही. १९७७ साली तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या कार्यकाळात हे विधेयक पुन्हा सादर करण्यात आले. या विधेयकावरील कारवाई सुरू असतानाच लोकसभा विसर्जित झाल्याने हे विधेयक पुन्हा मंजूर होऊ शकले नाही.

१९८५ साली पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्यकाळात पुन्हा हे विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त संसदीय समितीने या विधेयकावर विचारविनिमय करण्यासाठी २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशाचा दौरा केला. या समितीचा कार्यकाळ आठ वेळा वाढविण्यात आला. समितीने निर्धारित वेळेपेक्षा तीन वर्षे जास्त कामकाज केले, तरीही हे विधेयक मंजूर न होता नोव्हेंबर १९८८ मध्ये मागे घेण्यात आले.

१९८९ मध्ये सत्तेत आलेले पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांचे सरकार, १९९६ साली पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे सरकार, १९९७-९८ मधील पंतप्रधान इन्द्रकुमार गुजराल यांचे सरकार व १९९८ ते २००४ या कालावधीत असलेले पंतप्रधान अटल बिहारी बाजपेयी यांचे सरकार, अशा बिगर काँग्रेसी सरकारांनाही लोकपाल विधेयक पारित करण्यास अपयश आले हे वास्तव कसे विसरता येईल. अशा सशक्त लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले एक लोकोपयोगी विधेयक सत्ताधारी व विरोधी पक्ष यांच्या नाकर्तेपणामुळेच ४५ वर्षे रखडत राहिले.

## लढा उभारण्याचा निर्धार :

भ्रष्टाचाराने देश पोखरून निघाला आहे. भ्रष्टाचाराचे सार्वत्रीकरण झाले आहे. ते एक सार्वजनिक संकट बनले आहे. सर्वसामान्य, गरीब माणूस अतिरेकी भ्रष्टाचारामुळे होरपळून निघत आहे. तो हतबल झाला आहे. त्याच्या मनात भ्रष्टाचाराविरोधातील प्रचंड असंतोष धगधगत आहे, त्यामुळे भ्रष्टाचार हा केवळ चर्चेचा, चिंतेचा किंवा चिंतनाचाही नव्हे; तर प्रत्यक्षपणे कृतीची गरज असलेला विषय झाला आहे. भ्रष्टाचारमुक्त भारत करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी 'करेंगे या मरेंगे' या राष्ट्रीय बाण्याने दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईची देशबांधवांना हाक दिली. देशपातळीवर अण्णा हजारे, अरविंद केजरीवाल, किरण बेदी, न्या. संतोष हेगडे, ज्येष्ठ विधिज्ञ शांतीभूषण, ॲड्. प्रशांत भूषण इ. सह नागरी समिती प्रत्यक्ष कार्याला लागली. नांदेड येथे २३ फेब्रुवारी, २०११ रोजी देशातील पहिली ऐतिहासिक जाहीर सभा झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे होते तर यावेळी अण्णा हजारे, किरण बेदी व अरविंद केजरीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत देशातील लोकपाल संबंधाने पहिली ऐतिहासिक जाहीर सभा घेण्याचे जिल्हाध्यक्ष व राज्य समिती विश्वस्त

हिंसेला घाबरलेल्या जगाला अहिंसेची गरज - **अण्णा हजारे**

म्हणून मला संधी मिळाली. श्री गुरुगोविंदसिंहजी यांच्या बलिदानाने पवित्र झालेल्या या संतांच्या भूमीत अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचारमुक्त भारत व सुदृढ लोकशाहीसाठी जनलोकपाल विधेयक मंजूर करावे यासाठी देशव्यापी लोकलढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.

ज्येष्ठ पत्रकार सुधाकरराव डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ सर्वोदयी नेते गंगाप्रसादजी अग्रवाल व अण्णा हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाडा पातळीवरील एक हजार युवकांच्या उपस्थितीत युवा प्रबोधन कार्यशाळा कै. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड येथे घेऊन भ्रष्टाचार मुक्त भारतासाठी सशक्त लोकपालाची गरज असल्याचा घंटानाद करण्यात आला. त्याला उपस्थित युवकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. नांदेड येथील या ऐतिहासिक कार्यक्रमातून जनलोकपालाच्या लढ्यास प्रारंभ झाला.

**प्रकरण : दुसरे**

# जन लोकपाल बिल : खरं काय ? खोटं काय ?

**स**र्व भारतीय जनतेच्यावतीने टीम अण्णाचे अरविंद केजरीवाल, जस्टीस संतोष हेगडे, प्रशांत भूषण, किरण बेदी, जे. एम. लिंगडोह इ. तज्ञांनी तयार केलेले जनतेचे जनलोकपाल बिल व सरकारचे लोकपाल बिल याची तुलना दर्शविणारा तपशील पुढीलप्रमाणे आहे. ते वाचून खरे काय? व खोटे काय? ते जनतेनेच ठरवावे.

**जनलोकपाल विधेयकाची ठराविक वैशिष्ट्ये :**

१. केंद्रात लोकपाल आणि राज्यात लोकायुक्ताची नियुक्ती करण्यात येईल.

२. लोकपाल या संस्थेस निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे स्वायत्तता (स्वतंत्र) असेल. कोणीही नेता किंवा सरकारी अधिकारी तपास प्रक्रियेत अडथळा आणू शकणार नाही.

३. आज भ्रष्टाचार विरोधातील खटले २५ ते ५० वर्षापर्यंतही प्रलंबित राहतात. लोकपालामुळे भ्रष्टाचार विरोधातील खटले दीर्घ काळ प्रलंबित राहणार नाहीत. कितीही मोठे भ्रष्टाचाराचे प्रकरण असले तरीही ते एका वर्षात निकाली काढले जाईल आणि दोषी आढळल्यास कितीही मोठा नेता, अधिकारी असला तरीही त्यांना दोन वर्षाचे आत तुरुंगात जावेच लागेल.

४. भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध झाल्यावर भ्रष्टाचारी व्यक्तीमुळे झालेले सरकारी नुकसान संबंधित व्यक्तीकडून भरून घेण्यात येईल.

५. एखाद्या नागरिकाचे कोणतेही काम ठराविक मुदतीत पूर्ण झाले नाही तर तो लोकपाल यंत्रणेकडे तक्रार करेल. संबंधित अधिकाऱ्याला त्यासाठी ही संस्था

दंड ठोठावेल. दंडाची ही रक्कम तक्रार करणाऱ्या व्यक्तीला नुकसान भरपाई म्हणून देण्यात येईल.

६. सामान्य जनतेला त्याचे रेशनकार्ड, उत्पन्नाचे, जातीचे, रहिवाशी, मतदान ओळखपत्र, बांधकाम परवाना योग्य वेळेत मिळत नसतील तर त्यासाठी ते लोकपालाकडे तक्रार करू शकतात आणि ती प्रमाणपत्रे एक महिन्याच्या आत मिळतील.

७. कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराची तक्रार लोकपालाकडे करता येईल. उदा. शासकीय वितरण व्यवस्थेतील धान्याचा काळा बाजार, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर पंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, राज्य किंवा केंद्र सरकारच्या कार्यालयातील निधीचा गैरवापर किंवा दुरुपयोग इ.

८. शासन भ्रष्टाचारी आणि दुबळ्या व्यक्तीला लोकपाल सदस्य बनविणार नाही का? हे शक्य होणार नाही. कारण लोकपाल सदस्याची निवड न्यायमूर्ती, नागरिक आणि वैधानिक संस्थांच्या वतीने केली जाईल. यांची नियुक्ती पारदर्शक पद्धतीने आणि लोकांच्या सहभागानुसार केली जाईल. नेत्यांच्या मर्जीनुसार नाही.

९. लोकपाल संस्थेतच काम करणारे अधिकारी भ्रष्टाचारी असल्याचे आढळून आले तर...? लोकपाल आणि लोकायुक्ताचे कामकाज पूर्णपणे पारदर्शी स्वरूपाचे असेल. लोकपालमधील कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी दोन महिन्याच्या आत पूर्ण करावी लागेल. त्यानंतर त्याला निलंबित करता येईल.

१०. स्वत: लोकपालच भ्रष्ट झाला तर...? दाद कोणाकडे मागायची...? लोकपाल हा जरी सर्वशक्तिमान असला तरी, लोकपालाची नऊ लोकांची समिती असणार आहे. अति महत्वाच्या व मोठ्या प्रकरणात सर्वानुमते निर्णय घेतला जाईल. लोकपालाचे खंडपीठही असेल. लोकपालाचे सरकारऐवजी थेट जनतेच्या प्रती

युवकांनी जीवनाचं ध्येय निश्चित करावे. - **अण्णा हजारे**

दायित्व असणार आहे. लोकपाल थेट जनतेलाच जबाबदार असणार आहे. त्यामुळे देशातील कोणताही सामान्य नागरिक लोकपालाचा अध्यक्ष (प्रमुख) किंवा लोकपालाच्या सदस्यांना त्या पदावरून दूर करण्यासाठी पुराव्यासह सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करू शकेल. तीन किंवा तीनहून अधिक न्यायाधीशांचे खंडपीठ नियुक्त करून त्यांच्या समोर या अर्जाची सुनावणी केली जाईल. संबंधित सदस्य किंवा अध्यक्ष दोषी आढळल्यास सर्वोच्च न्यायालयाने केलेली शिफारस पंतप्रधान तातडीने राष्ट्रपतीकडे पाठवतील आणि राष्ट्रपती एका महिन्याच्या आत संबंधित सदस्य किंवा अध्यक्षाला पदावरून दूर करण्याचे आदेश काढतील.

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
|---|---|---|
| **पंतप्रधान**<br>लोकपालाकडे पंतप्रधानांच्या विरोधातील भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या चौकशी करण्याची शक्ती असावी. मात्र विना कारण आणि निराधार तक्रारी रोखण्यासाठी पुरेशी व्यवस्था असावी. | पंतप्रधानांची चौकशी लोकपालांच्या कक्षेबाहेर | विद्यमान व्यवस्थेत पंतप्रधानांची चौकशी भ्रष्टाचार विरोधी कायद्याअंतर्गत केली जाऊ शकते. स्वायत्त आणि निष्पक्ष लोकपालांकडून पंतप्रधानाविरुद्धच्या तक्रारीची चौकशी होण्यापेक्षा आपल्या अखत्यारीत येणाऱ्या सी.बी. आय.कडेच ती रहावी अशी सरकारची इच्छा आहे. |
| **न्यायपालिका**<br>न्यायपालिकेच्या विरोधातील भ्रष्टाचाराची चौकशी लोकपालांच्या कक्षेत असावी. मात्र विनाकारण आणि निराधार तक्रारी रोखण्यासाठी पुरेशी व्यवस्था. | न्यायपालिकेची चौकशी लोकपालांच्या कक्षेबाहेर | सरकार न्यायालयांना ज्युडिशियल अकाउंटेबिलीटी कायद्याच्या कक्षेत आणू इच्छिते. यात न्यायाधीशांविरुद्ध येणाऱ्या भ्रष्टाचाराच्या चौकशीची परवानगी एक त्रिसदस्यीय समिती देईल. (या तीन सदस्यांपैकी दोन सदस्य त्याच न्यायालयाचे विद्यमान न्यायाधीश व एक सदस्य त्याच न्यायालयातील एक निवृत्त मुख्य न्यायाधीश असतील.) या विधेयकात आणखी बऱ्याच त्रुटी आहेत. न्यायाधीशांना या कायद्याच्या कक्षेत आणण्यास आमची हरकत नाही, मात्र हा कायदा कडक असावा आणि तो लोकपाल कायद्याच्या बरोबरच मंजूर करावा. न्याय पालिका भ्रष्टाचारापासून मुक्त करण्याची बाब लांबणीवर टाकणे योग्य नाही. |

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
|---|---|---|
| **खासदार**<br>कोणाही खासदारावर लाच घेऊन मतदान केल्याचा किंवा प्रश्न विचारल्याचा आरोप झाल्यास त्यांची चौकशी लोकपालांच्या कक्षेत असावी. | सरकारने खासदारांना लोकपालाच्या कक्षेबाहेर ठेवले आहे. | लाच घेऊन संसदेत प्रश्न विचारणे किंवा मतदान करणे या बाबी लोकशाहीचा पाया ठिसूळ करू शकतात. इतक्या गंभीर अपराधाची चौकशी निष्पक्ष यंत्रणेच्या बाहेर ठेवून सरकार लाच घेऊन संसदेत बोलण्याचा परवाना खासदारांना देत आहे. |
| **सामान्य जनतेच्या तक्रारीचे निवारण**<br>एखाद्या अधिकाऱ्याने सामान्य नागरिकाचे काम नागरिकांच्या सनदेमध्ये दिलेल्या मुदतीत केले नाही तर लोकपाल त्याला दंड करू शकतात व त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचा खटला चालवू शकतात. | नागरिकांच्या सनदेतील मुदतीत काम न केल्यास अधिकाऱ्याला कोणतीही शिक्षा नाही. | २३ मे रोजी झालेल्या बैठकीत शासनाने हा मुद्दा मान्य केला होता परंतु नंतर सरकारने भूमिका बदलली. |
| **सी.बी.आय.**<br>सी.बी.आय.ची भ्रष्टाचारविरोधी शाखा लोकपालाच्या कक्षेत असावी. | सरकार सी.बी.आय.वर आपले वर्चस्व ठेवू इच्छिते | शासनाकडून सी.बी.आय.चा गैरवापर होतो. नुकतेच शासनाने सी.बी.आय.ला माहिती अधिकाराच्या कक्षेतून वगळले, त्यामुळे आता सी.बी.आय.मधील भ्रष्टाचार वाढण्याची शक्यता आहे. जोपर्यंत सी.बी.आय.वर शासनाचे नियंत्रण आहे तोपर्यंत तिथे भ्रष्टाचार होत राहणार. |

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
|---|---|---|
| **लोकपालाची निवड**<br>१) विस्तृत अशी निवड समिती ज्यामध्ये पंतप्रधान, विरोधी पक्ष नेता, दोन उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, दोन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, मुख्य निवडणूक आयुक्त, महालेखापाल असतील.<br>२) निवड समितीसाठी लोकपालाच्या उमेदवारांची पहिली यादी तयार करण्यासाठी एक संवैधानिक शोध समिती असेल. या समितीवर निवड समितीचे नियंत्रण असेल.<br>३) संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक व जनतेच्या सहभागाने होईल. | १) निवड समितीच्या दहा सदस्यांपैकी पाच सत्ताधारी पक्षाचे सदस्य असतील, दहापैकी एकूण दहा सदस्य राजकीय पक्षांशी संबंधित असतील.<br>२) शोध समितीची निवड, निवड समिती करेल.<br>३) लोकपालाच्या उमेदवारासाठी निवड प्रक्रियाच नसेल. | १) शासनाचा प्रस्ताव लोकपाल पदावरील सदस्य व अध्यक्ष हे आपल्याच मर्जीतील असावेत अशा प्रकारचा आहे. खरे तर ७ मे च्या बैठकीत शासनाने निवड प्रक्रिया ठेवण्याचे मान्य केले होते, मात्र या समितीच्या रचनेवरून मतभेद होते. नंतर सरकारने घूमजाव केल्याने आम्हाला आश्चर्य वाटले. लोकपालपदी कमकुवत, अप्रामाणिक आणि डळमळीत व्यक्ती यावी यांची संपूर्ण खबरदारी शासन घेत आहे.<br>२) शोध समितीची निवड, निवड समिती करेल. याचाच अर्थ शोध समिती, निवड समितीच्या हातातील बाहुले असेल.<br>३) लोकपाल पदाच्या उमेदवारीसाठी निवड प्रक्रियाच नसेल, म्हणजे निवड समिती ठरवेल ते अंतिम असेल. |
| **लोकपाल कोणाला उत्तरदायी असेल ?**<br>लोकपाल जनतेला उत्तरदायी असतील, लोकपाल बाबत सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागून नागरिक त्यांना हटविण्याची मागणी करू शकतात. | लोकपाल शासनाला उत्तरदायी असेल. फक्त शासनच त्याला पदावरून हटवू शकेल. | शासनाच्याच वरिष्ठतम अधिकाऱ्यांच्या गैरप्रकारची चौकशी करणाऱ्या लोकपालाची नियुक्ती आणि त्यांना हटविणे या बाबी शासनाच्याच हातात राहिल्यास बिकट परिस्थिती निर्माण होईल. |
| **लोकपालांच्या कर्मचाऱ्यांची निवड**<br>लोकपालांच्या कर्मचाऱ्यांविरुद्धच्या तक्रारींची चौकशी स्वायत्त यंत्रणेमार्फत (पाच न्यायाधीशांची समिती) करेल. | आपल्या कर्मचाऱ्यांच्या चौकशीचे अधिकार लोकपालाकडे. | आपल्या कर्मचाऱ्यांच्या चौकशीचे अधिकार लोकपालाकडे राहिल्यास एकाधिकारशाही वाढीला लागेल आणि त्यांच्या कामकाजात विरोधाभास निर्माण होईल. |

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
| --- | --- | --- |
| **चौकशीची पद्धत** फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार इतर कोणत्याही फौजदारी प्रकरणात चौकशीची जशी पद्धत असते तशीच ती येथेही असेल. प्राथमिक चौकशीनंतर फिर्याद दाखल केली जाईल, नंतर तपास होईल व न्यायालयात खटला दाखल केला जाईल. | सरकार फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये बदल करणार आहे. त्यात आरोपींना विशेष संरक्षण दिले जाणार आहे. प्राथमिक चौकशीनंतर सबळ पुरावे दाखवून त्यांच्या विरुद्ध फिर्याद का दाखल करू नये अशी विचारणा केली जाईल. तपास पूर्ण झाल्यानंतर पुन्हा संपूर्ण पुरावा आरोपीला दाखल केला जाऊ नये याबाबत त्यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले जाईल. तपासणी दरम्यान आणखी एखाद्या नवीन व्यक्तीविरुद्ध तपास करण्याची वेळ आल्यास त्याला सुद्धा पुरावा दाखवून सुनावणीची संधी देण्यात येईल. | सरकारने सुचवलेली तपास प्रक्रिया अस्तित्वात आल्यास प्रत्येक पातळीवर तडजोडीची शक्यता आहे. तपासाच्या प्रत्येक पायरीवर आरोपीला पुरावा दाखवला तर तपास प्रक्रियेवर तर त्याचा परिणाम होईलच परंतु प्रकरण उघड करणाऱ्यांची व साक्षीदारांची नावे समजल्याने त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होईल. गुन्ह्याच्या तपासाची अशी विनोदी प्रक्रिया जगात इतरत्र कोठे असेल, असे वाटत नाही. अशा प्रकारे तपास केल्यास ती त्या प्रत्येक प्रकरणाची भृणहत्या ठरेल. |
| **कनिष्ठ स्तरावरील अधिकारी** फौजदारी प्रक्रिया संहितेतील लोक सेवकाच्या व्याख्येतील प्रत्येकजण यास चौकशीच्या कक्षेत असेल. यात कनिष्ठ स्तरापासून सर्व कर्मचारी व अधिकारी असतील. | फक्त अ वर्ग अधिकाऱ्यांचाच यात समावेश असेल. | कनिष्ठ स्तरावरील बाबींना चौकशीच्या बाहेर ठेवण्याची शासनाची भूमिका अनाकलनीय आहे. याचे कारण कदाचित सी.बी.आय. आपल्या अखत्यारीत ठेवणे हेच असू शकेल. सर्वच अधिकारी लोकपालाच्या कक्षेत आले तर सी.बी.आय.ला आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्याचे सरकारला कारणच उरणार नाही. |
| **लोकायुक्त** या विधेयकातच राज्यांमध्ये लोकायुक्तांचे प्रस्ताव असावे आणि केंद्रातीलच लोकपालाप्रमाणे राज्यातील लोकायुक्ताला स्वायत्ततेचे अधिकार असावेत. | हे विधेयक फक्त लोकपालासाठीच असते. राज्यात लोकायुक्त नेमण्यास सरकार तयार नाही. | प्रणव मुखर्जी यांच्या म्हणण्यानुसार काही मुख्यमंत्र्यांनी याच विधेयकाद्वारे लोकायुक्तांच्या नेमणुकीच्या प्रस्तावास विरोध केला आहे. इथे मुखर्जी यांना आठवण करून देण्यात आली की, केंद्रीय माहिती अधिकार या एकाच |

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
|---|---|---|
| | | कायद्यानुसार केंद्र आणि राज्यात माहिती आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. ते काही उत्तर देऊ शकले नाही. |
| **भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्यांना संरक्षण** भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्या कार्यकर्त्यांवर जे हल्ले होतात ते रोखण्यासाठी लोकपाल भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्यांना, साक्षीदारांना आणि भ्रष्टाचाराने पीडित लोकांना संरक्षण देतील. | याबाबत काहीही म्हटलेले नाही. | सरकारचे म्हणणे आहे भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र कायदा बनवला जात आहे, परंतु तो कायदा इतका कमकुवत आहे की, संसदेच्या स्थायी समितीनेही त्याला निरुपयोगी म्हटले आहे. २३ मे च्या बैठकीत ठरले होते की, एका वेगळ्या कायद्यान्वये लोकपालांकडे भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्यांना संरक्षण देण्याचे अधिकार दिले जातील. त्या कायद्याविषयी व त्यातील सुधारणांविषयी चर्चा संयुक्त समिती-तच होईल, परंतु असे घडले नाही. |
| **उच्च न्यायालयात खास खंडपीठे** भ्रष्टाचाराच्या खटल्यातील अपीलांची जलद सुनावणी करण्यासाठी उच्च न्यायालयांमध्ये खास खंडपीठाचा प्रस्ताव | काहीही योजना नाही. | एका अभ्यासानुसार भ्रष्टाचाराच्या एका खटल्याचा निकाल लागायला किमान पंचवीस वर्षे लागतात. यावर उपाय शोधलाच पाहिजे. |
| **फौजदारी प्रक्रिया संहिता** अनुभव असा आहे की, भ्रष्टाचाराच्या खटल्याच्या सुनावणीस बराच कालावधी लागतो आणि असे खटले बहुतेक वेळा सरकारी यंत्रणा हरतातच, असे का होते? वारंवार घेतल्या जाणाऱ्या स्थगितीला आळा घालण्यासाठी काही सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. | काहीही समावेश नाही. | भ्रष्ट अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचा अधिकार त्याच खात्याच्या मंत्र्यांकडे असण्यापेक्षा तटस्थ लोकपालांकडे असणे अधिक हितावह आहे. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, भ्रष्ट अधिकाऱ्याला काढून टाकण्यापेक्षा अशा अधिकाऱ्याला बक्षीस देण्यातच मंत्र्यांनी धन्यता मानली आहे. |

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
|---|---|---|
| **भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्याचे निलंबन**<br>तपास संपल्यानंतर भ्रष्ट अधिकाऱ्यांवर खटला दाखल करण्याबरोबरच लोकपाल त्या अधिकाऱ्याला नोकरीतून काढून टाकण्याबाबत खुली सुनावणी घेऊन निर्णय करतील. | भ्रष्ट अधिकाऱ्याला काढून टाकायचे की नाही याचा निर्णय मंत्री घेतील. | |
| **भ्रष्टाचाराबाबत दंड**<br>१) जास्तीत जास्त शिक्षा जन्मठेप किंवा आजन्म कारावास.<br>२) वरिष्ठ दर्जाच्या आरोपी अधिकाऱ्यांना जास्त शिक्षा.<br>३) जर आरोपी व्यावसायिक असतील जबरदस्त दंड.<br>४) जर व्यावसायिक आरोपीवरील गुन्हा सिद्ध झाला तर आरोपीला काळ्या यादीत टाकण्याची तरतूद. | काहीही मान्य नाही, जास्तीत जास्त शिक्षा दहा वर्ष. | |
| **आर्थिक स्वायत्तता**<br>११ लोकपाल सदस्य मिळून त्यांचे अंदाजपत्रक ठरवतील. | लोकपालांना किती पैसे द्यायचे हे अर्थ मंत्रालय ठरवेल. | ही लोकपालांच्या आर्थिक स्वातंत्र्याची तडजोड ठरेल. |
| **भविष्यातील नुकसान थांबविणे**<br>निदर्शनास आणून दिल्यानंतर एखाद्या सुरू असणाऱ्या कामातील भविष्यातील नुकसान थांबविण्यासाठी लोकपाल पावले उचलतील व गरज पडल्यास त्यासाठी उच्च न्यायालयाकडून आदेश प्राप्त करतील. | लोकपालांना असे काहीही अधिकार नाहीत. | असे म्हटले जाते की टू जी प्रकरण घडत असतानाच त्यात भ्रष्टाचार होत असल्याचे माहिती होते. गुन्हा घडल्यानंतर आरोपींना शिक्षा देण्यापेक्षा तो गैरप्रकार, भ्रष्टाचार थांबविण्यासाठी यंत्रणा असायला नको का? |
| **फोन टॅपिंग**<br>लोकपाल फोन टॅपिंगचे आदेश देऊ शकतील. | फोन टॅपिंगचे आदेश देण्याचा अधिकार फक्त गृह सचिवांना | गृह सचिव अशाच लोकांच्या हाताखाली काम करत असतात ज्यांच्याविरुद्ध चौकशी सुरु असते. अशा स्थितीत तपासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. |

| जन लोकपाल विधेयकातील तरतूद | सरकारी लोकपाल विधेयकातील तरतूद | अभिप्राय |
|---|---|---|
| **अधिकारांचे वाटप**<br>लोकपाल फक्त राजकारणी, वरिष्ठ अधिकारी आणि ज्यामध्ये मोठा आर्थिक व्यवहार आहे अशीच प्रकरणे हाताळतील. बाकी प्रकरणे लोकपालांचे अधिकारी हाताळतील. | सर्व प्रकरणे ११ लोकपाल सदस्यच हाताळतील. अधिकाऱ्यांच्या वाटपाची कोणतीही सोय नाही. | लोकपाल अस्तित्वात येण्याआधीच ते संपवण्याचे हे कारस्थान आहे. फक्त ११ लोक सर्व प्रकरणे हाताळू शकणारच नाहीत. तक्रारींच्या ओझ्याखाली लोकपाल दबले जातील. |
| **स्वयंसेवी संस्था**<br>शासकीय अर्थसहाय मिळणाऱ्या संस्थांचा समावेश | सर्व स्वयंसेवी संस्था, मग त्या छोट्या असोत की मोठ्या त्यांचा समावेश | स्वयंसेवी संस्थांना, छोट्या मोठ्या आंदोलनांना धाकात ठेवण्याचा-चिरडण्याचा प्रयत्न. |
| **विनाकारण अथवा निराधार तक्रारी**<br>शिक्षा नाही, फक्त दंड. लोकपाल ठरवतील तक्रार विनाकारण, निराधार केली आहे किंवा कसे. | दोन ते पाच वर्षाची कैद व दंड आरोपी तक्रारदाराविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करू शकतो. या खटल्याचा सर्व खर्च म्हणजे वकीलाची फी, दाव्याचा खर्च वगैरे सर्व सरकार करेल. आरोपीला तक्रारदाराला नुकसान भरपाई सुद्धा मागण्याचा अधिकार(देशातील स्वयंसेवी संस्थांना जाणूनबुजून त्रास देण्याचा एक प्रयत्न) असेल. | यामुळे भ्रष्ट लोकांना तक्रारदारांना छळण्याचे एक साधन मिळेल. भ्रष्टाचार करणारे नेहमी श्रीमंत असतात. ते तक्रारदारांविरुद्ध खोट्यानाट्या केसेस दाखल करतील आणि अशांची तक्रार दाखल करण्यास कोणीही पुढे येणार नाही. गंमत म्हणजे भ्रष्ट आरोपीला कमीत कमी सहा महिन्यांच्या शिक्षेची तरतूद आहे तर चुकीची किंवा निराधार तक्रार दाखल करणाऱ्याला मात्र कमीत कमी दोन वर्षाच्या शिक्षेची तरतूद शासनाच्या विधेयकात आहे. |

संदर्भ : ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणीत भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगणसिद्धी, ता. पारनेरचे प्रसिद्ध पत्रक

लोकशाहीत सर्वोच्च पद असलेले पंतप्रधान पद, न्यायाधीश, मंत्री, खासदार हे लोकपालाच्या कक्षेत असावेत किंवा नाही यावर एकमत होऊ शकले नाही. परंतु मागील काही वर्षात या विविध पदावरील व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतल्यास ते लोकपालाच्या कक्षेत असावेत असे वाटू लागते.

**पंतप्रधान :**

जगात सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशाचे पंतप्रधानपद म्हणजे सर्वोच्च पद आहे. हे जर लोकपालाच्या कक्षेत आणले तर लोकशाही धोक्यात येईल, देशात अस्थिरता माजेल असे आक्षेप घेतले जातात, परंतु मागील ६४ वर्षात पंतप्रधानांच्या काळात झालेल्या व थेट पंतप्रधानांवर आक्षेप घेणाऱ्या घटना घडल्या. त्यास मंत्रीमंडळाचा प्रमुख म्हणून पंतप्रधानांना जबाबदार धरण्यात येऊ नये का?

जनलोकपालातील तरतुदीनुसार लोकपालास पंतप्रधानांच्या चौकशीचा अधिकार द्यावा. त्यांना दंड किंवा शिक्षा करण्याचा अधिकार नाही. राज्यघटनेने राष्ट्राध्यक्षांना संरक्षण दिलं आहे, पंतप्रधानांना नाही, असे टाईम्स ऑफ इंडिया या प्रसिद्ध दैनिकात म्हटले आहे.

सन २०१० साली सरकारने जे विधेयक तयार केले होते त्यात पंतप्रधानावर कारवाई करता येऊ शकेल अशी तरतूद करण्यात आली होती.

आजही विद्यमान व्यवस्थेत पंतप्रधानांची चौकशी भ्रष्टाचार विरोधी कायद्याअंतर्गत करता येते. पंतप्रधान लोकपालाच्या कक्षेत असावे अशी भूमिका बिगर काँग्रेसी सरकारातील तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग, एच. डी. देवेगौडा, अटल बिहारी वाजपेयी यांनी घेतली होती. तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानेही वेळोवेळी पंतप्रधानपद लोकपालाच्या कक्षेत असावे अशी भूमिका मांडली आहे. सन २०११ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंह यांनीही लोकपालाच्या कक्षेत येण्यास अनुकूलता दर्शविली होती. परंतु पक्षाच्या रेट्यामुळे नंतर त्यांना भूमिका बदलावी लागली.

**न्यायालय :**

आपल्या राज्यघटनेत आपल्या लोकांच्या सार्वभौम सत्तेची लोकशाही शासनसंस्था आपण स्वीकारली आहे. तिच्यामध्ये लोकप्रतिनिधी सभा, कारभारी यंत्रणा

सामान्य माणूस असामान्य कर्तृत्व करू शकतो. - **अण्णा हजारे**

आणि न्यायसंस्था अशा तीन स्वायत्त, परंतु परस्पर संबंधित संस्था निर्माण केल्या आहेत.

संसदेने केलेले कायदे सर्वोच्च न्यायालय रद्द करू शकते आणि न्यायाधीशांवर महाभियोग संसद चालवू शकते, त्यांना सेवानिवृत्त करू शकते. भारतीय लोकशाहीचा हाच गाभा आहे की, कायदे मंडळ, न्याय यंत्रणा आणि प्रशासन यांचे एकमेकांवर नियंत्रण आहे. यालाच राज्य घटनेतील चेक्स अँड बॅलन्स म्हणतात. तो आहे म्हणूनच आपली लोकशाही जिवंत आहे. न्याय व्यवस्था आमच्या देशातील सर्वोच्च संस्था आहे, परंतु सर्वोच्च न्यायालयातील ५० टक्के न्यायाधीश भ्रष्ट आहेत, असे न्यायालयातच शपथपत्राद्वारे निवेदन केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे विद्यमान अध्यक्ष के. जी. बालकृष्णन यांच्या विरुद्धच्या कथित बेहिशोबी मालमत्तेप्रकरणी आतापर्यंत काय कारवाई केली? अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयांनी केंद्र सरकारला केली आहे. तसेच एक महिन्याच्या आत उत्तर सादर करण्याचे न्यायालयाने सांगितले आहे. सन २००४ ते २००९ या काळात सरन्यायाधीश के. जी. बालकृष्णन यांनी आपल्या नातेवाईकाच्या नावावर सुमारे ४० कोटी रु. बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याचा आरोप करून देशातील कॉमन कॉज नामक संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

१. या देशातील सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद न्यायालयावरच ताशेरे ओढले.
२. अशाच एका प्रकरणात सिक्कीमच्या एका न्यायमूर्तींना राजीनामा द्यावा लागला.
३. न्यायालयातील भविष्य निर्वाह निधी घोटाळा - गाजियाबाद येथील न्यायालयातील तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या कष्टाचे भविष्य निर्वाह निधीतील पैसे २००१ ते २००८ या कालावधीत तेथील न्यायाधीश मंडळींनी चैनीसाठी वापरत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यात सर्वोच्च न्यायालयाचे एक निवृत्त न्यायमूर्ती व इतर तब्बल २३ न्यायाधीशांवर सी.बी.आय.ची संशयाची सुई होती. परंतु या सर्वांवर कारवाई करण्याएवढा भक्कम पुरावा मिळत नसल्याचे सी.बी.आय.ने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

| |
|---|
| गोरे गेले, काळे आले - **अण्णा हजारे** |

४. न्या. सौमित्र सेन हे १९९३ साली कोर्ट रिसिव्हर या पदावर असताना ३२ लाखांचा गैरव्यवहार केला. न्या. सेन यांच्यावर राज्यसभेत महाभियोगास सुरुवात झाली. दरम्यान न्या. सेन यांनी अगोदरच राजीनामा दिला.

५. न्या. दिनकरन यांनी जमीन घोटाळाप्रकरणी राजीनामा दिला.

६. सध्या भारतात १४ हजारापेक्षा अधिक न्यायालयांचे जाळे पसरलेले आहे. ९० टक्के खटले कनिष्ठ न्यायालयात प्रलंबित आहेत. अंतिम निकाल मिळविण्यासाठी २५ वर्षे वाट पाहावी लागते. ''विलंबाने न्याय म्हणजे न्याय नाकारणे होय.'' हेच पुन्हा पुन्हा सिद्ध होते. दुसरीकडे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी व तहसिलदार तथा तालुकादंडाधिकारी हे सतत प्रशासनाच्या ओझ्याखाली असतात. त्यामुळे त्यांना प्रकरणे त्वरित निकाली काढता येत नाहीत. महसूल यंत्रणा योग्य पद्धतीने काम करत नाही, म्हणून लोक न्यायालयाकडे धाव घेतात.

७. ब्रिटनप्रमाणे न्याय संस्थेची विश्वासार्हता व उत्तरदायित्व तपासण्यासाठी स्वतंत्र स्वायत्त संस्था असावी. अण्णा हजारे यांनी देखील पर्याय दिला होता. सरकार न्यायालयांना ज्युडिशियल अकाउंटेबिलीटी (न्यायिक उत्तरदायित्व) कायद्याच्या कक्षेत आणू इच्छिते. यात बऱ्याच त्रुटी आहेत. यातील त्रुटी दूर कराव्यात. कायदा कडक असावा आणि तो लोकपाल कायद्याच्या बरोबर मंजूर करावा. अशी मागणी अण्णा हजारे यांनी केली आहे. केंद्र सरकारने मार्च २०१२ मध्ये न्यायाधीशाचा तपास करण्यासाठी यंत्रणा पुरविणारे न्यायालयीन मापदंड आणि उत्तरदायित्व विधेयक २०१० ला लोकसभेने मंजूरी दिली आहे.

८. देशाच्या इतिहासात ३७५ कामगारांना जल समाधी देणाऱ्या सर्वात मोठ्या यासनाला कोलियरीच्या कोळसा खाण अपघाताला जबाबदार असलेल्या दोघा दोषी अधिकाऱ्यांना न्यायालयाने तब्बल ३६ वर्षांने एक वर्षाची शिक्षा धनबाद (रांची) झारखंड येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी यांनी सुनावली. सदर घटना २७ डिसेंबर १९७५ रोजी घडली होती. तर निकाल एप्रिल २०१२ मध्ये देण्यात आला.

| |
|---|
| मैं नर को ही नारायण मानता हूँ। - **अण्णा हजारे** |

**खासदार :**

मागील ६४ वर्षात, हे सरकार आपलं आहे. आपण लोकशाही पद्धतीने निवडून दिलेले खासदार आपले प्रतिनिधी आहेत. ते आपल्या कल्याणासाठी निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्य करतात. असा विश्वास जनतेला निर्माण झाला नाही. १३ व्या लोकसभेत विविध प्रकारचे गंभीर (आरोप) गुन्हे असलेल्या खासदारांची संख्या ६० च्या आसपास होती. ती १४ व्या लोकसभेत १२० पर्यंत तर १५ व्या लोकसभेत १६२ च्या वर गेली आहे. नुकतेच माजी मुख्य निवडणूक आयुक्त, जे. एम. लिंगडोह यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. १५ व्या लोकसभेतील १६२ संसद सदस्यांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे फौजदारी गुन्हे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. ही लोकशाहीच्या दृष्टीने मन विषण्ण करणारी घटना असून या प्रलंबित प्रकरणाचा जलदगती न्यायालयात निपटारा करावा अशी विनंती लिंगडोह यांनी केली आहे. न्या. पी. सदाशिवम यांच्या नेतृत्वाखालील पीठाने १६२ खासदारांविरुद्ध फौजदारी प्रकरण संदर्भात केंद्र व राज्यांना नोटीस जारी केली आहे.

पाच वर्षांसाठी एकदा निवडून गेले म्हणजे स्वयंभू झाले. त्यामुळे निरंकुशपणे कार्य करणे नव्हे, लोकांचा आपल्या प्रतिनिधीवर अंकुश असायला पाहिजे असे वाटत आहे. तीच खरी लोकशाही आहे.

१) ४२ वर्षे एखाद्या प्रस्तावित कायद्याचा मसुदा संसदेच्या पटलांवर नुसता पडून राहतो. तेव्हा लोकप्रतिनिधी दोषी नाहीत का? अशा वेळी सांसद व सरकार कर्तव्यात कसूर करतात हे जनतेला समजत नाही का?

२) स्वत:च्या अधिकाराबाबत अत्यंत सजग असलेल्या संसदेने सार्वजनिक शुचिता प्रस्थापित करण्याच्या हेतूने संमत केलेल्या दोन कायद्यांचे काय झाले?

३) संसदेने पक्षांतर बंदी कायदा केला. या कायद्याच्या मसुद्यातही काहींनी अत्यंत कठोर तरतुदी सुचविल्या होत्या. पण चर्चेच्या दरम्यान त्या पातळ केल्या गेल्या आणि आयाराम-गयारामांना त्यांच्या कोलांट्या उड्यांची सजा जनतेनेच द्यावी असे सूचित केले व कायदाच बोथट केला.

४) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून संसदेने लोकप्रतिनिधित्वाच्या कायद्यात

| मुझे तो हर दु:खी या पीडित आदमी में भगवान नजर आता है। - **अण्णा हजारे** |
|---|

बदल करून नामांकन सादर करताना प्रत्येक उमेदवाराने आपल्या मालमत्तेचे विवरण आणि गुन्हेगारीचा इतिहास प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावा, अशी तरतूद केली. पण या दोन्हींचा संबंधितांच्या उमेदवारीच्या भवितव्याशी कोणताही संबंध ठेवला नाही. ते काम मतदारांवर सोपविले गेले. संपत्ती आणि गुन्हेगारी यांचा तपशील बघून लोकांनी म्हणजे मतदारांनी निर्णय घ्यावा, संसद काहीही करणार नाही! कायद्याने संसद सदस्यांना पळवाट मोकळी करून दिली.

५) अण्णांच्या मगणीला विरोध करताना - लोकप्रतिनिधी नसलेल्या लोकांना मसुदा समितीमध्ये घेण्यावरून एवढा गहजब कशासाठी?

६) राजकीय पक्षांकडून राज्यसभेच्या जागा धनवंतांना देण्यात येतात. राज्यपालाची नेमणूक शुद्ध राजकीय असते. सरकार, मोठे उद्योगपती आणि राजकारणी संगनमत करून राष्ट्राची लूट करीत आहेत.

दु:खी या पीडित की सेवा ही मेरी पूजा है। - **अण्णा हजारे**

# जनतेचा जनलोकपाल

**जनता सत्ताधारी प्रजा**

**राष्ट्रपती**

**पंतप्रधान** **सर्वोच्च न्यायालय**

**जनलोकपाल**

(उच्च न्यायालयाचा दर्जा) (अध्यक्ष)

**जनलोकपाल समिती** (११ सदस्य)

**जनलोकपालाचे खंडपीठ**

(३ किंवा अधिक सदस्य) (सह-सचिव किंवा त्यावरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याविरुद्धचा तपास)

**मुख्य देखरेख अधिकारी**

(लोकपालाकडून नियुक्त) (प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळावर) (१५ दिवसानंतर)

**सार्वजनिक तक्रार निवारण अधिकारी**

(त्या-त्या कार्यालयाने नियुक्त केलेला अधिकारी) (प्रत्येक सार्वजनिक अधिकारी मंडळासाठी)

**जनता / प्रजा**

(नागरिकाच्या सनदेचा भंग झाल्यास कोणताही नागरिक तक्रार करू शकेल)

***जनलोकपाल विधेयकात अशी रचना अपेक्षित आहे***

या रचनेत सर्वोच्च स्थानी जनता असून ती प्रजासत्ताक लोकशाहीत सर्वश्रेष्ठ व मालक आहे, तसेच या रचनेत ती पायाभूत स्थानीही आहे, कारण या सर्वांची तीच निर्माती आहे.

प्रकरण : तिसरे

# दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याची गरज

**स्वा**तंत्र्यानंतर सामान्य माणसाला सुखाचे जीवन वाट्याला येईल असा आशावाद निर्माण झाला होता. परंतु मागील ६४ वर्षात सामान्य माणसाचे शोषण झाले आहे. देशात भ्रष्टाचाराने थैमान घातले असून भ्रष्टाचाराचे सार्वत्रिकीकरण झाले आहे. देशाच्या प्रमुख पदी असलेल्या मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी भ्रष्टाचाराबाबत मांडलेले मत विचार करावयास लावणारे आहेत.

भ्रष्टाचाराने मांडलेल्या सुकाळाने आपला देश व्यापला आहे. देशाला महासत्ता बनविण्याच्या गप्पा करणारे राजकीय नेतेच भ्रष्टाचारामध्ये गुंतले आहेत. तरीही त्यांना त्यांचे काहीच वाटत नाही. देशाला सध्या अनेक प्रश्न सतावत आहेत. पण ते सोडविण्यासाठी काही करावे असे राज्यकर्त्यांना वाटत नाही. त्याऐवजी आपला खिसा कसा भरता येईल याकडेच ते लक्ष देतात. भ्रष्टाचार करणाऱ्या उमेदवाराला निवडणुकीला उभेच राहू देता कामा नये, अशी आयोगाची भूमिका आहे. पण अशा प्रकारचा कायदा झाला तर बहुतेकांना निवडणुकीला उभेच राहता येणार नाही, अशी धास्ती राजकीय नेत्यांना वाटते. भ्रष्टाचार मुक्तीचे धोरण अवलंबविण्याची राजकीय इच्छाशक्तीच नाही. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या जनलोकपालासाठीच्या देशव्यापी लढ्यात प्रेशर कुकरचा स्फोट व्हावा तसा जनतेच्या मनातील भ्रष्टाचार विरोधी भावनांचा उद्रेक रस्त्यावर दिसून आला आहे.

भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्वाची आहे. देशातील भ्रष्टाचार व राजकीय स्थितीचे वर्णन करणारा गीतकार राहत इंदोरी यांचा शेर आठवतो, **''जो चीजें जंगलों की हैं, उन्हें जंगल में ही रहना था। वो अब दिल्ली में रहते हैं, जिन्हें**

मी माझ्या शरीरात प्राण असेपर्यंत जनसेवेचे कार्य करीत राहणार - **अण्णा हजारे**

**चंबल में रहना था।''** देशातील उच्चपदस्थ राजकारणांच्या भ्रष्टाचाराच्या काही ठळक घटना दिल्या आहेत. त्यात बहुतेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षातील बड्या नेत्यांचा सहभाग आहे. याशिवाय केंद्र व राज्य सरकारचे अधिकारी, कर्मचारी यांच्या कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या लाखो घटना आहेत, घडत आहेत, सरकार दरबारी प्रकरणे प्रलंबित आहेत. तसेच अनेक एन.जी.ओ.ही भ्रष्टाचारापासून विभक्त राहू शकल्या नाहीत. तसेच १९९१ नंतरच्या जागतिकीकरणाच्या मुक्त व्यापार धोरणामुळे निर्माण झालेला खाजगी क्षेत्रातील भ्रष्टाचार खूप-खूप मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. त्याने व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनात प्रवेश केला आहे. त्यामुळे सामान्य माणूसही हतबल झाला आहे. त्यासाठी स्वतंत्र कायद्याची व यंत्रणेची गरज आहे.

**उच्च पातळीवरील भ्रष्टाचारात भारताची आघाडी -**

''ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल या संस्थेच्या करप्शन परसेप्शन इण्डेक्स''नुसार २०१० मध्ये १७८ भ्रष्ट देशाच्या यादीत भारताचा क्रमांक ८७ व्या स्थानावर होता. शून्य म्हणजे सर्वाधिक भ्रष्ट देश तर दहा म्हणजे सर्वाधिक स्वच्छ, भ्रष्टाचारमुक्त देश असे भ्रष्टाचाराचे शून्य ते दहा या परिमाणावर मोजमाप केले जाते. २०११ मध्ये भारतात ३.१ एवढी भ्रष्टाचाराची तीव्रता होती. तर न्यूझीलंड, डेन्मार्क, फिनलंड, स्वीडन, सिंगापूर हे ह्या क्रमानं सर्वात स्वच्छ देश होते. या मोजणीनुसार भारत ९५ व्या क्रमांकावर आहे. २००५ साली झालेल्या सर्वेक्षणानुसार भारतात ५५ टक्क्यापेक्षा अधिक लोकांनी लाच देऊन किंवा आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून आपली कामे करून घेण्याचा अनुभव घेतल्याचं आढळून आले. भ्रष्टाचारामुळे हतबल झालेल्या माणसाचे वर्णन एका कवीने पुढील पंक्तीत केलं.

**''घुंगरू की तरह बजता ही रहा हूँ मैं**
**कभी इस पाँव में,कभी उस पाँव में,**
**बंधता ही रहा हूँ मैं''**

देशातील भ्रष्टाचाराच्या परिस्थितीला आजही तंतोतंत लागू होतील असे संत कबीरांचे दोहे आठवतात.

जीवन निष्कलंक ठेवल्यामुळेच मला बलाढ्य शक्तीशी
लढण्याची शक्ती मिळते. - **अण्णा हजारे**

गांडू भडवे रण चढे,
मर्दों के बेहाल
पतिव्रता भूखी सोये
पेडे खाये छिनाल।

**- संत कबीरदासजी**

भारतात भ्रष्टाचार रोज किती गतीने वाढत आहे! १२० कोटी लोकसंख्येच्या या देशात सरासरी प्रत्येक व्यक्ती दोन हजार रुपये लाच देतो! देशातील मूठभर भ्रष्ट लोकांनी विदेशात लाखोकोटी रुपये स्वीस बँकेत ठेवले आहेत. स्वीस बँकेत जमा असलेली भारतीय संपत्ती परत आणण्यासाठी कायदेशीर मोहीम राबवणारे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ राम जेठमलानींच्या म्हणण्यानुसार **''स्वीस बँकेत ७० लाख कोटी''** रुपयांची संपत्ती पडून आहे.

**उच्च पातळीवरील भ्रष्टाचाराच्या ठळक घटना**

१) स्वतंत्र भारतातील भ्रष्टाचाराचे पहिले प्रकरण उघडकीस आले, यात कृष्ण मेनन इंग्लंडमध्ये उच्चायुक्त असताना अडकले.

२) मुंदडा प्रकरण- इंदिरा गांधी यांचे पती फिरोज गांधी यांनी लावून धरलेल्या या प्रकरणाची अखेर न्या. छागला यांच्यामार्फत चौकशी करणे पं. नेहरूंना भाग पडले. तत्कालीन अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी आणि अर्थसचिव एच. एम. पटेल यांचेवरील संशयावर पुढे शिक्कामोर्तबही झाले.

३) पं. नेहरू पंतप्रधान असताना-पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंह कैरौं यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर आली.

४) केंद्रीय मंत्री के. डी. मालवीय यांचाही गैरव्यवहार उघड झाला.

५) इंदूर येथे १९६३ मध्ये कॉंग्रेस अधिवेशनात डी. संजीवय्या यांनी १९४७ मध्ये कंगाल असलेले अनेक कॉंग्रेसचे नेते करोडपती कसे झाले, हे निदर्शनास आणले होते.

६) कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री के. हनुमंतय्या यांनी माझ्याकडे काही लाख रुपये असतील तर मी सहज मुख्यमंत्री होऊ शकतो आणि एखादे कोटी असतील तर पंतप्रधानही ! (१९६३) असे म्हटले होते.

अण्णा हजारे आँधी है। देश का दूसरा गांधी है।

७) तत्कालीन पंतप्रधान मा. इंदिरा गांधी यांच्या काळात अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रेगन यांनी केलेला भ्रष्टाचार वाटर गेट स्कॅम नावाने गाजला.

८) जपानमध्ये तिनाईका आणि इंडोनेशियामधील सुकार्णो यांचे सरकार भ्रष्टाचारामुळेच संपले.

९) पाकचे आयुबखान भ्रष्टाचाराच्या चक्रव्यूहात फसले होते.

१०) इंदिराजी तेव्हा म्हणायच्या ''भारतात भ्रष्टाचार काही नवीन गोष्ट नाही. या भ्रष्टाचाराला आपण आळा घालू शकत नाही. कारण हा जागतिक प्रश्न बनला आहे.'' योगायोगाने त्यावेळी जागतिक स्तरावर अनेक सरकारे कोलमडली.

११) १२ जून १९७५ रोजी निवडणूक प्रक्रियेत भ्रष्टाचार केला यासाठी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची अलाहाबाद उच्च न्यायालयाने लोकसभेवरील निवड रद्दबातल ठरवली होती. त्यावर लगेच स्थगिती मिळवली व इंदिराजीने सर्वोच्च न्यायालयात अपील केले. त्यांच्या राजीनाम्याची मागणी झाली. जर निकाल विरोधात गेल्यास संपूर्ण कारकीर्दच धोक्यात येईल, या भीतीने ३९ वी घटनादुरुस्ती केली. या दुरुस्तीनुसार वर्तमान पंतप्रधान अथवा पंतप्रधानपदी नियुक्त केलेल्या व्यक्तीची निवडणूक ही न्यायिक पुनरावलोकनाच्या अधिकारापासून संरक्षित करण्यात आली. मागील काळापासूनच या दुरुस्तीची अंमलबजावणी करण्याचे घोषित केले. तथापि सर्वोच्च न्यायालयाने ही घटना दुरुस्ती अवैध ठरविली. परंतु इंदिरा गांधींची लोकसभेतील निवड वैध ठरवली.

१२) इंदिरा गांधी यांनी घटनेच्या आधारे आणीबाणी पुकारली. हुकूमशाही काय असते याचा तेव्हा विरोधातील (पक्ष) लोकांनी अनुभव घेतला. १९७४ मध्ये जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन चिरडले गेले. मीसाखाली अनेक पुढारी व विचारवंतांना अटक करण्यात आली. १९ महिने एकहुकमी सरकार चालविले.

१३) लोकसभेची मुदत १ वर्षांनी वाढवून घेतली (संसदेचा वापर रबरी शिक्यासारखा केला) संसदेत बहुमत असताना संसदेच्या संमतीनेच लोकशाही व संसदेतील मतदारांचा गळा सहज घोटता येतो, हे देशाने तेव्हा पाहिले. त्यावेळी विरोधी पक्षातील अनेक दिग्गज पुढारी, धनवंत, पत्रकार, विचारवंत, वृत्तपत्रे यांची आहुती पडली.

सत्य आणि प्रामाणिकपणा हेच माझे शस्त्र आणि अस्त्र आहे. - **अण्णा हजारे**

१४) इंदिराजींच्या काळात सर्वात चर्चेत राहिलेला भ्रष्टाचार म्हणजे पाणबुडी कांड. संजय गांधी यांच्यावर आरोप झालेले मारुती कारचे कांड. १९७५ साली संजय गांधी व बन्सीलाल चर्चेत आले त्या मारुती (कार) उद्योगात १०० कोटींचा घोटाळा.

१५) १९८० साली प्रकाशचंद सेठी यांचा तो घोटाळा समोर आला यात संजय गांधी यांच्या सांगण्यावरून सेठी यांनी इंडियन ऑईलच्या निविदामध्ये फेरफार केला होता, असे आरोप झाले.

१६) १९८४ साली भोपाळ येथील युनियन कार्बाईड कंपनीच्या कारखान्यातील वायु गळतीमुळे झालेल्या अपघातात ३८३३ जण मृत्यु पावले, पाच हजार जण जखमी झाले, ३०४ भा. द. वि. अन्वये गुन्हा दाखल झाला. पुढे चौकशी नाही. १९९१ सुप्रीम कोर्टाने कंपनीवर पुन्हा फौजदारी खटला भरण्यास परवानगी दिली. पुढे काहीही झाले नाही.

१७) १९८७ ला बोफोर्स तोफांचा आवाज चहुबाजूंनी ऐकू येऊ लागला. जवळचे सहकारी विश्वनाथ प्रताप सिंग यांनी बोफोर्सच्या सौद्यात ६४ कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप केला होता. १९८९ मध्ये राजीव गांधी यांची सत्ता गेली व व्ही. पी. सिंग पंतप्रधान झाले. या सौद्यात दलाली करणारे क्वात्रोची आणि विन चड्डा यांना संसदेत बोलावले जावे असे ठरले, परंतु संसदेत येण्यापूर्वीच त्यांना परदेशात पाठवले गेले. त्यावेळी शरद जोशी यांनी व्यंग लिहिले- तुम विन चड्डा... हम बिन चड्डी !...

इंदिरा गांधी व राजीव गांधी या दोन पंतप्रधानांवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर जनआंदोलने उभी राहिली आणि त्यात दोन्ही सरकारची सत्ता गेली.

१८) १९८६ मध्ये कोळसा घोटाळ्यात ५० कोटीचे प्रकरण उघडकीस आले. १९८८ मध्ये सरकारी रुग्णालयाच्या उपकरणांमध्ये तेव्हाच्या आरोग्य मंत्र्यांनी ५००० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप झाला.

१९) बोफोर्स प्रकरणी - द हिंदू या वर्तमान पत्राच्या पत्रकारांनी न्यायालयात याचिका दाखल केली. ६४ कोटी रुपयांची लाच कमिशन दलाल व राज्यकर्ते यांना दिली

जनशक्ती हेच माझे बळ आहे. - **अण्णा हजारे**

हे सिद्ध झाले. स्वीस न्यायालयाकडून त्याचा तपशील मिळाला. यानंतर पुढाऱ्यांनी न्यायालयाच्या कामात अडथळे आणले, त्यामुळे काम रेंगाळले. लोकसभेत स्वत:ची चौकशी नेमली, तिचा अहवाल राज्यकर्त्यांनी गोठवून ठेवला नंतर सरकार गेले.

२०) १९९१ पी. व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले. काँग्रेसला बहुमत मिळाले नव्हते. यासाठी शिबू सोरेन (झारखंडचे तत्कालीन मुख्यमंत्री) यांच्या झारखंड पार्टीच्या पाच खासदारांना खरेदी करण्यासाठी करोडो रुपयांची देवाणघेवाण झाली. यावेळीच संसदेत नोटांची बंडले दाखविण्यात आली होती. या प्रकरणात चंद्रास्वामीचे नाव प्रसिद्ध झाले.

२१) १९७१ ते १९९६ पर्यंत अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडली. त्यात सिक्युरिटी स्कॅम, बिहारचा चारा घोटाळा, युनिट ट्रस्ट स्कॅम, ताज कॉरिडॉर स्कॅम, तांदूळ आणि साखर निर्यात घोटाळा इ. अनेक घोटाळ्यांचा समावेश होता. दूरसंचार मंत्री सुखराम यांना १९९६ साली ५ कोटीचा टेलीकॉम घोटाळा केल्याप्रकरणी तुरुंगात जावे लागले. नोव्हेंबर २०११ मध्ये सीबीआय न्यायाधीशांनी ८६ वर्षाच्या सुखराम यांना पाच वर्षाचा कारावास व चार लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

२२) २००० ते २००५ या काळात सत्तेत राहिलेल्या व आज विरोधी पक्ष असलेल्या भा.ज.पा.च्या काळातही भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस आली.

२३) भाजपाचे तत्कालीन अध्यक्ष खुलेआम डॉलरचे बंडल स्वीकारतांना कॅमेरात कैद झाले. परंतु सदरील पैसा हा पक्षनिधी होता असा उलट कांगावा त्यांनी केला. ११ वर्षापूर्वीच्या या बनावट शस्त्र सौद्यात १ लाख रुपयाची लाच घेतल्याच्या आरोपात बंगारू लक्ष्मण यांना दोषी ठरवून २८ एप्रिल २०१२ रोजी दिल्लीच्या एका न्यायालयाने ४ वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली व लगेच तिहार तुरुंगात रवानगी करण्यात आली. यावेळी न्या. आरोरा म्हणाले ‘‘भ्रष्टाचार हा वेश्या व्यवसायापेक्षाही वाईट आहे. कारण त्यामुळे संपूर्ण समाजाला धोका निर्माण होतो’’ कारगिल युद्धानंतर संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी देशासाठी शहीद झालेल्या सैनिकांच्या शवपेटीमध्येही घोटाळा केल्याचे उघड झाले.

खेड्यातील प्रत्येक माणूस उभा राहिल्याशिवाय देश उभा राहणार नाही.- **अण्णा हजारे**

२४) पेट्रोलमंत्री असताना राम नाईक यांनी पेट्रोल पंपांच्या वाटपात घोटाळा केल्याचे आरोप झाले.

२५) याच काळात प्रमोद महाजन दूरसंचारमंत्री होते, त्यावेळी एक मोठी घटना घडली. त्यामुळे त्यांना तात्काळ राजीनामा द्यावा लागला. याच प्रकरणात नोव्हेंबर २०११ मध्ये सीबीआयने स्पेक्ट्रम वाटप घोटाळा प्रकरणी माजी दूरसंचार सचिव, वोडाफोन व एअरटेल कंपन्यांविरुद्ध गुन्हे दाखल केले.

२६) वेदप्रकाश गोयल (मंत्री) यांनाही एका प्रकरणात राजीनामा द्यावा लागला.

२७) हवालाकांडात नाव आल्यानंतर लालकृष्ण आडवाणी यांनाही खासदारकीचा राजीनामा देणे भाग पडले. भ्रष्टाचार विरोधात यात्रा काढणारे खासदार आडवाणी यांची यात्रा गुजराथमध्ये श्री पटेल यांना घेऊन अवतरली, त्या पटेल यांचेवर दारु व्यवसायातील २८ गुन्हे दाखल झाले आहेत.

२८) भ्रष्टाचाराच्या विरोधात मोहीम उघडणाऱ्या भाजपाला भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे दोन मुख्यमंत्री गमवावे लागले. त्यात कर्नाटकाचे मुख्यमंत्री बी. एस. यदियुरप्पा तसेच उत्तराखंडचे मुख्यमंत्री रमेश पोखरीयाल निशंक यांचा समावेश होता. तसेच भाजपाचे अनेक मंत्री व आमदारही भ्रष्टाचारामुळे पायउतार झाले आहेत. कर्नाटकाचे सत्ताधारी नेते तथा दोन आमदार लोकशाहीच्या पवित्र मंदिरात अश्लील व्हिडीओचा आनंद लुटताना सी.सी.टी.व्ही. कॅमेराने कैद झाले. तसाच प्रकार गुजरातमध्येही घडल्याचे आरोप झाले. ते कोणत्या राजकीय विकृतीचे दर्शन आहे? एन्रॉन प्रकरणी शिवसेना-भाजपने घेतलेली भूमिका लोक विसरणे अशक्य आहे. राष्ट्रीय पक्षापुरताच भ्रष्टाचार मर्यादित नसून विविध राज्यात सत्तेवर असलेले बहुसंख्य प्रादेशिक पक्ष सुद्धा भ्रष्टाचारापासून अलिप्त राहू शकले नाहीत.

पंतप्रधान मनमोहनसिंह (२००५-२००९) यांच्या काळात भ्रष्टाचाराच्या प्रकरणांनी कळस गाठला.

शेतकरी हा आपल्या सर्वांचा अन्नदाता आहे. - **अण्णा हजारे**

२९) राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा घोटाळ्यात कॅगने थेट मुख्यमंत्री शीला दीक्षित व इतर अधिकाऱ्यांवर व नेत्यांवर टीका केली. भ्रष्टाचार झाल्याचे सूतोवाच केले. खासदार सुरेश कलमाडी यांच्या नियुक्तीबाबत सर्वप्रथम सुनील दत्त (क्रीडामंत्री), मणीशंकर अय्यर (क्रीडामंत्री), संघटन समिती प्रत्येक दिवसाला ५००० डॉलर मोजून सल्लागारांची नेमणूक करत आहे. राष्ट्रकुल क्रीडा फेडरेशनचे माईक हुपेर यांची तीन कोटी रुपयांच्या फार्महाऊसवर राहण्याची व्यवस्था केली जात आहे. विमानाचे प्रथम श्रेणीचे मासिक तिकीट दिले जात आहे. या उधळपट्टीकडे लक्ष द्यावे, असे वारंवार निदर्शनास आणले. तसेच क्रीडामंत्री एम. एस. गिल यांनी संघटना समितीबद्दल आक्षेप नोंदवले. या सर्व बाबीकडे पंतप्रधानांच्या कार्यालयाने दुर्लक्ष केले.

३०) टू-जी स्पेक्ट्रम घोटाळा प्रकरणी माजी केंद्रीय मंत्री ए. राजा, खासदार कनीमोझी यांना १,७६,००० कोटी रुपयांच्या महाघोटाळ्याप्रकरणी तुरुंगात जावे लागले. सदर प्रकरणी थेट पंतप्रधानांवरही आरोप झाले. टू-जी स्पेक्ट्रम घोटाळ्याबाबत माजी मंत्री सुब्रम्हण्यम स्वामी यांनी या प्रकरणात जमवलेली कागदपत्रे न्यायालयांनी अभ्यासली. निर्णय देताना त्याचा आधार घेतला. सदर प्रकरणात माजी मुख्य निवडणूक आयुक्त जे. एम. लिंगडोह, टी. एस. कृष्णमूर्ती, एन. गोपाल स्वामी, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त ज्यूलीओ रिबेरो, माजी नौदल प्रमुख आर. एच. ताहिलायानी, ज्येष्ठ पत्रकार प्रणजोय गुहा ठाकूर यांनी सार्वजनिक हिताच्या याचिकेद्वारे सर्वोच्च न्यायालयात केस दाखल केली होती. या नामवंतांबरोबरच सेंटर फॉर पब्लिक इंट्रेस्ट लिटिगेशन, कॉमन कॉज, लोकसत्ता आणि टेलिकॉम वॉच डॉग या सामाजिक संघटनांनीही याचिकेला पाठिंबा दिला होता. या सर्व याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयात प्रसिद्ध विधीतज्ञ तथा टीम अण्णांचे सदस्य प्रशांत भूषण यांनी समर्थ व प्रभावीपणे बाजू मांडली व सदर प्रकरणात आपल्या कारकीर्दीच्या शेवटच्या दिवशी रामशास्त्री बाण्याचे न्यायमूर्ती ए. के. गांगुली यांनी १५२ परवाने रद्द करून १.७६ हजार

समाज और देश सेवा की प्रेरणा मुझे मेरी माँ से मिली - **अण्णा हजारे**

कोटी रुपयांच्या स्पेक्ट्रम घोटाळ्यावर शिक्का मोर्तब केले. सदर प्रकरणी २ एप्रिल २०११ रोजी माजी मंत्री ए. राजा सह ९ मुख्य आरोपींवर आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल करण्यात आले. आरोपपत्राची एकूण ८० हजार पाने आहेत. ए. राजा यांचे खेरीज आर. के. चंडोलिया, सिद्धार्थ देहुरा, शाहीद उस्मान बलवा, विनोद गोयंका, संजय चंद्रा, गौतम दोशी, विरेंद्र तितारा, हरि नायर इ. उच्चपदस्थ व उद्योगपती यांचा समावेश आहे. आरोपपत्रात युनीटेक, रिलायन्स कम्युनिकेशन्स, स्वाज टेलिकॉम इ. कंपन्यांचा समावेश आहे तर टाटा समूहास निर्दोष ठरविण्यात आले आहे.

३१) मार्च २०११ मध्ये घोडे व्यापारी हसनअली यांच्या भ्रष्टाचाराबाबत लेचीपेची भूमिका का घेतली जात आहे? असा सवाल न्यायालयाने करून सरकारलाच फटकारले आहे. हसन अली यांचेवर दहशतवादाचा आरोप ठेवण्याचा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला. हसनअली खानची संपत्ती २००१ मध्ये ५२९ कोटी रु. होती. ती २००७ मध्ये ५४ हजार २६८ कोटी रु. झाली. १०० पटीने वाढली. त्याने ७५ हजार कोटीचा आयकर चुकविला. राज्याचे तीन माजी मुख्यमंत्री व काही बडे नौकरशाह यांचे पैसे हसनअलीने हवाला मार्गे शेअर बाजारात गुंतविले याबाबत महाराष्ट्र विधानसभेत पडसाद उमटले.

३२) लष्कर प्रमुख जनरल व्ही. के. सिंग यांनी २०१० मध्ये सशस्त्र दलासाठी १ हजार ट्राटा ट्रक्स खरेदीची ऑर्डर थांबविली होती. हा सौदा मंजूर करण्यासाठी सिंग यांना १४ कोटी रुपयांची लाच देऊ करण्यात आली होती, असा त्यांनीच खुद दावा केला आहे.

३३) रामदेवबाबांनी काळ्या पैशासंदर्भात संघर्ष सुरू केल्यानंतर दिग्विजय सिंह यांनीच त्यांना सर्वाधिक टार्गेट केले होते. खालच्या थराला जाऊन रामदेवबाबा यांच्यावर आरोप केले. दिग्विजय सिंह यांची अशी भूमिका का होती हे आता कळले. विदेशी बँकेमध्ये दिग्गी राजाचे तब्बल १ लाख २९ हजार ५०३ कोटी रुपये

राष्ट्र-धर्म का मौका है। सरकारी लोकपाल धोका है। - **अण्णा हजारे**

असल्याचे आरोप झाले आहे. त्यामुळेच तर दिग्गीराजाने रामदेवबाबांविरुद्ध जिवाचा आटापिटा केला होता. त्याचबरोबर राष्ट्रीय काँग्रेस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस, अण्णा द्रमुक, ए.आय.डी.एम.के., डी.एम.के. व इतर अन्य प्रादेशिक पक्षांच्या नेत्यांचे कोट्यावधी रुपये स्विस बँकेत असल्याची यादीच फेसबुकवर प्रकाशित करण्यात आली आहे.

३४) २२ जुलै २००८ रोजी भा.ज.पा.चे तीन खासदार सभागृहात एक कोटीच्या थैल्या घेऊन आले. हे 'कॅश फॉर वोट' प्रकरण न्यायालयात गेले. २०११ पर्यंत न्यायालयात पोलिसांनी स्टेटस रिपोर्ट सादर केला नाही. सर्वोच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दिल्ली पोलिसांची कानउघाडणी केली. तेव्हा दिल्ली पोलिसांनी अमरसिंग यांचे तेव्हाचे सहकारी राजीव सक्सेना यांना अटक केली. चौकशीत अमरसिंग यांचे नाव घेतले. पुढे अमरसिंगांनाही अटक झाली व ते जामिनावर सुटले.

३५) कर्नाटकात दोन लाख कोटीचा वक्फबोर्ड जमीन घोटाळा झाला असून, शेकडो एकर जमीन कंपन्यांच्या घश्यात गेली असून त्यासाठी ३८ काँग्रेसच्या नेत्यांवर ठपका ठेवण्यात आला आहे. अल्पसंख्यांक आयोगाचा ५५०० पानांचा अहवाल नुकताच मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आला आहे.

३६) खरे तर न्यायपालिकेच्या हस्तक्षेपाशिवाय कार्यपालिकेने कार्य करावयाचे आहे. परंतु ते होत नाही. वेळोवेळी न्यायपालिकेला निर्णय द्यावे लागतात. त्यामुळे या देशाच्या न्यायपालिकेसमोर अनेक खटले प्रलंबित राहणे, हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण नाही. अनेकवेळा न्यायपालिकेच्या निर्णयाची अंमलबजावणी कार्यपालिका टाळते व ती टाळण्यासाठी नवे-नवे कायदे बनविते. उदा. शाहबानो केस व झिंगा-मछली केस.

| |
|---|
| जनआंदोलनातील तरुणांच्या सहभागाने देशात एक नवा आशावाद निर्माण झाला. - **अण्णा हजारे** |

३७) देशातील हजारो मुलांचे अपहरण दरवर्षी केले जाते. मुलांच्या अपहरणाच्या व्यवसायात देशामध्ये ८०० पेक्षा जास्त टोळ्या सक्रिय आहेत. त्यासाठी सरकारने विशेष दल स्थापन करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. परंतु सरकारने अंमल केला नाही.

३८) देशातील गोदामात हजारो मेट्रीक टन अन्न-धान्य सडत आहे. (सरकारने अन्न सुरक्षा विधेयक मंजूर केले) दारिद्र्यरेषेखालील गरीब व्यक्तींना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत हे धान्य मोफत वाटावे असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. सरकारने अंमल करण्यास असमर्थता दर्शविली.

३९) तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी हत्या प्रकरणातील आरोपी असो, की पंजाबच्या मुख्यमंत्र्याची हत्या करणारा आरोपी असो या सर्वांना न्यायालयाने फाशीची शिक्षा दिल्यानंतर हे सरकार त्याचा अंमल करीत नाही. उलट राज्य सरकार फाशीचा अंमल करू नये यासाठी केंद्रावर कायदेशीर दबाव आणते. हे सशक्त लोकशाहीचे लक्षण नाही.

भ्रष्टाचाराविरुद्ध लढ्यात भाग घेणे हीच खरी देशभक्ती. - **अण्णा हजारे**

**आधुनिक भारतातील श्रीमंतांचा शायनिंग आयपीएल इंडिया विरुद्ध गरीबांचा डार्क बी.पी.एल. भारत हे चित्र बदलण्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याची गरज**

| | |
|---|---|
| * खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे आर्थिक विकासाला चालना | * सार्वजनिक कंपन्यांची तोट्यात विक्री |
| * दरडोई उत्पन्नात वाढ | * कोट्यावधी गरिबांच्या वास्तव उत्पादनात घट |
| * भारतातील ४० व्यक्तींचे दरदिवशी प्रत्येकी दीडकोटी रुपयाचे उत्पन्न | * ७७% भारतीयांचे दर दिवशी २०.०० रु.चे उत्पन्न (अर्जुन सेन गुप्ता, सरकारी समितीच्या अहवालानुसार) |
| * आर्थिक विकासदरात वाढ | * लोकशाही समाजवादाचा गळा घोटला. |
| * राष्ट्रीय उत्पन्नात वाढ | * २७ कोटी लोकांना पुरेसे व सकस अन्न मिळत नाही. |
| * अन्नस्वावलंबन व अन्नसुरक्षा विधेयक मंजूर | * कुपोषणाने मृत्यू, ४०% बालकांचे कुपोषण |
| * आधुनिक शेती, कृषी विकासाला चालना, हरित क्रांती | * दर तीन तासाला ६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सुपीक जमिनीचा ऱ्हास. |
| * प्रचंड औद्योगिक उत्पादन | * मूठभर महाजनांच्या आर्थिक विकासात वाढ, कोट्यावधी बहुजनांचा आर्थिक विकास खुंटला.<br>* बेरोजगारीत प्रचंड वाढ. |
| * संगणक व माहितीक्षेत्रात क्रांती<br>* चौपदरी रस्ते, रेल्वे, वाहतुकीत वाढ | * ग्रामीण भागात रस्ते व वाहतुकीच्या सोयींचा अभाव. |

**आधुनिक भारतातील श्रीमंतांचा शायनिंग आयपीएल इंडिया विरुद्ध गरीबांचा डार्क बी.पी.एल. भारत हे चित्र बदलण्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याची गरज**

| | |
|---|---|
| * शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, उच्चशिक्षण व संशोधनात वृद्धी | * कोट्यावधी तरुण शिक्षणापासून वंचित. |
| * आरोग्य सुविधात वाढ | * ७०% लोक शासकीय आरोग्य सेवेपासून वंचित. |
| * शुद्ध पाणी पुरवठ्याच्या योजना | * पाण्याची तीव्र टंचाई, टँकरने पाणी पुरवठा |
| * अब्जावधीची परकीय गुंतवणूक | * देशी विदेशी कर्ज व व्याजाची परतफेड करण्यासाठी अर्थ-संकल्पात सर्वाधिक तरतूद. |
| * परकीय गंगाजळीत प्रचंड वाढ | * विदेशी कर्जात वाढ (२६१ अब्ज डॉलर). |
| * आय. टी. पार्क्स | * संस्कृतीचा ऱ्हास. |
| * गोल्फ मैदाने | * देशी खेळ हद्दपार. |
| * पंचतारांकित हॉटेल्स | * फास्टफूड, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे बाजारपेठेवर वर्चस्व. |
| * आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ | * ग्रामीण, आदिवासी भागात रस्ते नाहीत, रस्त्याचे खाजगीकरण |
| * वातानुकूलित मॉल्स | * किरकोळ व्यापाऱ्यांना हद्दपार. |
| * उच्च दर्जाचे राहणीमान | * सकस अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण यांपासून कोट्यावधी बांधव वंचित. |
| * महिलांचा विकास | * महिला अत्याचारात वाढ, महिलांचे शोषण, सरोगेट माता, जाहिराती व चित्रपटात महिलांचे देह प्रदर्शन व संस्कृतीचे विकृतीकरण. |

## आधुनिक भारतातील श्रीमंतांचा शायनिंग आयपीएल इंडिया विरुद्ध गरीबांचा डार्क बी.पी.एल. भारत हे चित्र बदलण्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याची गरज

* रोजगारात वाढ
* जगातील श्रीमंतांच्या यादीत ३२ भारतीय.
* बेस्ट अंडर बिलियन या फोर्ब्स आशियाच्या २०० कंपन्यांच्या यादीत ३५ भारतीय कंपन्यांचा समावेश
* जगातील ५०० बड्या कंपन्यांत ८ भारतीय कंपन्यांचा समावेश
* आंतरराष्ट्रीय संविधानाचा अंमल
* जागतिक व्यापार संघटना, जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या विकासात सहभाग
* सेझची निर्मिती
* पाश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण
* स्वच्छ व पारदर्शक कारभार
* जागतिक, आर्थिक महासत्ता होणार !

* प्रचंड बेकारी व कामगारांचे शोषण.
* ४० कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली.
* प्रचंड आर्थिक विषमता.
* देशात चलनात असलेल्या पैशा-एवढा काळा पैसा विदेशी बँकांत जमा.
* भारतीय संविधानाला छेद.
* काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था
* पर्यावरणाचा ऱ्हास.
* ग्लोबल वॉर्मिंग, ग्लोबल रेनिंग व ग्लोबल कूलिंगची समस्या.
* हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी हडप
* स्वातंत्र्य, समता, नैतिक मूल्य, सामाजिक कल्याण, सामाजिक न्याय इत्यादि मूल्यांचा ऱ्हास.
* भ्रष्टाचाराचे थैमान
* जागतिक, नैतिक महासत्ता गमावणार, अमेरिकन भांडवली लोकशाहीचा स्वीकार

## आधुनिक भारतातील श्रीमंतांचा शायनिंग आयपीएल इंडिया विरुद्ध गरीबांचा डार्क बी.पी.एल. भारत हे चित्र बदलण्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याची गरज

* खाजगी क्षेत्राचा विकास
* आंतरराष्ट्रीय सलोखा व शांतता
* अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्यांक व आदिवासींचे उत्थान.
* कोट्यावधी मोबाईल, कोट्यावधींच्या घरी टी.व्ही., दुचाकी व चारचाकी वाहनात प्रचंड वाढ.
* सरकारी महसूलात वाढ.
* वस्तू व सेवांचे प्रचंड उत्पादन.
* मुक्त अर्थव्यवस्था.
* नफ्याचे खाजगीकरण.

* खाजगी कंपन्यांद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनी हडप, ३ लाख एकर जमिनीचे संपादन.
* प्राचीन भारतीय संस्कृतीचा ऱ्हास, भोगवादी व चंगळवादी जीवनशैलीचे अनुकरण.
* अनुसूचित जाती, जमाती, आदिवासींच्या मूलभूत हक्कांवर गदा व दैन्यावस्था.
* नैसर्गिक साधन व संपत्तीची प्रचंड लूट.
* प्रचंड प्रदूषण, उर्जेची टंचाई, पेट्रोल, डिझेल दरात भरमसाठ वाढ.
* भ्रष्टाचारात १८० देशात भारताचा ८४ वा क्रमांक.
* कृत्रिम साठा, महागाई, प्रचंड नफा.
* जगातील सर्वाधिक १६ राष्ट्रातील भ्रष्टाचारात भारत चौथा.
* सार्वजनिक क्षेत्राचा ऱ्हास.
* तोट्याचे सामाजिकीकरण.

**जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी - खरे प्रतिनिधी :**

जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी बहुमताने गठित केलेले सरकार संविधानानुसार जनतेच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक मानले पाहिजे असे वारंवार लोकप्रतिनिधींकडून सांगितले जाते. देशात लोकसेवक व उच्च अधिकारी यांचे विरोधात असलेली शेकडो भ्रष्टाचाराची प्रकरणे, सबळ पुरावे असतानाही सरकार त्यांचे विरोधात खटले भरण्याची परवानगी देत नाही. वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवली जातात. त्यामुळे अलिकडे सर्वोच्च न्यायालयानेच लोक प्रतिनिधी, अधिकाऱ्यांच्या विरोधात, सबळ पुरावे दिल्यानंतर कायदेशीर खटला भरण्याची परवानगी पंतप्रधान कार्यालयांनी ४ महिन्याच्या आत द्यावी, नाही दिल्यास सरकारची परवानगी असल्याचे मानले जाईल. असा आदेश दिला आहे. त्यामुळे सरकार न्यायालयच चालवते की काय असे वाटू लागले आहे. टीम अण्णांची थट्टा उडवीत राष्ट्रीय काँग्रेसचे महासचिव म्हणाले- समाजाच्या नावावर, अण्णा हजारे आणि त्यांचे सहकारी आपलेच म्हणणे खरे म्हणून पुढे रेटणार असतील, तर ते आम्हाला मान्य नाही. राज्यघटनेनुसार निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे अधिकार, कोणी अशा प्रकारे हिरावू शकतो का? अशी भूमिका मांडली. जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी हेच खरे प्रतिनिधी आहेत, हे सत्य आहे. परंतु संविधानाच्या प्रतिज्ञालेखात उल्लेखिलेल्या धर्म, जातिनिरपेक्षता, समानता, आर्थिक न्याय इ. श्रेष्ठत्वांना जर आपली निवडणूक प्रक्रियाच मुळात हरताळ फासणारी (अल्प मतदान, सदोष मतदार याद्या, मतदानासाठी मतदारांना दिली जाणारी आमिषे, जातीयता व धर्मांधतेचा वापर, साधने व पैशाचे सर्रास वाटप, दशहत व गुंडागर्दी, प्रकर्षाने पुढे येत असलेली राजकारणातील वारसा पद्धती) असेल तरीही अशा भ्रष्ट प्रक्रियेतून निवडून आलेल्या सरकारला जनतेच्या सार्वभौमत्वाचे खरे प्रतिनिधी मानावयाचे काय? हा वादाचा नाही तर चिंतनाचा प्रश्न आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या कल्याणाचा निर्णय घ्यावयाचा आहे. तुमचे मत काय? लोकप्रतिनिधी निर्भयपणे सांगतात, 'हाय कमांड निर्णय घेईल, तो आम्हाला मान्य राहील. निर्णय घेण्याचा सर्वाधिकार पक्ष श्रेष्ठीला दिलेला आहे.' तेव्हा प्रश्न पडतो की, तुम्ही २५ ते ३० लाख लोकांचे प्रतिनिधी आहात, तेव्हा लोकप्रतिनिधीने जनतेच्या प्रति असलेले आपले दायित्व लक्षात घ्यायला हवे. जनता मोठी की हाय कमांड?

खेड्यातील निसर्ग हा खेड्याच्या सुखसमृद्धीचा झरा आहे. - **अण्णा हजारे**

जनलोकपाल विधेयकाद्वारे प्रत्येक राज्यात लोकायुक्त नेमले जावेत अशी मागणी टीम अण्णा तर्फे करण्यात आली. त्याबाबत केंद्राने प्रत्येक राज्याच्या मुख्यमंत्र्याकडे त्यांच्या मताबद्दल विचारणा केली. त्यावर काँग्रेसची सत्ता असणाऱ्या २२ राज्यांनी **याबाबत हाय कमांड घेतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल,** असे कळविले आहे. त्यामध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचाही समावेश आहे.

मागील ६४ वर्षात खासदारांचे लोकप्रतिनिधी म्हणून राहिलेले वर्तन, अनेक वेळा आक्षेपार्ह राहिलेले आहे. उदा. लाच घेऊन प्रश्न विचारणे, लाच घेऊन मतदान करणे, वेळोवेळी उपस्थित न राहणे, उपस्थित राहिल्यास चर्चेत सहभाग न घेणे, चर्चेत सहभाग घेतल्यास कायदा हातात घेणे इ. अनेक बाबी.

जनतेला न्याय देणारे लोकपाल विधेयक संसदेत एकीकडे ४२ वर्षे रखडते तर दुसरीकडे खासदारांच्या पगारवाढीचे विधेयक मात्र एका मिनिटात आवाजी मतदानाने सर्वानुमते मंजूर होते. तर तुम्ही जनतेचे प्रतिनिधी कसे?

संसद सदस्यांची वाढत जाणारी अनुपस्थिती चिंतेचा प्रश्न आहे. २६ एप्रिल २००२ रोजी वित्त विधेयकावरील चर्चेच्या वेळी ५४५ सदस्यांपैकी फक्त १७ सदस्यांनी उपस्थित राहून विक्रम प्रस्थापित केला. संसदेच्या २०११ च्या पावसाळी अधिवेशनात महागाईबाबत चर्चा होत असतांना संसदेत फक्त ४८ खासदार उपस्थित होते, ते पुढे ७८ पर्यंत वाढले. १४ व्या लोकसभेचे सभापती सोमनाथ चॅटर्जी अत्यंत हतबल होऊन, काही खासदारांच्या वर्तनाबाबत म्हणाले होते, ''तुम्हाला जनतेने निवडून दिले आहे, परंतु तुम्ही त्यांचे प्रतिनिधित्व करण्याच्या योग्यतेचे नाही.'' भारतीय संसदेचे अलिकडे स्वरूपच बदलले आहे. अन्य देशांच्या संसदीय पद्धतीत सदस्यांचे जे वागणे सहन केले जात नाही, ते भारतात सहन केले जाते. भारतात कायदा मोडणे म्हणजे स्वत:ची ताकद दाखवणे ही प्रथा रूढ होऊ पहात आहे. कायद्यावर चर्चा करणे आवडत नाही. सदस्यांची वागणूकही सभापतींच्या सहनशीलतेचा अंत पहाणारी असते. २०१० मध्ये पाच आठवड्यांचे संसदेचे पूर्ण अधिवेशन कोणतेही कामकाज न होता संपविण्यात आले होते. कारण विरोधक टू-जी स्पेक्ट्रम घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी संसदीय समिती नेमण्याची मागणी करीत होते.

श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. - **अण्णा हजारे**

**अण्णा हजारे किंवा टीम अण्णा म्हणजे जनतेचे प्रतिनिधी?**

१) भारतीय जनतेने लोकशाही पद्धतीने निवडून दिलेले संसदेतील प्रतिनिधी खरे लोक प्रतिनिधी का?

२) ६४ वर्षानंतर एखाद्या राष्ट्रीय प्रश्नावर सत्तेबाहेर असलेल्या किंबहुना कोणतीही सत्ता नसलेल्या गांधीवादी अण्णा हजारे यांच्यासारख्या एका समाजसेवकाचे नेतृत्व स्वीकारून भारतातील बहुसंख्य जनता रस्त्यावर उतरते. तब्बल १२ दिवस ऐतिहासिक असा अहिंसात्मक लोकलढा निर्माण होतो. तेव्हा अण्णा हजारे हे जनतेचे प्रतिनिधी आहेत का? असा सवाल करणाऱ्यांनी हेही लक्षात घ्यावे असे वाटते.

३) संवैधानिक दृष्ट्या टीम अण्णा जनतेचे प्रतिनिधित्व करू शकत नाही, तरीही सरकारने गुडघे टेकले. त्यांना विचारावेसे वाटते, एका राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्ष असलेल्या सोनिया गांधी राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या अध्यक्षा आहेत, राष्ट्रीय सल्लागार परिषदेस संवैधानिक अस्तित्व आहे का? ही परिषद नागरी स्वयंसेवी संघटनांचा समुच्चय असून या बिगर संसदीय यंत्रणेस मनमोहन सिंह सरकारकडून कायदे करण्याच्या सल्लामसलतीसाठी अधिकृतपणे निमंत्रित केले जाते. म्हणजे सोनिया गांधी चालतात, परंतु मा. अण्णा हजारे नाही!

भारतीय संसदीय लोकशाहीत लोकप्रतिनिधी आणि सरकार हे जनतेचे सेवक आहेत. जनतेला कशा प्रकारचा कायदा हवा, ते लोकशाही मार्गाने मांडण्याचा, त्याचा आग्रह धरण्याचा पूर्ण अधिकार आहे. जे जनतेच्या प्रति कर्तव्य बजावत नाहीत किंवा लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी पार पाडत नाहीत अशा लोकप्रतिनिधींना अण्णा हजारे व टीम अण्णा यांचा विरोध आहे. अण्णा हजारे यांचा लढा संसदविरोधी नाही तर संसदेत गैरवर्तन करणाऱ्या खासदारांच्या विरोधात आहे.

आपले आचार, विचार शुद्ध हवेत. - **अण्णा हजारे**

## प्रकरण : चौथे

# जनलोकपालाचा लढा

### दुसऱ्या स्वातंत्र्याची गरज :

**दी**डशे वर्ष देश पारतंत्र्यात होता. एका ईस्ट इंडिया कंपनीने देश लुटला. आज स्वातंत्र्याच्या ६४ वर्षात हजारो विदेशी कंपन्या सनदशीर मार्गाने देशातील जल, जमीन, जंगल, खनिज संपत्ती व सागर संपत्तीची लूट करीत आहेत. पाश्चात्य संस्कृती म्हणजे जगातील सर्वात उच्च संस्कृती असून तिचे अनुकरण करून चंगळवाद, भोगवाद व भौतिक विकास म्हणजेच विकास होय, यासाठीच स्पर्धा लागली आहे.

प्राचीन भारतीय ऋषी व कृषी संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. लोकशाहीच्या नावाखाली खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या धोरणाने भांडवलशाहीचा उदय झाला आहे. त्यामुळे श्रीमंत श्रीमंतच होत असून गरीब गरीबच होत आहे. असमतोल विकास, प्रचंड आर्थिक विषमता, गरिबी, गुंडागर्दी, माफियाराज, जातीय व धार्मिक दंगे इत्यादीमुळे देश अस्थिर बनला आहे. लोकशाहीच्या नावाखाली धनदांडगेशाहीस प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय इत्यादि तत्वांना काळिमा फासला जात आहे. सुदृढ लोकशाहीसाठी व बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी, चिरंतन विकासासाठी, दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईची गरज आहे.

आमच्याच करातून सरकारकडे जमा झालेल्या महसूलातून २५ टक्के रक्कम अनुदान व सवलत या गोंडस नावाखाली अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्यांक व इतर मागासवर्गीयांना देऊन ७५ टक्के हक्क नाकारणाऱ्या व हिरावून घेतलेल्या सरकारी धोरणाचा बीमोड करण्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्याची गरज आहे.

| तुमच्या उक्ती व कृतीत फरक असता कामा नये. - **अण्णा हजारे** |
|---|

देशातील भ्रष्टाचारास समूळ नष्ट करण्यासाठी सशक्त कायदा असावा यासाठी न्यायमूर्ती संतोष हेगडे, प्रसिद्ध विधीतज्ञ शांतीभूषण आणि अरविंद केजरीवाल यांच्या वतीने असे सांगण्यात आले की, विविध तज्ञ व्यक्ती, तसेच या विधेयकावर वेबसाईटवर देशातील जनतेच्या प्रतिक्रिया आणि जनतेशी चर्चा करून या सशक्त विधेयकाचा मसुदा तयार करण्यात आला. या विधेयकाला ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, ज्येष्ठ विधीतज्ञ प्रशांत भूषण, भारतातील पहिल्या महिला आय.पी.एस. किरण बेदी, माजी निवडणूक आयुक्त जे. एम. लिंगडोह यांनी समर्थन दिले. सर्वानुमते सदर जनतेच्या जनलोकपाल विधेयकाची एकेक प्रत पंतप्रधान आणि देशातील सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना डिसेंबर २०१० मध्येच पाठविण्यात आले. परंतु त्यांची कोणीही दखल घेतली नाही. अगदी एप्रिल २०११ पर्यंत साधी पोचही मिळालेली नाही. सरकारचे लोकपाल विधेयक कुचकामी असून भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी सशक्त अतिशय प्रभावी असे जनलोकपाल विधेयक हवे होते. त्यासाठीच मा. अण्णा हजारे यांनी सरकारचे विधेयक नाकारले व जनलोकपाल विधेयकाचा आग्रह धरला. त्यासाठी अण्णा हजारे व त्यांच्या टीमतर्फे दरम्यानच्या काळात जनलोकपालाची देशाला असलेली गरज जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य केले. त्यामुळे देशात जनलोकपाल विधेयकाबाबत चर्चा व जनजागृती होऊ लागली.

**ऐतिहासिक लढ्यास प्रारंभ :**

मागील ६४ वर्षाच्या स्वतंत्र भारताच्या वाटचालीत निर्माण झालेला श्रीमंतांचा शायनिंग आय.पी.एल. इंडिया व गरिबांचा डार्क बी.पी.एल. भारत ही दोन्ही चित्रे सशक्त लोकशाहीत अपेक्षित नाहीत. भारतात लोकशाही पद्धतीने कायद्यावर आधारलेले राज्य साकार करणे हा भारतीय संविधानाचा हेतू आहे. तो साध्य करण्यासाठी, भ्रष्टाचारमुक्त, सशक्त भारतासाठी जनलोकपाल विधेयकाची गरज आहे. सरकारने तयार केलेल्या कमकुवत लोकपाल विधेयकाऐवजी जनतेच्या वतीने तयार करण्यात आलेले सशक्त जनलोकपाल विधेयक सरकारने मंजूर करावे या मुख्य मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांनी दिल्ली येथे जनआंदोलन करण्याचा इशारा दिला.

> आंदोलनात लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या प्रसार माध्यमांनी संपूर्ण जगाला आपले सामर्थ्य दाखवून दिले. - **अण्णा हजारे**

विदेशात उच्चपदस्थ नेते व धनदांडग्यांनी ठेवलेला काळा पैसा व देशात टू-जी स्पेक्ट्रम, राष्ट्रकुल स्पर्धा अशी भ्रष्टाचाराची एकामागून एक रोज बाहेर पडणारी मोठी प्रकरणे, पंतप्रधानांची त्यास गोलमाल उत्तरे, सर्वोच्च न्यायालयाकडून सरकारला वेळोवेळी फटकारणे तरीही सरकारची प्रचंड उदासीनता, प्रचंड महागाई यामुळे सामान्य व मध्यमवर्गीयांच्या मनात सरकारबद्दल प्रखर असंतोष पसरला. याचवेळी भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कठोर कायदा करावा या मागणीसाठी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी, २०११ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर इंडिया अगेन्स्ट करप्शन या संघटनेच्या वतीने मोर्चाचे आयोजन केले. त्यात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, किरण बेदी, अरविंद केजरीवाल, स्वामी अग्निवेश, प्रशांत भूषण यांचेसह अनेक नामवंत व हजारो नागरिक सहभागी झाले होते.

२३ फेब्रुवारी, २०११ रोजी भ्र. वि. जन आंदोलन न्यास, जिल्हा शाखा, नांदेडच्या वतीने देशातील पहिली ऐतिहासिक जाहीर सभा नांदेड येथे मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आली. यात भारतातील पहिल्या महिला आयपीएस किरण बेदी, अरविंद केजरीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत भ्रष्टाचार मुक्त भारतासाठी सरकारने कठोर लोकपाल विधेयक आणावे अन्यथा दिल्ली येथे जन आंदोलन उभारण्याचा इशारा मा. अण्णा हजारे यांनी सरकारला येथील हजारो जनतेच्या साक्षीने दिला.

सशक्त लोकपाल विधेयक असावे व त्यासाठी सरकारने नागरी संघटनांच्या प्रतिनिधींचाही समावेश मसुदा बनविण्याच्या समितीत करावा अन्यथा ५ एप्रिल पासून दिल्लीत जन आंदोलन करण्याचा इशारा मा. अण्णा हजारे यांनी २६ फेब्रुवारी २०११ रोजी प्रेस क्लबमध्ये पत्रकार परिषदेत दिला. मा. पंतप्रधान यांना वारंवार पत्रव्यवहार करूनही त्याची दखल घेतली जात नसल्याची खंत व्यक्त केली. भ्रष्टाचार, घोटाळे आणि काळ्या पैशाच्या विरोधात एक रॅली २७ फेब्रुवारी २०११ रोजी स्वामी रामदेवजी बाबा, मा. अण्णा हजारे, स्वामी अग्निवेश, राम जेठमलानी, किरण बेदी, अरविंद केजरीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. रामलीला मैदान ते जंतरमंतरपर्यंत निघालेल्या निषेध यात्रेत देशातील सर्वत्र फोफावलेला भ्रष्टाचार रोखण्यासाठी कडक तरतुदी असलेले लोकपाल विधेयक आणण्याची गरज अण्णांनी स्पष्ट केली व पंतप्रधानांनी यासाठी मार्च अखेरपर्यंत पावले उचलावी अन्यथा आपण ५ एप्रिल पासून

दिल्लीत आमरण उपोषण सुरू करू, अशी घोषणाही केली. परंतू त्याची फारशी दखल पंतप्रधान व सरकारने घेतली नाही. सर्वच नेत्यांनी मा. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांना भेटून भ्रष्टाचाराला अंकुश लावण्यासाठी कठोर कायद्याची मागणी केली. अशा प्रकारे मा. अण्णा हजारे यांनी लोकपालाचा मुद्दा दिल्लीत ठळकपणे मांडला.

अखेर मा. अण्णा हजारे यांच्या उपोषणाच्या इशाऱ्याची दखल घेऊन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पत्राद्वारे मा. अण्णांना ८ मार्च रोजी चर्चेला पाचारण केले. (सरकारचे लोकपाल विधेयक कमकुवत असल्याचा सूर राष्ट्रीय सल्लागार परिषदेनेही व्यक्त केला) आणि परंतु त्यातून फारसे निष्पन्न झाले नाही.

भ्रष्टाचाराची चौकशी करणाऱ्या संस्थांना सरकारचा धाक वाटेनासा झाला आहे. ही व्यवस्था बदलण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी कडक कायदा करण्याची गरज आहे. सी.बी.आय.सारखी यंत्रणा, सर्व पोलीस यंत्रणा हाताशी असताना एवढे प्रचंड घोटाळे झाले, मात्र यामध्ये एखादा मंत्री, एखादा सनदी अधिकारी तुरुंगात गेला, जन्मठेप झाली किंवा फाशीची शिक्षा झाली अशी उदाहरणे नाहीत. त्यासाठी लोकपालाच्या कठोर कायद्याची गरज असल्याचे प्रतिपादन अण्णा हजारे यांनी राज्यभर व देशात झालेल्या विविध बैठका व सभातून व्यक्त केले. अशा कायद्याचा मसुदा करताना त्यामध्ये जनतेतून विविध क्षेत्रातील ११ जणांची समिती नेमण्यात यावी. तिला अधिकार देण्यात यावेत. ही समिती व शासनातील काही अधिकारी यांनी कायद्याचा मसुदा तयार करावा. असे प्रतिपादन केले.

**राजघाट, इंडिया गेट ते जंतरमंतर : पहिले ऐतिहासिक आंदोलन**

५ एप्रिल २०११ रोजी ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांनी नियोजनानुसार आपल्या शेकडो समर्थकांसह राजघाट येथे महात्मा गांधींच्या समाधीला आदरांजली वाहून अण्णा इंडिया गेट येथे आले. इंडिया गेट येथून वंदे मातरम्, भारत माता की जय, अण्णा हजारे जिंदाबाद अशा घोषणा देत, तिरंगा खांद्यावर घेऊन, हातात जनलोकपाल विधेयकाच्या समर्थनार्थ फलक घेऊन हजारो युवक व नागरिक मिरवणुकीने जंतरमंतरकडे पोहोचले. हजारो युवक व कार्यकर्ते जमले. प्रेरणादायी देशभक्तीपर गाणी, भ्रष्टाचारविरोधी पथनाट्य, घोषणा इ.नी परिसर दणाणून गेला. मा. अण्णांच्या

| संसदेपेक्षा जनसंसद श्रेष्ठ.- **अण्णा हजारे** |
| --- |

घोषणांना प्रचंड प्रतिसाद देत युवकांनी गर्दी केली. परंतु पहिल्या दिवशी सरकारने फारशी दखल घेतली नाही. जंतरमंतर येथे पाच दिवस चाललेल्या मा. अण्णा हजारे यांच्या ऐतिहासिक लढ्याने जादू केली.

देशातील भ्रष्टाचाराचा अंधकार दूर करण्यासाठी नवनायक देशवासियांना मिळाल्याचा आनंद जनतेला झाला. सामान्य जनतेला आपल्या संघटित शक्तीची जागृती व जाणीव झाली. राजकीय नेते सर्वस्व नाहीत तर जनता ही या देशाची मालक आहे. लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य ही संकल्पना मा. अण्णांनी प्रत्यक्षात उतरवली. समाजाच्या सर्वच स्तरातून आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आंदोलनात स्त्री, पुरुष, युवक, विद्यार्थी, विविध सामाजिक संघटना, समाजसेवी संघटना, सर्व कर्मचारी संघटना, स्वयंसेवी संघटना, किरण बेदी, अध्यात्मिक गुरु श्री रविशंकर, योगगुरु स्वामी रामदेव बाबा, अरविंद केजरीवाल असे शुद्ध आचार-विचार असलेल्या व्यक्तींची एक शक्ती देशात उभी राहिली. देशाच्या सर्वोच्च न्यायालयानेही अण्णा हजारे यांच्या आंदोलनाची दखल घेत एका प्रकरणादरम्यान सरकारला सुनावले, देशातील परिस्थिती सुधारली नाही तर अण्णा हजारे यांच्यासारख्या आणखी आंदोलनाला सरकारला सामना करावा लागेल. जनलोकपालासाठी झालेल्या आंदोलनाप्रमाणे जनता सर्वांना धडा शिकवेल.

अखेर ९ एप्रिल २०११ रोजी सरकार नमले. जनतेचे प्रतिनिधी व सरकारच्या वतीने सशक्त लोकपालचा मसुदा तयार करण्यासाठी संयुक्त समिती गठित करण्याचा निर्णय सरकारतर्फे घेण्यात आला. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह म्हणाले, 'सरकार आणि सामान्य लोकांचे प्रतिनिधी भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी एका समझोत्यावर तयार झाले आहेत, याचा मला आनंद आहे. अण्णा हजारे आपले उपोषण समाप्त करण्यास तयार झाले, याचा मला खूप आनंद आहे.' अण्णा हजारे यांनी एका लहान मुलीच्या हातून लिंबू पाणी घेऊन उपोषण मागे घेतले.

अण्णा हजारे यांनी आपल्या वतीने समितीवर ज्या पाच जणांचा समावेश केला, त्या पाच जणांबद्दलचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे आहे.

| |
|---|
| नीतीमत्तेचे पुजारी बना. - **अण्णा हजारे** |

**शांतीभूषण सह-अध्यक्ष :**

१९७७ साली मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या केंद्रातील जनता सरकारमध्ये कायदा मंत्री होते. शांतीभूषण यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९२५ रोजी झाला. वयाच्या ८७ व्या वर्षीही तरुणाला लाजवेल अशा जिद्दीने शांतीभूषण अण्णांच्या नेतृत्वाखाली लोकपाल लढ्यात सक्रिय सहभागी झाले आहेत. शांतीभूषण हे काही काळ काँग्रेस (ओ)चे सदस्य होते. पुढे ते जनता पक्ष स्थापन झाल्यावर त्यात गेले. मंत्रीही झाले. १९८० साली भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यावर त्यात गेले. १९८६ नंतर ते तेथून बाहेर पडले. शांतीभूषण यांना ज्येष्ठ विधीतज्ञ व ख्यातनाम व्यक्ती म्हणून २००९ साली जगमान्यता मिळाली. या वर्षी जगभरातील महानुभवी व्यक्तींची जी यादी प्रकाशित करण्यात आली. त्यात त्यांचे नाव ४७ व्या क्रमांकावर होते. शांतीभूषण हे अत्यंत निर्भीड बाण्याचे असून सर्वोच्च न्यायालयात टॉपचे वकील म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यांनी देशातील १६ मुख्य न्यायमूर्तींच्या प्रामाणिकपणावर फक्त प्रश्नचिन्हच निर्माण केले नाही तर त्यांच्या विरोधातील आपले मत जाहीरपणे मांडले. या १६ न्यायमूर्तींपैकी ८ जण पूर्णपणे भ्रष्टाचारी असल्याचे त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले. ६ न्यायमूर्ती प्रामाणिक असून उर्वरित दोनबद्दल मात्र काही सांगता येत नाही. देशात वेळोवेळी झालेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. अशा प्रकारे माजी मंत्री असलेले शांतीभूषण एक असामान्य व्यक्तिमत्व असून टीम अण्णांचे सदस्य आहेत.

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे :**

देशातील भ्रष्टाचार मुक्तीचा लढा ज्यांच्या नेतृत्वाखाली लढला जात आहे. अशा टीम अण्णाचे अण्णा हजारे हे सदस्य आहेत. त्यांनी या समितीचे अध्यक्षपद भूषवावे अशी जनतेची मागणी होती. परंतु त्यासाठी त्यांनी स्वत: नकार दिला. अण्णा हजारे यांचा जन्म १५ जून १९३८ साली राळेगण सिद्धी तालुका पारनेर, जि. अहमदनगर येथे सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. ७ भावंडात अण्णा सर्वात मोठे आहेत. घरातील अत्यंत गरिबीमुळे अण्णा केवळ इयत्ता ७ वी पर्यंतचे शिक्षण घेऊ शकले. दादर रेल्वे स्टेशनच्या बाहेर एका फूल विक्रेत्याच्या दुकानात नोकरी केली. नंतर स्वत: फूल विक्रीचे दुकान टाकले. वयाच्या २२ व्या वर्षी अण्णा सैन्यात दाखल झाले. १२ वर्षांच्या स्वच्छ

शुद्ध विचार व निष्कलंक चारित्र्य हवे. - **अण्णा हजारे**

सेवेनंतर त्यांनी सन्मानपूर्वक निवृत्ती घेतली. सेवा काळात १९६५ च्या भारत-पाक युद्धात सहभाग घेतला. शत्रूशी लढताना सुदैवाने वाचले. त्यांचे सर्व सहकारी शहीद झाले. सेवाकाळात सैन्य सेवा पदक, संग्राम पदक, स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवाचे पदक, पश्चिमी स्टार असे सन्मान पटकावले. पद्मश्री, पद्मभूषण व इतर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. राज्यात राळेगण सिद्धी या आपल्या जन्म गावास आदर्श गावात परिवर्तित केले. राज्यात माहिती अधिकाराचा कायदा, ग्रामसभेचा कायदा, दप्तर दिरंगाईचा कायदा, बदल्यांचा कायदा व इतर कायद्यांसाठी जनआंदोलन केले. राज्यातील भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे बाहेर काढली. राज्य शासनातील सहा मंत्र्यांना व शेकडो अधिकाऱ्यांना घरी पाठविले. १९९७ साली भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासाची स्थापना केली. २००६ साली माहितीच्या अधिकारात दुरुस्ती करून तो पांगळा करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न हाणून पाडला.

**न्यायमूर्ती एन. संतोष हेगडे :**

न्यायमूर्ती एन. संतोष हेगडे यांचा जन्म १६ जून १९४० रोजी झाला. यांचे वडील के. एस. हेगडे हे लोकसभेचे अध्यक्ष होते. त्यांनी काही काळी कर्नाटकाचे ॲडव्होकेट जनरल म्हणून काम पाहिले. सन १९९८ साली देशाचे सॉलीसिटर जनरल म्हणून त्यांनी काम केले. जानेवारी १९९९ ते जून २००५ पर्यंत त्यांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणूनही काम केले आहे. सन २०११ मध्ये कर्नाटकाचे लोकायुक्त म्हणून त्यांची कारकीर्द गाजली. कर्नाटकातील खाण घोटाळा प्रकरणी बेल्लारी ब्रदर्स कंपनीचे माजी मंत्री जनार्दन रेड्डी व बंधू श्रीनिवास रेड्डी यांना अटक झाली व मुख्यमंत्री यदियुरप्पा यांना पायउतार व्हावे लागले. सदर प्रकरणात लोकायुक्त म्हणून निर्भीडपणे सरकारकडे अहवाल सादर केला. या समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्यासाठी त्यांच्या नावाचा विचार करण्यात येत होता, पण त्यांनी स्वत:च नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश जी. एस. वर्मा या पदासाठी अधिक लायक असल्याचे त्यांनी सांगितले. लोकपालाकडे पोलिसाचे सामर्थ्य असायला हवे असा विचार न्यायमूर्ती एन. संतोष हेगडे यांनी मांडला आहे.

व्यक्तीतील 'मी'पणा व अहंकार सुटला की लोकसेवेतच देव दिसतो. - **अण्णा हजारे**

**अरविंद केजरीवाल :**

अरविंद केजरीवाल हे एक प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांचा जन्म १९६८ साली हरियाणातील हिसार येथे झाला आहे. ते मेकॅनिकल इंजिनीअर असून त्यांनी आय.आय.टी. खडकपूर येथून आपले शिक्षण पूर्ण केले आहे. ते बी.टेक. आहेत. परिवर्तन नावाच्या एन.जी.ओ.चे ते प्रमुख आहेत. १९९२ साली वयाच्या २४ वर्षी सिव्हील सर्व्हिसेससाठीही त्यांची निवड करण्यात आली होती. त्यांची पहिली पोस्टिंग दिल्ली येथे सहा. आयकर आयुक्त म्हणून करण्यात आली होती. राजस्थान कॅडरमधील आय.ए.एस. अधिकारी अरुणा राय यांच्या सोबतीने लोक माहिती अधिकाराचे आंदोलनात सहभाग घेतला होता. भ्रष्टाचाराच्या विरोधात माहिती अधिकाराची गरज यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. २००५ साली त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला व समाजसेवेत स्वत:ला झोकून दिले. टीम अण्णाचे प्रमुख सदस्य म्हणून त्यांनी अलिकडे देशात खूप नावलौकिक मिळविला आहे.

**प्रशांत भूषण :**

प्रशांत भूषण हे एक प्रसिद्ध वकील असून सर्वोच्च न्यायालयात कार्यरत आहेत. त्यांचा जन्म १९५६ साली झाला आहे. या समितीचे सह अध्यक्ष असलेले शांती भूषण हे त्यांचे वडील आहेत. त्यांची द केस दॅट शूक इंडिया, बोफोर्स-द सेलिंग ऑफ अ नेशन ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. देशात गाजलेल्या टू-जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात सर्व याचिकाकर्त्यांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात समर्थ व प्रभावीपणे बाजू मांडली. त्यामुळेच न्यायालयाने टू-जी स्पेक्ट्रम घोटाळा प्रकरणी १२२ परवाने रद्द केले व १७६ कोटीचे घोटाळ्याचे प्रकरण उघडकीस आले.

**अण्णांच्या लोकलढ्यास उत्स्फूर्त पाठिंबा :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात म. गांधी यांच्या नेतृत्वाखाली कोट्यावधी जनता उभी राहिली. अनेकांनी बलिदान दिले. अनेकांनी आपले जीवन देशसेवेसाठी समर्पित केले हा इतिहास आहे. स्वातंत्र्यानंतर १९७४ मध्ये भ्रष्टाचार विरोधातील जय प्रकाश नारायण यांनी केलेल्या लोकलढ्यात कोट्यावधी जनता उतरली. आता काळ बदलला आहे. विज्ञानाने भौतिक प्रगती केली. परंतु माणसाचे माणूसपण हरवले आहे. संवेदना बोथट झाल्या आहेत. बेजबाबदार युवापिढी निर्माण होत आहे अशी चर्चा होऊ लागली.

युवाशक्ती हीच खरी राष्ट्रीय शक्ती आहे. - **अण्णा हजारे**

**सर्व जाती, धर्मांचा सहभाग :**

याही परिस्थितीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली देशव्यापी जनलोकपालाच्या लढ्यात अख्खा देश सामील झाला. गल्ली-बोळीतून, वाडी-तांड्यातून विविध राज्यातून आलेले विविध भाषा, विविध जाती, धर्म व वेशभूषा असलेले स्त्री-पुरुष, युवक सक्रिय सहभागी झाले. काश्मीरपासून ते कन्याकुमारीपर्यंत, मुंबईपासून ते बंगाल आणि आसामपर्यंत या आंदोलनात कोट्यावधी लोक सहभागी झाले. त्यामुळेच सरकार हादरले.

आंदोलनात विविध जाती, धर्मांच्या लोकांचा सहभाग होता. उत्तरप्रदेश, बिहार, मुरादाबाद, होशियारपूर, अलिगढहून मुस्लीमांचे एक-एक मोठे गट आले होते. अण्णा हजारे झिंदाबाद, भ्रष्टाचारी मुर्दाबादच्या घोषणा देत सहभागी झाले होते. रामलीला मैदानावर प्रार्थनेच्या वेळी शेकडो मुस्लीम बांधव नमाज अदा करताना आपण पाहिले. हमाल, मापाडी, रिक्शावाले, मागासवर्गीय, आदिवासींनी सहभाग घेतला. काही आदिवासी आप-आपल्या वेषभूषेत आले होते. अनेक नामवंत व्यक्ती सामान्य जनतेच्या गर्दीत सहभागी झाले होते.

अण्णा हजारे यांच्या लोकलढ्यास देशातील सामान्य जनतेने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला त्याचबरोबर देशातील दिग्गज नेते कॉ. ए. बी. वर्धन, खा. सिताराम यचूरी, दिनेश त्रिवेदी राज्यमंत्री केंद्र सरकार, तृणमूल काँग्रेस, प्रा. पी. के. धूमल, मुख्यमंत्री हिमाचल प्रदेश, शांताकुमार माजी मुख्यमंत्री, मुख्तार अब्बास नकवी, खा. डॉ. राजन सुशांत, भा. ज. पा.चे वरिष्ठ नेते राजनाथसिंह तसेच अनेक काँग्रेसचे खासदार व नेते यांनी जाहीर पाठिंबा दिला. तसेच, सिनेसृष्टीतील प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री सुष्मिता सेन, शबाना आझमी, सुपरस्टार अमिताभ बच्चन, जूही चावला, अमीर खान, अनुपम खेर, राहुल बोस, दिया मिर्झा, शेखर कपूर, शहनाज पदमसी, बिपाशा बासू, नाना पाटेकर, सदाशिव अमरापूरकर, प्रसिद्ध दिग्दर्शक रामगोपाल वर्मा इत्यादीसह अनेक अभिनेत्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. तसेच योगगुरु रामदेव बाबा, आध्यात्मिक गुरु श्री रविशंकर, किसान नेते स्वामी अग्निवेश, प्रसिद्ध सामाजिक नेत्या मेधा पाटकर, संपादक विजय चोपडा, एम. जे. अकबर यांच्यासह प्रसार माध्यमातील अनेक

युवक हाच राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. - **अण्णा हजारे**

नामवंतांनी सक्रिय पाठिंबा दिला. याचबरोबर मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी, सी.बी.आय. संचालक, के. एन. सिंग, भारताचे मुख्य नियंत्रक व महालेखा परीक्षक विनोद राय यांनीही जाहीर समर्थन केले. अनेक प्रसिद्ध उद्योगपतींनीही पाठिंबा दिला. आंदोलनात मुंबईच्या डबेवाल्यांनीही १२० वर्षाच्या अखंड सेवेला एक दिवसासाठी खंडित करून जाहिर पाठिंबा दिला. तसेच पी. मुदगील स्वामी नावाचे १०३ वर्षे वयाचे स्वातंत्र्य सैनिकांनी अण्णा सोबत उपोषणात सहभाग घेतला. या आंदोलनात लाखो युवकांचा पाठिंबा मिळाला.

**विदेशातूनही पाठिंबा :**

तसेच देश विदेशातून, नेपाळ, वॉशिंग्टन, हाँगकाँग, जपान, दुबई व अन्य राष्ट्रातील जनताही या लोकलढ्यात सहभागी झाली. जगप्रसिद्ध टाईम मॅगझिनने दखल घेतली. प्रत्यक्ष राळेगण येथे येऊन अण्णांची भेट घेतली. ''न्यूयॉर्क टाइम्सने'' अण्णांची मुलाखत घेतली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी अण्णांना पाठिंबा दिला.

**प्रसार माध्यमांचा पाठिंबा :**

देशातील तरुणाईचे लोकप्रिय असलेले फेसबुक, ट्विटर आणि नेट या प्रसारमाध्यमातही अण्णा हजारे महानायक ठरले. कोट्यावधी युवकांनी या प्रसारमाध्यमाद्वारे आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदविला. ११ एप्रिल २०११ पर्यंत ३१ लाख नागरिकांनी मिस कॉल करून समर्थन दिले. ट्विटरवर ४ कोटीपेक्षा जास्त लोकांनी समर्थन दिले, गूगलवर ५ एप्रिल ते १० एप्रिल दरम्यान जनतेने सर्वाधिक पाठिंबा दिला. फेसबुकवर लाखो तरुणांनी समर्थन दिले. वेबसाईटवरही प्रचंड प्रतिसाद मिळाला. वाढत्या संख्येमुळे अनेकवेळा वेबसाईट क्रॅश झाली. एका आठवड्यात लाखो लोकांनी ऑनलाईन पिटीशनची नोंदणी केली. शाळा, कॉलेज व विद्यापीठातील युवकांनी प्रत्यक्ष आंदोलनात सहभाग नोंदवला. साडेसात कोटी लोकांचा एस.एम.एस. द्वारा पाठिंबा मिळाला.

**जनलोकपाल लढ्याचा घटनानुक्रम :**

**५ एप्रिल २०११** रोजी अण्णा हजारे राजघाट येथे महात्मा गांधी यांच्या समाधीला आदरांजली वाहून जंतरमंतर येथे उपोषणास बसले. त्यापूर्वी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात त्यांनी आंदोलनासाठी जनजागरण मोहीम हाती घेतली होती. प्रत्येक

हमारी संसद हमारे लोकतंत्र का पवित्र मंदिर है। - **अण्णा हजारे**

सभेला लोकांनी उत्स्फूर्त व प्रचंड गर्दी केली होती. पहिल्याच दिवशी देशभरातून प्रचंड पाठिंबा मिळाला.

**६ एप्रिल २०११** रोजी अण्णा हजारे यांचे उपोषण चालूच राहिले. त्यांच्या भूमिकेमुळे व घणाघाती टीकेमुळे शरद पवार हे लोकपाल विधेयक मसुदा समितीतून बाहेर पडले. या समितीत सामान्य जनता व तज्ञ व्यक्तींचा समावेश व्हावा, असा आग्रह अण्णांनी धरला. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी जनतेच्या पाठिंब्यात वाढ झाली.

**७ एप्रिल २०११** रोजी तिसऱ्या दिवशी अण्णांचे उपोषण चालूच राहिले. सरकारी गोटातील अस्वस्थता वाढली. अण्णांच्या मागण्यांपैकी काही मागण्या मान्य करण्यास केंद्र सरकारने तयारी दाखविण्यास प्रारंभ केला. मसुदा समितीत ५०% सदस्य सरकारचे व ५०% सदस्य जनतेचे हे मान्य केले. केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल यांनी सरकारच्या वतीने आंदोलकांशी अण्णा हजारे यांच्या प्रतिनिधींशी चर्चा सुरू केली. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनीही अण्णांना उपोषण मागे घेण्याचे आवाहन केले. आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी जनतेतून प्रचंड पाठिंबा मिळाला. एस.एम.एस. व इंटरनेटद्वारे पाठिंबा देणाऱ्यांची संख्या वाढली.

**८ एप्रिल २०११** रोजी टीम अण्णांचे प्रतिनिधी व सरकार दरम्यान पुन्हा चर्चा घडून आली. सरकार व जनता यांचे प्रत्येकी पाच प्रतिनिधी मसुदा समितीवर घेण्यास सरकारची मान्यता मिळाली. मसुदा समिती स्थापनेची अधिसूचना व सरकारच्या पत्राची अंतिम प्रत हाती आल्यावरच उपोषण मागे घेणार असल्याचे स्पष्टीकरण अण्णांच्या वतीने अरविंद केजरीवाल यांनी दिले.

**९ एप्रिल २०११** रोजी मसुदा समितीच्या स्थापनेची अधिसूचना व सरकारचे अधिकृत पत्र टीम अण्णांना प्राप्त झाले. ९ तारखेला सकाळी १०.३० च्या सुमारास अण्णांनी आपले ऐतिहासिक उपोषण मागे घेतले. हा जनतेचा प्रारंभिक विजय आहे अजून लढाई लढायची आहे अशी प्रतिक्रिया अण्णांनी व्यक्त केली.

मसुदा समितीचे अध्यक्ष अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली व अण्णा हजारे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व समिती सदस्यांच्या सहा बैठका पार पाडल्या. त्या कधी सुसंवादाने तर कधी कुसंवादाने गाजल्या. सरकार व सरकारी समितीचे सदस्य यांनी

युवक हाच समाजाचा दीपस्तंभ - **अण्णा हजारे**

दूरची भूमिका घेतली. सरकारी लोकपाल मंजूर करून, सरकारने व कॉंग्रेसने देशातील जनतेला फसवलं, धोका दिला असे अण्णांनी स्पष्टपणे सांगितलं. ते सरकारी प्रतिनिधी व टीम अण्णांदरम्यानच्या बैठकीतील विविध चर्चेतून किती खोटे वागले हे नुकत्याच सरकारतर्फे चर्चेच्या ध्वनिफीत जाहीर केल्यानंतर दिसून येते.

लोकपाल व जनलोकपालात संदर्भात सरकारचे प्रतिनिधी व टीम अण्णांचे चर्चेत तब्बल नऊ बैठका झाल्या. या चर्चा खुल्या स्वरूपात (जाहीर) करावे अशी मागणी वारंवार टीम अण्णांतर्फे करण्यात आली होती. परंतु सरकारने ते मान्य केले नाही.

परंतु आता समितीच्या चर्चेची ध्वनिफीत जाहीर करण्यात आली आहे. त्यातील काही भाग वृत्तपत्रांनी प्रसिद्धही केला आहे. त्यामुळे सत्य जनतेसमोर येत आहे. सरकारचे प्रतिनिधी सरकारी नोकरवर्ग, पंतप्रधान यांना लोकपाल कक्षेबाहेर ठेवण्याचा व पंतप्रधानांना लोकपालच्या कक्षेत आणावे ही मागणी करीत होते. समितीसमोर चर्चेत प्रणव मुखर्जी यांनी आपण लोकपाल संदर्भातील दोन्ही मसुदे चर्चेसाठी पुढे ठेवू, त्यावरील चर्चा संसदेत होईल. सरकार या मुद्यावर विचार करेल व नंतर निर्णय घेईल असे म्हटले आहे. जर स्वतंत्र दोन्ही मसुदे संसदेत मांडायचे होते तर संयुक्त समितीचा फार्स कशासाठी? उत्तर नाही? पुढे संसदेत सरकारी लोकपालचा मसुदाच ठेवला, तो मंजूर केला. संसदेपुढे दोन्ही मसुदे ठेवण्याचा वादा करणाऱ्या सरकारने जनलोकपाल विधेयकातील प्रमुख मुद्दे देखील मांडले नाहीत तर जाणीवपूर्वक वगळले व जनतेचा विश्वासघात केला.

**सरकारी लोकपालची होळी :**

अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली नागरी समितीने जनजागरण मोहिमेस गती दिली. दरम्यानच्या काळात सरकारने लोकपालबाबतचा आपलाच मसुदा मंत्रिमंडळात मंजूर केला व ४ ऑगस्ट रोजी संसदेत लोकपाल विधेयक-२०११ सादर केले व जनतेच्या आशा-अपेक्षांचा भंग केला.

देशात सर्वत्र भ्रष्टाचाराने थैमान घातले असताना, अनेक घोटाळ्यात काही मंत्री, खासदार, नेते, उच्च पदस्थ अधिकारी, बडे भांडवलदार यांच्यासह थेट पंतप्रधानांवरही आक्षेप घेतले जात असताना, पंतप्रधान, न्यायपालिका, मंत्री, खासदार यांना लोकपालाच्या कक्षेबाहेर ठेवण्याचा, तसेच लोकपालाच्या कक्षेत फक्त अ-वर्ग

राष्ट्रहितासाठी कार्य करणारे कार्यकर्ते माझे वारसदार - **अण्णा हजारे**

अधिकाऱ्यांचाच समावेश करून, इतर एक कोटीहून अधिक कर्मचाऱ्यांना कक्षेच्या बाहेर ठेवण्याची तरतूद असलेल्या, तसेच नागरिकांच्या सनदेतील मुदतीत काम न केल्यास अधिकाऱ्यांना कोणत्याही शिक्षेचे प्रावधान नसलेला, बड्या मंडळींना वाचवण्यासाठी एक बोथट व तकलादू विधेयक मंत्रीमंडळाने मंजूर केले. इंडिया अगेन्स्ट करप्शन तथा नागरी समितीच्या वतीने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली सदर सरकारी लोकपाल विधेयकाच्या प्रती राळेगण सिद्धी येथे जाळण्यात आल्या व सरकारच्या दुटप्पी धोरणाचा निषेध करण्यात आला, तसेच संपूर्ण देशातून सदर विधेयकाच्या प्रतीची होळी करण्यात आली व जनतेने प्रचंड संताप प्रकट केला. देशातील प्रमुख विरोधी पक्षांनीही या विधेयकाला जोरदार विरोध केला. देशातील नागरिकांच्या व युवकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन, अण्णा हजारे यांनी सशक्त जनलोकपाल विधेयक पारित करण्याच्या मुख्य मागणीसाठी १६ ऑगस्ट २०११ पासून दिल्ली येथे 'करेंगे या मरेंगे' या ध्येयाने आमरण उपोषण करण्याचा सरकारला इशारा दिला व स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढाईत युवक, महिला व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

व्यसनमुक्त युवकांची देशाला गरज. - **अण्णा हजारे**

जंतर मंतर येथील यशस्वी लोकलढ्यामुळे अण्णा हजारे यांच्या रूपाने एक फरिश्ता, महामानव, भगवान कृष्ण देशवासियांना मिळाल्याची भावना आंदोलनात सहभागी झालेल्या डॉ. ललिता अलसटवार यांनी खालील कविता इंडिया गेट येथे आंदोलकांसमोर सादर केली....

## अण्णा

मैं गांधारी आँखों पे पट्टी बंधे ।
इस देश की पतिव्रता हूँ मैं ।
यहाँ जब भी अन्याय, अत्याचार होता।
तिलमिला उठती.....।
आँखों से अंगारे बरसते,
लेकिन मैं कुछ नहीं कर सकती ।
क्यों कि एक पतिव्रता हूँ मैं ।
भ्रष्ट आचारों से सब अंधे हुए,
मेरी आँखें रोतीं।
सत्ता के मद से बेहोश होकर,
डूब रहे हैं सब भारती।
अब मैं चुप नहीं बैठूंगी,
ऐसा महाभारत रचाऊंगी।
अण्णा कृष्ण हैं, मैं माँ हूँ इस लोकसत्ता की।
जरूरत है स्वतंत्र समता, बंधुता की।
अण्णा आप भगवान भी हो, फरिश्ता भी हो,
इन्सान भी हो।
अधर्म मिटाने जनलोकपाल लाये हो।
मैं समझ गई दुर्व्यवहारी दुर्योधन को हटाना है।
मेरी पट्टी खोल..... हर एक,
सुयोधन को वज्रदेही बनाना है।

**- डॉ. ललिता अलसटवार**

# अण्णा, बाबा आणि सरकार !

मागील तीन दशकापासून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे देशाच्या सेवेत समर्पित आहेत. लष्करी सेवेच्या माध्यमातून अण्णांनी आपले ऐन तारुण्यातले आयुष्य देशसेवेसाठी अर्पण केले. त्यानंतर उशाशी दुष्काळ घेऊन हताशपणे व असहाय्य होऊन देवावर व दैवावर हवाला ठेवून अंधकारमय जीवन जगणाऱ्या राळेगणसिद्धी येथील गरीब व्यसनी व सामान्य ग्रामस्थांना जीवनाचा मार्ग सुकर करण्यासाठी राळेगणसिद्धी येथे समाज सेवेच्या कार्याला सुरुवात केली. सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेला माणूस व म. गांधी यांच्या स्वप्नातील स्वावलंबी व स्वयंपूर्ण गाव उभा केला. केवळ एक खेडं बदलून उपयोग नाही म्हणून राज्यात जलसंवर्धन व पाणलोटाच्या कामांना गती दिली. देशातील विविध राज्यातही राळेगणसिद्धीचा प्रयोग राबवला गेला. अण्णांनी सल्लागार म्हणून कार्य केले. विकास कामात होणाऱ्या भ्रष्टाचाराने अण्णा व्यथित झाले व भ्रष्टाचारमुक्त भारताचे स्वप्न घेऊन राज्यात व देशात लोकलढे उभारले.

योगगुरु स्वामी रामदेवबाबा यांनी योग व अध्यात्माबरोबरच काळ्या पैशाविरुद्ध मोहीम राबवली. बाबा रामदेव यांची विचारसरणी व मार्ग वेगळा असला तरी त्यांनी काळ्या पैशाबद्दल मोहीम उघडली. देशहिताचा गंभीर प्रश्न हाती घेतला. जनजागृती केली. मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती यांची भेट घेऊन आपली भूमिका मांडली. पण सरकारने फारसे गांभीर्याने घेतलेले नाही. बाबा रामदेव यांनी रामलीला मैदानावर सुरू केलेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या हजारो महिला, वृद्ध, मुली व नागरिकांवर रात्री १.०० वाजता पोलीस बळाचा वापर करून अश्रुधूर सोडले, झोपेत असलेल्या जनतेवर लाठीचार्ज करण्यात आला. हे लोकशाहीत, अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या जनतेसाठी कुठला न्याय आहे? लोकशाहीचा गळा घोटताना टी.व्ही. द्वारे थेट प्रक्षेपण होताना देशातील कोट्यावधी बांधवांनी पाहिले आहे. याची किंमत सरकारला चुकवावी लागेल.

मा. अण्णा हजारे यांनी या सरकारच्या भ्याड हल्ल्याचा निषेध केला व जंतरमंतर येथे एक दिवसाचे सरकार विरोधात रामदेव बाबांच्या समर्थनार्थ उपोषण केले. जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळाला.

त्यानंतर अण्णा हजारे यांनी सुरू केलेल्या जनलोकपालाचा लोकलढाही त्याच पद्धतीने दडपून टाकण्याची खेळी सरकारने केली. काँग्रेसचे महासचिव दिग्विजयसिंह व केंद्रीयमंत्री सलमान खुर्शीद यांनी बाबांप्रमाणेच अण्णांचेही आंदोलन चिरडण्याची जाहिर भाषा केली. यामुळे सरकारच उघडे पडले व देशात अण्णांच्या नेतृत्वाखाली अहिंसक व ऐतिहासिक लढा उभा राहिला.

## प्रकरण : पाचवे

# दुसरी ऑगस्ट क्रांती

### ऑगस्ट क्रांती - स्वयंस्फूर्त जनआंदोलन :

सरकारी लोकपालाच्या निषेधार्थ व जनलोकपाल विधेयक मंजूर करावे या मागणीसाठी अण्णा हजारे यांनी १६ ऑगस्ट पासून दिल्ली येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला. देशातील सर्व जनतेने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या सायंकाळी रात्री आठ ते नऊ वाजता दिवे बंद करून भ्रष्टाचाराच्या विरोधातील या लोकलढ्यास सुरुवात करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यकर्त्यांसह बहुसंख्य जनतेने उत्स्फूर्तपणे दिवे बंद करून आंदोलनात सहभाग नोंदविला. अण्णांना आंदोलनासाठी जे. पी. पार्कचा पर्याय दिल्ली पोलिसांनी दिला होता. मात्र त्याबरोबरच त्यासाठी २२ जाचक अटी लादल्या होत्या. त्यात वाहनांची मर्यादा ५०, आंदोलकांची संख्या पाच हजारपर्यंत, ध्वनिवर्धक वापरास बंदी, शामियाना टाकावयाचा नाही, केवळ सरकारी डॉक्टरांतर्फेच अण्णांची तपासणी करता येईल. आंदोलन केवळ तीनच दिवसासाठी करता येईल. लोकशाही प्रजासत्ताक देशात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यासाठी सरकारची ही दडपशाही समर्थनीय आहे काय? निश्चितपणे नाही.

### अण्णा हजारे यांना अटक : तिहार तुरुंगात रवानगी :

दिल्लीत अण्णांच्या समर्थनार्थ जनतेचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. ४ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान सरकारातील जबाबदार मंत्री काँग्रेसचे प्रवक्ते यांनी टीम अण्णा विरुद्ध रान उठवले. कपिल सिब्बल म्हणाले भविष्यात कायदा बनवण्यासाठी नागरी समितीचा सल्ला, सहभाग घेतला जाणार नाही. काँग्रेसचे प्रवक्ते मनीष तिवारी यांनी १५

व्यसनांच्या अंधारातून व वासनेच्या काळोखातून युवक मुक्त झाला पाहिजे.- **अण्णा हजारे**

ऑगस्ट पूर्वी पत्रकार परिषदेत अण्णा हजारे हेच पायापासून ते डोक्यापर्यंत भ्रष्टाचारात बुडाले असल्याचा बेलगाम आरोप करून आगीत तेल ओतले. जनमानसातून प्रचंड विरोध होताच, मनीष तिवारी यांनी अण्णा हजारे यांची माफी मागितली. काँग्रेसचे महासचिव दिग्विजयसिंह, प्रणव मुखर्जी, पी. चिदंबरम, काँग्रेस प्रवक्ते राशिद अल्वी यांनी टीम अण्णा व अण्णा हजारे यांना टीकेचे लक्ष्य करून प्रसार माध्यमासमोर बोलत राहिले व जनतेची दिशाभूल करण्याचा आणि स्वत:ला व सरकारला खरे ठरवण्याचा प्रयत्न केला. परंतु जनतेच्या मनातील असंतोष वाढत गेला. जनतेत विरोधाची लाट पसरली. अण्णा हजारे यांनी १६ ऑगस्टपासून जंतर मंतर येथे आंदोलन करण्याचा इशारा दिला. परंतु दिल्ली पोलिसांनी तिथे परवानगी देण्यास नकार दिला. त्यानंतर अण्णा हजारे यांनी इतर चार ठिकाणे सुचवली. परंतु तिथेही परवानगी देण्यात आली नाही. अखेर अण्णांनी १३ ऑगस्टला घोषणा केली, जर त्यांना उपोषणाची परवानगी दिली नाही तर जेलभरो आंदोलन करू व उपोषण दरम्यान पाणीही पिणार नाही असा इशारा दिला.

१५ ऑगस्ट रोजी अण्णा राजघाट येथे म. गांधी यांच्या समाधिस्थळी काही तास ध्यान व चिंतन करून आपला उपोषण करण्याचा निर्धार घोषित केला. अण्णा म्हणाले, जे. पी. पार्कवर उद्या उपोषणासाठी जाणार आहे, ''मला कळले आहे की, जे. पी. पार्क येथे १४४ कलम लागू करण्यात आले आहे, तरी मी तिथे जाईन व उपोषण करेन. पोलीस प्रशासनाने रोखले तरीही तिथेच उपोषण करेन, जेलमध्ये टाकले तरीही उपोषणाला तिथेच बसणार, पुन्हा सोडल्यास, पुन्हा जे. पी. पार्कवर उपोषणाला जाणार, परंतु हे आंदोलन थांबवणार नाही.''

१६ ऑगस्ट क्रांतीचा दिवस उजाडला. दिल्लीत अण्णांच्या समर्थनार्थ जनतेचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. सरकार दरबारी काय खलबते झाली. गुन्हे अन्वेषण विभागाचे उपायुक्त अशोक चांद यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त उपायुक्त संजय भाटीया आणि पी. कुशवाह यांच्यासह सुमारे २५० पोलीस कर्मचाऱ्यांनी सकाळी ७.२५ वाजताच दिल्ली येथील मयूर विहार फेज-१ मधील प्रसिद्ध विधितज्ज्ञ प्रशांत भूषण यांच्या सुप्रीम एनक्लेव या निवासस्थानातून अण्णा हजारे यांना ताब्यात घेण्यात आले.

देह आहे तोपर्यंत देहभान विसरून सेवा करा.- **अण्णा हजारे**

सकाळी ७.४५ वाजता अण्णांना ज्या पोलीस गाडीतून घेऊन जात होते, त्या पोलीस गाडीसमोर शेकडो कार्यकर्ते उभे राहिले. शेकडो अण्णा समर्थक रस्त्यावरच आडवे पडले व रस्ता रोखला. काही समर्थक गाडीच्या बोनेटवर बसले. चहूबाजूंनी कार्यकर्त्यांनी गर्दी केली. पोलीसांनी जनतेला चुकीची माहिती देऊन दिशाभूल केली. अण्णांना उपोषण स्थळी घेऊन जात आहोत असे सांगितले. जीवन अनमोल हॉस्पीटलजवळ प्रसार माध्यमाचे सर्व पत्रकार व कार्यकर्त्यांना पुढे येण्यास पोलिसांनी रोखले. काही कार्यकर्त्यांना जबरदस्तीने बाजूला करण्यात आले. सडकेवरून उठवण्यात आले व गाडी पुढे नेली. अण्णांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी प्रसारमाध्यमांनी सर्वत्र पसरवली. प्रत्यक्ष घटनेचा लाईव्ह टेलिकास्ट सारखे चालू होते. दिल्लीत अण्णा समर्थकांची गर्दी वाढत होती. अण्णांना दिल्ली येथील सिव्हील पोलीस मेस येथे आणण्यात आले. अण्णांनी तिथेच आपल्या उपोषणास प्रारंभ केला व पाणी पिण्यासही नकार दिला.

हजारो कार्यकर्ते तिरंगा हातात घेऊन रस्त्यावर आले, याचवेळी अरविंद केजरीवाल यांनाही अटक करून वेगळ्या वाहनाद्वारे इतरत्र हलवले. जनतेचा जबरदस्त विरोध पाहून पोलीस वेगवेगळ्या रस्त्याने अण्णा व केजरीवाल यांना घेऊन गेले.

इकडे जे. पी. पार्कवर पहाटे पाच वाजतापासून येणाऱ्या अण्णा समर्थकांना पोलीसांनी जागोजागी जबरदस्तीने ताब्यात घेतले. सर्वत्र शहरात जागोजागी हजारो पोलीस तैनात केले होते. रस्त्यारस्त्यावर बॅरिकेडस् लावून अडथळे निर्माण करण्यात आले होते. राजघाट, जे. पी. पार्क, श्यामनाथ पार्कजवळ पोलीसांनी १४४ चे कलम भंग केल्याबद्दल शेकडो कार्यकर्त्यांना अटक केले.

इकडे एन.डी.ए.ने ७.५५ वाजता बैठक बोलावल्याची घोषणा केली. ८ वाजता टीम अण्णाचे सदस्य प्रशांत भूषण यांनी अण्णांच्या अटकेच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे संकेत दिले. ८.०५ वाजता राजघाट येथे किरण बेदी यांना पोलीसांनी ताब्यात घेतले. अण्णांना पोलीसांनी ताब्यात घेतल्यानंतर अण्णांनी पोलिसांना विचारले, ''माझा कोणता गुन्हा आहे म्हणून अटक करण्यात आली आहे?'' पोलीसांनी सांगितले, ''आमच्याकडे काही तशी माहिती नाही, आपल्या अटकेचे

जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत या भेदांना स्थान देऊ नका.- **अण्णा हजारे**

वारंटही नाही. परंतु वरून आदेश आहेत.'' किरण बेदी यांना त्यांच्या समर्थकांसह अटक करून आई.टी.ओ.जवळील पार्क येथे नेण्यात आले. जिथे पूर्वीच शेकडो लोकांना अटक करून ताब्यात घेतले होते. ११ वाजता संसदेच्या कामकाजास प्रारंभ होणार होता. अण्णांच्या अटकेच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने वॉक आऊटची घोषणा करून सरकारला अधिक अडचणीत आणले.

अण्णा, किरण बेदी व अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर अत्यंत प्रक्षुब्ध झालेले शांती भूषण म्हणाले, ''यह सरकार अंग्रेज सरकार बन गई है, यह डॉ. मनमोहन सरकार नहीं, विल्सन, चर्चिल सरकार बन गई है। मेरे फ्लैट में पुलिस आकर, अण्णा को यह कहकर ले गई कि उन्हें उपर से आदेश है। यह भ्रष्टाचार में लिप्त सरकार की तानाशाही थी। यह नेहरू, गांधी की सरकार नहीं रही। यह सरकार अब किसी भी हालत में भविष्य में चुनाव नहीं जीत सकेगी।''

माजी कायदामंत्री व टीम अण्णाचे सदस्य शांतीभूषण यांनाही अटक करण्यात आली व १३, अलीपूर रोड स्थित गॅझेटेड ऑफिसर्स मेस येथे नेण्यात आले.

अण्णांच्या अटकेच्या बातमीमुळे जनतेत प्रचंड असंतोष पसरला. देशातील अनेक मान्यवरांनी पोलीसांच्या भूमिकेचा, सरकारच्या निर्णयाचा निषेध केला. अटकेपूर्वीच अण्णांनी जनतेला संदेश दिला होता की, ''मी उपोषण करत आहे. मला माहित आहे की हे सरकार मला अटक करील. जर मला अटक झाली तर आपण मागे हटू नका. आपण सर्व जनतेने हे आंदोलन चालूच ठेवावे. प्रत्येक भारतीयाने आपआपल्या घरातून बाहेर पडा, रस्त्यावर या. पोलीस अटक करेल, अटक करून घ्या. पाहू या की, सरकारच्या जेलमध्ये किती जागा आहे. दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईची हीच वेळ आहे. भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी एक व्हा व लढाईत सामील व्हा.''

दुपारी १२ वाजेपर्यंत दिल्ली शहरात अण्णांच्या समर्थनार्थ हातात तिरंगा घेऊन, वंदे मातरम्, अण्णा हजारे जिंदाबादच्या घोषणा देत हजारो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. पाच हजार कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. प्रसार माध्यमांच्या थेट प्रसारणामुळे देशभरातून जनतेच्या मनातील सरकारबद्दल असलेल्या असंतोषाचा स्फोट झाला. देशात लखनौ, आगरा, वाराणसी, अलाहाबादसह संपूर्ण उत्तर प्रदेशात अण्णांच्या समर्थनार्थ,

व्यापारी, युवक, विद्यार्थी रस्त्यावर उतरून समर्थन देऊ लागले. समर्थनार्थ लखनौ येथील उच्च न्यायालयामध्ये वकील संपावर गेले. अलाहाबाद येथील उच्च न्यायालयाचे वकील संपावर गेले. दिल्ली येथील अण्णा समर्थकांमुळे रस्ते भरून गेले. वाहतूक ठप्प झाली.

देशातील प्रत्येक राज्यात व शहरात अण्णांच्या अटकेचे पडसाद उमटले. काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत व कलकत्ता ते जयपूरपर्यंत ४०० शहरात लाखो लोक आंदोलनात सामील झाले.

महाराष्ट्रात मुंबई येथील आझाद मैदानावर हजारो कार्यकर्ते जमा झाले. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा व तहसिल परिसरात कार्यकर्त्यांनी अण्णांच्या अटकेचा निषेध केला. पुणे, नाशिक, औरंगाबाद, नांदेड येथेही ''मैं अण्णा हूँ'' या नावाची गांधी टोपी घातलेले शेकडो लोकांनी आंदोलनात सहभाग घेतला. पाटणा, जयपूर, चंदीगड, पंजाब, हरियाणा येथे नागरिक व युवकांनी, वकीलांनी, विद्यार्थ्यांनी रॅली काढून पाठिंबा दिला.

हैद्राबाद, आंध्रप्रदेशात तेलगू देशम पार्टीने भव्य रॅली काढून चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखाली एक दिवसाचे उपोषण करण्यात आले. विजयवाडा, वरंगल, आदिलाबाद, तिरुपती व विशाखापटनम् येथेही अण्णांच्या समर्थनार्थ जोरदार प्रदर्शन करण्यात आले. तामीळनाडू राज्यात चेन्नई, कोईम्बतूर, मदुराईसह अन्य शहरात मोठ्या प्रमाणात विरोध प्रदर्शन करण्यात आला. केरळ व कर्नाटकातील प्रमुख शहरात अण्णांच्या अटकेचा निषेध करण्यात आला.

१६ ऑगस्ट सायंकाळी दिल्ली येथे इंडिया गेट व छत्रसाल स्टेडियम येथे हजारो युवक व नागरिक एकत्र येवून मेणबत्ती जाळून प्रचंड विरोध प्रदर्शन केला.

प्रसारमाध्यमाद्वारे सतत चालू असलेल्या बातम्यामुळे सर्व वातावरण बदलून गेले. संपूर्ण देश आंदोलनात सहभागी झाला. अण्णा हजारे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ तिहार जेलमधील कैद्यांनी जेवण घेण्यास नकार दिला. तिहार जेलच्या बाहेरही हजारो कार्यकर्ते नागरिकांची प्रचंड गर्दी वाढू लागली. सर्व देशभर भ्रष्टाचाररूपी राक्षस जाळण्यासाठी वणवा पेटला. लोक जागृत झाले, रस्त्यावर आले. सरकार प्रचंड

| |
|---|
| माझ्या सुरक्षेची चिंता करू नका, माझ्याऐवजी संपूर्ण देशाला 'झेड' सुरक्षेची गरज.- **अण्णा हजारे** |

दबावाखाली आले. ज्या सरकारने सात दिवसासाठी अण्णा व त्यांच्या सहकार्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवले होते. ते सात घंटेही ठेवू शकले नाही. दिल्ली पोलीसांनी १६ ऑगस्ट रोजीच सायंकाळी ७ वाजता विशेष न्यायालयात अण्णांच्या सुटकेसाठी अर्ज दिला व तो मंजूर करण्यात आला. परंतु तुरुंगाच्या नियमावलीनुसार सुटका करण्यासाठीचा असलेला निश्चित कालावधी संपला होता. बाहेर दिल्लीसह संपूर्ण भारत आंदोलनमय झाला होता. ''दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईचा मंतरलेला काळ'' होता. देशप्रेम व देशभक्तीने युवा, नागरिक, महिला भारावून गेले होते. देशभर प्रचंड वातावरण होऊनही सरकार, मंत्री यांची खलबते चालूच होती. अण्णांना सायंकाळी ७ वाजता जेलमधून सोडण्यात आल्यानंतर, स्वामी रामदेवबाबा यांचेसारखी योजना तयार होती. त्यांना पोलीस गाडीत बसवून सरळ विमानतळाकडे नेण्यात येईल. तेथून थेट अण्णांना पुणे येथे विमानाने आणतील व सरळ अण्णांचे गाव राळेगणसिद्धी येथे पोहचविण्यात येईल व त्यांना दिल्ली येथे येण्यास मनाई करण्यात येईल.

परंतु चार दशकांचा समाजसेवेचा व आंदोलनाचा अनुभव असलेल्या अण्णांच्या व्यक्तित्वाचा वेध सरकारला घेता आला नाही. देशसेवेसाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या अण्णांनी भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढाईचे रणशिंग फुंकले होते. निर्धार पक्का होता. अण्णांनी घोषित केले की जोपर्यंत कोणत्याही अटीशिवाय दिल्लीत उपोषण करण्याची परवानगी मिळणार नाही तोपर्यंत तिहार जेलमध्येच उपोषण करणार.

अण्णा आणि सरकारच्या दरम्यान तोडगा काढण्यासाठी १७ ऑगस्ट रोजी संध्याकाळी उशीरा बैठक घेण्यात आली. दिल्लीचे पोलीस आयुक्त बी. के. गुप्ता यांचे निवासस्थानी अरविंद केजरीवाल व किरण बेदी यांची भेट झाली. चर्चा झाली. अखेर दोन्ही पक्षात सहमतीसाठी चर्चा झाली. सरकारने रामलीला मैदानावर अण्णांना कोणत्याही अटीशिवाय उपोषण करण्यासाठी परवानगी देण्याची तयारी दर्शविली.

अण्णा हजारे यांच्या रामलीला मैदानातील उपोषणास सशर्त परवानगी मिळाल्याची बातमी प्रसारमाध्यमाद्वारे वाऱ्यासारखी पसरली. अण्णांच्या समर्थकांचा

परिवर्तन की जंग जारी रहेगी। - **अण्णा हजारे**

उत्साह द्विगुणीत झाला. अण्णांनी आंदोलन चालू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. जनतेनी धरणे, उपोषणे प्रदर्शने चालूच ठेवली होती. देशभरातून रॅली काढल्या जात होत्या.

१६ ऑगस्टपासून तिहार तुरुंगात असलेल्या अण्णांचे दर्शन घेण्यासाठी तुरुंगासमोर तब्बल तीन दिवसापासून वाट पाहणाऱ्या कार्यकर्त्यांत १९ ऑगस्ट रोजी उत्साह संचारला. तिरंगे फडकू लागले. ७४ वर्षाचे युवा गांधीवादी अण्णा तुरुंगातून धावत बाहेर जनतेच्या दर्शनाला आले. तेव्हा अण्णांच्या तीन दिवसाच्या उपोषणानंतरचा फिटनेस पाहून सर्वजण चकित झाले. अण्णांनी आपल्या लाडक्या समर्थकांना आवाहन केले. १९४७ ला मिळालेल्या स्वातंत्र्यासाठी १९४२ ला चलेजावचा लढा सुरू करण्यात आला. परंतु आजही खरे स्वातंत्र्य मिळाले नाही. म्हणून ही स्वातंत्र्याची दुसरी लढाई सुरु झाली आहे. ध्येयपूर्तीसाठी सर्वांनी लढले पाहिजे. अण्णा असतील किंवा नसतील परंतु भ्रष्टाचाराच्या विरोधात पेटलेली मशाल जळत राहिली पाहिजे. चार दिवसापासून जेलच्या बाहेर बसलेले सर्व कार्यकर्ते, युवक व नागरिकांना अण्णांनी धन्यवाद दिले. युवक, महिला व नागरिकांना रामलीला मैदानावरील आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. ''आंदोलनकाळात कोणतीही अनुचित घटना घडणार नाही. कोणतीही तोडफोड किंवा राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होणार नाही याची जरूर काळजी घ्या, ट्रॅफिकचीही पूर्ण काळजी घ्या. आपल्याशी रामलीला मैदानावर बोलेनच!''

समर्थकांना मार्गदर्शन केल्यानंतर अण्णा हजारे मिरवणुकीने मायापुरीकडे रवाना झाले. खुल्या ट्रकमध्ये अण्णा व साथी बसले होते. हजारो युवक व नागरिक हाती तिरंगा फडकवत दिल्लीच्या रस्त्यावरून मोठ्या उत्साहात निघाले. याच वेळी दिल्लीत पाऊस सुरु होता. तरीही हजारो नागरिक मिरवणुकीत सहभागी झाले. दिल्लीच्या रस्त्यावर असे चित्र कधी दिसले नाही. वरचेवर जनलोंढा वाढत गेला व त्याचे रूपांतर जनसागरात झाले. मायापुरीहून अण्णा राजघाट येथे म. गांधी यांच्या समाधीस्थळी दर्शनाला गेले. म. गांधी यांना श्रद्धांजली अर्पण करून, अण्णा थेट इंडिया गेट येथे अमर ज्योतीकडे रवाना झाले. शहीद जवानांना आदरांजली वाहण्यात आली. पश्चिम दिल्ली येथून निघालेल्या ऐतिहासिक मिरवणुकीत हजारो युवक, विद्यार्थी, महिला नागरिक मोटार सायकल,

कार, पायी सहभागी झाले. वंदे मातरम्, भारत माता की जय, अण्णा हजारे जिंदाबादच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

अखेर दुपारी २ वाजता अण्णा हजारे यांचे रामलीला मैदानावर आगमन झाले. उपस्थित हजारो जनतेनी ''भारत माता की जय, इन्कलाब जिंदाबाद, अण्णा हजारे जिंदाबाद''च्या गगनभेदी घोषणांनी गांधीवादी अण्णांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

**ऑगस्ट क्रांतीचा घटनानुक्रम :**

**१६ ऑगस्ट -** उपोषणासाठी सज्ज अण्णासाहेब हजारे यांना सकाळीच (७.३० वाजता) अटक. त्यांच्या टीमलाही राजघाटावर अटक. सुटकेसाठी वा जाहीर उपोषणासाठी पोलिसांच्या अटी मानण्यास अण्णांचा नकार. उपोषणास तिहारमध्येच प्रारंभ. चाल उलटली म्हटल्यावर पोलीस हळूहळू माघार घेऊ लागले. पोलिसांच्या नथीतून तीर मारू पाहणारी सत्ता मागे सरू लागली. सुटकेचे आदेश आले पण अण्णांनी लेखी परवानगी मागितली आणि तिहार तुरुंगातून बाहेर येण्यास नकार दिला. तिहारबाहेर आंदोलकांचा महापूर आला.

**१७ ऑगस्ट -** सरकार आणखी झुकले. अण्णांच्या ६ पैकी ५ मागण्या मान्य. रामलीला मैदान उपलब्ध करून देण्याची तयारी. पण ते किती दिवस देणार यावर घोडे अडले. तिहारमध्ये जाऊन श्री श्री रविशंकर व रामदेव बाबांनी घेतली अण्णांची भेट. अण्णासाहेबांनी तिहार सोडले नाही.

**१८ ऑगस्ट -** अण्णांनी दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्याच्या संदर्भात केलेल्या आवाहनास देशभरातून जोरदार प्रतिसाद. सरकार, पोलिसांकडून टीम अण्णांशी चर्चा सुरू.

**१९ ऑगस्ट -** अण्णासाहेब हजारे तिहारमधून बाहेर आले. राजघाटावर दर्शन घेऊन ते रामलीला मैदानाकडे निघाले. तेव्हा तिहारपाशी जमलेले व रस्त्यात येऊन मिळणाऱ्या हजारो समर्थकांसह अण्णासाहेब मिरवणुकीने रामलीला मैदानाकडे आले. तिथं देखील हजारो समर्थक त्यांची प्रतीक्षा करत होते. अण्णांचे आगमन होताच अभूतपूर्व जल्लोषात त्यांचे स्वागत झाले. ७४ वर्षाचा हा युवक रामलीला मैदानावर

आजारी होऊन मरण्यापेक्षा देशासाठी मरण आले तर माझं भाग्यच समजतो.- **अण्णा हजारे**

पावसात उपोषण मंचाकडे धावत निघाला तेव्हा अण्णासाहेबांचा फिटनेस पाहून सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले. उपोषणाचा चौथा दिवस.

**२० ऑगस्ट -** अण्णांचे उपोषण पाचव्या दिवशीही चालूच, सरकारच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हालचाली चालू. वृत्तपत्रात जाहिरात देऊन सरकारने मागविल्या जनतेकडून सूचना. (वेळकाढूपणाचा पहिला नमुना) दरम्यान अरुणा रॉय यांचा लोकपाल मसुदा जाहीर.

**२१ ऑगस्ट -** रविवारच्या सुट्टीमुळे अण्णांच्या उपोषण आंदोलनाला देशभर अभूतपूर्व प्रतिसाद. ३० ऑगस्टपूर्वी जनलोकपाल विधेयक मंजूर करा वा सत्ता सोडा- अण्णांची सूचना. त्याचबरोबर आता आपापल्या खासदारांना, त्यांच्या निवासस्थानांना घेराव करण्याचे अण्णांचे समर्थकांना आवाहन.

**२२ ऑगस्ट -** पंतप्रधानांनी पाठवले अण्णांना उपोषण सोडण्याचे पत्र. सरकारने दाखविली लोकपाल, जनलोकपाल विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे पाठवण्याची तयारी. केवळ पंतप्रधान वा राहुल गांधींशीच लोकपाल मसुद्यावर अण्णांनी दाखविली तयारी.

**२३ ऑगस्ट -** टीम अण्णांची सरकारच्या मंत्र्यांशी चर्चा, पण निष्फळ ठरली. सरकारी पातळीवर चर्चेच्या फेऱ्या पण ठोस काही उत्पन्न नाही.

**२४ ऑगस्ट -** उपोषणाच्या नवव्या दिवशी चर्चा फिसकटल्याने टीम अण्णा व सरकार दोघेही आक्रमक. संवाद प्रक्रियेतून कपिल सिब्बल व पी. चिदंबरम् हे दूर राहिले. प्रणव मुखर्जींची अरविंद केजरीवाल व किरण बेदी यांच्याशी चर्चा. पंतप्रधानांनीही घेतली वरिष्ठ मंत्र्यांबरोबर बैठक.

**२५ ऑगस्ट -** जन-लोकपालावर १८४ कलमांतर्गत (मतदानाची सुविधा असणाऱ्या) चर्चेस सरकारची तयारी, खुद्द पंतप्रधानांचे निवेदन, लोकसभेचे एकमुखी, उपोषण सोडण्याचे अण्णासाहेबांना आवाहन. अण्णासाहेब ठाम. केंद्रीय मंत्री विलासराव देशमुखांनी केला अण्णांशी संवाद.

**२६ ऑगस्ट** -उपोषणाचा ११ वा दिवस अण्णासाहेबांच्या तब्येतीबाबत

रामलीला मैदान में वर्षों से रावण जलता आ रहा है। मगर इस बार भ्रष्टाचार का रावण जलेगा। - **अण्णा हजारे**

देशभरातून चिंता व्यक्त. लोकसभेत कोणते मुद्दे चर्चिले जावेत यावर चर्चा सुरू, टीम अण्णा निराश, पण ठाम.

**२७ ऑगस्ट -** अखेर संसदेच्या दोन्ही सभागृहात लोकपालावर चर्चा सुरू. अण्णासाहेबांच्या तीन मागण्यांवर प्रमुख राजकीय पक्षांचे एकमत. अण्णांना डॉ. मनमोहन सिंह यांचे पत्र. अण्णांचा रविवार दि. २८ ऑगस्टला सकाळी उपोषण मागे घेण्याचा निर्णय.

**२८ ऑगस्ट -** अण्णासाहेबांनी रविवार दि. २८ ऑगस्ट रोजी रामलीला मैदानावर सकाळी १०.२४ मिनिटांनी आपले २९१ तासांचे उपोषण मागे घेतले. देशभर जल्लोष. अण्णांना नॉयडातील इस्पितळात उपचार व विश्रांतीसाठी दाखल करण्यात आले. सायं. इंडिया गेटवर हजारोंच्या गर्दीने केला अर्धा विजय पूर्णत: साजरा.

## मैं अण्णा हूँ !

देशातील नव्हे तर जगातील सतत १३ दिवस चाललेल्या अण्णा हजारे यांच्या लोकलढ्याला देशभरातील कोट्यावधी जनतेने व विदेशातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त व प्रचंड पाठिंबा दिला. हा पाठिंबा देताना बहुतेकांनी **मैं अण्णा हजारे हूँ!** असे वाक्य असलेली टोपी परिधान केली होती. केवळ अण्णा हजारे यांची टोपी घातल्याने कुणी अण्णा होत नाही, अशी टीका होऊ लागली. खुद्द अण्णा हजारे यांनी **ऑगस्ट क्रांती** आंदोलनाचे उपोषण सोडले तेव्हा टोपी घालणे खऱ्या अर्थाने सार्थ ठरवायचे असेल तर पुढील पाच बाबी प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारल्या पाहिजेत, तरच बलवान व समर्थ देश निर्माण होईल.

- ✯ तुमच्या उक्ती व कृतीत फरक असता कामा नये.
- ✯ आचार, विचार स्वच्छ व शुद्ध हवेत.
- ✯ चारित्र्य निष्कलंक हवे.
- ✯ मनात त्याग भावना असायला हवी.
- ✯ प्रत्येक व्यक्तीत अपमान सहन करण्याची शक्ती असायला हवी.

देश को अहिंसा के मार्ग की जरूरत है । - **अण्णा हजारे**

(दैनिक सकाळ) सप्तरंग रविवार दि. २८ ऑगस्ट २०११ च्या अंकातील भूमिका.

**मी आहे 'अण्णा', 'अण्णा'!**

'मी आहे अण्णा' हा मंत्र अण्णा हजारे यांच्या आंदोलनाने अवघ्या देशाला दिला आहे. या आंदोलनामुळे सगळा भ्रष्टाचार मुळापासून उखडला जाणे लगेचच शक्य नसले तरी या 'राक्षसा'विरुद्ध आपणही काही करू शकतो, आपल्या पातळीवर 'अण्णा' बनू शकतो, ही उर्मी सर्वसामान्यांच्या मनात अण्णांनी जागवली, मरगळलेल्या समाजाला चिवट जिद्द, ऊर्जा दिली. या आंदोलनाने जागा झालेला प्रत्येक 'मी' नक्कीच ठरेल उद्याचा 'अण्णा'!

हे बुद्धिवंतांनो.....

टीम अण्णामुळे अराजक येईल
म्हणणारे बुद्धिवंत ज्ञानी नाहीत.
टीम अण्णा म्हणजे काही
परग्रहावरून आलेले प्राणी नाहीत,
तुम्ही एवढे बुद्धिवंत आहात तर
तुम्ही कुठे पेटून उठत आहात?
अक्कल भाड्याने देऊन
व्यवस्थेचे पाय चाटत आहात!

**-सूर्यकांत डोळसे, पाटोदा, बीड**

**माझीही जबाबदारी !**

देशाच्या दैन्यावस्थेला सरकारच जबाबदार !

संपूर्ण व्यवस्थाच किडलेली आहे !

इतरांना दोष देऊन जमणार नाही !

सुदृढ व सशक्त लोकशाहीसाठी माझे कर्तव्य, माझी जबाबदारी ओळखून, वर्तनात सकारात्मक बदल केला तरच खरे परिवर्तन येईल.

स्वत:चे विचार, आचार, नैतिकता, मानवी मूल्य जपणे व पर्यावरण सुसंगत

कार्यकर्त्यांनी अपमान गिळायला शिकले पाहिजे.- **अण्णा हजारे**

जीवन पद्धतीचा अवलंब करणे हेच प्रत्येकाचे स्वातंत्र्य आहे. ते काटेकोरपणे प्रत्यक्ष आपल्या दैनंदिन व्यवहारात उतरविले तरच खऱ्या स्वातंत्र्याचा आनंद घेता येईल. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे तर माझ्या वर्तनामुळे शेजाऱ्यांच्या (इतरांच्या) स्वातंत्र्यावर बाधा येणार नाही याची जाणीव ठेवून वर्तन करणे होय. जनलोकपाल आला पाहिजे. लोकप्रतिनिधीला परत बोलावण्याचा अधिकार, नापसंतीचे मतदान करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. देश भ्रष्टाचार मुक्त झाला पाहिजे. ही मागणी करताना सक्तीच्या मतदानाचीही गरज आहे. हे कसे विसरता येईल. अन्न, वस्त्र, आरोग्य, शिक्षण, रोजगार याची सार्वजनिक व समान संधी असण्याचा हक्क प्रत्येक स्त्री पुरुषाला असण्याची तरतूद मूलभूत हक्कात करण्याची गरज आहे. तसेच काम करेल त्यालाच खाण्याचा अधिकार आहे. बिनश्रमाचे खाणे गुन्हा ठरविण्यात आला पाहिजे. कारण आधुनिकतेच्या नावाखाली श्रमाकडे पाठ फिरवणारा एक नवा वर्ग उदयाला येत आहे. त्यामुळे श्रम संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. **सत्यमेव जयते** या ब्रीदासोबतच **श्रममेव जयते** या मंत्राचा अंमल करणे गरजेचे आहे.

**भारताचे दुसरे गांधी :**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी म. गांधींच्या पावलावर पाऊल ठेवत आपल्या गावात ग्राम स्वराज्याची स्थापना केली आहे. राळेगण शिंदीचे राळेगण सिद्धीत परिवर्तन करून देशातील आदर्श गाव उभा केला. गावासोबत **माणूसही** उभा करण्याचे काम अण्णांनी केले. असे काम संपूर्ण देशात झाले पाहिजे यासाठी आपले संपूर्ण जीवन इतरांचे जीवन सुखी करण्यासाठी आजन्म ब्रह्मचारी राहून समाज व देशसेवेला वाहिले. महाराष्ट्रात वेळोवेळी केलेली आंदोलने व त्यांचे निष्कलंक जीवन, साधे राहणे व उच्च विचार त्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे गांधी म्हणून आळखले जाऊ लागले. जनलोकपाल लढ्याच्या निमित्ताने ते जनतेच्या प्रचंड पाठिंब्याने भारताचे दुसरे गांधी असल्याच्या प्रतिक्रिया जनमानसातून येऊ लागल्या. अण्णा हजारे यांचे व्यक्तिमत्व म. गांधी यांच्या विचारामुळे अहिंसावादी व लवचिकतेचे असले तरी प्रसंगी सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारखे पोलादी पुरुष म्हणूनही भूमिका निभावली आहे. म. गांधीजींच्या मार्गाने यश मिळणार नसेल, तर छ. शिवाजी महाराज यांचाही मार्ग स्वीकारू असे त्यांनी म्हटले

| म. गांधी, स्वामी विवेकानंद यांच्या विचारांच्या प्रेरणेतून लढा.- **अण्णा हजारे** |
|---|

आहे. अण्णा हजारे यांनी महाराष्ट्रात केलेल्या समाजसेवेच्या कार्यामुळे सन १९९६ सालीच पत्रकार व चित्रपट निर्माते राघव यांनी त्यांचेवर हिंदीमध्ये **अगम्य की खोज** व इंग्रजीमध्ये **इन सर्च ऑफ इटोपिया** असे अर्धा तासाचे चित्रपट निर्माण केले होते. प्रसिद्ध महिला पत्रकार दीपा गहलोत यांनी यात पुढाकार घेतला व चित्रपटाची पटकथा लिहिली होती. चित्रपट निर्माते कृष्ण राघव अण्णांबद्दल लिहितात. हा चित्रपट बनविण्यासाठी मी कोणाचीही आर्थिक मदत घेतली नाही. अण्णांचा त्याग व समाजसेवेच्या कार्यामुळे मी खूप प्रभावित झालो. तब मुझे अण्णा लाल बहादूर शास्त्री जैसे लगे थेक्ष छोटे कद के मगर बडे आदमीक्ष अण्णांवरील चित्रपटांची खूप प्रशंसा झाली. दूरदर्शननेही चित्रपट प्रसारित केला. दोन-तीन आंतरराष्ट्रीय समारंभातही चित्रपटाचे प्रसारण झाले व प्रशंसा मिळाली. जनलोकपालच्या देशव्यापी ऐतिहासिक लढ्यानंतर प्रसिद्ध चित्रपट निर्माते प्रकाश झा यांनी देखील अण्णा हजारे यांच्या जीवनावर आधारित एक चित्रपट सत्याग्रही निर्माण करण्याचे घोषित केले. अमिताभ बच्चन त्यामध्ये अण्णांची भूमिका करतील.

जंतर मंतर, रामलीला मैदान दिल्ली येथील आंदोलनाचे वेळी विविध राज्यातून आपापल्या पारंपारिक पोशाखात व वेशभूषेत आलेले आदिवासी महिला भगिनी व बंधू अण्णा हजारे आंधी हैं, देश के दूसरे गांधी हैं। अशा घोषणा देताना अण्णा हजारेंकडे फार मोठा मुक्तिदाता या आशेने पहात होते. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य व आशावाद उत्स्फूर्तपणे दिसून येत होते.

देशातील सी.बी.एस.ई.च्या सामान्य ज्ञान या पाठ्यपुस्तकात **भारत का दूसरा गांधी** या शीर्षकाचा पाठ अलिकडे समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे बच्चे कंपनीसाठी अण्णा हजारे दुसरे गांधी म्हणून परिचित होणार आहेत.

अण्णांनी अनेक वेळा सांगितलं, ''महात्मा गांधी यांच्या पायाजवळही बसायची माझी पात्रता नाही. त्यामुळे गांधीजींशी माझं नाव जोडणं बरोबर नाही. गांधीजींनी कधी कुणाला कठोर शब्द वापरले नाही. गांधी म्हणत, कठोर शब्द प्रयोग करणं म्हणजे हिंसाच, पण मी अनेक वेळा देश व समाजाशी गद्दारी करणाऱ्यांच्या विरोधात कडक शब्द वापरले, ते मी देश व समाजाच्या भल्यासाठीच केलं. अर्थात गांधीजींच्या विचारानुसार तीही हिंसाच ठरते. त्यामुळे गांधीजींशी माझी तुलना करू नये.''

| |
|---|
| प्रत्येक खेडेरूपी आत्मा समर्थ झाला, तरच देश बलवान बनेल.- **अण्णा हजारे** |

**भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासाचा लोकलढ्यातील सहभाग :**

देश सेवा करून सैन्य दलातून सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झाल्यानंतर अण्णा हजारे उजाड बनलेले आपले गाव, राळेगणसिद्धी येथे आले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर म. गांधी यांच्या स्वप्नातील स्वयंपूर्ण, स्वयंशासित आदर्श गाव व माणूस उभे केले. त्यानंतर भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकात नमूद केलेल्या तत्वावर आधारित समाजाची उभारणी करणे, ही उद्दिष्टे समोर ठेवून १९९७ साली राज्यात भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाची स्थापना केली. भ्रष्टाचारमुक्त भारत निर्माण करणे व जनतेच्या हाती सत्ता येण्यासाठी चळवळ उभारणे व चळवळीच्या द्वारे जनजागृती, प्रबोधन व वेळोवेळी संघर्ष करणे हीच खऱ्या अर्थाने ''स्वातंत्र्याची दुसरी लढाई'' आहे. राज्यातील तेहेतीस जिल्ह्यात २५२ तालुक्यात भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या वतीने राज्यव्यापी दौरे केले. ध्येयवादी कार्यकर्त्यांचे संघटन उभे केले. राज्यातील शेकडो भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा पर्दाफाश केला. राज्याचे अनेक मंत्री व उच्च पदस्थ अधिकारी भ्रष्टाचार प्रकरणी घरी गेले. भ्रष्टाचार विरोधी लढ्यात तुरुंगवासही भोगावा लागला. राज्यात माहिती अधिकाराचा कायदा व्हावा. यासाठी प्रदीर्घ लढा दिला. आंदोलनाचे फलित राज्यात माहिती अधिकाराचा सशक्त कायदा झाला. हा महाराष्ट्र माहिती अधिकाराच्या कायद्याचा मसुदा केंद्र सरकारने स्वीकारला. केंद्रातही माहिती अधिकाराचा कायदा झाला. ''ग्रामसभेचा अधिकार'', ''दप्तर दिरंगाईचा कायदा'', ''रेशनींगचा कायदा'', ''बदल्यांचा कायदा'' इ.साठी आंदोलने केली. सहकारी संस्थांचे शुद्धीकरण, तेलगी मुद्रांक घोटाळ्याविरुद्ध न्यायालयीन लढा, टोल वसुलीविरुद्ध संघर्ष, दारुबंदी व सहकाराचा नवीन कायदा इ.साठी अण्णांनी संघर्ष केला. जन आंदोलने उभारली. राज्यात वेळोवेळी झालेल्या सर्व आंदोलनात व पुढे जनलोकपालाच्या देशव्यापी लोकलढ्यात प्रारंभापासून मा. अण्णा हजारे यांच्या खांद्याला खांदा लावून भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे उपाध्यक्ष अशोक सब्बन हे गेली २५ वर्षांपासून कार्यरत आहेत. तर नगर जिल्ह्यात अभिनव भारत संघटनेच्या माध्यमातून त्यांनी आपल्या समाज सेवेची सुरुवात केली आहे. अल्लाऊद्दीन शेख हे भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या सचिव पदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत आहेत. तसेच हिंद स्वराजचे ते विश्वस्त आहेत. ठाणे जिल्हाध्यक्ष असलेले अस्लम शेख हे त्यांचे वरिष्ठ बंधू आहेत. त्यांचेसोबत ठाणे व रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागात उभयतांचे मोठे काम आहे.

| व्यसनमुक्त, शोषणमुक्त समाज निर्मितीची गरज.- **अण्णा हजारे** |
|---|

आदरणीय अण्णासोबत विश्वस्त म्हणून कर्नल डॉ. रमेश वासुदेव (मुंबई), डॉ. शिवनाथ कुंभारे (गडचिरोली), ॲड्. श्यामसुंदर असावा (नगर), ॲड्. अजित देशमुख (बीड), गजानन हरणे (अकोला), डॉ. बालाजी कोंपलवार (नांदेड) हे कार्यरत आहेत. न्यासाच्या कार्यालयातील महत्वाची जबाबदारी सांभाळत मा. अण्णा हजारे यांचेसोबत २० वर्षांपासून स्वीय सचिव म्हणून कार्यरत असलेले अनिल शर्मा व सुरेश पठारे यांचे महत्वाचे योगदान आहे. तसेच दादा पठारे, दत्ता आवारी या तरुणांनीही सहभाग घेतला आहे. त्याचबरोबर राज्यातील ३३ जिल्ह्यातून जिल्हाध्यक्षाची जबाबदारी सांभाळणारे व वेळोवेळी लोकलढे यशस्वी करण्यात निष्ठेने सक्रिय सहभाग घेणारे भावेश पटेल (मुंबई), अस्लम शेख (ठाणे), युयुन्स आर्ते (रत्नागिरी), जयानंद मठकर (सिंधुदूर्ग), राधेश्याम जगताप, के. डी. पवार (पुणे), संदीप जगताप (सातारा), प्रा. बाळासाहेब हाके (सांगली), नारायण पवार (कोल्हापूर), वसंतराव आपटे (सोला-पूर), हेमंत कवडे (नाशिक), हेमचंद्र काळे (जळगाव), शशिकांत शर्मा (धुळे), संभू पाटील (नंदूरबार), रामराव बोर्डे (औरंगाबाद), प्रा. भगवान दिरंगे (जालना), प्रा. अरुण बोबडे (उस्मानाबाद), डॉ. विलास मोरे (परभणी), डॉ. बालाजी कोंपलवार (नांदेड), डॉ. ए. बी. नायक सवनेकर (हिंगोली), संदीप वरु (वर्धा), जी. व्ही. गौरकर (भंडारा), सुरेश धुर्वे (गोंदिया), अविनाश आंबेकर (चंद्रपूर), चंद्रशेखर भडांगे (गडचिरोली), अनिल ऊर्फ भैय्यासाहेब ठाकरे (अमरावती), अविनाश पसारकर (वाशिम), जयप्रकाश खोत (बुलढाणा), शैलेश पिसाळकर (यवतमाळ), शंकर बगाडे (रायगड), दत्ता सायकर (पिंपरी-चिंचवड) इ.नी जिल्ह्याचे खंबीर नेतृत्व केले.

**राळेगण परिवार अण्णांची शक्ती :**

अण्णांनी राळेगण सिद्धी आदर्श गाव उभं केलं. त्यासोबत माणूसही उभा केला. राळेगणसिद्धी येथील लोक केवळ स्वत:साठी व कुटुंबासाठीच जगत नाहीत. तर देशभक्तीची जाणीव ठेऊन इतरांसाठी जगतात. अण्णांनी ते संस्कार कृती रूपाने केले. अण्णांना राळेगणसिद्धी परिवार गाव हे एक मोठे कुटुंब आहे. जेव्हा जेव्हा गावाच्या, परिवाराच्या, राज्याच्या व देशाच्या विकासासाठी अण्णांनी आंदोलन केले. त्या त्या

वेळी गावकऱ्यांनी व परिसरातील सर्व खेड्यातील जनतेने उपोषण, निषेध, मोर्चे, प्रभातफेरी, दिंडी काढून पाठिंबा दिला. सरकारी लोकपाल बिलाची होळी केली. तर दुसरीकडे लोक लढ्याचा विजय उत्सवही हर्ष व उल्हासात साजरा केला.

अण्णा हजारे व त्यांच्या लोकलढ्यास प्रसिद्ध कवी दुष्यंत यांनी लिहिलेली शायरी तंतोतंत लागू पडते....

हो गई है पीर पर्वत सी पिघलनी चाहिए।
इस हिमालय से कोई गंगा निकलनी चाहिए।
आज यह दीवार पर्दों की तरह हिलने लगी है।
शर्त भी लेकिन यह है कि बुनियाद भी हिलनी चाहिए।
कौन कहता कि आसमान में सुराग़ हो नहीं सकता ?
एक पत्थर तो तबीयत से उछालो यारो।
सिर्फ हंगामा खडा करना मेरा मक्सद नहीं।
मेरी कोशिश यही है कि सूरत बदलनी चाहिए।
हर सडक पर, हर गली में, हर नगर, हर गली में।
हाथ लहराते हुए, हर लाश चलनी चाहिए।
मेरे सीने में नहीं, तो तेरे सीने में सही।
हो कहीं भी आग, लेकिन आग जलनी चाहिए।

## अण्णांचे पंतप्रधानांना पत्र

आदरणीय डॉ. मनमोहनसिंहजी,

आपण सर्वांनी आमच्या आंदोलनाचा आदर केल्याबद्दल मी आपले आणि संसदेचे आभार मानतो. आपल्या संसदेबद्दल आमच्या मनात अपार आदर आहे. आपली संसद आपल्या लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे.

मी व्यक्तिगत स्वार्थासाठी उपोषणाला बसलेलो नाही. आपण मंडळी देशाच्या भल्यासाठी काम करत आहात. मी देखील देशातील जनतेचाच विचार करतो. माझ्याकडे कोणतीही सत्ता नाही. मी केवळ एक सामान्य माणूस आहे.

आमचे हे आंदोलन कोण्या व्यक्ती किंवा पक्षाच्या विरोधात नाही. आम्ही

यह मशाल कभी बुझने मत देना, वह जलती ही रहनी चाहिए। - **अण्णा हजारे**

भ्रष्टाचाराच्या विरोधात आहोत, भ्रष्ट व्यवस्था बदलू इच्छितो. आमच्या आंदोलनादरम्यान आपल्याला किंवा अन्य व्यक्तीला दुखावणाऱ्या अशा काही शब्दांचा वापर मी किंवा माझ्या सहकाऱ्यांकडून झाला असेल तर मी सर्वांतर्फे दिलगिरी व्यक्त करतो. भ्रष्टाचारामुळे देशातील सामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे. यापुढच्या काळात हे सारे थांबेल. अशी मला अपेक्षा आहे. त्यासाठी आपल्याला सर्वांना एकत्र काम करावे लागेल. नियम, कायदे जनतेसाठी आहेत; जनतेपेक्षा श्रेष्ठ नाहीत. सामान्य माणसाला छळणारा भ्रष्टाचार रोखण्यासाठी जनलोकपाल विधेयकामध्ये तीन तरतुदी आहेत.

- ✯ प्रत्येक राज्यात या कायद्याद्वारे लोकायुक्त नेमले जावेत.
- ✯ प्रत्येक क्षेत्रातील नागरी समस्यांसाठी आचारसंहिता बनविली जावी, जी न मानणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई होईल.
- ✯ वरपासून खालपर्यंत केंद्र सरकारचे सर्व कर्मचारी लोकपालाच्या अखत्यारीत आणले जावेत आणि अशाच प्रकारे राज्य सरकारचे कर्मचारीही लोकपालाच्या कक्षेत असावेत.

या तीन मुद्यांचा प्रस्ताव संसदेत आणला जाऊ शकतो! मला अपेक्षाच नव्हे तर खात्री आहे, की आपले सर्व खासदार देशातील जनतेला दैनंदिन भ्रष्टाचारांच्या समस्येपासून मुक्त करण्यासाठी प्रारंभी या तीन मुद्यांवर सहमत होतील. अंतरात्मा सांगतो, की या मुद्यांवर संसदेत सहमती झाल्यानंतर मी उपोषण सोडीन. जनलोकपालचे इतर मुद्दे, उदा. निवड प्रक्रिया इत्यादीदेखील भ्रष्टाचार रोखण्यासाठी अतिशय महत्वाची आहे. जोपर्यंत इतर मुद्यांवर संसदेत निर्णय होत नाही तोपर्यंत मी जनतेसोबत रामलीला मैदानावर बसून राहीन. कारण हा जनतेचा आवाज आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात देशभरात सुरू असलेल्या या आंदोलनात सहभागी होण्यासाठी मी आपल्याला आणि सर्व खासदारांना आवाहन करतो.

आपला,
कि. बा. ऊर्फ अण्णा हजारे

अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल समर्थनार्थ सुरू झालेल्या आंदोलनास संपूर्ण भारतातून मिळणाऱ्या प्रचंड पाठिंब्यामुळे आंदोलन मोडून काढण्याचा खटाटोप

हा युवा शक्तीचा विजय आहे.- **अण्णा हजारे**

करणाऱ्या सरकारला अखेर नमते घ्यावे लागले. लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना अटक केल्याबद्दल पंतप्रधानांनी सभागृहात निवेदन करावे यासाठी विरोधी पक्ष बहिष्कार टाकण्याच्या मन:स्थितीत आले होते. जनआंदोलनाचा दबाव व विरोधी पक्षांबरोबरच सत्ताधारी काँग्रेस पक्षातील काही नेते व खासदार जेव्हा उघडपणे अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला पाठिंबा देऊ लागले, तेव्हा सरकारने आपली भूमिका बदलली. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी दोन्ही सभागृहात निवेदन केले. २७ ऑगस्ट २०११ रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहात १७ तास चाललेल्या प्रदीर्घ ऐतिहासिक चर्चेनंतर अण्णांच्या जनलोकपाल विधेयकातील तीन प्रमुख मागण्या एकमताने मंजूर करण्यात आल्या. या देशाच्या सर्वोच्च सभागृहाचे सभापती व सर्व सदस्यांनी अण्णा हजारे यांनी आपले आमरण उपोषण मागे घेण्याची विनंती सभागृहात उभे राहून केली. देशाच्या इतिहासात प्रथमच कोणतीही सत्ता नसलेल्या एका नि:स्वार्थ समाजसेवकाचा हा सन्मान म्हणजे कोट्यावधी देशबांधवांचा सन्मान सरकारने केला व सार्वभौम प्रजासत्ताकाची पावतीच दिली. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी अण्णा हजारे यांना एक पत्र लिहून त्यांच्या तीन मागण्यांना संसदेने मंजूरी दिली असून अण्णांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. ते पत्र केंद्रीय अवजड मंत्री विलासराव देशमुख यांनी रामलीला मैदानावर रात्री ९ वाजता जनतेसमोर वाचून दाखविले.

प्रिय श्री अण्णा हजारे,

तुम्ही २६ ऑगस्टला पाठविलेल्या पत्राबद्दल धन्यवाद. संसदेत आज लोकपाल विधेयक मुद्यांवर चर्चा झाली हे तुम्हाला माहित आहेच. तुम्ही मांडलेल्या तिन्ही मुद्यांवर आज संसदेत चर्चा होऊन एका दुरुस्तीच्या स्वरूपात या मुद्यांना आज संसदेने मंजूरी दिली. या दुरुस्तीनंतर खालील तीन मुद्यांवर संसद तुमच्याशी सहमत आहे.

१) नागरिक मसुदा

२) योग्य यंत्रणेच्या आधारे खालीच्या पातळीवरील सरकारी कर्मचाऱ्यांना लोकपालाच्या कक्षेत आणणे.

३) राज्यात लोकायुक्तांची स्थापना करणे.

आजची कारवाई संसदेतील संबंधित विभागाच्या समितीकडे पाठविण्याची

यदि शादी करता, तो छोटा सा परिवार होता । - **अण्णा हजारे**

दुरुस्तीही संसदेने आज मंजूर केली. त्यामुळे ते आपल्या विभागाचा कारभार करताना त्याचा समावेश करू शकतील. संसदेने मंजूर केलेल्या दुरुस्त्यांचा विचार करता तुम्ही आपल्या आमरण उपोषणाची लगेच सांगता कराल आणि पुन्हा निरोगी व्हाल, अशी आशा आहे. तुम्हाला निरोगी आयुष्य लाभावे. हीच शुभेच्छा.

शुभेच्छांसह आपला,

**मनमोहन सिंग**

संसदेत अण्णा हजारे यांनी केलेल्या तीन मागण्या मंजूर झाल्याचे पत्र वाचल्यानंतर रामलीला मैदानावरील जनतेसह संपूर्ण देशातील जनतेने विजयोत्सव साजरा केला. भ्रष्टाचारमुक्त भारत हे स्वप्न साकार करण्यासाठी स्वातंत्र्याची ही दुसरी लढाई आहे, या लढाईत मी एक छोटी ज्योत पेटवली आहे, तिचे मशालीत रूपांतर झाले, 'मेरा युवकों से आवाहन है कि, यह मशाल कभी बुझने मत देना, वह जलती ही रहनी चाहिए', हा संपूर्ण देशातील जनतेचा विजय असून, ही फक्त सुरुवात आहे, अर्धी लढाई जिंकली असून पुढील लढाईसाठी सिद्ध राहावे, असे आवाहन अण्णा हजारे यांनी देशवासीयांना केले व अण्णा हजारे यांनी दिनांक २८ ऑगस्ट रोजी रामलीला मैदानावर सकाळी १०.२४ वाजता आपले २९१ तासाचे उपोषण मागे घेतले. संपूर्ण देशभर विजयोत्सव व जल्लोष करण्यात आला. अण्णांना उपचारासाठी व विश्रांतीसाठी नॉयडातील हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. दरम्यान अण्णांच्या अनुपस्थितीत सायंकाळी अत्यंत उत्साहात व जल्लोषात इंडियागेट दिल्ली येथे हजारो युवक, महिला व नागरिकांनी विजयोत्सव साजरा केला. उपोषण मागे घेऊन एका ऐतिहासिक व अहिंसक जनआंदोलनाची सांगता झाली.

अण्णा हजारे यांनी केलेली विविध वक्तव्ये एकत्र करून त्याचा एकत्रित अर्थ काढण्याचा प्रयत्न **''दैनिक जनजागरण''**ने खालीलप्रमाणे केला आहे.

''अपनी आजादी को हम हरगिज भुला सकते नहीं, सर कटा सकते हैं लेकिन सर झुका सकते नहीं'', हे गाणे ऐकल्यावर आम्हाला शहीद भगतसिंग यांची आठवण होते. राजगुरु यांची आठवण होते. जे लोक सरकारमध्ये बसले आहेत, जे लोक संसदेत बसले आहेत, ज्यांनी आपल्या भविष्याची जबाबदारी घेतली आहे, त्यांना भगतसिंग, राजगुरु

आज पूरा देश ही मेरा परिवार है । - **अण्णा हजारे**

यांची आठवण येते का? मी माझे डोके उडवू शकतो पण झुकू शकत नाही. लता मंगेशकर यांनी एक अतिशय सुंदर गीत गायले आहे. ''ऐ मेरे वतन के लोगों जरा आँख में भर लो पानी, जो शहीद हुए हैं उनकी जरा याद करो कुर्बानी'', ही वेळ त्या हुतात्म्यांचे बलिदान आठवण्याची आहे. या देशातील प्रत्येक मुलाला त्या हुतात्म्यांचे हौतात्म्य लक्षात ठेवायचे आहे. फक्त लक्षात ठेवूनच भागणार नाही, तर आपल्याला नवीन हौतात्म्यासाठी सज्ज रहावे लागणार आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीपासून गांधीजींनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. देशातील भ्रष्टाचार मात्र अजून संपलेला नाही. हे कसले आहे स्वातंत्र्य? आता आपल्याला देशाच्या दुसऱ्या स्वातंत्र्याचा लढा लढायचा आहे. हा एक नवीन संघर्ष असणार आहे. ही एक नवीन क्रांती आहे. ते म्हणाले होते, ''हम लाये हैं तूफान से कश्ती निकाल कर, इस देश को रखना मेरे बच्चों संभाल कर'', आपला देश खरोखरच योग्य प्रकारे सांभाळून ठेवला आहे काय? त्याची अवस्था आणखी बिकट केली आहे. या देशाचा जो खजिना आहे तो आपला आहे. त्यात असलेला सर्व पैसा आपला आहे. त्याला चोरांचा नाही तर, फितूरांचा धोका आहे. या देशातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारे जनलोकपाल विधेयक मंजूर होणार नाही तोपर्यंत आपले उपोषण सुरू रहाणार आहे. तोपर्यंत आम्ही इथून हलणार नाहीत. आम्ही इथून जाणार नाहीत. आमचे वजन मग कितीही कमी झाले तरी त्याची आम्हाला काळजी नाही. आमची खरी शक्ती तुम्ही आहात तुमच्यापासून आम्हाला नवीन ऊर्जा मिळते. तरुणांकडून ऊर्जा मिळते. ७४ वर्षाचे वय झाले आहे. स्वत:साठी खूप जगलो आहे. आता हे जीवन संपले तरीही मला त्याची काळजी नाही. माझे हे जीवन देशाच्या कामी पडावे, तरुणांच्या सार्थकी लागावे. अजून मला काय हवे?

माझ्या समोर असलेली लोक संसद ही सर्वात मोठी संसद असल्याचे कोणीही विसरता कामा नये. या लोक संसदेला विसरण्याची चूक करणाऱ्याला लोक विसरून जातील. इतिहास विसरून जाईल. ती जी संसद आहे, तिची निवड आपण सर्वांनी मिळून केली आहे. तीही महत्त्वाची आहे. जिचे निर्माण आपण केले आहे, ती संसद जर आपले म्हणणे ऐकणार नसेल, तर आपल्याला सर्वांनाच विचार करावा लागणार आहे. हा काही एकट्या अण्णाचा प्रश्न नाही. संपूर्ण देशाचा प्रश्न आहे. आपण त्यांची निवड केली आहे, ही गोष्ट खरी आहे. पण ते काही आपले मालक नाहीत. ते तर आपले

| लोकशाहीत लोकप्रतिनिधी आणि सरकार हे जनतेचे सेवक आहे.- **अण्णा हजारे** |
|---|

सेवक आहेत. तेच मालक झाले आहे. त्यांचा हा गैरसमज दूर करायला हवा. त्यांना आपले ऐकावेच लागेल. नाही ऐकले तर त्यांना जावे लागेल. त्यांना जावेच लागेल. देशातून इतके सारे लोक एकत्र होत आहेत. येत आहेत. ते काही फक्त अण्णांमुळे येत आहेत? नाही या देशातील भ्रष्टाचार पाहून ते तंग झाले आहेत. भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या विरोधात ते नाराज आणि निराश झाले आहेत. सरकार आपण मिळून बनविले आहे. त्यांनी चांगल्या प्रकारचे कायदे करावेत यासाठी आपण त्यांना तयार केले आहे. आपल्या पैशाचे, संपत्तीचे रक्षण करण्यासाठी त्यांना नेमले आहे, त्याची लूट करण्यासाठी नाही. आपल्या पैशाची त्यांनी उधळपट्टी करावी. ते हजम करावेत यासाठी त्यांना निर्माण केले नाही.

''माझ्या उपोषणाला सात दिवस झाले आहेत पण मी अजून निरोगी आहे. तुम्ही जेव्हा भारत मातेचा जय जयकार करता, वंदे मातरम् म्हणता, इन्कलाब जिंदाबाद म्हणता, तिरंगा फडकविता तेव्हा त्यातून मला नवीन ऊर्जा मिळत असते. तुम्ही फक्त मलाच ऊर्जा देण्याचे काम करीत नाहीत, तर सर्व देशाला ऊर्जा पुरविण्याचे काम करीत आहात. आजचा तरुण जागा झाला आहे. आजचा तरुण तयार झाला आहे. त्यांच्यापासून या देशाला नवीन ऊर्जा मिळत आहे. आता तर हा देश आपले हक्क मिळविल्याशिवाय राहणार नाही. या देशातील लोक आता दाखवून देतील की त्यांची जी इच्छा आहे, त्यांना जे हवे आहे, ते करून दाखविल्याशिवाय ते राहत नाहीत.''

भारत माता की जय !
वंदे मातरम् !!

देशाचे विश्वस्तच देशाची तिजोरी लुटत आहेत.- **अण्णा हजारे**

## प्रकरण : सहावे

# लोकपाल विधेयकाची सरकारी वाटचाल

### लोकपाल विधेयक स्थायी समितीकडून सादर :

लोकपाल विधेयकाच्या मसुद्याची पडताळणी करणाऱ्या संसदेच्या स्थायी समितीने ९ डिसेंबर २०११ रोजी त्यांचा अहवाल संसदेत सादर केला. त्यात ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांच्या जनलोकपालातील सीबीआय, नागरिकांची सनद, क व ड श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना लोकपालाच्या कक्षेबाहेर ठेवण्याची शिफारस केली. यामुळे अण्णा हजारे यांच्या तीन प्रमुख मुद्यांना समितीने-मिनी संसदच असल्याचा दर्जा व प्रतिष्ठा आहे अशा समितीने-जनभावनेची दखल घेतली नाही. या देशाच्या सर्वोच्च संसदेने अण्णा हजारे यांच्या तीनही प्रमुख मागण्या एकमुखी मान्य करून देशाच्या जनतेला आश्वासित केले होते. याचा विवेक संसदेच्या स्थायी समितीस आपल्या मसुद्यात प्रतिबिंबित करता आला नाही. याउलट लोकपालाच्या कक्षेतील सिटिजन चार्टरला छेद देत सरकारी कार्यालयात तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्याची शिफारस केली आहे. तसेच लोकपालाकडील प्रकरणाची प्राथमिक चौकशी लोकपालाची यंत्रणा करेल व सखोल चौकशी करण्याची जबाबदारी सीबीआयची असेल. अंतिम अहवाल सीबीआय लोकपालाकडे सुपुर्द करेल. लोकपाल अहवालाची न्यायिक बाजू तपासून पाहील व निर्णय घेईल.असे करण्यामुळे लोकपाल हुकुमशहा किंवा एकाधिकारशहा होणार नाही असे समिती व सरकारला वाटते. परंतु या सर्व गुंतागुंतीच्या प्रक्रियेतून प्रकरणाचा जलद व न्याय्य निपटारा न होता ते अधिकच गुंतागुंतीचे व वेळखाऊ ठरणार आहे. यावरून सरकार आपले नियंत्रण सोडण्यास तयार नाही हेच दिसून येते.

सद्गुणी व श्रमनिष्ठ माणूस सदा वंदनीय ठरतो.- **अण्णा हजारे**

सरकारने सशक्त जनलोकपाल विधेयक पारित करावे यासाठी अण्णा हजारे यांनी ११ डिसेंबर २०११ रोजी जंतरमंतरवर एक दिवशीय उपोषण केले. त्यास देशातील जनतेचे, विविध संघटनाचे व विरोधी पक्षांचे जोरदार समर्थन मिळाले. त्यामुळे सरकारवर प्रचंड दबाव निर्माण झाला. हिवाळी अधिवेशनात सदर विधेयकावर चर्चा होऊ शकली नाही यास सत्ताधारी पक्षाबरोबर, विरोधकही जबाबदार आहेत हे नाकारता येत नाही. अखेर सरकारने हिवाळी अधिवेशनाची मुदत वाढवून २७ डिसेंबर रोजी लोकपाल विधेयकावर चर्चा करण्याचे ठरविले. दरम्यानच्या काळात टीम अण्णातर्फे मुंबई येथे दि. २७ व २८ डिसेंबर रोजी जनआंदोलन केले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे एक दिवस अगोदरच अण्णा हजारे यांना आंदोलन मागे घ्यावे लागले. मुंबई येथील आंदोलनास जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळाला नसल्याची चर्चा करताना अण्णा हजारे यांच्या राज्यातील भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनामुळे ३३ जिल्ह्यातील प्रत्येक तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ७० हजार कार्यकर्ते व हजारो जनतेने सहभाग घेतला हे विसरणे क्रमप्राप्त ठरणार नाही.

सदर विधेयकात जनलोकपालातील मागण्यांना शह देण्याचा व सरकार धार्जिण्या दुरुस्त्या करत सरकारने लोकसभेत मंजूर केले. परंतु सरकारचे संसदेत २/३ बहुमत नसल्यामुळे या विधेयकास घटनात्मक दर्जा प्राप्त होऊ शकला नाही. पुढे हे विधेयक मंजुरीसाठी राज्यसभेत पाठवण्यात आले. परंतु सरकारने बहुमताचे कारण पुढे करून सदर विधेयक मतदानासाठी ठेवले नाही. त्यामुळे तब्बल ४२ वर्षाच्या प्रवासानंतरही लोकपालाचा प्रवास पुन्हा एकदा पूर्ववत सुरूच राहिला आहे.

**सरकारी लोकपाल असा मंजूर झाला :**

पंतप्रधानांना लोकपालाच्या कक्षेत घेण्यात आले. परंतु लोकपाल संस्थेच्या नऊ सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांनी मान्यता दिल्याशिवाय पंतप्रधानांविरोधात चौकशी करता येणार नाही. विधेयकातील मूळ तरतूद तीन चतुर्थांश अशी होती. अशा रितीने पंतप्रधानांविरोधात चौकशी करता येणार नाही. विधेयकातील कारवाई सौम्य करण्यात आली. त्याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा, परराष्ट्र व्यवहार, अंतर्गत व बाह्य सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था, अणुऊर्जा व अंतराळ या विषयांस वगळण्यात आले. मागील

बलसंवर्धन, श्रमसंस्कार, देशप्रेम, शीलसंवर्धन व प्रज्ञाविकास या पंचसूत्रीची गरज.- **अण्णा हजारे**

६४ वर्षांचा अनुभव लक्षात घेता वरील विषयास अनुसरून अनेक आर्थिक घोटाळे उघडकीस आले त्या अनुषंगाने या विषयाशी संबंधित आर्थिक करार व त्यातील शर्ती व अटी यांची माहिती उपलब्ध झाल्यास पंतप्रधानांच्या कार्यात अधिक पारदर्शकता निर्माण होईल.

संसद सदस्य आणि विधिमंडळ सदस्यांनाही लोकपालाच्या कक्षेत आणताना सवलत दिली आहे. त्यानुसार केवळ लोकपाल वा लोकायुक्त यांच्या शिफारशीनुसार पीठासन अधिकाऱ्यांना त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही. त्यासाठी संबंधित सदस्यांची रीतसर ट्रायल व्हावी लागेल. (भिजत घोंगडे ठेवण्याची सोय केली आहे.) लष्करासाठी कोर्ट मार्शलची स्वतंत्र व्यवस्था असल्यामुळे लालू प्रसाद यादव यांच्या सूचनेनुसार लष्करालाही लोकपालाच्या कक्षेतून वगळण्यात आले आहे.

केंद्रात लोकपाल मंजूर करताना राज्यात लोकायुक्त नियुक्तीच्या वेळी राज्य सरकारची सहमती घेण्याचे सरकारने मान्य केले. या लोकपालामुळे राज्यांनाही लोकायुक्त निर्माण करावे लागल्यास ते देशाच्या संघराज्य प्रकृतीवर घाला घालणारे ठरेल. ह्या विरोधकांच्या मतांचा सन्मान केला की, भ्रष्टाचार निर्मूलनाच्या राष्ट्रव्यापी कार्यात संघराज्य व्यवस्था अडसर ठरणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. हा वादातीत विषय आहे. लोकपाल विधेयकातील अनुच्छेद २४ मध्येही सरकारने संशोधन केले.

न्यायपालिकेस लोकपालाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले. त्यासाठी ज्युडीशियल अकाउंटेबिलिटी बिल तयार करण्यात येणार आहे. सरकारी लोकपालाच्या मसुद्यानुसार एक राष्ट्रीय न्यायालयीन आयोग स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. टीम अण्णाच्या वतीने प्रारंभीच न्यायपालिकेस या कायद्याच्या कक्षेत आणण्यास हरकत नाही, मात्र हा कायदा कडक असावा आणि तो लोकपाल कायद्याच्या बरोबरच मंजूर करावा अशी मागणी केली होती. या मागणीचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांनीही पुनरुच्चार केला आहे. न्यायाधीशाचा तपास करण्यासाठी यंत्रणा पुरविणारे न्यायालयीन मापदंड आणि उत्तरदायित्व विधेयक २०१० ला लोकसभेने मंजूरी दिली आहे. १९६८ मध्ये आणण्यात आलेल्या न्यायाधीशाच्या चौकशीसंबंधी आदेशात सुधारणा करण्याच्या दृष्टीने हे

विधेयक आणले गेले. न्यायपालिकाच या देशातील जनतेला न्याय देवू शकते असा आशावाद व विश्वास वाटत असताना न्यायालयीन भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे पुढे आली. त्याचबरोबर अनेक प्रकरणात न्यायपालिकेने सरकारच्या चुकीच्या धोरणाबद्दल सरकारला फटकारले. देश व समाजहिताचे धाडसी निर्णय दिले. न्यायपालिका भ्रष्टाचारापासून अलिप्त राहिली पाहिजे. सुदृढ लोकशाहीसाठी तिच्यावरही अंकुश असला पाहिजे. या उद्देशाने डिसेंबर २०१० मध्ये पहिल्यांदा हे विधेयक सभागृहात ठेवण्यात आले होते. अण्णा हजारे यांच्या आंदोलनानंतर यात अनेक सुधारणा करण्यात आल्या. सुधारित विधेयकानुसार एखादा न्यायाधीश घटनात्मक प्राधिकरण व्यक्तिगत रीत्या कोणाविरुद्ध मौखिक भाष्य करीत असेल तर न्यायालयीन गैरवर्तनाचा ठपका ठेवला जाईल. सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाविरुद्ध तक्रारीची चौकशी करण्यासाठी यंत्रणा स्थापन केली जाईल. न्यायालयीन स्वातंत्र्य वाढवितानाचा न्यायाधीशासाठी उत्तरदायित्व ठरवून देत संतुलन राखण्याचा या विधेयकाचा उद्देश आहे. याआधी सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाविरुद्ध सर्वसामान्यांनी दाखल केलेल्या तक्रारींवर कायदेशीर कार्यवाही करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. ती यात आहे. परंतु विधेयकातील सर्व तरतुदींचा अभ्यास व चिकित्सा झाल्यानंतरच खरे स्वरूप कळेल.

**सीबीआय :**

बड्या नेत्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणात सीबीआय वेगाने कारवाई करीत नाही अशी टीका जनमानसातून नेहमीच होत असते. प्रथमच यावर्षी सीबीआयकडून राष्ट्रकुल क्रीडास्पर्धा घोटाळा, टू-जी घोटाळा आणि आदर्श इमारत घोटाळाप्रकरणी बड्या नेत्यांवर आरोपपत्र दाखल झाले.

त्याचबरोबर बोफोर्स गैरव्यवहार आणि आरुषी हत्याकांड या प्रकरणांवर पडदा टाकण्याच्या सीबीआयच्या कृत्यावरही जोरदार टीका झाली आहे. बोफोर्स प्रकरणातील इटालियन उद्योगपती क्वात्रोच्ची यांच्या विरोधातील सर्व आरोप काढून टाकण्याच्या विनंतीला न्यायालयानेही मंजूरी दिली आहे.

१९८४ च्या शीखविरोधी दंगल प्रकरणाचेही सर्व आरोप काढून टाकण्याच्या

निर्भयतेशिवाय कोणताही लढा यशस्वी होत नाही, ''निर्भय बनो''. **- अण्णा हजारे**

सीबीआयच्या प्रयत्नांवर न्यायालयाने कोरडे ओढले आहेत. सीबीआयकडून केल्या जाणाऱ्या २-जी स्पेक्ट्रमच्या चौकशीवर सर्वोच्च न्यायालयाला लक्ष ठेवावे लागते यावरून प्रशासन व्यवस्था कोलमडून पडल्याचे दिसते.

झारखंडचे माजी मुख्यमंत्री मधु कोडा यांचा निकटचा सहकारी संजय चौधरी याला दुबईहून, पुरुलिया शस्त्रफेक प्रकरणातील किम डेव्ही याला डेन्मार्कहून, नौदल गोपनीयताभंग प्रकरणातील रविशंकरन याला इंग्लंडहून भारतात आणण्यातही सीबीआयला अपयश आले.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत घोटाळ्यात सीबीआयने १५ गुन्हे नोंदवले असले तरी न्यायालयात एकच आरोपपत्र दाखल केले आहे. वेळेत आरोपपत्र दाखल न केल्याने न्यायालयाने काही मुख्य आरोपींना जामीन मंजूर केला.

सीबीआयला सरकारने बाहुले बनवून तिचा दुरुपयोग केला असल्याचा आरोप विरोधकासह टीम अण्णांने केला आहे. वेळोवेळी तो जनतेनेही अनुभवला आहे. त्यामुळे टीम अण्णांने सीबीआयला लोकपालाच्या कक्षेत ठेवण्याची मागणी केली होती परंतु ती फेटाळण्यात आली. याउलट सरकारी लोकपालातील मसुद्यानुसार लोकपाल संस्थेकडे स्वत:ची चौकशी यंत्रणा असेल. भ्रष्टाचाराची तक्रार आल्यानंतर सखोल चौकशीसाठी सीबीआयकडे पाठवण्यात येईल. सखोल चौकशीनंतर अहवाल सीबीआय लोकपालाकडे पाठवील. या आधारावर लोकपाल विशेष लोकपाल न्यायाधीशाकडे प्रकरण पाठवतील. अशा प्रकारे लोकपालाच्या गतिमान न्याय या उद्देशालाच हारताळ फासला जाईल. सरकारी कामकाजाची गती व त्यात होणारे राजकीय हस्तक्षेप आपल्याला माहित आहेत.

''भ्रष्टाचार हे प्रशासनापुढील मोठे आवाहन बनले असून जेथे राजा स्वत:च अनैतिकतेची पाठराखण करणार असेल तर प्रजा त्यापेक्षा वेगळी कशी असेल. **यथा राजा तथा प्रजा** परिस्थितीमुळे भ्रष्टाचार संपणार तरी कसा?'' अशा तीव्र शब्दात **सी.बी.आय. संचालक ए. पी. सिंग** यांनी भ्रष्टाचार प्रशासन व्यवस्थेवर जोरदार कोरडे ओढले. विदेशी बँकेतील ५०० अब्ज अमेरीकन डॉलर जबर राजकीय इच्छा शक्तीशिवाय परत आणणे कठीण असल्याचे मतही सिंग यांनी व्यक्त केले. भ्रष्टाचार

खेड्यातील प्रत्येक युवकाने ठरवलं तर २०२० मध्ये देश महासत्ता होईल.- **अण्णा हजारे**

सरकारपुढील मोठे आवाहन असूनही त्यावर तातडीची कोणतीही उपाययोजना नाही. याची कबुली सिंग यांनी दिली. सद्यस्थितीतील प्रशासकीय यंत्रणा अत्यंत क्लिष्ट, केंद्रीभूत, अपारदर्शी आणि विवेकहीन झाली असून भ्रष्टाचार फोफावण्यास हीच परिस्थिती कारणीभूत ठरत आहे, अशी टीकाही ए. पी. सिंग यांनी केली.

सीबीआयला माहितीच्या अधिकारातून वगळले आहे.

**सरकारचा विरोधाभास :**

या देशाच्या सर्वोच्च संसदेत दहा तास चर्चा होऊन केंद्रात लोकपाल, राज्यात लोकायुक्ताची नियुक्ती, केंद्र व राज्य सरकारचे सर्व कर्मचारी लोकपाल व लोकायुक्ताच्या कक्षेत असतील व जनतेची सनद या अण्णा हजारे यांनी केलेल्या तीन मागण्या तत्वत: मंजूर करण्यात आल्या. परंतु यातील दोन मागण्यांना सरकारने हरताळ फासत जनतेचा विश्वासघात केल्याची तिखट प्रतिक्रिया टीम अण्णा व विरोधीपक्षांनीही दिली आहे.

लोकपालाच्या कक्षेत मुख्यमंत्री, संसद सदस्य, आमदार आणि अ व ब श्रेणीतील अडीच लाख कर्मचाऱ्यांना आणण्यात आले. जवळजवळ ६० लाखाहून अधिक सी आणि डी श्रेणीतील कर्मचाऱ्यांना लोकपालाच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले. या सर्व कर्मचाऱ्यांवर केंद्रीय दक्षता आयोग नियंत्रण ठेवणार असल्याची तरतूद करण्यात आली. अशा प्रकारे त्याच वेळी दोन चौकशी संस्था निर्माण करण्यात आल्या. हे अधिकाराचे विकेंद्रीकरण आहे की सरकारचे नियंत्रण हे काळच ठरवेल.

यासाठी सरकारकडून आलेले स्पष्टीकरण अत्यंत जुजबी व कुचकामी आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार एकटा लोकपाल मोठ्या संख्येने असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे हाताळू शकणार नाही. असे म्हणताना सरकारने मात्र पाच लाखापेक्षा जास्त असलेल्या एनजीओ (सेवाभावी संस्थां)ना हजारो कॉरपोरेट कंपन्यांना व सर्व मीडीया कंपनीस लोकपालाच्या कक्षेत आणण्याचा निर्णय कसा घेतला? याचे स्पष्टीकरण देऊ शकत नाहीत.

**सिटिझन चार्टर / नागरिकांची सनद :**

भारतीय बहुसंख्य जनतेची लोकशाहीत अपेक्षा काय आहे? पर्यावरण संतुलित

लोकसभा व विधानसभेप्रमाणेच ग्रामसभा महत्वाची.- **अण्णा हजारे**

पुरेसे सकस अन्न, पुरेसे वस्त्र, हवेशीर घर, उच्च शिक्षणाची संधी, उत्तम आरोग्य सुविधा व स्वस्थ मनोरंजन. परंतु मागील ६४ वर्षात जनतेचा अधिकार जनतेला मिळाला नाही. उलट जनतेचे शोषण व भांडवलदार व नेत्यांचे पोषण चालू आहे.

अर्थसंकल्पातील ६२ टक्के पेक्षा अधिक रक्कम केवळ सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार व लोकप्रतिनिधींचे भत्ते, सोयी व सुविधा इत्यादींवर खर्च होतो. ही सरकार यंत्रणा ज्यांच्यासाठी नियुक्त आहे त्या जनतेची शासकीय यंत्रणेकडूनच अडवणूक व पिळवणूक केली जाते. त्यांना आवश्यक असणारे रेशनकार्ड, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रजिस्ट्रेशन, बांधकाम परवानगी, वाहन परवाना, सातबाराचा उतारा, पाणी जोडणे, वीज जोडणे, इ. कामांसाठी दलालाची मदत घेतल्याशिवाय, छोटी मोठी लाच दिल्याशिवाय काम होत नाही. गावपातळीवरील कार्यालयापासून थेट मंत्रालयातील भ्रष्टाचाराची साखळीच तयार झाली आहे. ही तोडण्यासाठीच अण्णा हजारे यांनी नागरिकांच्या सनदेचा लोकपालात समावेश करण्याची मागणी केली आहे. परंतु एकट्या लोकपाल यंत्रणेला हा सर्व प्रशासकीय भार पेलणार नसल्याचे सांगत स्वतंत्र तरतूद करण्याचे धोरण जाहीर केले. त्याचवेळी पाच लाखाहून अधिक असलेल्या एनजीओंना (सेवाभावी संस्था) मात्र लोकपालाच्या कक्षेत ठेवले. त्यावेळी हा प्रशासकीय भार आहे असे सरकारला वाटले नाही. उच्च पातळीवरील भ्रष्टाचाराने देशाच्या तिजोरीला जबरदस्त फटका बसतो. तर तळातील भ्रष्टाचारामुळे कोट्यावधी गरीब जनता होरपळून जात आहे. हतबल बनली आहे. ठरलेल्या वेळेत काम होत नाही. जनलोकपालातील नागरिकांच्या सनदेतील तरतुदीनुसार नागरिकांचे एखादे काम दिलेल्या मुदतीत केले नाही तर लोकपालास दंड करण्याचा, भ्रष्ट व्यक्तीच्या विरोधात खटला चालवू शकतात. परंतु याउलट सरकारी लोकपालात सनदेप्रमाणे काम न केल्यास अधिकाऱ्याला कोणतीही शिक्षेची तरतूद नाही. जनलोकपालातील मुद्दा सरकारने २३ मे रोजी झालेल्या बैठकीत मान्य केला होता. परंतु नंतर ही भूमिका बदलली.

**लोकपालाचे विधेयकाचे विभाजन !**

आपल्या देशाचा लोकपाल आहे. अशा व्यापक व उदार भूमिकेतून या विधेयकाकडे (व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळीतील एका कायदेशीर प्रयत्नाकडे)

ग्रामसभा ही स्वयंभू आणि सार्वभौम आहे.- **अण्णा हजारे**

पाहण्याचा मनाचा मोठेपणा आपल्या देशात बहुसंख्य पक्षाकडे नव्हता हे वास्तव जरी खरे असले तरी याच देशात ब्रिटिश काळापासूनच फोडा आणि झोडा या नीतीचा सुप्त परंतु व्यापक पद्धतीने अंमल करणारी प्रस्थापित शक्ती आहे. ती गतिमान होते. आपल्या देशाचा लोकपाल, अण्णा हजारेचा लोकपाल, सरकारी लोकपाल, भाजपचा लोकपाल, कम्युनिस्टाचा लोकपाल, विविध प्रादेशिक पक्षांचा लोकपाल, शेवटी संघटना, धर्माचा व जाती-पातीचा लोकपाल आदि पातळ्यांवर त्याचे विभाजन केले जाते. हेच सुदृढ व सशक्त लोकशाहीसाठी अतिशय घातक आहे. हे सर्व विविध राजकीय धुरीणांना/नेत्यांना माहिती असूनही ते आपली भूमिका बदलू शकत नाहीत. त्यामुळे देशहितासाठी हे वास्तव सर्व जनतेच्या लक्षात येणे गरजेचे आहे. अण्णा हजारे यांच्या लोकचळवळीमुळे ते लक्षात आले परंतु ते टिकले पाहिजे. शेवटी अण्णांच्याच शब्दात ही मशाल विझू देऊ नका हे सत्य आहे. अन्यथा अण्णा जिंकले आपण हरलो असे होईल.

**जन लोकायुक्त विधेयक, २०११**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या भ्रष्टाचारविरोधी कराराच्या प्रस्तावनेत संयुक्त राष्ट्रसंघाचे तत्कालीन सरचिटणीस कोफी अन्नान यांनी म्हटले होते की, भ्रष्टाचार हा अत्यंत हानिकारक आणि समाजाच्या सर्व स्तरांवर व्यापक दुष्परिणाम करणारा समाजाचा आजार आहे. भ्रष्टाचारामुळे लोकशाहीचा आणि कायदे यंत्रणेच्या चौकटीचा ऱ्हास होतो. मानवी हक्कांचा भंग होतो. बाजारपेठा विस्कळीत होतात. जीवनाचा दर्जा खालावतो. सामूहिक गुन्हेगारीला भ्रष्टाचार खतपाणी घालतो. दहशतवाद आणि मानवी सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अनेक बाबींना यातून उत्तेजन मिळते.

सर्व लहानथोर आणि गरीब, श्रीमंत अशा सर्व प्रकारच्या देशात हा रोग आढळतो. मात्र विकसनशील देशांमध्ये त्याचे परिणाम अत्यंत भयावह आणि विनाशकारी असतात. विकासाचे निधी दुसरीकडे वळवले गेल्यामुळे गरीब लोकांवर भ्रष्टाचाराचे तीव्र दुष्परिणाम होतात. प्राथमिक सेवासुविधा पुरविण्याच्या सरकारच्या क्षमतेवर भ्रष्टाचारामुळे विपरीत परिणाम होतात. असमानता आणि अन्याय वाढून परदेशी मदतीला आणि गुंतवणुकीलाही आळा बसतो. भ्रष्टाचार हे आर्थिक अक्षमतेचे एक प्रमुख कारण आहे. तसेच दारिद्र्य निर्मूलन आणि विकास यांच्या मार्गातलाही तो मोठाच अडसर आहे.

श्रमाच्या पावलानी समस्यांचे पर्वत पार करा.- **अण्णा हजारे**

या परिषदेच्या प्रस्तावावर ३१ ऑक्टोबर, २००३ रोजी भारताने सही केली आहे. या प्रस्तावाला मान्यताही दिली आहे. ज्या देशांनी या प्रस्तावावर सह्या केल्या त्यांना या समस्येचे गांभीर्य समजल्यामुळे चिंता वाटत होती. भारताने या प्रस्तावावर सही करताना म्हटले आहे की, समाजाचे स्थैर्य आणि सुरक्षितता यांना भ्रष्टाचारामुळे निर्माण होणारे धोके सही करणाऱ्या देशांना माहिती आहेत. भ्रष्टाचारामुळे विविध संस्था आणि समाज पोखरला जातो. लोकशाही आणि नैतिक मूल्ये, तसेच न्यायव्यवस्था धोक्यात येते. त्यामुळे स्थायी विकास आणि कायदे पांगळे ठरतात.

सन १९९३ मध्येच एन. एन. व्होरा समितीच्या अहवालात भारतातील भ्रष्टाचाराचे गंभीर परिणाम स्पष्ट करण्यात आले होते. या अहवालात म्हटले होते की, देशाच्या विविध भागात गुन्हेगारी टोळ्या, पोलीस, नोकरशाही आणि राज्यकर्ते यांच्यात लागेबांधे असल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणूनच वैयक्तिक गुन्हेगारांसाठी तयार करण्यात आलेली सध्याची न्यायव्यवस्था अशा संघटित गुन्हेगारांचा निवाडा करताना कमी पडते. आर्थिक गुन्ह्यांच्या संदर्भात असलेले कायदे अत्यंत कमकुवत आहेत. संघटित गुन्हेगार आणि माफियांच्या टोळ्या यांच्याकडे मोठ्या प्रमाणात गुंड आहेत आणि आर्थिक पाठबळही आहे. शिवाय सरकारी यंत्रणा आणि राजकीय नेते आणि सर्व संबंधित घटक यांच्याशी लागेबांधे असतात.

भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण नक्कीच गंभीर आहे आणि सध्याच्या भ्रष्टाचाराविरोधी यंत्रणा त्याचा सामना करण्यात अपयशी ठरल्या आहेत. त्यामुळेच या यंत्रणांना आणि भ्रष्टाचाराविरोधी कायद्यांना खिळखिळ्या करून टाकणाऱ्या भ्रष्टाचाराच्या राक्षसाची गांभीर्याने दखल घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

यूएनसीएसीच्या (संयुक्त राषट्रसंघाच्या भ्रष्टाचाराविरोधी करार) कलम ६(२) अन्वये, प्रत्येक राज्याने या कलमाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केलेल्या भ्रष्टाचारविरोधी यंत्रणेला किंवा यंत्रणांना कायदे यंत्रणेच्या मूलभूत तत्वांबाबत आवश्यक स्वायत्तता दिली पाहिजे. त्यामुळे ही यंत्रणा किंवा या यंत्रणा त्यांचे कार्य किंवा कार्ये प्रभावीपणे करू शकतील. तसेच कोणत्याही अनावश्यक दबावाला त्या बळी पडणार नाहीत. याशिवाय त्यांना आपले काम परिणामकारकतेने करता यावे, यासाठी आवश्यक साधनसामुग्री पुरवली पाहिजे. तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची सुविधाही राज्यांनी पुरविली पाहिजे.

क्रांतीची मशाल सतत तेवत ठेवा.- **अण्णा हजारे**

या विधेयकामधून महाराष्ट्र राज्यात लोकायुक्तांच्या रचनेला दुजोरा मिळतो. लोकायुक्त यंत्रणा स्वायत्त असली पाहिजे. सरकारी अधिकारी आणि राजकीय पदस्थांविरुद्ध निष्पक्षपातीपणे तपास आणि कारवाई करण्यास सक्षम असणारी ही यंत्रणा त्या सरकारी अधिकारी आणि राजपदस्थांच्या प्रभावापासून मुक्त असेल. ही स्वायत्तता व्यापक, पारदर्शी निवड प्रक्रिया आणि कामाचे संपूर्ण स्वातंत्र्य देऊन निर्माण करता येईल. म्हणूनच या विधेयकात नमूद करण्यात आल्याप्रमाणे लोकायुक्ताला आपल्या कर्मचाऱ्यांची निवड करण्याचा अधिकार असेल. भ्रष्टाचार, गैरवर्तन आणि तक्रारी किंवा गाऱ्हाणी या बाबी हाताळण्यास असा कर्मचारी वर्ग सक्षम असेल. या सर्व गोष्टींचा परस्परसंबंध आहे. भ्रष्टाचारात नेहमीच गैरवर्तन अंतर्भूत असते आणि त्यातूनच तक्रारी निर्माण होतात. सध्याची तक्रार निर्मूलन किंवा देखरेख यंत्रणा कुचकामी ठरली आहे. कारण ते करतेवेळी हितसंबंध आडवे येतात. यात काही समस्या आहेत. सध्याच्या यंत्रणेत आपल्याच वरिष्ठावर किंवा अधिकाऱ्यावर लक्ष ठेवण्याचे काम करण्याची पाळी कनिष्ठ अधिकाऱ्यावर येते. आणि याच वरिष्ठांचे त्यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण असते. म्हणूनच देखरेख यंत्रणा आणि तक्रार निर्मूलन यंत्रणा यांना लोकायुक्ताच्या देखरेखीखाली ठेवण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

यूएनसीएसीच्या कलम ७(४) नुसार, आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून प्रत्येक राज्य हितसंबंधाचा संघर्ष न होऊ देणारी आणि पारदर्शकतेला प्रोत्साहन देणारी यंत्रणा निर्माण करेल, तिच्यात स्थैर्य राखेल आणि तिला वृद्धिंगतही करेल. या तत्त्वांच्या पायांवरच भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा तपास करणे, त्या संदर्भात खटले भरणे, तसेच गैरवर्तनाची चौकशी करणे आणि शिक्षा देणे या गोष्टी हितसंबंधाचा संघर्ष नसलेल्या स्वायत्त यंत्रणेकडे सोपविणे ही अत्यंत गरजेची गोष्ट ठरते.

यूएनसीएसीच्या कलम ८(५) नुसार, सार्वजनिक अधिकाऱ्यांनी आपली मालमत्ता, आपले इतर कार्यक्रम, रोजगार, गुंतवणूक, मालमत्ता, ज्यांच्यातून हितसंबंधाचा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असेल, अशा आपल्याला मिळालेल्या भेटी आणि लाभ यांची माहिती योग्य अधिकारी यंत्रणेकडे सादर करावी, यासाठी आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून प्रत्येक राज्य उपाययोजना योजण्याचे आणि यंत्रणा उभारण्याचे प्रयत्न करेल.

श्रमाशिवाय सुखी होण्याचा प्रयत्न माणसास भ्रष्टाचारास परावृत्त करतो.- **अण्णा हजारे**

यूएनसीएसीच्या कलम ८(६) नुसार, आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून प्रत्येक राज्य या कलमाने घालून दिलेली आचारसंहिता किंवा मानके यांचा भंग करणाऱ्या सार्वजनिक अधिकाऱ्यांवर शिस्तविषयक किंवा इतर प्रकारची कारवाई करण्याचा विचार करेल.

यूएनसीएसीच्या कलम १२ मध्ये खाजगी क्षेत्राचा विचार करण्यात आला आहे. खाजगी यंत्रणांना त्यांच्या कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने प्रोत्साहन दिलेच पाहिजे. उद्योगाची स्थापना आणि व्यवस्थापन यांच्यात सहभागी असलेल्या वैध आणि नैसर्गिक व्यक्तींची ओळख पटवून दिली जावी, यासाठी उपाययोजना करणे राज्य सरकारवर बंधनकारक असेल. याशिवाय राज्य सरकारवर इतरही काही गोष्टी बंधनकारक असतील. खासगी यंत्रणाकडून व्यापारी कारणांसाठी परवाने आणि अनुदान देतांना प्रक्रियांचा गैरवापर केला जात असेल, तर तो रोखणे, तसेच हितसंबंधांचा संघर्ष रोखण्यासाठी माजी सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक कृतींवर योग्य काळासाठी योग्य बंधने लादणे, राजीनामा दिलेल्या किंवा निवृत्त झालेल्या सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या पूर्वीच्या कार्यकालातील त्यांच्या कामाशी किंवा त्यांनी देखरेख केलेल्या कामाशी थेट संबंधित असलेल्या खासगी क्षेत्रातील रोजगारासाठीच्या नेमणुकीमुळे जर हितसंबंधाचा संघर्ष उद्भवण्याची शक्यता असेल, तर अशा माजी सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या अशा नेमणुकांवर बंधन घालणे.

यूएनसीएसीचे कलम १३, समाजाच्या सहभागाशी संबंधित आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा देण्यासाठी, तसेच भ्रष्टाचाराचे अस्तित्व, कारणे, त्याचे गांभीर्य आणि धोके या संदर्भात जनजागृती करण्यासाठीही सार्वजनिक क्षेत्राबाहेरील व्यक्ती आणि संस्था यांच्या सक्रिय सहभागाला राज्य सरकार आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून, आवश्यक उपाययोजना करून प्रोत्साहन देईल. सार्वजनिक क्षेत्राबाहेरील व्यक्ती आणि संस्था यामध्ये नागरी समाज, अशासकीय संघटना आणि अशासकीय गटांच्या संस्था यांचा समावेश असेल. हा सहभाग पुढील प्रमाणे वाढवला जाईल. निर्णय प्रक्रियातील पारदर्शकता वाढवणे आणि त्यांच्यातील लोकांचा त्यामधील सहभाग वाढवणे. लोकांना सहज व प्रभावीपणे माहिती उपलब्ध होण्याची हमी देणे.

यूएनसीएसीच्या कलम ३ नुसार, तिसऱ्या पक्षाच्या हक्कांविषयी योग्य तो आदर

राखून, सद्भावनेपोटी, आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून भ्रष्टाचाराच्या घटना समोर याव्यात यासाठी राज्य सरकार उपाययोजना करेल. या संदर्भात राज्य सरकार कायदेशीर कारवाई करून भ्रष्टाचाराचा मुद्दा महत्वपूर्ण मानून संबंधितांचे कंत्राट रद्द करू शकेल किंवा सवलती मागे घेईल किंवा तत्सम कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना करेल.

यूएनसीएसीच्या वरील सर्व तत्वांचा विचार करता, भ्रष्टाचाराच्या संदर्भात सार्वजनिक अधिकाऱ्यांचा तपास करणे किंवा त्यांच्यावर खटला भरणे आणि सरकारी अधिकाऱ्यांना भ्रष्टाचारासाठी शिक्षा करणे या बाबी स्वायत्त लोकायुक्त अधिकार यंत्रणेच्या कार्यकक्षेत आणल्या जातील. त्याशिवाय नागरिकांच्या सनदेचा भंग ही बाब आचारसंहितेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या संदर्भातील प्रकरणांचीही चौकशी लोकायुक्तांच्या देखरेखीखाली केली जाईल. याशिवाय लोकसेवकांनी भ्रष्टाचारी मार्गाने गोळा केलेली मालमत्ता जप्त करणे असे इतर अधिकारही लोकायुक्तांना असतील. शक्य असेल तिथे लोकसहभाग मिळवणे आणि कारभारात पारदर्शकता ठेवणे यातून या यंत्रणेचा आणि तिच्या नियंत्रणाखालील भ्रष्टाचारविरोधी किंवा देखरेख यंत्रणेचा प्रामाणिकपणा राखला जाईल. लोकायुक्तांचे दायित्व थेटपणे नागरिकांशी असेल. ते नागरिकांना जबाबदार असतील. कोणताही नागरिक मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल करू शकेल. लोकायुक्ताचे अध्यक्ष किंवा सदस्यांची चौकशी करणे किंवा त्यांना पदावरून दूर करणे हे अधिकार उच्च न्यायालयास असतील. कलम २२६ अंतर्गत उच्च न्यायालये आणि कलम ३२ व १३६ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयात लोकायुक्तांच्या कृतींचा कायदेशीर आढावा घेऊन त्यांच्या जबाबदारपणाचा निर्वाळा देतील.

प्रभावी, स्वायत्त आणि अधिकार प्रदान केलेली लोकायुक्त संस्था ही काळाची गरज असून तिच्या स्थापनेसाठी आणखी काही काळ महाराष्ट्राची जनता प्रतीक्षा करू शकणार नाही. या विधेयकातून हे उद्दिष्ट सफल करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्या उद्देशाने हा मसुदा आम्ही सुचवीत आहोत.

संदर्भ-भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन (न्यास) द्वारे प्रकाशित महाराष्ट्र जनलोकायुक्त विधेयक, २०११

**महाराष्ट्र जनलोकपाल विधेयक, २०११**

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत आरोपांचा जलदगतीने तपास

करणे, आरोपींवर खटले दाखल करणे आणि विशिष्ट प्रकारच्या सार्वजनिक तक्रारींचे निवारण करणे आणि तक्रारकर्त्यांना संरक्षण पुरविणे या हेतूंनी हे विधेयक तयार करण्यात आले आहे.

**लोकायुक्त**

१९६६ साली स्थापन केलेल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने केंद्रीय पातळीवर लोकपाल आणि घटक राज्य पातळीवर लोकायुक्तपद निर्माण करण्याची शिफारस केली. परंतु गेली ४२ वर्षे लोकपाल विधेयक प्रलंबित ठेवण्याचे पाप सरकारने केले आहे. मा. अण्णा हजारे यांच्या जनचळवळीमुळे ते पारित होणार आहे.

आज भ्रष्टाचार हा आर्थिक विकासाचा अडसर बनला आहे. त्यामुळे स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्वाचा ऱ्हास होऊन मानवी हक्कांचा भंग होत आहे. यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने देखील संयुक्त राष्ट्रसंघाचा भ्रष्टाचार विरोधी करार कलम ६(२) अन्वये, प्रत्येक राज्याने या कलमाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केलेल्या भ्रष्टाचारविरोधी तत्वांबाबत किंवा यंत्रणांना कायदे यंत्रणेच्या मूलभूत तत्वांबाबत आवश्यक स्वायत्तता दिली पाहिजे. त्यामुळे ही यंत्रणा किंवा या यंत्रणा त्यांचे कार्य प्रभावीपणे करू शकतील. तसेच कोणत्याही दबावाला त्या बळी पडणार नाहीत. या विधेयकामधून महाराष्ट्र राज्यात लोकायुक्तांच्या रचनेला दुजोरा मिळतो.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत लोकांना जलद आणि किफायतशीर स्वरूपात न्याय मिळवून देणे व शासन प्रशासनातील भ्रष्टाचारास प्रतिबंध घालून, पारदर्शक व स्वच्छ कारभारासाठी सशक्त लोकायुक्त विधेयक तयार करण्यात आले आहे.

**सशक्त जनलोकायुक्त विधेयक मंजूर करा –**

सध्या भारतात महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, छत्तीसगड, दिल्ली, गुजरात, झारखंड, आसाम, बिहार, हरियाणा, हिमाचलप्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, ओडिशा, पंजाब, राजस्थान, उत्तराखंड इत्यादी राज्यात लोकायुक्त आहेत. परंतु महाराष्ट्रातील लोकायुक्त कायदा सशक्त नाही. ते बुजगावणे ठरले आहे. त्यासाठी सशक्त जनलोकायुक्त विधेयकाची गरज आहे. म्हणून मा. अण्णा हजारे यांनी राज्यात १ मे पासून राज्यव्यापी जनलोकपाल व जनलोकायुक्त जनजागृती अभियान सुरू केले आहे.

**आंदोलन संविधानविरोधी नाही :**

जनलोकपाल कायद्याचा मसुदा संविधानानुसार बनवला आहे. त्यात संविधानविरोधी तरतूदी नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या ३८ (१), ३९ (ख) व (ग) आणि ५० व्या कलमात या संबंधात केलेली तरतूद स्पष्ट आहे. ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत आणि देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत. तसेच ३९ (ख) म्हणजे सामूहिक हिताला सर्वाधिक उपकारक होईल अशा रीतीने समाजाच्या भौतिक साधन संपत्तीचे स्वामित्व व नियंत्रण यांची विभागणी व्हावी. ३९ (ग) म्हणजे आर्थिक यंत्रणा राबवण्याचा परिणाम म्हणून संपत्तीचा व उत्पादन साधनांचा संबंध सामूहिक हितास बाधक होईल, अशा प्रकारे एकाच ठिकाणी होऊ नये. कलम ५० म्हणजे राज्याच्या लोकसेवामध्ये न्याय यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्याकरिता राज्य उपाययोजना करेल. लोकपाल बिल तयार करण्याच्या दृष्टीने संविधानाची ही कलमे मार्गदर्शक आहेत. संसद सार्वभौम आहे. पण कायदे बनवण्यासाठी खरी सार्वभौम आहे ती जनता. संविधानाने दिलेल्या अधिकारातून भारतीय जनतेने संसद जन्माला घातली आहे. लोकपाल आल्यामुळे देशात आमूलाग्र बदल घडेल असं नाही पण भ्रष्टाचाराने सारा देशच खिळखिळा होत असताना त्याला लगाम संसदेने घातला नाही तर लोकांचा या व्यवस्थेवरचा विश्वास उडेल. डॉ. आंबेडकरांच्या संविधानाने दिलेल्या अधिकारातून आणि गांधींच्या मार्गाने आपल्या लोकशाही हक्कांसाठी लढता येते हा विश्वास या आंदोलनाने नव्या पिढीला मिळाला आहे. असे मत आमदार कपिल पाटील यांनी व्यक्त केले आहे.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही या देशाची सनद सार्वभौम असून संसदेने घेतलेला निर्णय मान्य राहील असे वेळोवेळी म्हटले आहे.

**जनलोकपाल आणि हिंदू कोड बिल :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दोन वर्ष प्रचंड अभ्यास करून हिंदू कोड बिल तयार केले होते. पण संसदेत बसलेले विविध पक्षांचे नेते व प्रामुख्याने काँग्रेसमधील मोठ्या गटाने त्या क्रांतीकारक विधेयकाचा कायदा होण्यामध्ये शेकडो अडचणी व अडथळे आणले होते तर दुसरीकडे पंडित नेहरू हिंदू कोड बिल मंजूर करून घेणारच अशी भूमिका घेत होते.

१६ ऑगस्ट, १९५१ रोजी लोकसभेत हिंदू कोड बिल मांडले जावे आणि १

सप्टेंबरपर्यंत ते संमत करावे, असा आग्रह करणारे पत्र बाबासाहेबांनी पंतप्रधान नेहरूंना लिहिले होते. कारण या बिलाला अजिबात महत्त्व देऊ नये, अच काँग्रेस पक्षात धारणा असल्याचे त्यांना कळलेले होते. त्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही झाले होते.

१३ सप्टेंबर, १९५१ रोजी काँग्रेस संसदीय पक्षाची बैठक झाली आणि सरकारचा नूरच बदलला. चालू अधिवेशनात हिंदू कोड बिलातील विवाह आणि घटस्फोट एवढीच कलमे मंजूर करून घ्यावीत व उरलेली कलमे सवडीने विचारात घ्यावीत, असा पवित्रा काँग्रेसने घेतला.

संपूर्ण हिंदू कोड बिल संमत करावे नाही तर नको, असा अट्टाहास बाबासाहेबांनी केला होता. याउलट काँग्रेसतर्फे हिंदू कोड बिलाचे तुकडे पाडून त्याचा आत्माच संपवण्याचा डाव खेळला गेला. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनीही संपूर्ण जनलोकपाल बिल संमत करण्याचा हट्टाहास धरला. परंतू सरकारने त्यांचे तुकडे पाडून मूळ मसुद्यास खो दिला.

शेवटी डॉ. बाबासाहेबांनी २७ सप्टेंबर १९५१ रोजी आपला केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा पंतप्रधानांकडे पाठवला. व पंडित नेहरुंनी तो विनाविलंब मंजूर केला होता. डॉ. बाबासाहेबांनी कायदा मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर राजीनामा देणाऱ्या मंत्र्याला प्रश्नोत्तराचा तास संपल्यावर निवेदन करण्याचा अधिकार संसदेनेच दिलेला आहे, तसे ठरलेही होते. आपल्या त्या निवेदनाची प्रत बाबासाहेबांनी पंतप्रधानांकडे पाठवली सुद्धा होती, पण जेव्हा राजीनाम्यानंतर बाबासाहेब निवेदन करायला उभे राहिले तेव्हा सभा अध्यक्षस्थानी बसलेले उपसभापती अय्यंगार यांनी त्यांना परवानगीच नाकारली. निवेदनाची प्रत अगोदर आपल्याला दिली नाही म्हणून तो नकार दिला होता. जेव्हा नियम संपले तेव्हा अय्यंगार यांनी अध्यक्षांचा विशेषाधिकार वापरून बाबासाहेबांची मुस्कटदाबी चालवली होती.

त्यावेळी बाबासाहेबांनी आपले जळजळीत मत व्यक्त केले. (सभापती महोदय) मी निवेदन करावे अशी तुमची इच्छा नाही,असाच मी याचा अर्थ लावतो. आता यापुढे मी मंत्री नाही आणि मी बाहेर पडत आहे. अशा प्रकारच्या हुकूमशाहीपुढे मी मान वाकवणार नाही. डॉ. बाबासाहेबांचे ते वागणे संसदेवर कुरघोडी करणारे होते काय?

लोकसभेच्या उपसभापतीची दंडेली व हुकूमशाही झुगारून लावणाऱ्या त्या स्वाभिमानी महामानवावर जे कोणी मनापासून प्रेम करतात त्यांनी याची आजकाल चाललेली पुनरावृत्ती ओळखली पाहिजे. बाबासाहेबांची घटना व त्यातून अस्तित्वात आलेल्या संसदेची महत्ता काँग्रेसला असती तर त्याच बाबासाहेबांना लोकसभा निवडणुकीत पाडण्यासाठीचे जातीचे घाणेरडे समीकरण काँग्रेस पक्षाने राबविले असते काय? (प्रवाह दै. पुण्यनगरी, औरंगाबाद, २५ डिसेंबर २०११)

डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या हिंदू कोड बिलाप्रमाणेच संपूर्ण जनलोकपाल बिल संमत करावे. व अमुक मुदतीत संमत करावे अशी मागणी करणारे अण्णा हजारे संसदेच्या श्रेष्ठत्वावर कुरघोडी करतात असे म्हणता येईल का?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रखर व तेजस्वी ज्ञानाचा उपयोग देशाला झाला असता परंतु त्यांना संसदेपासूनच दूर ठेवण्याचा प्रयत्न काँग्रेसमधील मातब्बर पुढाऱ्यांनीच केला. डॉ. बाबासाहेबांना संसदेत जाण्याची संधी मिळाली. त्यामुळेच या महामानवाला सर्व भारतीयांच्या उद्धारासाठी आदर्श असे संविधान देता आले. हे ऐतिहासिक वास्तव कसे विसरता येईल का?

अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी वैयक्तिक रीत्या सहभाग घेतला. संघाने कार्यकर्त्यांना कोणतीही सूचना केली नव्हती. असे मत सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. तसेच ते म्हणाले भ्रष्टाचाराच्या मुद्यावर संघ आणि अण्णा यांची भूमिका समान असली तरी अण्णांच्या आंदोलनात संघ सहभागी नव्हता. असेही त्यांनी स्पष्ट केले. (संदर्भ दै. लोकसत्ता, ६ फेब्रुवारी २०१२)

**जंतर मंतर येथील लोकलढा :**

अण्णांना जनतेचा प्रचंड पाठिंबा होता आणि तो आजही आहे हे दिल्ली येथील जंतर मंतरवरील २५ मार्चच्या आंदोलनाने दाखवून दिले. जंतर मंतरवर मोठा जनसागर लोटला होता. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढताना उत्तरप्रदेश, बिहार, तामिलनाडू, महाराष्ट्रासह वीस कार्यकर्ते-अधिकारी शहीद झाले. मध्यप्रदेशात नरेंद्रकुमार यांच्यासारख्या तरुण कर्तबगार पोलीस अधिकाऱ्याला अंगावर ट्रॅक्टर घालून चिरडून मारण्यात आले. १६ ऑगस्ट २०११ रोजी आरटीआय कार्यकर्त्या शेहला मसूद यांचा भरदिवसा खून करण्यात आला. जनलोकपालाच्या लढ्यात राजघाट दिल्ली येथे

भावनावश युवक दिनेश यादव याने स्वत:ला पेटवून घेतले. २९ ऑगस्ट रोजी लोकनायक रुग्णालयात त्याचे निधन झाले. शहीदात अमित जेठवा, विश्राम डोडीया, जबारदन गधवी, अमित कपासीया-गुजरात, शशिधर मिश्रा, रामविलास सिंघ-बिहार, सोला रंगराव-आंध्रप्रदेश, ललित मेहता, कामेश्वर यादव, नियामत अन्सारी-झारखंड, शेहला मसूद-मध्यप्रदेश, एस. भूनेश्वरन, व्ही सुब्रम्हण्यम-तामीळनाडू, सतीश शेट्टी, अरूण सावंत, विठ्ठल गीते, इरफान युसफ काझी, दत्तात्रय पाटील-महाराष्ट्र, भ्रष्टाचाराच्या या लढ्यात शहीद झाले. तर शेकडो कार्यकर्त्यांवर हल्ले झाले. जंतर मंतर येथील आंदोलनात शहीद झालेल्यांच्या कुटुंबियांनी सहभाग घेतला. या कुटुंबियांनी देशाच्या व्यासपीठावर त्यांचं दु:ख मांडलं. त्यांचे दु:ख ऐकल्यानंतर भ्रष्टाचाराने गाठलेला कळस व त्याचं क्रूर रूप प्रगट होते. या शहीदांचं बलिदान सार्थ ठरवण्यासाठी अण्णा हजारे यांनी जंतर मंतर येथून कोट्यावधी भारतीयांना आवाहन करताना म्हणाले, ''या शहीदांचं बलिदान सार्थ ठरवण्यासाठी चला उठा स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढ्यात सहभागी व्हा.''

**आंदोलनाने काय साधले?**

- ✯ प्रत्येकाच्या जीवनात जगताना कमी जास्त भ्रष्टाचार आहे. या आंदोलनाने आत्मक्लेश व आत्मपरीक्षणाची संधी दिली. याची जाणीव समाजाला झाली आहे.
- ✯ देशातील कोट्यावधी बांधव जागे झाले. आम्ही या देशाचे खरे मालक आहोत याची खऱ्या अर्थाने जाणीव झाली. जनशक्तीची प्रचीती आली.
- ✯ देशात गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत परिवर्तनाची लाट आली. एक वर्ष क्रांतीमय वातावरण निर्माण झाले.
- ✯ सारा देश ''मैं हूँ अण्णा'' म्हणाला.
- ✯ जगातील सर्वात मोठे अहिंसात्मक व ऐतिहासिक जनआंदोलन ठरले.
- ✯ टू-जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात एक केंद्रीय मंत्री, एक खासदार, उद्योगपती, उच्चपदस्थ अधिकारी जेलमध्ये गेले.
- ✯ न्याय पालिकेतील अनेक घोटाळे उघडकीस आले. न्यायालयानेही चांगले निर्णय दिले. सरकारला फटकारले.

- ✯ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा घोटाळ्यात खा. सुरेश कलमाडी व इतर बड्या धेंडांना जेलची हवा मिळाली. सामान्य माणसाला खऱ्या अर्थाने वाटले - कायद्यामुळे सर्व समान आहेत.
- ✯ देशातील अनेक आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री - सत्तेतून पायउतार झाले. अनेकांना जेलमध्ये जावे लागले. अनेक मंत्री व मुख्यमंत्र्यांच्या चौकशी सुरु झाल्या.
- ✯ महाराष्ट्रात आदर्श घोटाळ्यात बडे अधिकारी तुरुंगात गेले. बँक घोटाळ्यात माजी खासदार, आमदारही जेलमध्ये गेले.
- ✯ उत्तराखंड सरकारने सशक्त लोकायुक्त विधेयक मंजूर केले.
- ✯ भ्रष्टाचार रोखण्यासाठी बिहार सरकारने सार्वजनिक सेवा अधिकार कायदा २०११ लागू केला. सर्व ऑनलाईन दाखले, सर्व सेवा ऑनलाईन हे या कायद्याचे वैशिष्ट्य आहे. अण्णांच्या आंदोलनामुळे जनतेकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. पहिल्या पाच दिवसात बिहार सरकारकडे पावणे तीन लाख अर्ज प्राप्त झाले.

अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या आंदोलनात हिंदू, बौद्ध, मुस्लीम, शीख, ईसाई, पारशी, आदिवासी इ. सर्वच धर्म, पंथातील व जातीतील जनता सहभागी झाली होती. परंतु एकही मुस्लीम, दलित, आदिवासी उपस्थित नव्हता असे म्हणणे ही टोकाची भूमिका आहे.

या देशातील साध्या, भोळ्या सामान्य माणसांनी हतबलता व अगतिकतेपोटी कधी भगवे, हिरवे, निळे, पांढरे कपडे घातलेल्या बड्या धर्ममार्तंडांवर विश्वास ठेवला परंतु ज्यावेळी त्यास तडा गेला तो टिकला नाही. तेव्हा याच भावुक व भोळ्या माणसांनी मूर्ती, पुतळे, प्रतिमा व दगड, धोंड्यावर विश्वास ठेवला. त्यावर श्रद्धा ठेवली. त्यांना जीवघेण्या वर्तमान समस्येला सुलभ करण्याचा आधार पाहिला. कधी हसत गेले, कधी फसत गेले. कदाचित त्याची जाणीव त्यांना असेल किंवा नसेलही. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात याच जनतेने उघड्या गांधींवर विश्वास ठेवून देशासाठी बलिदान दिले. त्यांचाच वसा घेऊन वाटचाल करणाऱ्या गांधी टोपी घातलेल्या अण्णा हजारेंवर सामान्य माणसांनी विश्वास दाखवला. भ्रष्ट व्यवस्थेच्या अतिरेकी वर्तनाविरुद्धचा जनतेच्या मनातील असंतोषाचा हा स्फोट होता. त्याच जोडीला अण्णा हजारे यांच्या सर्व संगपरित्यागी, नि:स्वार्थ भावनेने केलेल्या जनसेवेची प्रतिमा होती.

स्वातंत्र्यानंतर भारताच्या इतिहासात संसदेने एकमताने सशक्त लोकपाल बिल आणण्याचा निर्धार केला. पंतप्रधानांनी संसदेत अण्णांना सॅल्यूट केला. तीन प्रमुख मागण्या तत्वत: मंजूर करण्याचे लेखी पत्र दिले. संसदीय लोकशाहीच्या इतिहासात एक क्रांतिकारी घटना म्हणून तिची नोंद होईल. देशातील अकरा दिवस चाललेले लोकशाहीवादी अहिंसात्मक ऐतिहासिक आंदोलन उभे राहिले ते केवळ मिडीयानीच उभे केले असे म्हणू नका!

भ्रष्टाचाराच्या भाऊगर्दीत चेहरा हरवलेल्या माणसांना अण्णा हजारे यांच्या रूपाने परिवर्तनाची लढाई लढणारा आपला चेहरा दिसला. म्हणून लाखो लोक आंदोलनात सहभागी झाले.

वन मॅन आर्मी असलेल्या एका सच्चा सैनिकाचा, देशभक्ताचा, एका निशस्त्र परंतु निर्भीड व पवित्र आचार असलेल्या सामान्य फकीराचा, एका नि:स्वार्थी, त्यागी, आजन्म ब्रम्हचारी राहून जनसेवेसाठी देह झिजवणाऱ्या समाजसेवकाच्या श्रमसेवेचे हे जनफळ आहे. ज्या हाताने देशरक्षणासाठी बंदूक घेतली, ते हाथ सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीनाथ न होता संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, छ. शाहू, म. फुले, डॉ. आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी, श्री संत गाडगेबाबा यांचा विचार प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी हातात झाडू (खराटा) घेतला व राळेगणशिंदीचे राळेगणसिद्धीत परिवर्तन केले. देशात स्वावलंबी, स्वयंपूर्ण, शाश्वत व चिरंतन विकासाचे मूर्तिमंत उदाहरण निर्माण केले. चार ड्रेस, एक जेवणाचे ताट, एक पांघरूण घेऊन यादवबाबांच्या मंदिरात राहणाऱ्या एका फकीराने आपल्या कार्यकर्तृत्वाने माहितीचा अधिकार, ग्रामसभेचा कायदा, रेशनिंगचा कायदा, इ. कायदे जनतेसाठी जनआंदोलनातून दिले. या आंदोलनाने काय दिले? खलनायकाच्या भाऊगर्दीत अण्णा हजारे यांच्या रूपाने जननायक मिळाला. सामान्य माणसांच्या अस्तित्वाला धार आली. त्यांच्यात विश्वास व जाणीवजागृती निर्माण झाली. व्यवस्था परिवर्तनाची एक पायवाट निर्माण झाली. तिचे जनतेच्या राजमार्गात रूपांतर होण्यासाठी जन चळवळ सशक्त करण्यासाठी प्रयत्नशील राहू या व अण्णांच्याच भाषेत ''ही मशाल तेवत ठेवू या.''

नभात सैनिका प्रभात येऊ दे,
खगासवे जगा सुखात गाऊ दे।
फुला-फुलांवरी सुवर्ण शोभु दे,
जगात शांतता सुहास्य लाभू दे।
न पाय तोंवरी तुझे ठरायचे,
सदैव सैनिका पुढेच जायचे।



# —: संदर्भ सूची :—

भारताचे संविधान (भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय)

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित - २००६.

क्रांतिदूत - अपण हजारे - सुदर्शन भाटीया डायमंड पॉकेट बुक्स (प्रा.) लि. नई दिल्ली - २०११

भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया - तुकाराम जाधव, महेश शिरपुरकर- युनिक प्रकाशन, पुणे.

भारतीय अर्थव्यवस्था - डॉ. देशपांडे - हिमालया पब्लिशींग हाऊस, मुंबई
Indian Economy - Pratiyogita Darpan - 2010.

भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ - अ‍ॅड्. अभया शेलकर - नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद.

माहितीचा अधिकार - डॉ. बालाजी कोंपलवार

द वीक, जरनल, सप्टेंबर २०११.

साप्ताहिक लोकप्रभा - २० जाने. २०१२

द लोकपाल अँड लोकआयुक्त बिल - २०११ - २७ डिसेंबर २०११ रोजी लोकसभेने मंजूर केलेले विधेयक

साप्ताहिक साधना - ९ जुलै २०११

निर्भय बनो - संपादक मा. अण्णा हजारे - भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास- राळेगण सिद्धी ता. पारनेर, जि. अहमदनगर

निर्भय बनो - संपादक मा. अण्णा हजारे - नांदेड जिल्हा विशेषांक संपादक डॉ. बालाजी कोंपलवार - फेब्रु. २०११

साप्ताहिक - द पब्लिक एजेंडा - २०१२

साप्ताहिक - द इंडिया टुडे -  २ जाने. २०१२

साप्ताहिक - चित्रलेखा - ९ जाने. २०१२

साप्ताहिक - तहलका - ३१ डिसेंबर २०११

दै. सकाळ, दै. गांवकरी, मुंबई चौफेर, दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. पुण्यनगरी, दै. देशोन्नती, दै. एकमत, दै. उद्याचा मराठवाडा, दै. प्रजावाणी, दै. गोदातीर, द हिंदु, द एकॉनॉमिक टाइम्स,

www.indiaagainstcorruption.org
www.annahazare.org

# मराठा युवा प्रबोधन






(१०७)


पहिले सत्र



# नांदेड जाहीर सभा


भ्रष्टाचार मुक्त भारत व स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढाईसाठी जनआंदोलन
जाहीर सभा
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.खा.डॉ.व्यंकटेश काब्दे
प्रमुख पाहुणे -
मा.अण्णा हजारे
मार्गदर्शक : मा. किरण बेदी
मा. मेधा पाटकर
मा. अरविंद केजरीवाल
विनीत
कै. लक्ष्मणराव आणि कै. गोविंदराव पवार मलभूत संशोधन प्रतिष्ठाण, आलूवडगाव ता.




भ्रष्टाचार मुक्त भारत व स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढाईसाठी जनआंदोलन
जाहीर सभा
कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा.स्वा.डॉ.व्यंकटेश काब्दे
प्रमुख पाहुणे
मा.अण्णा हजारे
विनीत



# भ्रष्टाचारमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी जनलोकपाल आणि राज्यात लोकायुक्त

भ्रष्टाचारमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केंद्रात सशक्त जनलोकपाल व राज्यात जनलोकायुक्त मंजूर करावे यासाठी रामलीला मैदानावर ऐतिहासिक व अभूतपूर्व जनआंदोलन केले. संपूर्ण देशातील जनता स्वयंस्फूर्तपणे आंदोलनात उतरली. प्रमुख विरोधी पक्षांनी अण्णाआंदोलनाचे समर्थन केले. सरकारने नमते घेतले. २७ ऑगस्ट २०११ रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहात १७ तासांच्या प्रदीर्घ मंथनानंतर जनलोकपाल विधेयकातील नागरीक मसुदा, योग्य यंत्रणेच्या आधारे, खालच्या पातळीवरील सरकारी कर्मचाऱ्यांना लोकपालाच्या कक्षेत आणणे व राज्यात लोकायुक्ताची स्थापना करणे या तीन प्रमुख मागण्या एकमताने मंजूर करण्यात आल्या. जनआंदोलनाला यश मिळाले. जनसंसदेचा विजय झाला. संसदेची निर्माती असलेली जनसंसद श्रेष्ठ ठरली. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी नोंद व्हावी, अशी अलौकिक घटना घडली.

भारतीय संसदेने लोकपाल व लोकायुक्त विधेयकासंबंधी पारित केलेल्या ऐतिहासिक ठरावाची अंमलबजावणी करून केंद्रात लोकपाल व राज्यात लोकायुक्त विधेयक मंजूर करावे या मुख्य मागणीसाठी २७ ऑगस्ट २०११ ते २८ नोव्हेंबर २०१३ पर्यंत प्रधानमंत्र्यांना अनेक स्मरण पत्रे देऊन विनंती केली. याच कालावधीत राज्यसभेचे विरोधीपक्षनेते मा. अरूण जेटली व लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्या मा. सुषमा स्वराज यांनाही पत्र देऊन स्मरण दिले. तसेच श्रीमती सोनीया गांधी, श्री. नारायण सामी यांना पत्र देऊन स्मरण दिले. परंतु तब्बल दोन वर्षे उलटले तरी सरकारने सक्रीयता दाखवली नाही. सरकारने संसदेद्वारा दिलेले लेखी ठरावाची अंमलबजावणी न करून देशातील जनतेचा अवमान केला आहे. त्यामुळे राळेगणसिद्धी येथे जनआंदोलन सुरू करण्याचा निर्णय अण्णांनी घेतला.

**राळेगणसिद्धी येथे जनआंदोलन व अण्णांचे उपोषण :**

जनलोकपाल विधेयक मंजूर करण्याचा चेंडू लोकसभेने राज्यसभेकडे टोलविला. राज्यसभेत सदर विधेयक दोन वर्षापासून प्रलंबीत ठेवले. यासाठी विरोधीपक्ष म्हणून जनलोकपाल मंजूर होण्यासाठी विरोधी पक्ष ही फेल झाल्याची भावना अण्णांनी विरोधीपक्षनेते अरूण जेटली व सुषमा स्वराज यांना पत्राद्वारे कळविली. येत्या हिवाळी

अधिवेशनात हे विधेयक मंजूर होण्यासाठी विरोधीपक्ष म्हणून आपण सरकारवर दबाव आणावा असे आव्हानही अण्णांनी केले. व भाजपावरील आपली नाराजी जाहीरपणे प्रगट केली.

भ्रष्टाचारावर अंकुश ठेवणाऱ्या जनलोकपाल विधेयकास काँग्रेसकडून मंजूरी मिळण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न होत नसल्याची खंत अण्णांनी काँग्रेस अध्यक्षा सोनीया गांधी यांचेकडेही पत्राद्वारे व्यक्त केली. श्रीमती सोनीया गांधी यांनी अण्णांना दिलेल्या पत्राद्वारे विधेयक मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु ते पाळले नाही. जनलोकपाल विधेयक दोन वर्ष प्रलंबीत ठेवण्याचे पाप काँग्रेसने केले. देशातील चार राज्यांचा निकाल विचारात घेता काँग्रेसची झालेली वाताहत ही काँग्रेसने जनतेची फसवणूक केल्याची फळे आहेत. जनतेशी केलेला विश्वासघात आणि भ्रष्टाचार यामुळेच काँग्रेसला जनतेने मतदानातून शिक्षा दिली असून याचा परिणाम लोकसभेच्या येत्या निवडणूकीतही होईल असा स्पष्ट इशारा अण्णांनी जाहीरपणे दिला होता. भ्रष्टाचाराने मस्त झालेल्या जनतेच्या मनातील असंतोषाची परिणीती काँग्रेसची सत्ता जाण्यात झाली. अण्णांचा इशारा खरा ठरला.

**पुन्हा जनलोकपालासाठी लढा !**
**१० डिसेंबर, २०१३**

अण्णा हजारे यांनी सकाळी राळेगणसिद्धीचे पवित्र देवस्थान माता पद्मावती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. राळेगण परिवाराने सजविलेल्या उघड्या जीपमधून अण्णा मीरवणुकीने सर्व ग्रामस्थ, विद्यार्थी, युवक, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे कार्यकर्ते यांचेसह गावातील मुख्य रस्त्यावरून यादवबाबा मंदिरात आगमन झाले. यादवबाबा मंदिराच्या आवारात उभारलेल्या मंडपात सकाळी ११ वाजता उपोषणास सुरुवात केल्याचे जाहीर केले. विविध राज्य व महाराष्ट्रातून आलेल्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी तिरंगा ध्वज व वंदे-मातरम्, अण्णा हजारे आगे बढोच्या घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

जनलोकपाल विधेयक मंजूर झाल्याशिवाय आता माघार घ्यायची नाही. आता कोणाशी चर्चा नाही. असा निर्धार करत अण्णांनी आपल्या उपोषणाचा प्रारंभ केला.

दिल्ली विधानसभेत आम आदमी पक्षाचे घवघवीत यश मिळवले. चार राज्यात

काँग्रेसची पीछेहट झाली. अशा परिस्थितीत काँग्रेससह भारतीय जनतापक्षही धास्तावले होते. अण्णांचे उपोषण सुरू होताच संसदीय कार्यमंत्री व्ही. नारायणसामी यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनातच जनलोकपाल विधेयक मंजूर करून घेतले जाईल असे स्पष्ट केले. तर दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री ना. पृथ्वीराज चव्हाण यांचे दूत बनून महसूलमंत्री ना. बाळासाहेब थोरात हे सायंकाळी ५.०० वाजता राळेगणसिद्धी येथे पोहोचले. अण्णांची भेट घेतली. अणंची तब्येत चांगली नसल्यामुळे उपोषण करू नये अशी शासनातर्फे विनंती केली. दरम्यानच्या काळात श्रीमती सोनिया गांधी यांच्या कार्यालयातून अण्णांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न गांधी यांनी केला. परंतु चर्चा होऊ शकली नाही. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनीही दूरध्वनीद्वारे अण्णांशी संपर्क साधून सध्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात जनलोकपाल विधेयक मंजूर करवून घेण्याचे आश्वासन दिले.

अण्णांच्या उपोषणास्त्रानंतर सरकारने पहिल्याच दिवशी दखल घेतली. सरकार जागे झाले व कामाला लागले.

अण्णांची प्रकृती ठीक नव्हती. अण्णांची नुकतीच पुणे येथील खाजगी दवाखान्यात शस्त्रक्रिया झाली असल्याने त्यांनी फक्त ७२ तासांचे उपोषण करता येऊ शकते, असा सल्ला डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर दिला होता. अण्णांची तपासणी करणारे शासकीय डॉक्टर पोपट सोनवणे, डॉ. प्रकाश लाळगे, पुण्याचे डॉ. कल्याणजी गंगवाल व नोबेल हॉस्पिटलचे डॉ. सारंग माने यांनी अण्णांनी अधिक काळ उपोषण करू नये या मताचे होते.

आम्ही काही कार्यकर्त्यांनी अण्णांनी उपोषण करू नये काही प्रमुख कार्यकर्ते उपोषण करतील अशी विनंती केली. परंतु अण्णांनी ती धुडकावली. मला माहीत आहे माझी तब्येत साथ देत नसतानाही जनतेच्या प्रश्नासाठी आमरण उपोषणाचा मार्ग निवडला आहे. मी मरणाला घाबरत नाही, देशासाठी बलिदानाची तयारी आहे. आपल्या पहिल्याच भाषणात अण्णांनी ही लढाई आर या पार ची असेल, असे संकेत दिले. केंद्र सरकार, काँगेसवर टीका करतानाच त्यांनी प्रमुख विरोधी पक्ष भाजपचाही समाचार घेतला. अण्णा म्हणाले, भ्रष्टाचार वाढल्याने महागाई वाढली हे नाकारून चालणार नाही. महागाई, बेकारी व भ्रष्टाचारामुळे त्रस्त झालेल्या देशात जनलोकपालाची गरज आहे. जनलोकपाल विधेयक हेच आपले अंतिम ध्येय आहे.

त्यामुळे कोणाशीही चर्चा करण्यात आपल्याला स्वारस्य नाही. सरकारने तातडीने जनलोकपाल विधेयक मंजूर करावे हा एकच मार्ग आहे. आता माघार नाही. अण्णांच्या समर्थनार्थ राळेगणसिद्धीत बंद पाळण्यात आला. अण्णा सोबत २८ कार्यकर्ते उपोषणाला बसले होते. विविध ठिकाणांहून दुचाकीने कार्यकर्ते रॅलीने राळेगणमध्ये आले व अण्णांना पाठींबा दिला. ग्रामस्थांनी थाळी मोर्चा काढला.

**किरण बेदी यांचा सहभाग**

माजी आय.पी.एस. अधिकारी व अण्णांच्या सहकारी किरण बेदी यांनी उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी अण्णांची राळेगणमध्ये भेट घेऊन चर्चा केली. यावेळी आंदोलनकर्त्यांसमोर बोलताना किरण बेदी म्हणाल्या, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी जनलोकपाल विधेयकासाठी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री नारायण सामी यांनी हे विधेयक हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्याची घोषणा केली असली, तरी ती फसवी असल्याचा गौप्यस्फोट केला. तसेच सरकारने जनलोकपाल विधेयक अद्यापी राज्यसभेच्या अजेंड्यावर, विषय सूचित घेतले नाही, नारायणसामी जनतेची दिशाभूल करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सरकारने राज्यसभेत व लोकसभेत जनलोकपाल विधेयक मंजूर करावे, तसे न झाल्यास आगामी लोकसभा निवडणूकीत मतदारांनी काँग्रेसला मतदान करू नये, असे आवाहन बेदी यांनी केले. तसेच शनिवारपासून अण्णांच्या सोबत राळेगणसिद्धी येथे उपोषणास बसणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. किरण बेदी यांच्या उपस्थितीत व कार्यकत्यांच्या आग्रहामुळे त्यांनी दोन वेळा भाषण केले त्यामुळे कार्यकर्त्यांत चैतन्य पसरले व गर्दीत वाढ झाली.

**केजरीवाल आजारी, अण्णांबरोबरील भेट रद्द**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळाल्यानंतर पहिल्यांदाच आम आदमी पक्षाचे संस्थापक अरविंद केजरीवाल व त्यांचे सहकारी गुरुवारी राळेगणसिद्धी येथे येणार असल्याची माहिती खुद्द केजरीवाल यांन दिल्ली निवडणुकीत २८ जागा जिंकल्यानंतर आम आदमी पक्षाने जंतर-मंतर मैदानावर काढलेल्या विजयी रॅलीत दिली होती. राळेगण येथे गेल्यानंतर केजरीवाल अण्णांच्या व्यासपीठावर नव्हे, तर सामान्या जनतेमध्ये बसणार असल्याचे सांगितले होते. परंतु त्यांची प्रकृती बरी नसल्याचे कारण देत ही राळेगण भेट रद्द करण्याचे घोषीत केले. त्यांचे ऐवजी कुमार

विश्वास, संजयसगि व गोपाल राय हे केजरीवाल यांचे सहकारी राळेगणसिद्धीत दाखल झाले होते.

**विधेयकावरून अण्णा-आप-भाजपा, काँग्रेस व समाजवादी पक्षात दुमत**

अण्णांचे राळेगणसिद्धी येथे बेमुदत उपोसण सुरू केल्यानंतर राज्यसभेत लोकपाल विधेयक चर्चेसाठी मांडण्यात येणार असल्याचे संकेत सांसदीय कामकाज मंत्री कमलनाथ, केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री व्ही. नारायणसामी यांनी दिले. राज्यसभेतील निवड समितीने या विधेयकात १३ दुरुस्त्या सुचवल्या आहेत. निवड समितीने सर्वानुमते मंजूर केलेल्या लोकपाल विधेयकाचा मसुदा कुठलेही बदल न करता पारित करण्याचा आग्रह भाजपाने धरला होता. तर हे विधेयक कसे पारित करायचे ते सभागृहाला ठरवू द्या असे यूपीए सरकारचे म्हणणे होते. तर राळेगणसिद्धी येथे आलेले 'आप'चे नेते कुमार विश्वास यांनी आपली भूमिका मांडताना म्हणाले की, दिल्लीत उपोषण सोडताना जो मसुदा देण्यात आला होता, तेच विधेयक जसेच्या तसे आणावे, अशी मागणी करताना हजारे यांनीही याच मुद्यावर ठाम रहावे, अशी सूचनाही त्यांनी केली होती.

राज्यसभेत नेमके कोणते विधेयक येत आहे, हे अद्याप माहित नाही. ते जेव्हा मांडले जाईल, त्याची प्रत आपण मिळवू त्यानंतरच त्याबद्दल बोलता येईल अशी भूमिका अण्णांनी मांडली. जनतेच्या हितासाठी असलेल्या जनलोकपाल विधेयकास समाजवादी पक्ष वा इतर पक्षांनी विरोध करू नये, असे मत अण्णांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. संयुक्त जनतादल आणि राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका याच अधिवेशनात लोकपाल विधेयक मंजूर व्हावे अशी आहे असे मत डी. पी. त्रीपाठी यांनी सांगितले. सरकारने जनतेचा विश्वास गमावल्याने त्यांनी सदनात एकही विधेयक आणू नये अशी मागणी समाजवादी पक्षाच्या नरेश अग्रवाल यांनी केली होती. सशक्त जनलोकपाल विधेयक संसदेत मंजूर होण्यासाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अण्णांबरोबर दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पाठींबा दिला.

जनलोकपाल विधेयकाच्या समर्थनार्थ राळेगणसिद्धी परिवाराने रात्री मशाल मोर्चा काढला. तसेच अण्णांच्या उपोषण कालावधीत राळेगणसिद्धीमधील प्रत्येक कुटुंबातील एक सदस्य लक्षणीय उपोषणास बसण्याचा निर्णय गावाच्या ग्रामसभेत घेण्यात आला.

**भ्रष्टाचार विरोधात लढायचंय?.... कॉल अण्णा**

राळेगणसिद्धी येथील जनलोकपाल आंदोलनाच्या निमित्ताने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यावर कॉल अण्णा हे विशेष दूरभाष संकेतस्थळ (युनिक टेलिफोन पोर्टल) तयार करण्यात आले होते. अण्णांच्या आंदोलनात सहभाग घेण्यासाठी, आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी याचा वापर करता येईल. या संकेतस्थळावरून मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेत संवाद साधण्याची सुविधा होती. या पोर्टलद्वारे हजारो कार्यकर्त्यांनी अण्णा आंदोलनात सहभाग घेतला.

**लोकपाल राज्यसभेत सादर**

लोकसभेत मंजूर झालेले लोकपाल वर्षभरापासून राज्यसभेत लटकले होते. अण्णांच्या आंदोलनामुळे पुन्हा हे विधेयक राज्यसभेत मांडण्यात (दि. १४ डिसेंबर, २०१३) आले. चार राज्यातील विधानसभा निवडणुकानंतर खडबडून जागे झालेल्या काँग्रेसने लोकपाल विधेयक पुन्हा राज्यसभेत आणले. बहुतेक सर्व पक्षांनी लोकपालाला पाठींबा दिल्यामुळे विधेयक आता मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आले होते. लोकपाल विषयी काँग्रेसची मूभिका स्पष्ट करण्यासाठी काँग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी, केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल, आणि अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी शनिवारी दिल्लीत संयुक्त पत्रकार परिषद घेतली. चार राज्यातील निवडणुकीतील पराभवाचा आणि लोकपाल विधेयक आणण्याचा काहीही संबंध नाही. काँग्रेस पक्ष ९९ टक्के विधेयकाच्या बाजूने आहे. एक टक्का पाठींबा इतर पक्षांनी द्यावा. सर्व समयांवर लोकपाल हे एकमेव उत्तर नाही, पण भ्रष्टाचार नियंत्रणासाठी हे मोठे पाऊल आहे. दिल्लीत आप पक्षाच्या यशानंतर युपीए आणि काँग्रेस पक्ष घाईघाईने हे विधेयक मंजूर करत असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी फेटाळला. सर्व सामान्य नागरिकांना बळ देणारा माहितीच्या अधिकाराचा कायदा आम्ही लागू केला. आता भ्रष्टाचाराला वेसण घालण्यासाठी लोकपाल विधेयक जरूरीचे आहे. त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या करून ते मंजूर करण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करण्याचे आवाहन राहुल गांधी यांनी केले.

सीबीआय अध्यक्षांच्या निवडीचे अधिकार लोकपालाकडे असणार नाही. केंद्रीय दक्षता आयोग कायद्यातील तरतुदीनुसार सीबीआय प्रमुखाची निवड केली जाणार आहे. मात्र, भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी लोकपाल सीबीआयला निर्देश देऊ शकतो, असे कायदामंत्री कपिल सिब्बल यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस आणि यूपीए सरकारच्या मित्रपक्षामुळेच लोकपाल रखडले आहे. राज्यसभेत पुन्हा काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी गोंधळ घातला आणि सभागृह चालू दिले नाही, तरी विनाचर्चा लोकपाल मंजूर करण्यास भाजपचा पाठींबा आहे. हे विधेयक तात्काळ मंजूर व्हावे, अशीच भाजपची भूमिका आहे. असे मत विरोधीपक्षनेते अरूण जेटली यांनी व्यक्त केले.

काँग्रेसने जनमत गमावले आहे. त्यामुळे महत्वाचे विधेयक मंजूर करून घेण्याचा काँग्रेसला अधिकार नाही. समाजवादी पक्ष लोकपालला विरोध करण्यासाठी कोणत्याही थराला जाईल. देशात पोलीसराज आणणे लोकशाहीला घातक आहे असे मत सपा चे नेते नरेश अग्रवाल यांनी व्यक्त केले.

सरकारी लोकपाल हे जोकपाल आहे. अशा जोकपालला अण्णा हजारे यांनी कसा काय पाठींबा दिला. अण्णांची कोणतरी दिशाभूल करत आहे, असे आरोप आप चे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी केला. आप च्या कुमार विश्वास यांनीही विरोध केला.

**लोकपाल अण्णांकडूनही पास !**

राज्यसभेत मांडण्यात आलेल्या जनलोकपाल विधेयकाविषयी आपण समाधानी असून, त्यात जनहिताचे बहुतेक मुद्दे आले आहेत. त्यामुळे ते लवकरात लवकर मंजूर करावे, अशी अपेक्षा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केले.

सीबीआयमध्ये सरकारचा हस्तक्षेप राहणार नाही. जनलोकपालच्या प्रतिनिधींची नियुक्ती पंतप्रधान, विरोधी पक्षनेता व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती करणार आहेत. आठ सदस्यांपैकी चार सदस्य सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती घेण्याचा निर्णय महत्वाचा आहे. लोकपाल सदस्यांना सीबीआयचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यांनी दिलेल्या अहवालावल राष्ट्रपती व सर्वोच्च न्यायालय चौकशी करणार आहे. त्यामुळे गडपडींना थारा मिळणार नाही. जनलोकपालसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करण्यात येणार असल्याने यात सरकारचा हस्तक्षेप होणार नाही. सीबीआयद्वारे करण्यात येणाऱ्या प्राथमिक चौकशीचा कालावधी सहा महिने व वर्षभरात चौकशीवर अंतिम निर्णय होणार आहे. तसेच प्रथम ते चतुर्थ श्रेणीपर्यंतचे सर्व अधिकारी व कर्मचारी लोकपालाच्या कक्षेत आले आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसून सर्व सामान्यांना न्याय मिळेल. सरकारी अनुदान घेणाऱ्या स्वयंसेवी संस्थानाही आता

आळा बसेल असे अण्णांनी स्पष्ट केले. पंतप्रधानांनाही जनलोकपालाच्या कक्षेत आणल्याचे स्वागत अण्णांनी केले. जनलोकपाल मंजूर झाल्यानंतर वर्षभरात देशातील सर्व राज्यांत सशक्त लोकायुक्त मंजूर करणे हे सरकारची व जनतेची ही जबाबदारी असल्याचे अण्णांनी सांगितले.

राईट टू रिजेक्ट, राईट टू रिकॉल, सिटिझन चार्टर, ग्रामसभेला जादा अधिकार या मागण्यासाठी पुढील काळातही लढा सुरू राहणार आहे. आपण दिलेल्या मसुद्यातील सोळा मुद्दे राज्यसभेत सादर केलेल्या मसुद्यात आले आहेत, हे सर्व मुद्दे भ्रष्टाचाराला आळा घालणारे व सर्वसामान्य जनतेच्या हिताचे आहेत. आपण जनलोकपाल संदर्भात केलेल्या मागण्यासंदर्भात तीन कायदे संसदेत स्वतंत्र मांडण्यात आले आहेत. राज्यसभेतील विधेयकात जे मुद्दे मंजूर करण्यात आले आहेत. त्यावर आपण समाधानी आहोत. आपण सर्वच मागण्यावर हट्ट धरून बसल्यास जनतेत वेगळा संदेश जाईल. शेवटी संसद ही सर्वोच्च असल्याने संसदेच्या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केल्यास आपण उपोषण सोडणार असल्याचे मत अण्णांनी व्यक्त केले. आपले हे विधेयक मान्य नसल्यास त्यांनी स्वतंत्र आंदोलन करावे असे मत अण्णांनी व्यक्त केले. हे विधेयक मंजूर झाल्यास तो देशातील जनतेचा विजय असेल. काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस राहुल गांधी यांनी भ्रष्टाचार समूह नष्ट करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले आहे, हे पत्रकारांनी अण्णांच्या निदर्शनास आणून दिले असता अण्णा म्हणाले, भ्रष्टाचार मिटवणार असाल तर राहुल गांधींच्या समवेत उभे राहू.

अण्णा हजारे यांनी राज्यसभेत मांडलेल्या जनलोकपाल विधेयकावर समाधान व्यक्त केल्याने व भाजपाने राज्यसभेत विधेयकास पाठींबा देण्याची घोषणा केल्यामुळे सरकारी लोकपालाला विरोध करणारा आम आदमी पक्ष व पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल कोंडीत सापडले. अरविंद केजरीवाल यांच्यामते सरकारी लोकपालात सीबीआयला स्वतंत्र केलेले नाही. त्यामुळे कोळसा व टूजी स्पेक्ट्रम घोटाळ्यात पंतप्रधान किंवा कुठल्याही मंत्र्याला शिक्षा होऊ शकत नाही. सध्याच्या लोकपालाने साधा उंदीरही तुरुंगात जाणार नाही. त्यामुळे आम्ही लोकपाल विधेयकाला विरोध करीत आहोत. सरकारी लोकपालला अण्णांचा पाठींबा हे दुर्दैवी असल्याचे मत केजरीवाल यांनी व्यक्त केले.

अण्णांच्या उपोषणाचा सहावा दिवस उजाडला. अण्णांचे वजन ४ किलो १००

ग्रॅमने घटले. त्यांचा रक्तदाब स्थिर असला तरी त्यांना अशक्तपणा जाणवत होता. त्यांना भेटण्यासाठी महाराष्ट्राचे आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे पाटील हे राळेगणसिद्धीत आले. या दोघांनाही अण्णांच्या लोकपाल विधेयकाला पाठींबा दिला.

**मुंबईच्या डबेवाल्यांचा पाठींबा !**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे रामलीला मैदानावर झालेल्या ऐतिहासिक जनलोकपाल आंदोलनाला १२५ वर्षाचा इतिहास असलेल्या मुंबईचे डबेवाले यांनी पाठींबा दिला होता. तसेच आझाद मैदान, मुंबई येथे झालेल्या अण्णांच्या आंदोलनास पाच हजार डबेवाल्यांनी एक दिवसांचा १२५ वर्षातील पहिला संप पुकारून पाठींबा दिला होता. ज्यामुळे मुंबईतील दोन लाख लोकांना त्या दिवशी डबा मिळाला नाही.

मुंबईतील डबेवाल्यांच्या संघटनेचे नेते गंगाराम तळेकर यांनी राळेगणसिद्धीत येऊन अण्णांची भेट घेतली व सोपान भऱ्हे, बबनराव वाळुंज यांनी आंदोलनास पाठींबा दिला.

**राळेगण बनलं साबरमती !**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी महात्मा गांधी यांनी उपोषणाचे हत्यार वापरून ब्रिटीश सरकारला नमवले होते. देशाचे दुसरे गांधी म्हणून ज्यांचा आज गौरव होतो ते राळेगणसिद्धीचे संत अण्णा हजारे यांनी गांधीजींच्या मार्गावर पाऊल ठेवत सरकार विरोधी उपोषणाचे हत्यार उपसले व अनेक यशस्वी आंदोलना केली. महाराष्ट्र व देशाला विविध लोकोपयोगी क्रांतीकारी कायदे दिले. जनलोकपाल विधेयकासाठी राळेगणसिद्धी येथे उपोषणास बसलेल्या अण्णांच्या आंदोलनास पाठींबा देण्यासाठी उपोषणाच्या सहाव्या दिवशी रविवार असल्यामुळे लोकांचा ओघ वाढला होता. कॉलेजचे विद्यार्थी, युवक, युवती, सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते अण्णांच्या उपोषणास्थळी येऊन आंदोलनात सहभाग घेऊन पाठींबा देत होते.

अण्णांनी लोकपालच्या मागणीसाठी दिल्ली व मुंबईत अशी दोन उपोषणे केली आणि राळेगणसिद्धी येथे होणारे तिसरे निर्णायक उपोषण अण्णांनी सुरू केले. महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढ्यात देशातील जनतेचे संपूर्ण लक्ष महात्मा गांधी व साबरमती

आश्रमाकडे असायचे. आज सर्व देशवासीयांच्या नजरा राळेगणसिद्धीकडे व अण्णा हजारे यांच्याकडे लागल्या आहेत. नव्या समाजपरिवर्तनाची व भ्रष्टाचार मुक्त सशक्त भारताचे स्वप्न अण्णांच्या रूपाने जनता पाहत आहे. राळेगणसिद्धीतील युवक वंदे मातरम्, इन्कलाब झिंदाबाद, अण्णा हजारे आंधी है, देश के दुसरे गांधी है! अशा घोषणा दिल्यामुळे परिसरात चैतन्य पसरले आहे. अण्णांनी लोकपाल विधेयकाच्या या आंदोलनास स्वातंत्र्याची दुसरी लढाई असं संबोदन दिलं आहे.

**अण्णांची प्रकृती खालावली - संपूर्ण महाराष्ट्रात चिंतेचे वातावरण**

अण्णा हजारे यांच्या बेमुदत उपोषणाचा सातवा दिवस उजाडला. अण्णांचे वजन ४ किलो ३०० ग्रॅमने घटले. त्यामुळे त्यांच्या वयाचा विचार करता ही चिंताजनक बाब असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अण्णांची प्रकृती खालावल्याच्या पार्श्वभूमीवर येथील यादवबाबा मंदिरात ससून रुग्णालयाचे डॉ. योगेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांचे पथक या ठिकाणी तैनात करण्यात आले होते.

अणंची प्रकृती खालावल्याची बातमी समजताच अण्णांच्या सहकारी माजी आयपीएस अधिकारी किरण बेदी या मागील दोन दिवसापासून अण्णांच्या उपोषणाच्या ठिकाणी हजर होत्या. त्या नवी दिल्लीला जाण्यासाठी पुणे विमानतळावर पोहोचल्या होत्या. परंतु अण्णांची प्रकृती खालावल्याचे वृत्त कळताच त्या दिल्लीकडे न जाता लगेच पुन्हा राळेगणसिद्धीकडे परत आल्या. त्यामुळे कार्यकर्त्यांना स्फूर्ती मिळाली.

**केंद्राचे पारदर्शकतेच्या दृष्टीने ऐतिहासिक पाऊल 'लोकपाल'वर लोकसभेत शिक्कामोर्तब !**

भ्रष्टाचारमुक्तीच्या लढ्यातील महत्वाचे पाऊल मानले जाणारे गेल्या ४६ वर्षापासून प्रलंबीत असलेले ऐतिहासिक 'लोकपाल व लोकायुक्त विधेयक – २०११' अखेर लोकसभेत आवाजी मतदानाने १८ डिसेंबर २०१३ रोजी मंजूर करण्यात आले.

लोकसभेच्या सभागृहात ना. कपिल सिब्बल यांनी सुधारीत लोकपाल विधेयक मांडले. त्यावर भाजप नेत्या सुषमा स्वराज यांनी भाजपचा लोकपाल विधेयकास संपूर्ण पाठींबा असल्याचे जाहीर केले. समाजवादी पक्षाचे नेते मुलायमसिंह यादव म्हणाले, या विधेयकामुळे सरकारी अधिकारी कर्तव्य बजावण्यास घाबरतील, परिणामी सरकारी कार्यालयातील काम ठप्प होईल. कोणताही अधिकारी कागदपत्रांवर स्वाक्षरी करणार नाही. समाजवादी पक्षाची ही भूमिका असल्यामुळे पक्षाच्या सर्व खासदारांनी या

विधेयकाला विरोध करीत लोकसभेतून सभात्याग केला. जदयूचे नेते शरद यादव म्हणाले, सरकारी कामात कोणत्याही प्रकारे अडथळे निर्माण होऊ नयेत म्हणून आम्ही या विधेयकास पाठींबा दिला आहे. काँग्रेसचे उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी, सर्व पक्षांनी एकमताने लोकपाल विधेयकाला पाठींबा द्यावा, असे आवाहन केले.

अशा प्रकारे कपिल सिब्बल यांनी लोकपाल विधेयक लोकसभेत मांडल्यावर सुषमा स्वराज, राहुल गांधी व शरद यादव यांनीच विधेयकावर भाषण केले.

लोकसभेत लोकपाल विधेयकाला शिवसेनेचाही विरोध होता. तो सभागृहाच्या कामकाजात नोंदवला जावा, यासाठी भाषण करण्याची संधी मिळावी म्हणून सेनेचे अनंत गीते यांनी हात उंचावून अध्यक्षांना अनेकदा विनंती केली. गीते यांना संधी द्यावी यासाठी खा. चंद्रकांत खैरे यांनीही अध्यक्षांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु गोंधळ वाढल्याने सेनेच्या सदस्यांनी सभात्याग केला. उर्वरीत सर्वांनी आपले भाषण लिखीत स्वरूपात लोकसभेच्या पटलावर ठेवण्याची सूचना लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार यांनी केली.

भ्रष्टाचाराच्या मुद्यावर सत्तारूढ काँग्रेस व प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपमध्ये लोकपाल विधेयकाच्या बाबतीत लोकसभेत दुर्मिळ असे ऐक्य दिसून आले. तेलंगणाच्या निर्मितीच्या विरोधात लोकसभेत सीमांध भागातील सदस्यांचा गदारोळ सुरू असतानाच लोकपाल व लोकायुक्त विधेयक लोकसभेत आवाजी मतांनी मंजूर करण्यात आले.

पंतप्रधान डा. मनमोहन सिंग विधेयक मंजूर झाल्यानंतर प्रतिक्रीया देताना म्हणाले, संसदेने हे विधेयक मंजूर करण्यात जो सूज्ञपणा दाखविला, त्यामुळे मला अतिशय आनंद झाला आहे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनीही लोकपाल विधेयक मंजूर झाल्याबद्दल स्वागत केले. काँग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी म्हणाले, ''माहितीचा अधिकार, हा युपीए सरकारने भ्रष्टाचारावर केलेला महत्त्वाचा हल्ला असून, आता लोकपाल विधेयक मंजूर करून ऐतिहासिक कामगिरी बजावली आहे.''

भाजपचे पंतप्रधान पदाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांनी लोकपाल विधेयक मंजूर करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना श्रेय दिले आहे. अण्णांच्या जिद्द व चिकाटीमुळेच हे यश मिळाले आहे. तसेच आमच्या पक्षाचे अरूण जेटली व

सुषमा स्वराज यांनी संसदेत विधेयक मंजूर होण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले असल्याचे मत व्यक्त केले. विरोधी पक्ष नेत्या सुषमा स्वराज म्हणाल्या, लोकपाल विधेयक मंजूरीचे श्रेय घेण्यासाठी रांग लागलेली आहे, पण या प्रश्नावर अण्णा हजारे यांनी अनेकदा उपोषण केले. त्यांनाच श्रेय दिले पाहिजे. काँग्रेसने घेण्याचा प्रयत्न करू नये. अण्णांच्यानंतर या देशातील जनतेला त्याचे श्रेय आहे.

**अण्णांनी संसद व जनसंसदेला केला 'सलाम'**

राज्यसभेपाठोपाठ लोकसभेतही लोकपाल विधेयक मंजूर करण्यात आल्यानंतर राळेगणसिद्धीमध्ये फटाके फोडून दिवाळी साजरी करण्यात आली. लोकपाल विधेयकावर लोकसभेत सुरू असलेली चर्चा व आवाजी मतदानाने विधेयक मंजूर झाल्याचे वृत्त अण्णा हजारे, किरण बेदी, व्ही. के. सिंग, विश्वंभर चौधरी, अशोक सब्बन, डॉ. बालाजी कोंपलवार, श्याम पठारे, सुरेश पठारे, दत्ता आवारी, राळेगणचे ग्रामस्थ व कार्यकर्ते दूरचित्रवाणीवर पाहत होते. विधेयक मंजूर झाल्याचे समजताच राळेगणसिद्धीमध्ये एकच जल्लोष उडाला. दुपारी एक वाजून ४४ मिनिटांस राळेगणसिद्धी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता दुसरीच्या वर्गातील मागासवर्गीय विद्यार्थी साहिल सुरेंद्र गायकवाड व प्रिती दत्तात्रय उगले यांच्या हस्ते व किरण बेदी, व्ही. के. सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारो आंदोलनकर्त्यांच्या साक्षीने नारळपाणी घेऊन नऊ दिवस सुरू असलेले उपोषण बुधवारी १२ डिसेंबर रोजी मागे घेतले. महिलांनी फुगड्या घालून आनंद व्यक्त केला. विद्यार्थी, युवक व हजारो कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

व्यासपीठ व मंडपात पुष्पवृष्टी करण्यात आली. फटाके फोडून अण्णा हजारे यांचा जयजयकार करणाऱ्या घोषणांनी परिसर दणाणला. राष्ट्रभक्तिपर गीतांनी वातावरण फुलून गेले. ग्रामस्थांनी येथे प्रसिद्ध यादव बाबा मंदिरात गूळ वाटून आनंद व्यक्त केला. वृद्धांसह, महिलांनी आनंदाच्या भरात राष्ट्रभक्तीपर गीतांवर ताल धरला. पारंपारिक ढोल, ताशे व लेझीमच्या तालावर सर्वजण आनंदोत्सवात सहभागी झाले.

लोकपाल मंजूर केल्याबद्दल भारतीय जनतेच्या वतीने विधेयक मंजुरीस पाठींबा देणाऱ्या सर्व खासदारांना प्रणाम करतो. याचे श्रेय मी देशाच्या संसद व जनसंसदेला देत असल्याची भावना अण्णांनी व्यक्त केली. उपोषणास पाठींबा देऊन सहकार्य केल्याबद्दल सर्व कार्यकर्ते व जनतेचे विशेष आभार मानले.

उपोषण सोडल्यानंतर भ्रष्टाचाराला आळा घालणारा सशक्त कायदा प्रथमच होत असल्याबद्दल अण्णांनी समाधान व्यक्त केले. येत्या लोकसभेच्या निवडणुकीची आचार संहिता लागू होण्यापूर्वी या विधेयकाचे कायद्यात रूपांतर व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच पुढे अण्णा म्हणाले, केवळ लोकपाल कायदा बनून चालणार नाही. त्याची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. लोकपाल विधेयकाने शंभर टक्के भ्रष्टाचार बंद होणार नाही, पण भ्रष्टाचाराचे प्रमाण मात्र निश्चित कमी होईल. गरीबांना न्याय मिळेल. असा विश्वास अण्णांनी व्यक्त केला.

**राष्ट्रपतीची लोकपाल विधेयकास मंजूरी**

राज्यसभा व लोकसभेत ''लोकपाल व लोकायुक्त विधेयक-२०१३'' मंजूर झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या मंजूरीसाठी पाठवण्यात आले. मा. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी १ जानेवारी, २०१३ रोजी सदर विधेयकावर सही केली. १६ जानेवारी, २०१६ पासून कायदा अस्तित्वात आला. अशाप्रकारे संसदेचे चार दशकांहून अधिक काळ रखडलेले 'लोकपाल व लोकायुक्त विधेयक' अखेर मंजूर होऊन कायद्यात रूपांतर झाले. मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली मागील आठ वर्षापासून सुरू असलेल्या लोकपालाच्या लढ्यासाठीच्या जनआंदोलनाला अखेर यश प्राप्त झाले. जनतेचा विजय झाला. भ्रष्टाचाराचा अँटीव्हायरस प्रत्येकानी टोचून घेणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन मा. राष्ट्रपती यांनी केले.

**लोकपाल व लोकायुक्त विधेयकाची वैशिष्ट्ये !**

अण्णा टीमने तयार केलेले जनलोकपाल विधेयक मसुदा व १८ डिसेंबर २०१३ रोजी लोकसभेत मंजूर झालेले 'लोकपाल व लोकायुक्त विधेयक-२०११' या विधेयकातील मसुद्यात फार मोठी तफावत असल्याचे मत 'आम' आदमी पक्षाने केला.

परंतु एक व्हिसल ब्लोरचा मुद्दा व नागरीकांची सनद हे दोन मुद्दे सोडले तर इतर मुद्दे फार गंभीर नाहीत. लोकसभेने मंजूर केलेल्या सुधारीत विधेयकाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

● **लोकायुक्त**

लोकायुक्त कायद्याची अधिसूचना निघाल्यानंतर प्रत्येक राज्याला वर्षभरात लोकायुक्ताची नियुक्ती करणे बंधनकारक असेल. त्याचे स्वरूप आणि पद्धत

ठरविण्याचा अधिकार राज्यांना असेल.

● **लोकपालची घटना**

लोकपालमध्ये अध्यक्षासह आठ सदस्य असतील. यातील निम्मे सदस्य न्यायमूर्ती असतील. एकूण सदस्यांपैकी निम्मे सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय, अल्पसंख्यांक तसेच महिला वर्गातील असतील.

● **लोकपालची निवड समिती**

लोकपालच्या निवड समितीत पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, लोकसभेतील विरोधीपक्षनेते व सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती असतील. निवड समितीमधील पाचवा सदस्य नामवंत न्यायमूर्ती असेल.

● **लोकपालची अधिकार कक्षा**

लोकपालच्या अधिकार कक्षेत पंतप्रधानाचा समावेश करण्यात आला आहे. अर्थात काही बाबतीत त्यामध्ये सूट देण्यात आली आहे. पंतप्रधानांवर कारवाई करतांना ठराविक कार्यप्रणालीचे पालन करावे लागेल. लोकपालच्या कक्षेत सर्व श्रेणीतील लोकसेवकाचा समावेश करण्यात आला आहे. सर्व सरकारी संस्था, न्यास आणि संघटनांचा अंतर्भाव असेल. ज्या सार्वजनिक संस्था, ट्रस्ट यांना देणगीदाखल नागरिकांकडून तसेच परदेशातून पैसा मिळतो अशा सर्व संस्था या कायद्याच्या कक्षेत येतात. यातून धार्मिक व समाजोपयोगी कामात सहभागी संस्थांना वगळले आहे.

● **केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय)**

फौजदारी खटल्यांसाठी सीबीआयच्या स्वतंत्र संचालकाची नियुक्ती करण्यात येईल व ते सीबीआय संचालकाच्या आधीन असतील. त्यांची नियुक्ती केंद्रीय दक्षता आयोगाच्या शिफारशीनुसार होईल. सीबीआय संचालक आणि स्वतंत्र संचालकाचा कार्यकाळ दोन वर्षाचा असेल. लोकपालद्वारे तपास करणाऱ्या सीबीआय अधिकाऱ्यांची बदली करण्यासाठी लोकपालची मंजूरी आवश्यक करण्यात आली आहे.

● **सुनावणी**

सरकारी अधिकाऱ्याविरोधात प्रकरण असेल तर लोकपालकडे प्रकरण नेण्यापूर्वी संबंधीत अधिकाऱ्याचे म्हणणे ऐकून घेतले जाईल.

**● तपास यंत्रणा**

लोकपालाअंतर्गत येणाऱ्या प्रकरणांची चौकशी ६० दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल व तपास सहा महिन्यांच्या आत पूर्ण करावा लागेल. सुनावणीनंतर लोकपाल तपासाचे आदेश देऊ शकतील.

**● शिक्षा व दंड**

खटल्यात दोषी आढळणाऱ्या सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना सात वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. गुन्हेगारी कृत्य करणारे तसेच वारंवार तक्रारी होऊन त्या सिद्ध होणाऱ्या सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दहा वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. चुकीच्या आणि खोट्या तक्रारी देणाऱ्यांना एक वर्षाचा तुरुंगवास तसेच एक लाख रुपयांच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**● भ्रष्टाचाऱ्याची संपत्ती जप्त करण्याचा अधिकार**

भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सापडलेल्या संपत्ती जप्त (सील टाच करणे) करण्याचा अधिकार आहे.

**● प्रामाणिक लोकसेवकास संरक्षण**

प्रामामणिक लोकसेवक, कर्मचाऱ्यांस कायद्याद्वारे पर्याप्त संरक्षण दिले आहे.

**● लोकपालास हटविणे**

लोकपालचे अध्यक्ष आणि सदस्यांचे निलंबन आणि पदच्युती बाबत अध्यक्ष किंवा सदस्यांपैकी कोणाविरुद्ध झालेल्या तक्रारीची चौकशी लोकपाल करणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाद्वारे चौकशी होऊन लोकपालचे अध्यक्ष किंवा सदस्य यांचे विरोधात दोषी असल्याबद्दल राष्ट्रपतीकडे शिफारस आल्यानंतर, अहवाल प्राप्त झाल्यानंतर राष्ट्रपती गैरवर्तनाच्या कारणास्तव अध्य किंवा सदस्यास पदच्यूत करतील.

**● लोकपालचे कर्मचाऱ्यांच्या विरोधात कारवाई**

लोकपालचे अधिकारी व कर्मचारी कायद्याने लोकसेवक आहेत. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार दंडनीय अपराधाबद्दल, लोकपालांतर्गत किंवा सहकारी असलेल्या कोणत्याही अधिकारी वा कर्मचारी वा अभिकर्ता (दिल्ली विशेष पोलीस आस्थापने सहित) यांच्या विरोधात प्राप्त झालेली आरोप किंवा गैरवर्तनाची

तक्रार ही कलमाच्या तरतुदींप्रमाणे वागविली जाईल.

**● मालमत्ता घोषित करणे**

कलम ४४ नुसार लोकसेवक हा त्याची मालमत्ता तसेच दायित्वे या अधिनियमाद्वारे किंवा यात दिलेल्या रीतीने घोषित करील. लोकसेवक, त्याचे सेवेत प्रवेश करताना शपथ घेईल त्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत सक्षम प्राधिकाऱ्याकडे तो, त्याची, तिची, पत्नी, पती आणि अवलंबून असणारी मुले, एकत्रितपणे किंवा विभिन्न मालकी किंवा लाभार्थी आहेत. तसेच त्याची, त्याचे, तिच्या पतीची, पत्नीची, दायित्वे तसेच याच्यावर अवलंबून मुले. अशा प्रकारे या कलमानुसार प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यास वर उल्लेख केल्यानुसार त्याची, कुटुंबाची मालमत्ता आणि दायित्व यांची माहिती, हा अधिनियम अंमलात आल्यानंतर तीस दिवसांचे आत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पुरवील. ही अत्यंत कडक व सक्षम तरतूद मूळ लोकपाल विधेयकात होती. परंतु २८, २९ जुलै, २०१६ रोजी मा. नरेंद्र मोदी सरकारने सदर तरतुदीत दुरुस्ती करून फक्त अधिकारी व कर्मचऱ्यांच्या नावांवर असलेल्या मालमत्ता व दायित्वाची माहिती देण्याची जबाबदारी निश्चित केली आहे. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपली पत्नी, पती, मुले यांच्या नावांवर संपत्ती असेल तर यास टाच येणार नाही. ही तरतूद भ्रष्टाचाऱ्याला अभय देणारी आहे. व लोकपाल विधेयक कमकुवत करणारी आहे. म्हणून सदर तरतूद रद्द करावी व पूर्ववत तरतूद ठेवावी अशी मागणी अण्णा हजारे यांनी केली आहे.

**● चौकशी आणि गुन्ह्याची नोंदणी**

भारतीय घटनेचे पन्नासाव्या कलमातील तरतुदीनुसार देशात चांगली व सक्षम न्यायव्यवस्था देणे हे राज्यसंस्थेचे काम आहे. अशी सक्षम, सशक्त व स्वायत्त न्यायव्यवस्था निर्माण करण्यासाठी तिच्यामागे योग्य अशी चौकशी व्यवस्था आवश्यक आहे. अशी चौकशी व्यवस्था आपल्याकडे नव्हती. लोकपालच्या निमित्ताने ती निर्माण झाली आहे.

विद्यमान कायद्यानुसार एखाद्या नेत्याने भ्रष्टाचार केला तर केवळ त्याच्याच संपत्तीवर टाच आणता येते. ही मर्यादा होती. लोकपालमध्ये अशी तरतूद आहे की, जोपर्यंत लोकपालला खात्री वाटेल तोपर्यंत भ्रष्टाचाराच्या आखत्यारीत येणाऱ्या कुठल्याही व्यक्तीची संपत्ती जप्त करता येऊ शकते.

इंडियन पिनल कोडमध्ये एखाद्या प्रकरणाच्या चौकशीसाठी कोणतीही कालमर्यादा नव्हती. लोकपालातील तरतुदीनुसार प्रत्येक प्रकरणांच्या चौकशीसाठी आता तीन महिन्यांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. तसेच भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमानुसार खटला कधी दाखल करावा याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. त्यामुळे सीबीआयने चार्जशीट कधी फाईल करावी याला काही मर्यादा नाहीत. अनेक राजकीय नेत्यांच्या व उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या केसमध्ये सीबीआय अनेक वर्षे केस फाईल केले नसल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याला अभय मिळत गेले. लोकपालातील तरतुदीनुसार प्रत्येक गुन्ह्याची चार्जशीट एक वर्षाच्या आत करावी लागणार आहे. एक वर्ष दावा चालवावा लागणार आहे. कोणत्याही प्रकरणाचा निकाल दोन वर्षात देण्याची तरतूद लोकपाल विधेयकात आहे.

● **लोकपालची स्वायत्तता**

लोकपाल हे पूर्णपणे स्वायत्त असून त्यावर सरकारचे कुठलेही नियंत्रण नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकरणाची स्वायत्त आणि सरकारी नियंत्रणाशिवाय लोकपाल चौकशी करू शकते. यासाठी लोकपालची स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. राष्ट्रीय, राज्यस्तरपासून ते जिल्हा व तालुकापातळीपर्यंत ही यंत्रणा असणार आहे. त्यामुळे सामान्य जनतेलाही न्याय मिळणे सोयीचे होणार आहे. लोकपालच्या कामात सरकारचा हस्तक्षेप होणार नाही. त्यामुळे लोकपालला आपले कर्तव्य मोकळेपणाने आणि नि:पक्षपणे पार पाडता येईल. हे अण्णा आंदोलनाचे फार मोठे यश आहे.

## लोकपाल व लोकायुक्त, शेतकरी व कृषी समस्या व निवडणूक सुधारणासाठी अण्णांचे रामलीला मैदानावर पुन्हा आंदोलन लोकपाल व लोकायुक्त विधेयक कमजोर करण्याचा काँग्रेसआघाडी व भाजपा सरकारचे प्रयत्न

काँग्रेस आघाडी सरकारने लोकपाल व लोकायुक्त विधेयक मंजूर केले. भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आले. मोदी सरकार सत्तंत आल्यानंतर अण्णांनी साडेतीन वर्षात लोकपाल व लोकायुक्त विधेयकाची अंमलबजावणी करणे, कृषी मालाला ५० टक्के लाभ मिळवून भाव देणे, शेतकऱ्यांना पेन्शन देणे व निवडणूक विषयक सुधारणा इत्यादीसह अन्य मागण्यांसाठी ४३ वेळा पत्रव्यवहार केला. परंतु सरकारकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. याउलट मोदी सरकारने लोकपाल विधेयकातील

कलम ४४ मध्ये केवळ तीन दिवसात संशोधन करणारे ठराव मंजूर केले. लोकपाल विधेयक कमजोर करण्याचा प्रयत्न केला.

कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला परिवाराच्या नावांवर असलेल्या संपत्तीची माहिती देण्याची गरज नसल्याची तरतूद केली. २७ जुलै, २०१६ रोजी मोदी सरकारने लोकपाल व लोकायुक्त विधेयकाच्या कलम ४४ मध्ये संशोधन करण्याचा प्रस्ताव आणला. सदर विधेयकाच्या तरतुदीनुसार लोकपालच्या कक्षेत येणाऱ्या केंद्र व राज्यसरकारच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली स्वत:ची व आपल्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावांवर असलल्या संपत्तीची माहिती दरवर्षी सरकारला देणे अनिवार्य करण्यात आले होते. परंतु भाजपा सरकारने यात संशोधन करून ''अधिकारी व कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावांवर असलेल्या संपत्तीची सरकारला माहिती देण्याची तरतूद वगळण्याचा प्रस्ताव दिला.'' सदर प्रस्ताव २७ जुलै, २०१६ ला लोकसभेत ठेवण्यात आला. कोणीही चर्चा न करता केवळ आवाजी मतदानाने हे विधेयक पारित करण्यात आले. दि. २९ जुलै, २०१६ रोजी मा. राष्ट्रपतींनी सदर दुरुस्ती विधेयकावर सही केली व विधेयक पूर्वव्यापी प्रभावाने लागू करण्यात आले. सदर विधेयकाची तातडीने कोणतीही चर्चा न करता केवळ तीन दिवसात संशोधन प्रस्ताव मंजूर करण्यासाठी सरकारवर कोणते राष्ट्रीय संकट आले होते हे कळले नाही. सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला अभय देणारी ही तरतूद करून सरकारने लोकपाल विधेयक कमकुवत करण्याचे महापाप केले आहे. विधेयकातील कलम ४४ मध्ये संशोधनाचा प्रस्ताव तीन दिवसांत मंजूर होऊ शकतो. परंतु लोकपालची नियुक्ती करण्यासाठी सरकारला साडेतीन वर्षे उलटले तरी जाग येत नाही. यावरून सरकारची नकारात्मक मानसिकता दिसून येते. लोकपाल विधेयकातील कलम ४४ मध्ये संशोधन करून मोदी सरकारने लोकशाहीचे पवित्र मंदिराचे पावित्र्य भंग केल्याचा आरोप मा. अण्णांनी केला.

मा. मनमोहनसिंग यांच्या काँग्रेस आघाडी सरकारने डिसेंबर, २०१३ मध्ये लोकपाल व लोकायुक्त विधेयक २०१३ च्या कलम ६३ नुसार लोकपाल विधेयकाच्या कायद्यात रूपांतर झाल्यानंतर ३६५ दिवसाच्या आत सर्व राज्यांनी लोकायुक्त विधेयक मंजूर करून, लोकायुक्त नियुक्त करणे अनिवार्य करण्यात आले होते. परंतु सदर तरतुदींमध्ये तातडीने बदल करून, एक वर्षाची समय सीमा हटविण्यात

आली व लोकपाल व लोकायुक्त विधेयक कमकुवत करण्याचा कुटील डाव काँग्रेस आघाडी सरकारने साधला. लोकपाल व लोकायुक्त विधेयकाच्या मूळ हेतुलाच हरताळ फासला. अशा प्रकारे भाजपा व काँग्रेस सरकारने लोकपाल व लोकायुक्त विधेयक कमकुवत करण्याचाच प्रयत्न केला आहे.

**● नरेंद्र मोदी व गुजरातेतील लोकायुक्त**

मा. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना स्वच्छ, पारदर्शक व भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी राज्यात लोकायुक्त नियुक्त करण्याची वारंवार मागणी करण्यात आली. परंतु मोदी सरकारने त्यास सतत विरोध केला.

गुजरातमध्ये लोकायुक्त नियुक्तीसाठी मा. राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती नेमली. २०१० मध्ये समितीने गुजरातच्या लोकायुक्ताची नियुक्तीचा निर्णय घेतला. तेव्हा मुख्यमंत्री मोदी यांनी सदर नियुक्ती विरोधात गुजरात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मा. गुजरात न्यायालयाने मोदी सरकारच्या विरोधात निर्णय दिला. यानंतर मोदी सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपिल केले. सर्वोच्च न्यायालयानेही मोदी सरकारचे अपिल फेटाळले व गुजरात उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. अशा प्रकारे मागील दहा वर्षापासून गुजरातचे लोकायुक्त पद रिक्त राहिले. यावरून गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून मोदी यांची स्वच्छ व पारदर्शक भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचे विचार व आचारातील फरक जनतेच्या लक्षात येतो. मागील चार वर्षात सरकारने लोकपाल व लोकायुक्त विधेयकाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व विधेयक कमकुवत करण्याच्या दृष्टीने सरकारने घेतलेले निर्णय व भूमिका लक्षात घेता भाजपा सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उक्ती व कृतीतील प्रचंड विसंगती दिसून येते.

ज्या लोकपाल व लोकायुक्त आंदोलनाच्या निमित्ताने देशातील जनतेने प्रचंड जनआंदोलन केले होते. त्यामुळे काँग्रेस सरकारला आपली सत्ता गमवावी लागली. भाजपा सरकार सत्तेत येणायासाठी बळ मिळाले. हे वास्तव माहित असतानाही भाजपा सरकार लोकपाल नियुक्तीसाठी टाळाटाळ करत आहे.

**मोदी व भाजपा चा निवडणुकपूर्व जाहीरनामा व त्याचा भंग**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानाचे उमेदवार म्हणून निवडणुकपूर्व अनेक प्रचार सभेतून भाजपाच्या जाहीरनाम्याची उद्‌घोषणा केली. जनतेला जाहीर आश्वासने दिली.

- भ्रष्टाचारमुक्त भारत बनाने के लिए देश में लोकपाल और राज्य में लोकायुक्त का अंमल करेंगे।
- देश में मागरिकों की सनद पर अंमल होगा।
- विदेश में छुपाया हुआ कालाधन भाजपा सत्ता में आने के बाद ३० दिन में वापस आयेगा।
- किसानों के उपज को पैदावारी के मूल्य पर आधारीत ५० प्रतिशत लाभ देकर दाम मिलेगा।
- ६० साल के उम्रवाले किसानों को हर महा पाच हजार रुपये पेन्शन देंगे।
- महिलाओं को विकास एवं पूरी सुरक्षा और सम्मान मिलेगा।
- चुनाव प्रक्रिया में सुधार लायेंगे।
- भ्रष्टाचारमुक्त भारत बनायेंगे और देश में अच्छे दिन आयेंगे।

## सर्वोच्च न्यायालयाने लोकपाल नियुक्तीच्या अनुषंगाने तीन वेळा केंद्रसरकारला फटकारले व लोकपाल नियुक्तीचे निर्देश दिले परंतु सरकार निष्क्रीय ठरले.

मोदी सरकारने सत्तेत आल्यानंतर आपला जाहिरनामा हा जनसंसदेत दिलेला जाहीर वचननामा होता. तो पाळायला हवा होता. परंतु मोदी सरकारने भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालणाऱ्या लोकपालातील व माहिती अधिकार कायद्यातील तरतुदी हटवल्या. तसेच धनविधेयक २०१७ मध्ये संशोधन करून राजकीय पक्षांना उद्योगपती व भांडवलदाराकडून दिल्या जाणाऱ्या पक्षानिधीचा ७.५ टक्के असलेली मर्यादा हटविण्यात आली. यामुळे राजकीय पक्षांना कोणतीही कंपनी, उद्योगपती वाटेल तेवढे निधी देऊ शकते. अशा प्रकारच्या धोरणामुळे पार्टीतंत्र मजबूत होते व लोकतंत्र कमकुवत बनते. देशातील निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना कंपनी, उद्योगपती व देणगीदाराकडून देण्यात येणाऱ्या निवडणुक निधीची मर्यादा वीस हजारावरून दोन हजारापर्यंत कमी करण्याची शिफारस केली होती. सरकारने ती शिफारस फेटाळली व राजकीय पक्षांना कोट्यावधी रुपयाचा निवडणुक निधी गोळा करण्यासाठी रान मोकळे करून दिले. अशा प्रकारे देश व राज्यात सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला असताना मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर मा. अण्णा हजारे यांनी चार वर्षात पंतप्रधान व सरकारकडे ४५ वेळा

पत्रव्यवहार केला. परंतु सरकारने त्यास उत्तर दिले नाही. सर्वोच्च न्यायालयात लोकपाल नियुक्तीच्या प्रकरणी दाखल केलेल्या जनहीत याचीकेवर सर्वोच्च न्यायालयाने वारंवार लोकपाल तुरन्त नियुक्त करण्याच्या दृष्टीने फटकारले आहे. निर्देश दिले आहेत. तरी परंतु सरकार निष्ट्रिय ठरले, हलले नाही.

काँग्रेस असो की भाजपा सत्तेत आले की लोकतंत्राऐवजी पार्टीतंत्राकडे अधिक लक्ष देतात. लोकप्रतिनिधींना आपल्या मतदार व जनतेचा विसर पडतो. ते लोकप्रतिनिधी न राहता पक्षप्रतिनिधी बनतात हे सुदृढ लोकशाहीसाठी धोक्याचे आहे.

मा. अण्णा हजारे मोदी सरकारच्या विरोधात गप्प का अशी कुजबुज सुरू होते. आरोप होतात. परंतु मा. अण्णांनी सरकारला पन्नास वेळा पत्रव्यवहार करूनही दखल घेतली नाही.

मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर अण्णांनी वेळोवेळी सरकारला आपल्या जाहीरनाम्याची आठवण करून दिली. तसेच भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी केंद्रात लोकपाल व राज्यात लोकायुक्त नियुक्त करण्याच्रया मागणीबरोबरच संसदेत फार काळ प्रलंबीत असलेल्या खालील खालील विधेयक मंजूर करण्याची वारंवार विनंती केली.

- Citizens charter Bill also known as the Right of Citizens for time Bound Delivery of Goods and Services and Redressal of their Grievances Bill 2011.
- The Prevention of Bribery of foreign public officials and officials of public international organizations bill 2011.
- Judicial standards and accountability bill 2012.
- The prevention of money laundering (amendment) Bill.
- The Public Procurement Bill 2012.

भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी आवश्यक असलेले वरील सर्व प्रलंबीत विधेयकासोबतच राईट टू रिजेक्ट, राईट टू रिकॉल, ग्रामसभेला जास्तीचे अधिकार देणारा कायदा, शहर विकासासाठी ग्रामसभेसारखाच वार्डसभेला अधिकार देणारे सशक्त नगरराज विधेयक इ. कायदे बनवण्यात यावे अशी मागणीही अण्णांनी केली होती. याउलट सरकारने भूमी अधिग्रहण कायदा २०१३ व देशासाठी शहीद जवानांच्यासाठी व देशाच्या शूर सैनिकांसाठीचे विसंगत व अन्याय करणारे धोरण अवलंबीले.

**अण्णांचे भूमी अधिग्रहण कायद्याविरोधात दिल्लीत उपोषण**

देशातील शेतकऱ्यांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर भारत सरकारने १८९४ साली इंग्रज सरकारने बनविलेल्या भूमी अधिग्रहण कायदा बदलून भूमी अधिग्रहण कायदा २०१३ साली मा. मनमोहनसिंग सरकारने पारित केला. यातील काही तरतुदी शेतकरी हिताच्या होत्या. परंतु भाजपा सरकारने सदर कायद्यात बदल करण्याच्या हेतुने ३१ डिसेंबर, २०१४ रोजी अध्यादेश निर्गमीत केला. ज्यामुळे शेतकरी हिताला बाधा येणार होती. या शेतकरी हितविरोधी तरतुदीला देशभरातील शेतकऱ्यांनी व शेतकरी संघटनांनी विरोध केला. त्यामुळे सरकारने ३ एप्रिल २०१५ रोजी सरकारद्वारे नवीन अध्यादेश काढण्यात आला. परंतु नवीन अध्यादेशाद्वारे शेतकरीहिताच्या तरतुदी नव्हत्या. यासाठी देशभरातील शेतकरी व शेतकरी संघटनांनी मासुहिकपणे सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाच्या निषेधार्थ मोठ्या प्रमाणावर आंदोलन सुरू करण्यात आले. सदर कायद्यातील तरतुदीमुळे सरकारला कायद्याच्या नावाने एकलव्यापारी संस्था, भागीदारी संस्था, कंपनी, प्रमंडळ व कायद्याने स्थापन केलेल्या कोणत्याही संस्थेला जमीन अधिग्रहण करण्यास सोयीचे करण्यात आले. यामुळे देशातील हजारो शेतकऱ्यांची लाखो एकर जमीन संपादन करून शेतकऱ्यांना भूमीहीन बनवण्याचे सरकारचे धोरण धोरण असल्याचे स्पष्ट झाले.

शेतकरी विहित विरोधी असलेल्या भूमी अधिग्रहण कायद्यातील नवीन तरतुदीस विरोध करण्यासाठी व देशातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मा. अण्णा हजारे यांनी केंद्र सरकारला सदर शेतकरी विरोधी भूमीअधिग्रहण कायद्यातील तरतुदी रद्द करण्याची पत्राद्वारे मागणी केली. परंतु सरकारकडून प्रतिसाद मिळाला नाही. अखेर मा. अण्णांनी २३ व २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी जंतर मंतर येथे उपोषण केले. सर्व शेतकरी संघटनांनी साथ दिली.

शेतकऱ्यांच्या संमती शिवाय जमीन अधिग्रहण करणे बेकायदेशीर आहे. भूमीअधिग्रहण कायद्यातील या दुरुस्त्या लोकशाही विरोधी आहेत. हे इंग्लंड व अमेरिकेचे सरकार नाही. भारतीय लोकांनी निवडून दिलेले भारताचे सरकार आहे. त्यामुळे सरकारला तात्काळ शेतकरी विरोधी तरतुदी रद्द करण्याची मागणी केली. सदर उपोषणास नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांनी पाठींबा दिला. हरियाणाचे राजगोपाल पी. व्ही. गोविंदाचार्य, जलतज्ज्ञ राजेंद्रसिंह इत्यादींनी पाठींबा

दिला. काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी भूमीअधिग्रहण दुरुस्ती विधेयक लोकशाही विरोधी असून, कंपन्यांना खुश करण्याचे सरकारचे धोरण आहे. मा. अण्णा हजारे यांनी काँग्रेसने आणलेल्या भूमी अधिग्रहण विधेयकास पाठींबा दिला असल्याची आठवण करून दिली. अखेर सरकार नमले. भूमीअधिग्रहण विधेयकातील शेतकरी विरोधी असलेल्या तरतुदी रद्द करण्यात आल्या. मोदी सरकारच्या विरोधातील पहिले अण्णा उपोषण व आंदोलन यशस्वी झाले.

## शहीदाच्या विधवा पत्नी आणि सैनिकांसाठी वन रँक वन पेन्शन योजना कार्यान्वित करण्याच्या मागणीसाठी दिल्ली येथे आंदोलन

भारताची जगातील विकसनशील लोकशाही प्रधान देश म्हणून जी ओळख आहे. त्यात या देशातील शेतकरी, कामगार व जनता यांचा सिंहाचा वाटा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वाधिक विषमता निर्माण झाली आहे. ज्याच्या श्रमावर व त्यागावर हा बलशाली भारत उभा आहे ते शेतकरी, कामगार व सैनिक दुर्लक्षीत ठरले आहेत. देशाच्या सुरक्षेसाठी रेगिस्तान, हिमाचलप्रदेश, जल, जंगल व बर्फाच्या उंच टेकड्यावर न्युनतम तापमान व ४७ डिग्री तापमानात ही सीमेवर रात्रंदिवस लढणाऱ्या या जवान वेतन फारच कमी आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने आपले जीवन जगू शकत नाहीत. अनेक २० ते ३५ वर्षे वयाचे जवान शहीद होतात. त्यांच्या विधवा पत्नी व वृद्ध माता-पिता व कुटुंबाचे आर्थिक हाल होतात. दुसरीकडे संसदेत निवडून गेलेले प्रतिनिधी आमदार, खासदार पन्नास हजार ते एक लाख वेतन मिळते. वेतनासोबत रेल्वेचे प्रथम श्रेणी सुविधा, विमानाचे भाडे, निवास खर्च, आरोग्य सुविधा व इतर अनेक सुविधा मिळतात. त्यावर कोट्यावधी रुपये खर्च होतात. परंतु या देशाच्या सैनिकाला तुटपुंजी पेन्शन मिळते.

देशातील सैनिकांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वाढील पेन्शन देण्यात यावी. 'वन रॅक वन पेन्शन योजना' लागू करण्यात यावी या मागण्यासाठी जंतर मंतर, दिल्ली येथे सेवानिवृत्त सैनिक संघटनांच्या वतीने धरणे आंदोलन चालू होते. भाजपाने निवडणूक काळात देशातील सैनिकांना 'वन रॅक वन पेन्शन' देण्याची घोषणा नरेंद्र मोदीजीने केली होती. भाजपाच्या जाहीरनाम्यातही याचे आश्वासन दिले होते. परंतु ते सरकारने पाळले नाही. त्यामुळे नैराश्यग्रस्त माजी सुभेदार रामकीशन यांनी जंतरमंतर येथेच आत्महत्या केली. सुसाईड नोटमध्ये, ''माझ्या मातृभूमीसाठी

व देशाचे रक्षण करणाऱ्या शूर सैनिकंसाठी मी माझे जीवन समर्पीत करत आहे. सरकारने सैनिकांच्या मागण्या मान्य करावे.'' असे लिहून आत्महत्या केली. हे देशाच्या दृष्टीने अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे.

२६ फेब्रुवारी, २०१४ रोजी भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाच्या माजी सैनिक कल्याण विभागाच्यावतीने संरक्षण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत 'वन रॅक वन पेन्शन' संबंधाने निर्णय घेण्यात आला. वित्तमंत्रालयाकडून आर्थिक तरतूद करण्यासाठीचा निर्णय घेण्यात आला. परंतु पुढे अंमल झाला नाही. 'वन रॅक वन पेन्शन'च्या मुद्यावर काही व्यक्तींनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने १६ फेब्रुवारी २०१५ रोजी सरकारला निर्देश दिले होते की, तीन महिन्याच्या आत 'वन रॅक वन पेन्शन' योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात यावा. यानंतर जास्तीचा वेळ दिला जाणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचाही आदर व पालन सरकारने केले नाही.

**जय जवान जय किसान आंदोलन**

देशाच्या संरक्षणासाठी लढणारा जवान व सर्व जनतेचा पोशिंदा असलेला अन्नदाता किसान यांचे प्रश्न सोडवणे ही आमची नैतिक व संवैधानिक जबाबदारी आहे. देशातील सैनिकांसाठी 'वन रॅक वन पेन्शन' योजना त्वरित लागू करावी. अन्यथा देशव्यापी आंदोलन उभे करू, दिल्ली येथे उपोषण करण्याचा इशारा मा. अण्णांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे दिला. लोकसभा निवडणुकीत देशातील सैनिकांसाठी 'वन रॅक वन पेन्शन' योजना लागू करण्याचे आश्वासन मा. मोदी यांनी दिले होते याची आठवणही अण्णांनी करून दिली.

'वन रॅक वन पेन्शन' योजना सैनिकांसाठी लागू करावी यासाठी दिल्लीहून कर्नल नैन व ब्रिगेडियर करतार सिंह यांनी राळेगणसिद्धी येथे मा. अण्णांची भेट घेऊन प्रदीर्घ चर्चा केली. कर्नल दिनेश नैन यांनी मा. अण्णांच्या वतीने वेळोवेळी सैनिकांच्या या आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला. भाजपाचे भूतपूर्व नेते प्रसिद्ध विधितज्ज्ञ राम जेठमलानी, कर्नल देवेंद्र सहरावत, दिपक भांडर, विठ्ठल देव यांनी ही प्रयत्न केले.

२६ जुलै शहीद दिनाचे औचित्य साधून देशातील जवानांनी दिल्ली येथे जंतर मंतरवर आंदोलन केले. सदर आंदोलनात मा. अण्णा हजारे यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. सरकारने जवानांना 'एक पद एक पेन्शन' योजना त्वरित लागू करण्याची

विनंती केल. या देशातील खासदारांना एकदा निवडून आले की, जन्मभर मोठी पेन्शन मिळते. विमानाचे प्रवासभाडे मिळते. रेल्वेचे वर्ग एकचे भाडे मिळते. बंगला, गाडी, दवाखाना व इतर अनेक सुविधा मिळतात. परंतु देशातील सैनिकांना, युद्धामध्ये वीरमरण आलेल्या सैनिकांच्या विधवा पत्नींना मात्र केवळ चार ते पाच हजार रुपये पेन्शन मिळते. हे या लोकशाही सरकारचे व देशाचे दुर्भाग्य आहे. भूतपूर्व पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांनी 'जय जवान जय किसान'चा नारा दिला होता. ज्या देशात जवान व किसानांना न्याय मिळत नाही. तर याला स्वातंत्र्य म्हणायचे काय? असा सवाल मा. अण्णांनी सरकारला केला. सरकारने येत्या दोन महिन्यात 'वन रॅंक वन पेन्शन' योजना लागू करावी व सैनिकांच्या इतर मागण्या मंजूर कराव्या अन्यथा २ ऑक्टोबर रोजी देशव्यापी आंदोलन करण्याचा इशारा मा. अण्णांनी सरकारला दिला.

यावेळी मा. अण्णा हजारे यांच्या हस्ते शहीद सैनिकांच्या माता व वीर पत्नीचा शहीद दिनाचे औचित्य साधून सत्कार करून सन्मान करण्यात आला.

जय किसान आंदोलनाला पाठींबा देण्याची विनंती अण्णांचे एकेकाळचे सहकारी प्रशांत भूषण यांनी अण्णांची भेट घेऊन केली होती. तत्पूर्वी एक दिवस आदि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल व उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी अण्णांची भेट घेऊन सदर प्रश्नावर चर्चा केली होती.

**अण्णांना जीवे मारण्याची धमकीज्ञ !**

दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे संबंध तोडा, अन्यथा आपला जीव घेऊ अशी धमकी देणारे निनावी पत्र अण्णांना आले होते. मा. अण्णांना वेळोवेळी अशा धमक्या देणारे पत्र आली. परंतु अण्णांनी अशा धमक्यांना भीक घातली नाही. ते निर्भयपणे देश हितासाठी जे जे योग्य आहे ते ते करत राहीले. याउलट वेळोवेळी मा. अण्णांनी मला झेड सुरक्षा देऊ नका, अशी विनंती सरकारला पत्राद्वारे केली.

भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयातर्फे 'वन रॅंक वन पेन्शन' ही मागणी मंजूर करण्यात आली. ज्यामुळे चाळीस वर्षाच्या प्रदीर्घ विलंबानंतर देशातील २६ लाख सैनिकांना सहा लाख शहीद सैनिकांच्या वीर पत्नींना याचा फायदा मिळाला आहे. यामध्ये काही त्रुटी होत्या त्या १७ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या सरकारच्या सुधारीत आदेशाद्वारे झालेल्या चूका सुधारण्यात आल्या आहेत.

''अण्णा हजारे यांनी वेळोवेळी जी आंदोलने आणि उपोषणे केली आहेत त्यासाठी निवडलेले विषय – प्रश्न हे व्यापक समाजहिताचे होते. तेव्हा त्यांच्या आंदोलनाकडे पक्षीय भूमिकेतून पाहणे योग्य नाही. त्यांच्या आंदोलनाला मिळणाऱ्या पाठींब्यावर त्यांच्या आंदोलनाचे, उपोषणाचे महत्व जसे वाढत नाही तसे ते कमीही होत नाही. अण्णा हे कोणत्याही राजकीय पक्ष संघटनांसाठी काम करणारी व्यक्ती नसून व्यापक समाज आणि राष्ट्रहिताला केंद्रस्थानी ठेवून आपले आयुष्य त्यासाठी समर्पित व्हावे या भावनेतून ते आजपर्यंत कार्यरत राहीले आहेत. हे लक्षात घेऊन त्यांच्या आंदोलनाकडे पाहिले पाहिजे.''

**राष्ट्रीय कार्यकर्ता शिबीर**

भ्रष्टाचारमुक्त भारत हेच आपले अंतिम उद्दिष्ट असून, त्यासाठी पुन्हा आंदोलनाची गरज असल्याचे प्रतिपादन अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी येथे आयोजित राष्ट्रीय कार्यकर्ता शिबीरात बोलताना केले. सदर शिबीरात ज्येष्ठ सर्वोदयी नेते अमरनाथभाई (वाराणसी), कर्नल दिनेश नैन, मनिंद्र जैन (दिल्ली) तसेच राजस्थान, गुजरात, पंजाब, उत्तराखंड, अरूणाचल प्रदेश, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, हरियाणा, मध्यप्रदेश, दिल्ली इ. राज्यातून प्रमुख कार्यकर्ते आले होते. कार्यकर्त्यांना भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासाचे सचिव अशोक सब्बन, उपाध्यक्ष प्रा. बालाजी कोंपलवार, कोषाध्यक्ष ॲड्. श्याम असावा, इंजि. नामदेवराव घुले यांनी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ सर्वोदयी नेते अमरनाथभाई म्हणाले, ''जेव्हा सज्जन माणसे मौन धारण करतात तेव्हा देशात भ्रष्टारात वाढ होते. विविध सरकारांनी जनतेला झोपवले आहे. तेव्हा मौन धारण केलेल्या व झोपलेल्या जनतेला व नेत्यांना जागे जागे करण्याचे काम अण्णांना करावे लागत आहे.''

**मोदी सरकारशी अण्णांचा ४५ वेळा पत्रव्यवहार, उत्तर नाही व कार्यवाही नाही...**

मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकार सत्तेत आल्यानंतर अण्णांनी देशात लोकपाल व राज्यात लोकायुक्ताचा अंमल करण्यात यावा. तसेच शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य कराव्या व निवडणूक विषयक सुधारणा करण्यात याव्या व इतर मागण्याबाबत चार वर्षात ४५ वेळा पत्रव्यवहार केला. परंतु दुर्दैवाने पंतप्रधान व त्यांच्या सरकारच्या कार्यालयाकडून एखादा अपवाद वगळता अण्णांना कोणतेही साधे

उत्तर आले नाही. याउलट मोदी सरकारने लोकपाल विधेयकातील कलम ४४ मध्ये शासकीय कर्मचारी व अधिकारी हिताचे संशोधन करून तीन दिवसांत मंजूर करून घेतले. लोकपाल विधेयक कमकुवत बनवले. देशात लोकपाल विधेयकाची अंमलबजावणी करावी यासाठी प्रसिद्ध व ज्येष्ठ विधितज्ज्ञ प्रशांत भूषण व इतरांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या सार्वजनिक याचिकेच्या सुनावणी दरम्यान मा. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला अनेकवेळा लोकपालचा अंमल करण्यासाठी निर्देश दिले व फटकारले आहे. तरी परंतु सरकारने दखल घेतली नाही. म्हणून मा. अण्णांनी २३ मार्च, २०१८ रोजी दिल्ली येथे रामलीला मैदानावर जन आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.

**पुन्हा एकदा रामलीला मैदानावर उपोषणाचा अण्णांचा निर्धार**

भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी सशक्त लोकपालची गरज आहे. यासाठी मा. अण्णा हजारे यांनी अनेक राज्यात दौरा केला. पाटणा येथील सभेत बोलताना अण्णा म्हणाले, ''काँग्रेस सरकारने लोकपाल विधेयकास कमजोर केले. तसेच भाजपा सरकारनेही कलम ४४ मध्ये बदल करून लोकपालास अधिक कमजोर केले. भाजपा सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्याबाबत जाहीरनाम्याद्वारे जनतेला आश्वासन दिले. परंतु मागील चार वर्षात सरकारने आश्वासनभंग केला आहे. केंद्रात लोकपाल व राज्यात लोकायुक्ताचा अंमल करावा व शेतकऱ्याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारीत ५० टक्के ज्यादा लाभ देऊन भाव देण्यात यावा. तसेच ६० वर्ष वयावरील शेतकरी व शेतमजुरांना पेन्शन द्यावी. निवडणूक विषयक सुधारणा करण्यात याव्या या व इतर मागण्यांसाठी २३ मार्च, २०१८ पासून रामलीला मैदानावर उपोषण करण्याचा निर्धार व्यक्त केला.'' आंदोलनाची तयारी म्हणून मा. अण्णांनी १२ राज्यात ३७ जाहीर सभा घेऊन जनतेला जागवण्याचा प्रयत्न केला. राळेगणसिद्धी ग्रामसभेने ''दिल्लीत नियोजित आंदोलनात अण्णांनी उपोषण करू नये'' अशी विनंती करणारा निर्णय घेतला. परंतु अण्णांनी तो अमान्य करून ''आपला उपोषण करण्याचा निर्णय ठाम असल्याचे सांगितले.''

आंदोलनाच्या तयारीसाठी अण्णांनी दिल्लीत दोन दिवस बैठका घेतल्या. त्यानंतर बिहारमध्ये सभा झाल्या. २१ मार्च २०१८ रोजी अण्णा दिल्लीत आंदोलनासाठी रवाना झाले. दिल्लीत देशभरातून आलेल्या २८ शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी अण्णांची

भेट घेतली. त्यांनी आंदोलनास सक्रीय पाठींबा दिला. दिल्लीत व राळेगण येथे नियोजन समितीचीही बैठक घेण्यात आली. यावेळी अण्णा आंदोलनाविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना म्हणाले, ''आंदोलनाशिवाय आता पर्याय नाही.''

**आंदोलनात गर्दी नको दर्दी हवे !**

दिल्ली येथील आंदोलनाला गर्दी जमवीणे हा आपला उद्देश नाही. लोकांना आणि मिडियाने पूर्वीच्या आंदोलनांशी तुलना केली तर करू द्या, आपण तो विचार करायचा नाही. पूर्वी मी एकटाच होतो. आताही एकटाच समजतो. त्यामुळे कोणीही आले नाही, तरीही आपण एकटेच उपोषण सुरू करणार आहोत. गर्दी जमवून आपल्याला कोणत्या निवडणुका लढवायच्या नाहीत. कोणत्याही संघटनांचा नेता व्हायचे नाही. त्यामुळे आंदोलनात सहभागी होणाऱ्या संघटनांनीही याची चिंता करू नये. हे आंदोलन भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी केंद्रात लोकपाल व राज्यात लोकायुक्ताच्या अंमलबजावणीसाठी व शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आहे. त्यामध्ये शक्ति प्रदर्शन करण्याची गरज नाही. त्यामुळे आपण गर्दीची चिंता करीत नाही. आंदोलनात गर्दीची नव्हे तर दर्दीची गरज आहे.''

**● देशातील १३१ कोटी जनतेच्या लाभाचे निर्णय प्रलंबीत !**

लोकपाल विधेयकाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला वेळ नाही. परंतु भारतीय जनता पक्ष व काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षांना निवडणुकीसाठी मिळणाऱ्या विदेशी निधीसाठी सूट देणारे विधेयक लोकसभेत कोणतीही चर्चा न करता मंजूर करून घेता येते. या विधेयकाच्या मंजुरीमुळे राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी मिळणाऱ्या विदेशी निधीसाठी आता कोणत्याही अंकेक्षण किंवा परिक्षणाची गरज नाही. अशी विशेष तरतूद करण्यात आली आहे. या विधेयकामुळे काँग्रेस व भाजपासहित इतर राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी विदेशी धन मिळविण्यासाठी फायदा होणार आहे. वित्त विधेयक २०१८ लोकसभेत २१ संशोधनांसह मंजूर झाले. यातील एक संशोधन विदेशातून येणाऱ्या निवडणूक निधीसाठी विदेशी चंदा नियमन कायदा २०१८ (एफसीआरए)साठी होते. जे विदेशी कंपन्यांकडून राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी चंदा देण्यास बंदी होती ते रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे देश व विदेशी कंपन्यांकडून कितीही निवडणूक निधी गोळा करण्यासाठी राजकीय पक्षास रान मोकळे झाले असून त्याची कोणतीही चौकशीची गरज असणार नाही. सदर

कायद्यात मागे संशोधन केले होते. त्यावर २०१४ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने एफसीआरए कायद्याचे उल्लंघन केल्याचा दोष काँग्रेस व भाजपावर ठेवला होता हे विशेष. सर्व राजकीय पक्षांच्या सोयीसाठीचे व लाभाचे निर्णय त्वरित कोणतीही चर्चा न होता, मंजूर होऊ शकतात. परंतु देशातील १३१ कोटी जनतेच्या लाभाचे निर्णय मात्र वर्षानुवर्ष प्रलंबीत ठेवले जातात याबद्दल मा. अण्णांनी खंत व्यक्त केली.

**● पुन्हा रामलीला मैदानावर अण्णांचे 'जन आंदोलन सत्याग्रह'**

केंद्रात लोकपाल व राज्यात सशक्त लोकायुक्ताचा अंमल करावा व शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या मंजूर करणे व निवडणूक विषयक सुधारणा करण्यात याव्या या व इतर प्रमुख मागण्यांच्या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मागील तीन वर्षात अनेक वेळा पत्रव्यवहार केला परंतु कोणतीही कार्यवाही सरकारने केली नाही. त्यामुळे येत्या २३ मार्च, २०१८ रोजी दिल्ली येथे पुन्हा शेतकरी व लोकपालसाठी सत्याग्रह आंदोलन करण्याचा निर्णय पाटणा बिहार येथील जाहीर सभेत मा. अण्णांनी जाहीर केला.

**● पंतप्रधान मोदीकडून कौतुक !**

भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर चार वर्षात मा. अण्णांच्या पत्राला उत्तरे न देणाऱ्या सरकारने तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी त्यांच्या कामाचे कौतुक केले. तसेच राळेगणसिद्धीचे ग्राम विकासाचे कार्य 'आदर्श गाव मॉडेल' देशभर पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा अशा सूचना भारतीय जनता पक्षाच्या आमदार व खासदारांना व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिल्या. अण्णांचे व अण्णांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले.

**● भाजपचे प्रयत्न अयशस्वी**

पूर्वी अण्णांनी आंदोलन करू नये म्हणून भाजपने बरेच प्रयत्न केले. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी अण्णांची भेट घेऊन त्यांचं मन वळविण्याचा प्रयत्न केला होता. केंद्रीय कृषीराज्यमंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनीही काल रात्री अण्णांसोबत महाराष्ट्र सदनात चर्चा केली. परंतु काहीही तोडगा निघाला नाही. अन्य आयोगाचे अध्यक्ष अरूण देशपांडे व सदस्य ॲड्. महेश ढवळे यांनीही अण्णांशी वेळोवेळी चर्चा केली व आंदोलन न करण्याची विनंती केली.

**● २३ मार्च, २०१८ रामलीला मैदानावर अण्णांचे उपोषण सुरू**

रामलीला मैदानावर शहीद दिवसाचे औचित्य साधून मा. अण्णा हजारे यांनी दिल्ली येथे राजघाट येथे जाऊन महात्मा गांधीजींच्या समाधीचे दर्शन घेतले. अण्णा शहीद पार्कला पोहोचले व शहीदांना आदरांजली अर्पण केली. त्यावेळी त्यांचे सोबत हरियाणाचे माजी न्यायाधीश प्रीतमपाल व ज्येष्ठ गांधीवादी नेते अमरनाथभाई उपस्थित होते. 'भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास' जनआंदोलन सत्याग्रह असे बॅनर असलेल्या भव्य स्टेजवर मा. अण्णा आले. भारत माता की जय, वंदे मातरम्, इन्कलाब जिंदाबादच्या घोषणा दिल्या. कार्यकर्त्यांत अण्णांच्या आगमनामुळे चैतन्य संचारले. ऐतिहासिक रामलीला मैदानावर देशातील विविध राज्यातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मा. अण्णांचे उपोषण सुरू झाले.

सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि कर्नाटकाचे माजी लोकायुक्त एन. संतोष हेगडे रामलीला मैदानावर पोहोचले. उपस्थितांशी संवाद साधताना अण्णा म्हणाले सरकारला ४२ वेळा पत्र लिहिले पण दखल घेतली नाही. काहीही कारवाई केली नाही. सरकारला खासदाराचे वेतनवाढ करण्याची गरज नाही. शेतकऱ्यांना हमी भाव देण्यात यावा आणि जनलोकपाल व लोकायुक्ताची अंमलबजावणी करावी. आंदोलनासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांची बस व वाहने पोलीसांकडून रोकण्यात आली. काही कार्यकर्त्यांना दमदाटी व मारहाण करण्यात आली. बस व रेल्वे गाड्या रद्द केल्या. सरकार शेतकऱ्यांना भडकावत आहे. शेतकऱ्यांनी हिंसा करावी असा सरकारचा हेतू असल्याचा आरोप अण्णांनी केला.

**● २४ मार्च, २०१८**

जनआंदोलन सत्याग्रहाच्या दुसऱ्या दिवशी आंदोलन स्थळी असलेल्या कार्यकर्त्यांची खूप मोठी अडचण झाली. कार्यकर्त्यांना फ्रेश होण्यासाठी बाथरूम, शौचालय, पाणी या प्राथमिक सुविधा नव्हत्या. त्यामुळे हजारो कार्यकर्ते अडचणीत आले. स्थानिक व्यवस्थापनाने या सुविधांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. मैदानाच्या एका बाजूस पातळ कापडी पडद्याचे आडोशे उभारून, जमीनीवर खड्डे खोदून टॉयलेट व शौचलय बनविले होते. विशेषता राज्यस्थान, पंजाब, हरियाणा, छत्तीसगड, उत्तरप्रदेश व बिहार येथून महिला आलेल्या ग्रामीण महिलांची फार मोठी गैरसोय झाली. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना व महिलांना आंदोलन सोडून जावे लागले.

उपस्थित कार्यकर्त्यांना अण्णा हजारे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले, ''केंद्र सरकारकडे मागण्याबाबत सकारात्मक चर्चा सुरू असून आंदोलन थांबविण्याची विनंती करण्यात आली. केवळ आश्वासनाने भागणार नाही तर त्वरित निर्णय घेण्यात यावा. अन्यथा आंदोलन मागण्या मान्य होईपर्यंत सुरूच राहील.'' असा इशारा दिला.

महाराष्ट्रातील कर्जाला कंटाळून शेतकरी धर्मा पाटील यांनी मुंबई येथे राज्य सचिवालयात विष घेऊन आत्महत्या केली होती. सरकारने त्यांच्या कुटुंबियांना न्याय दिला नाही. म्हणून मयत शेतकऱ्यांचा मुलगा नरेंद्र पाटील यांनी माझ्या वडीलांवर आत्महत्या करण्याची वेळ आली, ती इतर शेतकऱ्यांवर येऊ नये म्हणून मी अण्णांच्या आंदोलनात सहभागी असल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील दहा महिलांनी दिल्ली येथे आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला. अण्णांच्या आंदोलनाला पाठींबा दिला व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचे पुनर्वसन करण्याची मागणी केली.

**● २५ मार्च, २०१८**

आंदोलनाच्या तीसऱ्या दिवशी कार्यकर्त्यांची संख्या थोडी रोडावली तरी उपस्थितीत कार्यकर्त्यांत उत्साह होता. काही कार्यकर्ते जात होते. तर नवीन कार्यकर्ते येतही होते. पंजाब येथील किसान संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनात उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांसाठी लंगर सुरू करून नाष्टा, चहा व भोजनाची सुंदर व्यवस्था केली होती. तिसऱ्या दिवशी रामलीला मैदानावर अण्णांसोबत उपोषणाला बसणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या २२७ होती त्यात ५६ कार्यकर्त्यांची वाढ झाली. एकूण २८३ कार्यकर्ते आमरण उपोषणाला बसले. यातील काही कार्यकर्त्यांची प्रकृती बिघडलेली होती. वजनही घटत होते.

**मुंबईच्या डबेवाल्यांचा पाठींबा**

जनलोकपालासह अकरा मागण्यांसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिल्लीतील रामलीला मैदानावर सुरू केलेल्या आंदोलनाला मुंबईच्या डबेवाल्यांनी जाहीर पाठींबा दिला. डबेवाल्यांच्या संघटनेचे नेते सुभाष तळेकर यांनी सरकारला, ''अण्णांचे वय व कार्य पाहून सरकारने अण्णांनी मागणी केलेल्या जनहिताच्या मागण्या मान्य कराव्यात व अण्णांचा जीव वाचवावा अशी विनंती केली.'' मुंबईच्या डबेवाल्यांनी २०११ साली झालेल्या ऐतिहासिक आंदोलनालाही पाठींबा दिला होता.

**● २६ मार्च, २०१८ चौथा दिवस**

रामलीला मैदानावरील भव्य मंडपात १६ राज्यातून आलेले शेतकरी व कार्यकर्ते बसले होते. यात शेतकरी व महिलांची संख्या लक्षणीय होती. मंडपात चारही बाजूने विविध शेतकरी संघटना व आंदोलनात सहभागी असलेल्या संघटनांचे बॅनर लावलेले होते. काही युवक, कार्यकर्ते तीरंगा झेंडा खांद्यावर घेऊन वातावरणात फडकवीत होते. काही कार्यकर्ते विविध घोषणांचे बोर्ड व तक्ते हातात घेऊन फिरत होते. स्टेजच्या बाजूला म. गांधीजींची वेशभूषा केलेला एक उंचपुरी व्यक्ती गांधीजींची प्रतिमा गळ्यात बांधून तिरंगा झेंडा हातात घेऊन फडकावत होता. जसे अनेक आंदोलनात खुद्द म. गांधी करत असत. देशाची नीती व धोरणे ठरवताना समाजातील अशा शेवटच्या माणसाचा विचार झाला पाहिजे असे नेहमीच म. गांधींना वाटत असे. परंतु आजचे सरकार मात्र अशा सामान्य शेतकरी, मजुरांचे आवाज ऐकायला तयार आहे असे वाटत नाही. मागील आंदोलनात असलेली ऐतिहासिक गर्दी नवहती. त्यामुळे सरकार या अहिंसक आंदोलनाची कशी दखल घेईल याची शाश्वती नव्हती. मा. अण्णा सोबतच्या बाजूच्या स्वतंत्र स्टेजवर आमरण उपोषण करणाऱ्यांची संख्या २८३ वर पोहोचली होती.

अण्णा हजारे यांचे वजन चार किलोने घटले होते. अण्णा हे तपस्वी आहेत. एक साधक आहेत. चौथ्या दिवशीही त्यांच्या चेहऱ्यावर तेज होते. ते कार्यकर्त्यांना अधूनमधून तिरंगा हाती घेऊन फडकावत उत्साह वाढवत होते. 'इन्कलाब जिंदाबाद, भारत माता की जय'च्या घोषणा देत कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा वाढवत होते.

अण्णांनी पत्रकार परिषदेत सांगितले मागील चार वर्षे विद्यमान मोदी सरकारला वेळ दिला. भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली आश्वासनाची पूर्ती करणे सरकारचे कर्तव्य आहे. परंतु सरकारने भाजपा प्रणित राज्यात देखील लोकायुक्ताची नियुक्ती केली नाही. याचे उत्तर सरकारला द्यावेच लागेल.

उपोषणस्थळी देशभक्तीपर गीते सादर केली जात होती. रामलीला मैदान रामनामाच्या भजनांनी दुमदुमत होते. ''दिल दिया है जान भी देंगे ऐ वतन तेरे लिए'' या गीताचे शब्द घुमत होते. या देशभक्तीपर गीतावर उत्साही कार्यकर्ते तिरंगा फडकावत होते. तिरंगा कलरच्या साड्या परिधान केलेल्या व तिरंगा झेंडा हाती घेऊन उत्तर प्रदेश ग्रामीण व आदिवाशी भागातून आलेल्या महिला मंडपातून फीरत कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवत होत्या.

२६ मार्च रोजी रात्री ८-३० वाजता भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे सचिव अशोक सब्बन व उपाध्यक्ष प्रा. बालाजी कोंपलवार व अण्णांच्या समन्वय समितीचे सदस्य राष्ट्रीय किसान मजदूर महासंघाचे शिवकुमार कक्काजी, दशरथभाई, अमरनाथभाई, कर्नल दिनेश नैन, मनिंद्र जैन, विक्रम तपरवाडा, पंकजनाथ कल्की, शिवाजी खेडकर, कल्पना इनामदार, १६ राज्यातून आलेल्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. २९ मार्च रोजी दहा हजार शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित राहतील याचे नियोजन करण्यात आले.

**● अन्नदात्याच्या अन्न-त्यागाची किंमत सत्ताधिशांना कळेल का?**

अण्णा वेळोवेळी कार्यकर्त्यांशी हितगुज करत होते. जर सरकार शेतकऱ्यांच्या मागण्यांना गंभीरपणे घेत नसेल तर देशातील जनताही सरकारला गंभीरपणे घेणार नाही. जे सरकार देशाचा पोशिंदा, अन्नदात्याचा अन्नत्यागाची किंमत करणार नसेल, तर सरकारला सत्तेत राहण्याचा नैतिक अधिकार नाही. गर्दी पाहू नका, अण्णा हजारे यांनी केलेल्या देश हिताच्या मागण्या महत्त्वाच्या आहेत. असे मत अनेक तज्ज्ञ व प्रसार माध्यमाने केले.

**● २६ मार्च, सोमवार**

सोमवारी महाराष्ट्राचे जलसंपदामंत्री मा. गिरीश महाजन यांनी अण्णांची भेट घेतली व प्रकृतिची चौकशी केली. तसेच मा. अण्णांनी केलेल्या मागण्या मोदी सरकार मंजूर करावयास तयार असल्याचे सांगितले. आता चर्चा नको ठोस निर्णय हवा असल्याचे मंत्री महोदयांना सुचविले. जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत उपोषणावर ठाम असल्याचे सांगितले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केंद्र सरकारशी चर्चा करत असून दिल्लीत येणार असल्याचा निरोपही अण्णांना देण्यात आला.

**● २७ मार्च, २०१८ मंगळवार**

आंदोलनाच्या पाचव्या दिवशी प्रसारमाध्यमांशी बोलताना मा. अण्णा म्हणाले, सरकारशी आमची चर्चा चालू आहे. परंतु चर्चेअंती अजूनही ठोस असा निर्णय सरकारने दिलेला नाही. आम्ही सरकारला विविध मागण्यांबाबत निश्चित कालावधीत निर्णय घेण्याची मागणी करत आहोत. चार वर्षाचा कालावधी देऊनही सरकारकडून कोणताही कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे सरकारने लेखी आश्वासन दिल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही. आंदोलनाच्या पाचव्या दिवशी अण्णांचे वजन ५.५ किलोनी घटले होते.

**● २८ मार्च, २०१८ बुधवार**

मा. अण्णा हजारे यांच्या उपोषणाचा सहावा दिवस उजाडला. अण्णांना थोडा अशक्तपणा जाणवत होता. वजन पाच किलोने घटले होते. भाजपाचे महाराष्ट्रातील खासदार नाना पाटोळे जे नुकतेच काँग्रेसमध्ये सहभागी झाले होते. ते रामलीला मैदान येथे येऊन अण्णांची भेट घेतली व आंदोलनास पाठींबा जाहीर केला.

ना. गिरीश महाजन प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले, ''मा. अण्णांनी मुख्य ११ मागण्या मान्य करण्याची सूचना केली आहे. मोदी सरकारने ७ ते ८ मागण्या तत्वत: मान्य केल्याचे सांगितले. त्यासाठी एक लेखी प्रस्ताव अण्णांकडे आम्ही सादर करू.''

**● २९ मार्च, २०१८, गुरुवार**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व केंद्रीय कृषी राज्यमंत्री गजेंद्र सिंह शेखावत व ना. गिरीश महाजन यांचे प्रमुख उपस्थितीत अण्णांनी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऊसाचा रस घेऊन आपले सात दिवसाचे अनिश्चित कालीन उपोषण मागे घेतले. अण्णांसोबत उपोषणाला बसलेल्या २८३ कार्यकर्त्यांनीही उपोषण सोडले. २०११ च्या ऐतिहासिक आंदोलनातही महाराष्ट्राचे तात्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी मध्यस्थी करून महत्वाची भूमिका बावली होती.

यावेळी मा. अण्णा हजारे प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले, ''केंद्रात लोकपालाची नियुक्ती, राज्यात लोकायुक्ताची नियुक्ती, घटनात्मक दर्जा असलेल्या स्वतंत्र केंद्रीय कृषिमूल्य आयोगाची स्थापना, स्वामीनाथन आयोगानुसार शेतकऱ्याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारीत ५० टक्के ज्यादा नफा देऊन भाव देणे. ६० वर्षावरील सर्व शेतकरी व शेतमजुरांना प्रति महिना पाच हजार रुपये पेन्शन देणे व कृषि विम्याचे निकष बदलणे, बँकांद्वारे पीक कर्जावर आकारण्यात येणारे चक्रवाढ व्याज रद्द करणे. निवडणूक विषयक सुधारणा आदि मागण्यांचे लेखी आश्वासन केंद्र सरकार तर्फे पंतप्रधान कार्यालयाच्या वतीने राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या सहीचे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याची माहिती अण्णांनी दिली. रामलीला मैदानावरील सात दिवस चाललेले अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन स्थगीत करण्यात आले. केंद्र सरकारला वरील मागण्यांबाबत निर्णय घेण्यासाठी तीन महिन्याचा वेळ दिला. तीन महिन्याच्या आत सरकारने निर्णय न घेतल्यास पुन्हा रामलीला

मैदानावर जनआंदोलन करण्याचा इशारा अण्णांनी सरकारला दिला.''

मा. अण्णा हजारे यांनी सात दिवस केलेले आपले आमरण उपोषण सोडले. अण्णांचे उपोषण संपले. आंदोलन स्थगीत करण्यात आले. केंद्र सरकारने सुटकेचा श्वास सोडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेवर केंद्र सरकारने अण्णा आंदोलनाची जबाबदारी सोपवली. मा. अण्णांच्या आंदोलनाच्या प्रारंभापासूनच महाराष्ट्राचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन राळेगणसिद्धी व अण्णांच्या सतत संपर्कात होते. सुसंवाद चालू होता. मा. गिरीश महाजन यांनी महत्वाची भूमिका बजावली. तसेच महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष मा. अरूण देशपांडे हे ही केंद्र सरकारच्यावतीने विशेषत: भाजपा अध्यक्ष अमित शहा यांच्यावतीने राळेगणला भेट दिली. अण्णांशी सुसंवाद चालू ठेवला.

जनआंदोलनात यावेळी अण्णांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यास व्यासपीठावर येण्याची मनाई केली होती. त्यामुळे सर्वच पक्षासाठी मा. अण्णांच्या प्रयत्नाने देशात आलेला माहिती अधिकाराचा कायदा जसा अडचणीचा ठरला. त्यामुळे सर्व पक्षांनी मिळून सर्व राजकीय पक्षांना माहिती अधिकाराच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्याचा कायदा केला. तसेच भविष्यात लोकपाल व लोकायुक्त अडचणीचाच असल्याने लोकपालाच्या अंमलबजावणीची घाई सत्ताधारी पक्षासह अन्य विरोधकांनाही नव्हती. हे वास्तव आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांसह, विरोधी पक्षांनीही या आंदोलनाकडे पाठ फिरवली. मागील अण्णा आंदोलनातून देशपातळीवर प्रसिद्ध पावलेले चेहरे सत्ताधीश बनून सत्तेची मलई खाण्यात व्यस्त होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर इतर शेतकरी संघटनांनीही स्वतंत्र राज्य व देशपातळीवर आंदोलने सुरूच ठेवली होती. मा. अण्णा हजारे यांच्या आंदोलनात मागील आंदोलनासारखी गर्दी नव्हती. प्रसार माध्यमांद्वारे चर्चा होत होती. परंतु सत्य हे आहे की, यावेळी सरकारने आंदोलनासाठी शेवटपर्यंत जागेची परवानगी देण्यासाठी विलंब केला. दिल्लीत येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बसेस व गाड्या आडवल्या. अनेक कार्यकर्त्यांना मारहाण केली. दडपशाही केली. तर मागील ऐतिहासिक आंदोलनात शंभराहून अधिक वृत्तवाहिन्यांनी थेट प्रक्षेपण करून राष्ट्रीय माध्यमाने सर्व शक्ती पणाला लावली होती. ७०० ते ८०० तास थेट प्रक्षेपण केले होते. ज्यामुळे भ्रष्टाचार, बेकारी, दारिद्र्यामुळे आर्थिक दृष्ट्या कंबरडे मोडलेल्या सामान्य जनतेच्या मनातील असंतोषाला प्रगट करण्याची किमया

झाली. जनभावनेचा उद्रेक जनआंदोलनातून झाला होता हे वास्तव आहे. त्यामुळे प्रत्येक तरूण, महिला व नागरिकांनी मैं अण्णा हूँ! ची भूमिका घेऊन दिल्लीसह देशातील सर्व शहरात नागरीक जागृत होऊन क्रियाशील झाले होते.

रामलीला मैदानावरील पहिल्या दिवशी चांगली गर्दी व उत्साहाने कार्यकर्ते व नागरीक सहभागी झाले होते. परंतु जनआंदोलनाचे मागील आंदोलनासारखे सार्वत्रिकीकरण होऊ शकले नाही हे सत्य नाकारता येत नाही.

तसेच मागील ऐतिहासिक आंदोलनात केवळ लोकपाल व लोकायुक्त हा एकच प्रमुख विषय होता. परंतु मागील दहा वर्षात देशात पाच लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. देशाचा पोशिंदा असलेला शेतकरीच आत्महत्या करत आहे. त्याच शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणे हे राष्ट्रीय संकट असून ते देशासाठी लाजीरवाणी बाब असल्याचे मा. अण्णांनी वेळोवेळी सांगितले. लोकपाल सोबतच जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी व शेतमजुरांचे प्रश्न घेऊन यावेळी मा. अण्णांनी जनआंदोलन उभारले असतांनाही लोकांची फारशी गर्दी नव्हती हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही.

**● देश के दूसरे गांधी के सवालों का जवाब तो दे सरकार?**

ज्येष्ठ पत्रकार पशुपती शर्माजीने लिखा है, ''अन्ना के मंच पर आते ही भारत माता के नारों की गूंज सुनाई देने लगती है। इन्कलाब जिंदाबाद के नारे लगते हैं। पिछले कुछ दिनों से सोशल मिडिया और पत्रकार मित्रों के बीच इस बार के आंदोलन में भीड की कमी की जो चर्चा सुन रहा था, वो यहां पहुँचकर मुझे बेइमानी लगने लगती है। अहम् वो सवाल है, जो यहाँ पहुंचे किसान और आंदोलनकारी उठा रहे हैं। सवाल एक व्यक्ती उठाये या एक लाख लोगों का हुजूम, हमें उस सवाल की संजीदगी पर जाना चाहिए, उस शोर पर नहीं। खैर अन्ना एक बार फिर लोकपाल, किसानों के कर्ज और भ्रष्टाचार के मुद्दे पर रामलीला मैदाना से सवाल कर कर रहे हैं। वो कह रहे हैं की वे अपने वादे पूरा करें। वो घोषणाएँ जो चुनावी एजेंडे में थी, चुनावी घोषणापत्र में दर्ज हैं, वो केंद्र में, काबिज सरकार अंमल में लाए, अगर नहीं लायेंगे तो सवाल उठेंगे। अन्ना हजारे पूछते हैं की लोकपाल की नियुक्ती उन राज्यों में भी क्यों नहीं की जा सकी है। जिनमें बीजेपी का शासन है। इसका जवाब तो पंतप्रधान को देना होगा। वो सरकार मंशा पर सवाल उठा रहे हैं। मुझे लग रहा है,

अन्नदाता के अन्नत्याग की तडप सत्ता के गलियारों में बैठे लोगों को बातचीत के लिए मजबूर कर पायेगी?

यावेळी झालेल्या आंदोलनात मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान, ओरिसा, कर्नाटक, आसाम, उत्तराखंड, महाराष्ट्र, अरूणाचलप्रदेश, दिल्ली इत्यादी अन्य राज्यातून अनेक शेतकरी, शेतमजूर संघटनांनी भाग घेतला होता. यात राष्ट्रीय मजदूर महासंघाचे शिवकुमार कक्काजी, दिल्लीचे कर्नल दिनेश नैन व मनिंद्र जैन, राजस्थानचे विक्रम तपरवाडा, अक्षयकुमार (ओरिसा), रामनाईक (कर्नाटक), सुरेंद्रसिंग भाटी, सुनिल फौजी, चौधरी प्रविण भारतीया, पंकजनाथ कल्की, डॉ. राकेश रफिक, गौरवशन्त शर्मा, सुनील लाल, प्रतापचंद्रा, जयकांत मिश्रा (उत्तरप्रदेश), सुनील भट्ट (उत्तराखंड), नवीन, जय हिंद (हरियाणा), सेरफी फ्लेंगो (अरूणाचल प्रदेश), डॉ. बालाजी कोंपलवार, अशोक सब्बन, अल्लाउद्दीन शेख, शिवाजी खेडकर, कल्पना इनामदार, राळेगणसिद्धीच्या सरपंच वैशाली गाजरे, ॲड्. महेश ढवळे, सुरेश पठारे, दत्ता आवारी, श्याम पठारे, विनायक पाटील, करनवीर थमन (पंजाब), दशरथकुमार (राजस्थान), सुरेश शर्मा (हरियाणा), दिव्या ज्योती, सैकिया (आसाम), कमांडर यशवंत (दिल्ली), राजेंद्रसिंह (आगरा), दशरथभाई (राजस्थान) व कार्यालयीन सचिव संजय पठाडे इत्यादींनी प्रमुख भूमिका बजावली.

**● आंदोलनाचे फलित काय?**

मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली जन आंदोलनामुळे २०१८ मध्ये निवड समितीच्या पाच बैठका संपन्न झाल्या. या पाचही बैठकींना विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे अनुपस्थित होते. निवड समितीचे प्रमुख पंतप्रधान नरेंद्र मोदी, सदस्य मुख्य न्यायमूर्ती दिपक मिश्रा, लोकसभा सभापती सुमित्रा महाजन, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांचा सहभाग होता.

निवड समितीने लोकपालाच्या शोधसमितीची घोषणा केली. त्यात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई यांची चेअरमन म्हणून नियुक्ती केली. तर माजी एस. बी. आय. प्रमुख अरुंधती भट्टाचार्य, प्रसार भारतीचे चेअरमन अ. सूर्या प्रकाश, माजी अवकाश संशोधन संस्थेचे प्रमुख ए. एस. किरणकुमार, माजी न्यायाधीश अलाहाबाद उच्च न्यायालय सखारामसिंग यादव, माजी पोलीस प्रमुख

गुजरात शबीर हुसेन एस. खांडववाला, सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी राजस्थान केडर ललीत के. पनवार व मा. रणजीत कुमार यांची सभासद म्हणून निवड केली. सदर समितीच्या निवडीची घोषणा पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री मा. जितेंद्रसिंह यांनी २७ सप्टेंबर २०१८ रोजी केली. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे लोकपाल निवडीच्या कार्यास गती मिळाली आहे.

नीती आयोग तसेच केंद्रीय कृषी मूल्य आयोगाच्या शिफारशीनंतर खरीप हंगामासाठी उत्पादन खर्चाच्या दीड पट हमी भाव देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. हमी भाव देताना उत्पादन खर्चाचा (बियाणे, खते, अन्य सामग्री, मशीन, मंजूरी आदि. विचार कृषी मूल्य आयोग करीत असे. हमी भाव ठरवताना उत्पादन खर्चाबरोबर (ए.२) पहिल्यांदाच कुटुंब सदस्यांच्या श्रमाचा विचार (एफ.एल.) केला गेला आहे. ही मागणी अंशत: मंजूर झाली आहे. परंतु स्वामीनाथन आयोगाने जमिनीची किंमतही हमी भाव ठरविताना ग्रहीत धरण्याची शिफारस केली होती. ती केंद्र सरकारने मान्य केलेली नाही.

आज प्रजातंत्र ऐवजी पार्टीतंत्र आले आहे. लोकप्रतिनिधी ऐवजी पक्षप्रतिनिधी निवडून येत आहेत. ज्या मतदारांनी निवडून दिले त्यांना अपेक्षित असलेला अजेंडा न राबवता, पक्षाचा अजेंडा राबवला जात आहे. लोकशाहीत मतदार हा महत्वाचा भाग असतो. परंतु तो पाच वर्षाला एकदा मतदान करून (मताधिकार नाही.) जबाबदारी झटकतो. आपल्याला काही करायची गरज नाही. पक्षप्रतिनिधी सर्व काही करतील या भावनेने व्यक्तीकेंद्रीत व लाभ केंद्रीत बनला आहे. लोकचळवळी क्षीण झाल्या आहेत. जातधर्म हे राजकारण्यांची हत्यारे झाली आहेत. जात व धर्मांनी सामाजिक व मानसिक दृष्ट्या विभागले आहे. जाती-जाती व धर्मा-धर्मांत मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण केली जात आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या संविधानीक मूल्याला हरताळ फासला जात आहे. संविधान विरोधी धोरणामुळे स्वैराचार, विषमता व जाती व धर्मातील मत्सर व द्वेष वाढीस लागला आहे. उद्याचा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य आम्हाला घडवण्यासाठी फार मोठा अडसर ठरला आहे. म्हणून आजच्या भांडवलशाही व प्रतिनिधीक लोकशाहीला लोकसहभागी लोकशाही बनवायचे असेल तर अराजकीय नागरी संघटना, चळवळी सशक्तपणे उभ्या राहिल्या पाहिजेत. त्या सक्रीय होऊन राजसत्तेवर अंकुश ठेवण्याचे

कार्य केले पाहिजे. सरकारच्या धोरणे ठरविण्याच्या निर्णय प्रक्रियेत व अंमलबजावणीत सक्रीय सहभाग घेतला पाहिजे. राष्ट्रीय हिताचे धोरणे, कायदे व निर्णय घेण्यासाठी मा. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली चळवळीने असा सक्रीय सहभाग घेतला आहे. या जनआंदोलनाच्या माध्यमातून देशाची कायदे व धोरणे ठरविणाऱ्या संसदेवर जनआंदोलने व लोक चळवळीच्या माध्यमातून जन संसदेचा संसदेवर अंकुश ठेवून लोकोपयोगी कायदे करण्याचे कार्य केले आहे. अशा प्रकारे माहितगार व जबाबदार नागरिकांची सक्रीयता निर्माण होते व ती लोकशाहीला सशक्त करीत असते. हेच या आंदोलनाचे फलीत होय.

कोणत्याही जनआंदोलनासाठी सरकारवर जनशक्तीचा दबाव निर्माण होण्यासाठी लोकांची संख्या, प्रतिसाद ही पहिली कसोटी असते. या दृष्टीने मागील आंदोलनाची तुलना करता हे आंदोलन फारसे यशस्वी झाले नाही. यात तथ्य असेलही, परंतु आज राजकारण व समाजकारणातील संवेदनशीलता संपत असलेल्या काळात, देशाच्या प्रगतीबाबत या चार वर्षात जे झाले आहेत, ते मागील पन्नास वर्षात झाले नाही. सर्वत्र अच्छे दिन आले. सरकारच्या विरोधात विचारवंत, लोकसंघटना, नागरी संघटना व प्रसार माध्यमे कोणी आवाज काढू नयेत अशी स्थिती निर्माण झाली आहे. सरकारला विरोध करणारे देशद्रोही समजल्या जाणाऱ्या, बहुमताची मुजोरी चढलेल्या निष्ठर व असंवेदनशील सरकारच्या विरोधात, आपल्याकडे पूर्वीची टीम नाही हे माहीत असूनही देश व समाज हिताचे प्रश्न घेऊन जनतेसाठी 'वन मॅन आर्मी बनून' आपला जीव पणाला लावून सामान्य कार्यकर्त्यांच्या व जनतेच्या बळावर लढणाऱ्या अण्णांच्या या सत्याग्रह आंदोलनाने परिणामाची चिंता न करता सरकार विरोधात लोकशाही मार्गाने आवाज उठवला, लढा दिला हे सकारात्मक व धाडसाचे आहे हे नाकारता येत नाही.

आपल्या कामकाजात ढवळाढवळ करू पाहणारा, आपले अधिकार मर्यादीत करणारा, आपल्यावर नियंत्रण ठेवणारा सशक्त लोकपाल व लोकायुक्त रूपी भस्मासूर कोणत्याच पक्ष व सरकारला नको आहे. हे वास्तव पुढे आले. तसेच झुंडशाहीच्या आंदोलनाच्या काळात लोकशाही मार्गाने करण्यात येणारे सत्याग्रही आंदोलनाचे दिवस आता राहीले नाहीत हे विदारक सत्य पुढे आले आहे. तसेच मागील आंदोलनात रात्रंदिवस थेट प्रक्षेपण करणाऱ्या बहुसंख्य राष्ट्रीय माध्यमांनीही अण्णांकडे नव्हे तर

देशातील ज्वलंत प्रश्नाकडे दुर्लक्ष करून आंदोलनाकडे पाठ फिरविल्याचेही दिसून आले. मागील आंदोलनात दिल्ली शहरातून आंदोलनाला पाठींबा देणारा सामान्य, मध्यमवर्गीय समाज, युवक, परिवर्तनवादी संघटना व देशाला वैचारिक नेतृत्व देणाऱ्या तथाकथीत विचारवंत व प्रस्तापित पुढाऱ्यांनीही आंदोलनाकडे न फिरकल्याचे वास्तव पुढे आले आहे. जे समाज परिवर्तन व देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने सुचिन्ह नाही. शहीद दिनाला सुरू केलेले हे आंदोलन महावीर जयंतीला संपविण्याचा अण्णांचा निर्णय माघार नव्हे. हा अण्णांचा किंवा अण्णा आंदोलनाचा पराभव नव्हे. वयाच्या ८१ व्या वर्षातही सात दिवसाचे आमरण उपोषण जन व देश हितासाठी करणारे अण्णा जिंकले वा हारले नाहीत. तर आम्ही परिवर्तनवादी हारलो आहोत हे मान्य करावे लागेल.

## अण्णांचे राळेगणसिद्धीत पुन्हा आंदोलन

शोषणमुक्त व भ्रष्टाचारमुक्त भारतासाठी केंद्रात लोकपाल व राज्यात सशक्त लोकायुक्त लागू करण्यात यावा आणि शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यात यावेत या व इतर मागण्यांसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांनी केंद्र सरकारच्या विरोधात सहा वेळा उपोषण व आंदोलने केली. १६ ते २८ ऑगस्ट २०११ च्या दिल्ली येथील रामलीला मैदानावर झालेल्या ऐतिहासिक आंदोलनानंतर तात्कालीन मनमोहन सिंग सरकारने जनभावनेचा आदर करून रात्री संसदेत विशेष कामकाज चालवून लोकपालाचा कायदा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. तरीही कायदा होण्यास दोन वर्षे लागली. त्यासाठी वेळोवेळी आंदोलन करावे लागले. १० डिसेंबर २०१३ पासून राळेगणसिद्धी येथे अण्णा उपोषणाला बसले तेव्हा संसदेच्या विशेष सत्रात लोकपाल लोकायुक्त अधिनियम २०१३ ला अंतिम मंजूरी देण्यात आली. १ जानेवारी २०१४ रोजी त्यावर महामहिम राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली. त्यानंतर काँग्रेस सरकारने लगेच लोकपाल निवडीची प्रक्रियाही सुरू केली. परंतु दरम्यान लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या व २६ मे २०१४ ला भाजपाचे मोदी सरकार बहुमताने सत्तेवर आले. त्यानंतर लोकपाल निवडीची प्रक्रिया थांबली. पुन्हा पत्रव्यवहार सुरू झाला आणि अण्णांना आंदोलनाचे हत्यार उपसावे लागले. २३ मार्च २०१८ पासून दिल्लीतील रामलीला मैदानावर आंदोलनही केले. त्यावेळी सरकारने केवळ आश्वासने दिली. पण कायद्याची अंमलबजावणी झाली नाही. याउलट मोदी सरकारने २७ जुलै २०१६ रोजी लोकपालाच्या कायद्यातील कलम ४४ मध्ये

दुरुस्ती करून कायदा कमजोर करण्याचे काम केले.

२३ मार्च २०१८ रोजी रामलीला मैदानावर झालेल्या आंदोलनाच्या वेळी सरकारने पुन्हा लेखी आश्वासन देऊन मुदतवाढीची विनंती केल्यावर अण्णांनी उपोषण आंदोलन मागे घेतले होते. पण मागण्या मान्य न झाल्यास २ ऑक्टोबर २०१८ पासून पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. परंतु सरकारने पुन्हा मुदतवाढ मागीतली पण पुन्हा अपेक्षाभंग केला. केंद्र सरकारने आश्वासनाचा भंग केला म्हणून अण्णांनी पुन्हा एकदा ३० जानेवारी २०१९ महात्मा गांधीजी यांच्या पुण्यतिथीपासून राळेगणसिद्धी येथे आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केला.

## ३० जानेवारी, आंदोलनाचा पहिला दिवस

ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांनी महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने ३० जानेवारी २०१९ रोजी सकाळी ९.३० वाजता पिंपळनेर येथे जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर राळेगणसिद्धी येथील माता पद्मावतीचे दर्शन घेऊन, महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. पद्मावती मंदीरापासून वंदे मातरम्, भारत माता की जय, लोकपाल मागणीच्या घोषण देत अण्णांच्या नेतृत्वाखाली शेकडो युवक, विद्यार्थी, महिला व ग्रामस्थांच्या उपस्थितीत गावातून मिरवणुकीने यादवबाबा मंदीराकडे पोहोचले. यादवबाबांचे दर्शन घेतल्यानंतर अण्णांनी मंदीरासमोर उभारलेल्या भव्य मंडपातील मंचावर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आमरण उपोषणाची सुरुवात केली. राळेगणसिद्धी येथील ग्रामस्थांनी 'विशेष ग्रामसभा' घेऊन अण्णांच्या आंदोलनास सक्रीय पाठींबा दिला.

## ३१ जानेवारी २०१९, आंदोलनाचा दूसरा दिवस

अण्णांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी पारनेर, राळेगणसिद्धी परिवाराच्या वतीने पदयात्रा काढून तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. भारत माता की जय, जय जवान जय किसान, लोकपाल व लोकायुक्त लागू करा, स्वामीनाथन आयोगाच्या महत्वाच्या शिफारशी लागू करा इत्यादी मागण्यांच्या घोषणा देत मोर्चा पारनेरच्या बाजारपेठेतून तहसील कार्यालयावर पोहोचला. मोर्चातील महिलांच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन पारनेरचे तहसीलदार गणेश मरकड यांना देण्यात आले. यावेळी तहसील कार्यालयासमोर झालेल्या सभेत माजी नगराध्यक्ष अीनकेत औटी,

जि. प. सदस्य काशिनाथ दाते, राळेगणचे उपसरपंच लाभेष औटी, सरपंच सौ. प्रभादेवी पठारे, सुरेश पठारे, नगराध्यक्ष वर्षा नगरे, महिला युवा उपप्रमुख डॉ. वर्षा पुजारी, पं. स. सदस्य डॉ. श्रीकांत पठारे, नगरसेवक गंधाडे, माजी सरपंच जयसिंग मापारी, माजी उपसरपंच विजय डोळ, मारुती हजारे, शिवसेना शहरप्रमुख शिरिष साळवे, सावळाराम पठारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

राळेगणसिद्धी येथे पारनेर, वडुले, पिंपळनेर, पानोली, जातेगाव, शिरूर तालुक्यातील तसेच नगर जिल्ह्यातील व राज्यातील अनेक कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन आंदोलनाला पाठींबा दिला. एक दिवसाच्या लाक्षणिक उपोषणामध्ये अनेक नागरिकांनी सहभाग घेतला.

## नगर येथे 'हे राम... सत्याग्रह'

अण्णांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर गुरुवारी 'हे राम... सत्याग्रह' आंदोलन करण्यात आले. आंदोलनात सहभागी झालेल्या विविध संघटनांतील कार्यकर्त्यांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे जिल्हाधिकारी कार्यालयाचा परीसर दणाणला होता. ''राज्य सरकारने प्रस्तावीत केलेली लोकायुक्त कायदा दुरुस्ती फसवी आहे. मुख्यमंत्र्यांना लोकायुक्ताच्या कक्षेत आणणे म्हणजे पदावर असेपर्यंत मुख्यमंत्र्यांना मोकळीक मिळणार आहे.'' अशी प्रतिक्रिया राज्य शासनाच्या लोकायुक्त दुरुस्तीसंदर्भाने दिली.

## १ फेब्रुवारी–आंदोलनाचा तिसरा दिवस

अण्णांच्या उपोषणाचा तिसरा दिवस उजाडला तरी सरकारकडून कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने आंदोलन सुरूच होते. केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थ संकल्पाबाबत अण्णा म्हणाले, शेती व शेतकऱ्यांचे फारसे प्रतिबिंब अर्थसंकल्पात नाही. अर्थसंकल्पात वर्षाला सहा हजार रुपये शेतकऱ्यांना देण्याची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असून हे सरकार उद्योगपतींचे कोट्यावधींचे कर्ज माफ करते. कर सुविधा व अनुदाने देते. मात्र ६० वर्षावरील शेतकरी व शेतमजुरास दरमहा पाच हजार रुपये पेन्शन देण्यास तयार नाही ही शोकांतिका आहे. तसेच २३ मार्च २०१८ च्या दिल्ली येथील उपोषणादरम्यान केंद्र सरकारने दिलेल्या लेखी आश्वासनाचे पडसादही अर्थसंकल्पात उमटले नसल्याची खंत अण्णांनी व्यक्त केली.

केंद्रातील कृषीमूल्य आयोग सरकारच्या आधीन आहे. कृषिमंत्र्यांचे त्यावर नियंत्रण आहे. आयोगावरील हे नियंत्रण दूर केले पाहिजे. निवडणूक आयोगास ज्याप्रमाणे संवैधानिक व स्वायत्त दर्जा आहे. त्याप्रमाणे कृषिमूल्य आयोगास संवैधानिक दर्जा देऊन संपूर्ण स्वायत्तता दिली पाहिजे. तसेच आयोगावर दोन तज्ज्ञ शेतकऱ्यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली पाहिजे. तरच शेती मालाला योग्य भाव मिळू शकेल. तसेच शेतीसाठी लागणारी अवजारे व सिंचनाच्या पद्धतीवर व इतर वस्तूंवर लावण्यात आलेला जीएसटी रद्द करण्याचे आश्वासनही पाळण्यात आलेले नाही.

## केंद्र व राज्य सरकारच्या पुतळ्याचे दहन

अण्णांच्या उपोषणाचा तिसरा दिवस उलटूनही सरकारने आंदोलनाची दखल घेतली नाही. यासाठी निषेध म्हणून राळेगणसिद्धी येथील बसस्थानक चौकात केंद्र व राज्य सरकारच्या पुतळ्याचे दहन ग्रामस्थांच्या वतीने कार्यकर्त्यांनी केले. यावेळी अण्णांच्यावर बेछूट आरोप करणाऱ्या माजी मंत्री नवाब मलिक यांचा तीव्र निषेध करण्यात आला.

तसेच दिवसभर घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी राळेगणसिद्धीच्या सरपंच प्रभावती पठारे, उपसरपंच लाभेश औटी, सुरेश पठारे, दादा पठारे, सुनील हजारे, दत्ता आवारी, अरूण भालेकर, सुभाष पठारे, रोहिदास पठारे, आदींनी आंदोलनाचे नेतृत्व केले. यावेळी बहुसंख्य नागरीक व कार्यकर्ते उपस्थित होते.

नगरचे जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी आणि पोलीस अधिक्षक रंजनकुमार शर्मा यांनी उपोषण स्थळी भेट देऊन अण्णांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच पोलीस अधिक्षक सहायक पोलीस अधिक्षक मनीष कलानिया यांनीही उपोषण मागे घेण्याची प्रशासनाच्या वतीने विनंती केली.

## २ फेब्रुवारी, आंदोलनाचा चौथा दिवस : अण्णांची प्रकृती खालावली!

अण्णांच्या उपोषणाचा चौथा दिवस उजाडला. अण्णांची प्रकृती बरीच खालावली. अशक्तपणा वाढला. वजन घटले. अण्णांच्या वैद्यकीय तपासणीमध्ये त्यांच्या कीडनीत किटॉन बॉडीज आढळून आल्या. हे त्यांच्या प्रकृतीसाठी धोकादायक असल्याचे डॉ. धनंजय पोटे यांनी सांगितले.

राळेगणसिद्धी येथे पारनेर तालुक्यातील विविध गावातील ग्रामस्थांची महाग्रामसभा घेण्यात आली. सभेत रविवारी सकाळी नगर-पुणे (सुपा) व नगर-कल्याण (भाळवणी) महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पारनेर तालुका बंदची हाक देण्यात आली. तसेच नगर जिल्ह्यातील नागरीकांच्या वतीने व विविध पक्ष व संघटनांच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचे घोषित करण्यात आले. तसेच संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कार्यकर्त्यांचे व नागरीकांचे उपोषण, धरणे, घंटानाद, मोर्चे, रॅली काढण्यात आल्या.

चौथ्या दिवशी आयोजित केलेल्या विशेष ग्रामसभेचे अध्यक्ष शाहीर गायकवाड होते. या सभेस माजी जि. प. सदस्य ॲड्. आझाद ठुबे, माजी जि. प. उपाध्यक्ष सुजीत झावरे, काशिनाथ दाते, मधुकर उचाळे, बाबाजी तरटे, डॉ. भास्कर शिरोळे, संतोष सोडदे, गिरीश कुलकर्णी, ॲड्. शाम असावा, विजय डोळ, गंगाराम बेलकर, सदाशिव मापारी, सुरेश पठारे, अण्णा हजारे, युवा मंचाचे अध्यक्ष राहुल शिंदे, लाभेश औटी, नागेश्वर मित्र मंडळाचे कार्यकर्ते, सर्व ग्रामस्थ, नागरीक, युवक व महिला उपस्थित होत्या.

## रस्ता रोको जेलभरो व पोलीस ठाण्यावर मोर्चा

ज्येष्ठसमाजसेवक अण्णा हजारे यांनी लिहिलेल्या विविध पत्रास केंद्र सरकारकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आंदोलनापूर्वी अण्णांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रास प्रथमच उत्तर मिळाले. पत्राद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अण्णांच्या आंदोलनास शुभेच्छा दिल्या होत्या.

आंदोलन काळात अण्णांनी ज्या देशातील नागरीक व समाजाच्या विकासासाठी मागण्या केल्या आहेत. त्याचा ब्र शब्दही पत्राात लिहिला नाही. उपोषणादरम्यान अण्णांच्या प्रकृतीची चौकशी केली नाही. उपोषण मागे घेण्याची विनंती किंवा आवाहनही केले नाही. तर ''मा. अण्णा, शुभेच्छा'' एवढाच मजकूर लिहिला. चार वर्षात असे एक ओळीचे पत्र मिळाले. पंतप्रधान मोदी यांनी अण्णांच्या आंदोलनास शुभेच्छा देऊन अण्णांच्या पर्यायाने जनतेच्या मागण्यांची क्रूर थट्टा केल्याची भावना जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली. पंतप्रधानांच्या या भूमिकेचा सर्वत्र निषेध करण्यात आला.

माझे बरेवाईट झाल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी जबाबदार असतील असे मत अण्णांनी उपोषणाच्या चौथ्या दिवशी प्रसार माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. केंद्र सरकारने त्वरीत केंद्रात लोकपालची नियुक्ती करावी व राज्यात सशक्त लोकायुक्त कायदा करावा आणि शेतकऱ्यांसाठी स्वामीनाथन आयोगाच्या प्रमुख शिफारशी लागू करण्यात याव्यात. शेतकऱ्यांना एकवेळ संपूर्ण कर्जमुक्त घोषीत करावे व शेतमालास दीडपट हमी भाव द्यावा अशी मागणी केली.

## पारनेर–शिरूर येथे रस्ता रोको

शनिवारी सकाळी राळेगणसिद्धी परिवाराच्या वतीने व सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने राळेगणसिद्धी येथे चौकात सुमारे दोन तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलीसांनी आंदोलनकर्त्यांना अटक करून पारनेर पोलीस ठाण्यात नेले व गुन्हे दाखल करून नंतर सोडून देण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व उपसरपंच लाभेश औटी, सुरेश पठारे, दत्ता आवारी, दादा पठारे, जयसिंग मापारी, सरपंच प्रभावती पठारे, लता पठारे, विजया पठारे, कौशल्या हजारे, गायत्री गाजरे, रोहीदास पठारे, एकनाथ भालेकर, सुभाष पठारे, मधुकर उचाळे, राजू भंडारी, बापू भावकर, संतोष सोनावळे, चाँद शेख, सुनिल हजारे इत्यादींनी केले. आंदोलनादरम्यान राळेगणसिद्धी येथे पोलीसांमुळे छावणीचे स्वरूप आले होते.

## पारनेर येथे कडकडीत बंद! पोलीस ठाण्यावर मोर्चा

अण्णांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी पारनेर शहरात दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला. संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. सर्व नागरीक, सर्व कार्यकर्ते व विविध संघटनांच्या वतीने पारनेर पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांना पोलीसांनी अटक केली. यावेळी मोर्चामुळे कार्यकर्त्यांच्या घोषणांनी शहर व परीसर दणाणून निघाला. शहर बंद ठेवून मोर्चात हजारो नागरीकांनी भाग घेऊन आंदोलन तीव्र केले. त्यामुळे सरकारचे धाबे दणाणले.

यावेळी आंदोलनाचे पं. स. सभापती राहुल झावरे, संजय वाघमारे, शाहीर गायकवाड, पं. स. सदस्य डॉ. श्रीकांत पठारे, अण्णा हजारे युवा मंचाचे राहुल शिंदे, प्रवीण औटी, पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, सैनिक बँकेचे अध्यक्ष शिवाजी व्यवहारे, ढवळपूरीचे सरपंच राजेश भनगडे, संजय मते, नगर सेवक नंदकुमार

देशमुख, डॉ. मुद्दसर सय्यद, विजय डोळ, संदीप मोढवे, सरपंच नामदेव ठाणगे, धीरज महांडुळे, डॉ. सादिक राजे, शरद झावरे, युवराज पठारे, नजीर तांबोळी, सचीन नागरे, समीर शेख, पारनेर महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. यावेळी अण्णांनी केलेल्या देशहिताच्या मागण्या त्वरीत मान्य कराव्यात व अण्णांच्या प्रकृतीची काळजी सरकारने घ्यावी. अण्णा हे केवळ पारनेर तालुक्याचे भूमिपुत्र नसून भारत देशाची राष्ट्रीय संपत्ती आहे, याचा विचार सरकारने गांभीर्याने करावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी बोलताना अण्णांचे सहकारी व सामाजिक कार्यकर्ते सुरेश पठारे म्हणाले, ''आपल्या राजकीय स्वार्थासाठी व लालसेपोटी अनेक राजकीय पुढाऱ्यांनी अण्णांकडे उंबरठे झिजवले आहेत, आपली राजकीय पोळी भाजून घेतली. परंतु सध्या चालू असलेल्या आंदोलनाकडे सर्वच राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी पाठ फिरवली असून, अण्णांचा राजकीय स्वार्थासाठी वापर केल्याचा आरोप केला.

नगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील गावांसाठी महत्त्वपूर्ण असलेली साकळाई उपसा जलसिंचन योजना पूर्ण करण्याच्या मागणीसाठी व अण्णांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ चिखली जुना टोल नाका येथे शेतकऱ्यांनी बैलगाड्यासह रास्ता रोको आंदोलन केले. कृषी समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, आमदार राहुल जगताप, ज्येष्ठ समाजसेवक राजाराम भापकर, सभापती पुरुषोत्तम लगड, जि. प. सदस्य संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, दादाभाऊ चितळकर, रामदास झेंडे, रविंद्र भापकर, सरपंच ज्ञानेश्वर कवडे, शरद बोठे, संजय धावणे, अण्णा चोभे, प्रवीण कोठुळे, नारायण झेंडे, शरद चोभे, लहू कासार इत्यादींसह अनेक शेतकरी, युवक सहभागी झाले होते. जि. प. सदस्य संजय कार्ले यांनी अण्णांच्या आंदोलनास पाठींबा देणयाचा ठराव मांडला. उपस्थितांनी ठरावासा पाठींबा दिला. रास्ता रोकोमुळे, बैलगाड्यामुळे दोन तास वाहतूक ठप्प झाली होती.

## ३ फेब्रुवारी रविवार, आंदोलनाचा पाचवा दिवस

अण्णांचे आमरण उपोषण व देशव्यापी आंदोलन शेतकऱ्यांच्या हितासाठी असून सदर आंदोलनास पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी सक्रीय सहभाग घ्यावा. पारनेर बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद करण्याचा निर्णय सर्व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत सभापती प्रशांत गायकवाड व व्यापारी संघाचे अध्यक्ष मारूती रेपाळे यांनी

जाहीर केले. अण्णांचे उपोषण संपेपर्यंत बाजार समितीतील सर्व शेतमालाचे लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. यावेळी दिल्ली आंदोलनात सक्रीय असलेले व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष व संचालक मारूती रेपाळे यांनीही पुढाकार घेतला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांबाबत अण्णांनी केंद्र सरकारकडे भाववाढीची मागणी केल्याचेही सभापती प्रशांत गायकवाड यांनी उपस्थितांना सांगितले.

## आंदोलनाच्या समर्थनार्थ सोशल मिडीयाचा वापर

अण्णांच्या आंदोलनाची पाचव्या दिवशीही सरकारने फारशी दखल न घेतल्याने आंदोलन तीव्र करण्यासाठी युवक व विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा. तरूणांनी व्हॉटस् ॲप, फेसबुक,, ट्विटर इत्यादी सोशल मिडीयाचा वापर करून जनजागृती करावी असे आवाहन सुरेश पठारे, संजय वाघमारे यांनी केले. तसेच सरकारला अण्णांच्या मागण्या मान्य करण्यासाठी शेकडो पत्रे मुख्यमंत्र्यांना इमेलवर पाठविण्यात आले.

## विखे-थोरातांनी घेतली अण्णांची भेट !

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी युपीए सरकारच्या काळात केलेल्या लोकपाल आंदोलनाचा फायदा घेऊन भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. परंतु आज सत्तेत आल्यानंतर आंदोलनाचा विसर पडला असल्याची टीका विधानसभेचे विरोधी विरोधी पक्षाचे राधाकृष्ण विखे पाटील यांनी राळेगणसिद्धी येथे अण्णांची उपोषणस्थळी भेट घेतल्यानंतर केली.

शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी अण्णांच्या आंदोलनाला पाठीबा दिल्याच्या पार्श्वभूमीवर विखे पाटील म्हणाले, ''शिवसेनेला अण्णांची एवढी काळजी असेल तर त्यांनी त्वरीत सरकारातून बाहेर पडावे. तरच जनतेचा शिवसेनेवर विश्वास बसेल.''

माझी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी केंद्र सरकारने त्वरीत अण्णांच्या देशहिताच्या मागण्या मंजूर कराव्यात. अण्णांचे सामाजिक कार्य आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यानंतर देशाला दिशादर्शक कार्य हजारे यांनी केले आहे. यांच्यावर पद्मभूषणसारखा पुरस्कार परत करण्याची वेळ यावी हे दुर्दैव आहे असे म्हटले.

अण्णांच्या मागण्या देशव्यापी व जनतेच्या, शेतकरी, शेतमजुरांच्या हिताच्या असून अण्णांच्या आंदोलनाची दखल घेऊन मागण्या मंजूर कराव्यात, अण्णांच्या

जिवाशी खेळू नये असे प्रसार माध्यमांशी बोलताना शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले.

## अजीत पवारांनी मागितली अण्णांची माफी

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते माजी मंत्री नवाब मलिक यांनी टीव्ही चॅनेलवर बोलताना अण्णांचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध असल्याचे भाष्य केले होते. सदर मत हे मलिक यांचे व्यक्तिगत असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. ते पक्षाचे मत नाही. अण्णा हजारे यांच्याविषयी आम्हाला आदर आहे. सरकारचे अण्णांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यांच्या विषयी नवाब मलिक जे बोलले त्याबद्दल दिलगीरी व्यक्त करतो, असे मत माजी उपमुख्यमंत्री अजीतदादा पवार यांनी व्यक्त केले. अजीत पवार यांच्या दिलगीरीनंतर अण्णा म्हणाले, ''एवढ्या मोठ्या माणसाने माझ्यासारख्या फकीराची माफी कशाला मागायची? त्यापेक्षा आपल्या प्रवक्त्याला कसे बोलायचे याचे प्रशिक्षण द्यावे.''

## अण्णांचा भेटीसाठी नकार नव्हता !

पारनेर येथे सभेसाठी गेलो होतो. पारनेरची सभा उशिरा संपल्यानंतर गुरुवारी सायंकाळी अण्णा हजारे यांच्या भेटीला राळेगणसिद्धीला जाण्याचे आम्ही ठरवले होते. पण ते झोपले असल्याचा निरोप मिळाल्यानंतर आम्ही तिकडे जाणे रद्द केले. तिथे आम्हाला अण्णांकडून 'नकार' आला नाही. असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना दिले.

## ४ फेब्रुवारी, सोमवार : आंदोलनाचा सहावा दिवस

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आंदोलन मागे घ्यावे यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सहाव्या दिवशी दुपारी राळेगणसिद्धी येथे अण्णा हजारे यांची भेट घेऊन विनंती केली. परंतु अण्णांनी उपोषणावर ठाम असल्याचे मत व्यक्त केले. जोपर्यंत मागण्यांबाबत ठोस निर्णय होणार नाहीत तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार अण्णांनी व्यक्त केला. देशहितासाठी 'करेंगे या मरेंगे'चा पुनर्उच्चार त्यांनी केला.

केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री सुभाष भामरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व अण्णा हजारे यांच्यात सोमवारी सायंकाळी जवळपास साडेतीन तास चर्चा झाली. परंतु काही

ठोस निर्णय झाला नाही. प्रसार माध्यमांशी बोलताना ना. गिरीश महाजन म्हणाले, ''लोकपाल व लोकायुक्त नियुक्तीबाबतच्या मागण्यांबाबत अण्णा समाधानी झाले असून, स्वामीनाथन आयोगाच्या मुख्य शिफारशी, कृषी मूल्य आयोगात स्वायत्तता देणे, शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत दीडपट भाव, शेतकरी शेतमजूरांना पेन्शन, एक वेळ संपूर्ण कर्जमुक्ती आदी मागण्यांबाबत अण्णा समाधानी नसल्याने अण्णांनी उपोषण सुरूच ठेवल्याचे मत महाजन यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री हे केंद्र सरकारशी चर्चा करतील व उद्या दुपारपर्यंत अण्णांच्या सर्व मागण्या पूर्ण करून उपोषण सुटण्याची आशा महाजन यांनी व्यक्त केली.

## मोदी सरकार गेंड्याच्या कातडीचे : तृप्ती देसाई

अण्णांच्या जीवाशी खेळणे सरकारने थांबवावे व अच्छे दिनाच्या नावाखाली दिलेली आश्वासने या सरकारने पाळावीत, असे आवाहन भूमाता ब्रिगेडच्या अध्याक्षा तृप्ती देसाई यांनी आज राळेगणसिद्धी येथे अण्णांची भेट घेऊन चर्चा केली व आंदोलनास पाठींबा दिला. त्या प्रसंगी प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी आपले मत व्यक्त केले.

तृप्ती देसाई म्हणाल्या, ''हे सरकार गेंड्याच्या कातडीचे असून, सहा दिवसांपासून ८१ वर्षीय अण्णांना जनहिताच्या मागण्यासाठी उपोषण व आंदोलन करण्यास भाग पाडणे म्हणजे सरकारने केलेली जनतेची क्रूर चेष्टाच होय. वेळप्रसंगी अण्णांच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी भूमाता ब्रिगेड रस्त्यावर उतरणार असण्याचे सांगितले.

## ढोंगी व लबाडांसाठी अण्णांनी प्राणाची बाजी लावू नये – राज ठाकरे

अण्णांच्या आंदोलनामुळे हे मोदी सरकार सत्तेवर आले आहे. त्यामुळे ढेंगी व लबाड लोकांच्या सरकारमुळे अण्णा आपण आपल्या जीवाची बाजी लावू नका, आपले उपोषण मागे घ्यावे. अशी विनंती मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राळेगणसिद्धी येथे अण्णांची भेट घेऊन केली. यावेळी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, ''गेल्या रामलीला मैदानावरील लोकपाल आंदोलनामुळे दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी केजरीवाल यांना संधी मिळाली. परंतु केजरीवाल यांनी आता अण्णांची साथ सोडली आहे. एवढा कृतघ्न माणूस

आपण पाहिला नाही. केजरीवाल यांनी आंदोलनास पाठींबा नाही दिला. तरी अण्णांच्या प्रकृतीची चौकशी तरी करायची होती'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## सरकारचा खोटेपणा व फडणवीस मनातून उतरले – अण्णा

सरकारकडून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न लोकपाल व लोकायुक्त प्रश्नी ठोस निर्णय घेतल्याशिवाय आपण उपोषण सोडणार नसल्याचा निर्धार अण्णांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री सुषमा स्वराज व अरूण जेटली १७ व १८ डिसेंबर २०१३ रोजी लोकसभेत लोकपाल विधेयक मांडल्यानंतर जे बोलत होते ते आता सत्तेवर आल्यावर बोलायला व निर्णयाची अंमलबजावणी करायला तयार नाहीत. हे आचरण जनतेचा विश्वासघात असून सशक्त लोकशाहीसाठी मारक आहे. जनतेचा रोष पत्करून आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. पण चार वर्षात लोकायुक्त कायदा त्यांनी केला नाही. त्यामुळे ते मनातून उतरले. त्यांच्यावरील विश्वास उडाला, अशी वेदना अण्णांनी व्यक्त केली.

## जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

अण्णांच्या उपोषणाचे सहा दिवस झाले तरी, सरकारने फारशी दखल घेतली नाही. त्यामुळे राळेगणसिद्धी परिवार व विविध संघटनाच्या वतीने थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: निवेदन स्वीकारण्यासाठी आंदोलकांसमोर यावे, अशी मागणी आंदोलकांनी लावून धरली. परंतु प्रोटोकॉलप्रमाणे तसे करता येणार नसल्याने जिल्हाधिकारी निवेदन स्वीकारण्यास आले नाहीत. त्यामुळे संतप्त झालेल्या महिला आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटलाच बांगड्यांचा चुडा व निवेदन चिटकविले. तसेच यापुढे सरकारचे मंत्री व अधिकारांना गावबंदी करण्याची घोषणा करण्यात आली.

## पद्मभूषण परत करणार !

राज्यात लोकायुक्तासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संमती दिली आहे. परंतु केंदात लोकपाल नियुक्त केल्याशिवाय उपोषणापासून माघार घेणार नाही. अशी भूमिका घेतली. तसेच मागण्या मान्य न झाल्यास पद्मभूषण पुरस्कार परत करणार आहे. सरकारने मागण्यांचा तातडीने विचार करावा अन्यथा ८ किंवा ९ फेब्रुवारीला

पद्मभूषण पुरस्कार परत करण्याचा इशाराही अण्णांनी सरकारला दिला.

## ५ फेब्रुवारी – मंगळवार, आंदोलनाचा सातवा दिवस

अण्णांच्या उपोषणाचा आजचा सातवा दिवस, राळेगणसिद्धी येथील ग्रामस्थांनी व कार्यकर्त्यांनी दिवसभर चूल बंद ठेवून एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. जनावरेही चारापाण्याविना आंदोलनस्थळी बांधण्यात आली होती. शालेय विद्यार्थ्यांनीही एक दिवसाचा उपवास केला. अण्णांची प्रकृती खालावली. पाच किलो वजनही घटले.

सातव्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय कृषी मंत्री राममोहन सिंह येणार असल्याने नागरिक व कार्यकर्त्यांनी आंदोलन स्थळी गर्दी केली होती. पोलिसांचाही चोख बंदोबस्त होता. पोलीस महानिरीक्षक छेरिंग दोरजे, पोलीस अधिक्षक रंजनकुमार शर्मा, अप्पर पो. अधिक्षक सागर पाटील, सहाय्यक पो. अ. मनीष कलवानिया यांचेसह सर्व अधिकारी व पोलीस कर्मचारी जातीने उपस्थित होते.

मंगळवारी दुपारी दीड वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय कृषी मंत्री राधामोहन सिंह राळेगणसिद्धीत दाखल झाले. यादवबाबा मंदिरातील अण्णांच्या खोलीत मुख्यमंत्री, कृषिमंत्री, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन व अण्णा हजारे यांची बैठक सुरू झाली. यावेळी अण्णांच्या वतीने जनआंदोलनाचे सोमपाल शास्त्री, शिवकुमार शर्मा, सुरेश पठारे, पोपटराव पवार हे उपस्थित होते.

बाहेर यादवबाबा मंदिरासमोर टाकलेल्या सभा मंडपात कार्यकर्ते, विद्यार्थी व महिलांनी गर्दी केली होती. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणा सातत्याने दिल्या जात होत्या. तसेच अण्णांची भेट घेऊन पाठिंबा देण्यासाठी विविध पक्ष व संघटनेचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

## शेतकरी संघटनेचाही पाठिंबा !

याच वेळी मूळा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत गडाख, अमरावतीचे आमदार रवी राणा, अण्णांचे स्नेही कै. आर. आर. पाटील यांच्या पत्नी आमदार सुमन पाटील आदींनी अण्णांची भेट घेऊन उपोषणाला पाठिंबा दिला. तसेच स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर यांनी राळेगणसिद्धी येथे अण्णांची भेट घेऊन पाठिंबा दिला व सरकारच्या भूमिकेवर जोरदार टीका केली. तसेच अण्णांनी

भारतीय सेनेत सैनिक म्हणून देश सेवा केली. त्यामुळे माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनीही अण्णांची भेट घेऊन पाठिंबा दिला. अशा प्रकारे विविध संघटनांच्या वतीने अण्णांना पाठिंबा देण्यासाठी राळेगणसिद्धीत गर्दी झाली होती.

## अण्णांच्या भेटीसाठी छोटा पुढारी घनश्यात दराडे

मागील अनेक आंदोलनात सक्रीय असणारा व प्रसार माध्यमांद्वारे उत्कृष्ट भाष्य करणारा छोटा पुढारी घनश्याम दराडेही अण्णांच्या भेटीला आला होता. परंतु पोलीसांनी घनश्यामला दारातच अडवले. त्यामुळे त्याला रडू कोसळले. मी अण्णांचा शिष्य आहे. मला माझ्या गुरुंना भेटू द्या अशी विनंती पोलीसांना केली. परंतु पोलीसांनी अण्णांची भेट घेऊ दिली नसल्याची खंत छोटा पुढारी दराडे याने व्यक्त केली. घनश्याम दराडे याने राळेगणसिद्धी येथे कार्यकर्त्यांसमोर आपले छोटेखानी भाषणही केले व आंदोलकांची प्रशंसा मिळवली.

## राज्यातील २९ जिल्ह्यात व १०० हून अधिक तालुक्यात आंदोलन

भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यासाच्या वतीने अणंचे उपोषण व आंदोलनाच्या विविध मागण्यांच्या संदर्भात राज्यात २९ जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर व १०० हून अधिक तालुक्यात तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण, बेमुदत धरणे, घंटानाद, साखळी उपोषण व विविध ठिकाणी निवेदने देण्यात आली. तसेच विविध समविचारी संघटनांनीही सक्रीय पाठिंबा दिला.

अहमदनगर जिल्ह्यात अशोक सब्बन व ॲड्. कारभारी गवळी नेतृत्वाखाली जे अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन व विविध आंदोलने करण्यात आली तसेच संजय वाघमारे पारनेर, लक्ष्मण सताळे केतरगाव, बाबासाहेब कदम इत्यादींनी सहभाग घेतला.

## ५ फेब्रुवारी, मंगळवार – आंदोलनाचा सातवा दिवस

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी दुपारी २ नंतर राळेगणसिद्धीमध्ये आले. यादवबाबा मंदीराच्या बंद खोलीत अण्णांच्या सोबत सलग सहा तास चर्चा झाली. यावेळी केंद्रीय कृषिमंत्री राधा मोहन सिंह, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री सुभाष भामरे, महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. अण्णांच्या वतीने माजी केंद्रीय कृषिमंत्री सोमपाल शास्त्री, राज्य आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष

पोपटराव पवार, किसान महासंघाचे अध्यक्ष शिवकुमार शर्मा, राळेगणसिद्धी परिवारातर्फे सुरेश पठारे, लाभेश औटी उपस्थित होते.

## लोकपाल व लोकायुक्ताची मागणी मान्य

अण्णांनी केंद्रात सशक्त लोकपालची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. त्यासाठी संपूर्ण देशभर २०११ मध्ये ऑगस्ट क्रांतीचे ऐतिहासिक आंदोलन झाले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे १३ फेब्रुवारीला लोकपाल नियुक्तीसाठी केंद्राच्या समितीची बैठक होणार होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या बैठकीत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

एकेकाळचे अण्णांचे सहकारी ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांनी केंद्रात लोकपाल नियुक्तीबाबत जनहित याचिका दाखल केली होती. सदर प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने त्वरीत लोकपाल नियुक्तीची कार्यवाही करण्यासाठी केंद्र सरकारला अनेक वेळा धारेवर धरले होते.

## राज्यात सशक्त लोकायुक्त नेमणार

महाराष्ट्र सरकारने राज्यात लवकरात लवकर लोकायुक्त नियुक्त करण्याच्या दृष्टीने माहिती अधिकाराप्रमाणे सर्व देशाने स्वीकारावा असा सशक्त मसुदा तयार करण्यात यावा अशी मागणी केली होती. मुख्यमंत्र्यांनी राज्यात सशक्त लोकायुक्त नियुक्ती करण्यात येईल, त्यासाठी लोकायुक्त नवीन मसुदा तयार करण्यासाठी सरकार व जनतेचे प्रतिनिधी मिळून संयुक्त मसुदा समिती नियुक्त केली जाईल. हा मसुदा येत्या अर्थ संकल्पीय अधिवेशनात मंजुरीसाठी मांडला जाईल असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## कृषिमूल्य आयोगाच्या स्वायत्ततेसाठी समितीची स्थापना

भारतीय स्वातंत्र्यानंतर शेती व शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, देशात दर तासाला एक शेतकरी आत्महत्या करीत आहे. दररोज हजार शेतकरी शेतीतून बाहेर पडत आहेत. भारतासारख्या कृषिप्रधान देशाला शेतकरी आत्महत्या हा कलंक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर स्वामीनाथन् आयोगाच्या शिफारशीनुसार शेती मालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट भाव मिळाला पाहिजे. साठ वर्षावरील शेतकऱ्यांना व शेतमजूरांना दरमहा पाच हजार

रुपये पेन्शन मिळाली पाहिजे तसेच कृषी विम्याचे निकष बदलावेत व पीक कर्जावर चक्रवाढ व्याज लावू नये, एकदा सर्व शेतकऱ्यांना कर्जमुक्त घोषीत करून ७/१२ कोरा करावा, कृषिमूल्य आयोगाला संपूर्ण स्वायत्तता द्यावी, या व इतर मागण्या अण्णांनी लावून धरल्या होत्या.

या सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन केंद्र व राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्री व केंद्रीय कृषिमंत्र्यांनी दिले. कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष व सदस्य नियुक्ती संबंधाने एप्रील २०१७ मध्ये नियम तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार कृषिमूल्य आयोगास स्वायत्तता मिळणार असून, वैधानिक दर्जा पाप्त होणार आहे. कृषिमूल्य आयोगाच्या शिफारशीनुसार अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय कृषिमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्या समितीत हजारे यांच्या सूचनेनुसार माजी केंद्रीय कृषिमंत्री सोमपाल शास्त्री, रमेशचंद्र, नीती आयोगाचे सभासद व अन्य सदस्यांचा समावेश करण्यात येईल. ही समिती ३ ऑक्टोबर २०१९ पूर्वी आपला अहवाल सादर करील. निवडणूक आयोगाच्या धर्तीवर कृषिमूल्य आयोगास स्वायत्तता देण्याबाबत समिती निर्णय घेईल असे लेखी आश्वासन देण्यात आले.

## शेतकऱ्यांना व शेतमजुरांना पेन्शन

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी व शेतमजुरांचेच शोषण होत असून, शेतकरी व शेतमजुरांना सुरक्षित जीवन जगण्याची हमी देणे लोकशाही देशाचे संवैधानिक कर्तव्य आहे. त्यासाठी ६० वर्षे वयावरील शेतकरी-शेतमजुरांना दरमहा पाच हजार रुपये पेन्शन देण्याची मागणी अण्णांनी केली होती. भारत सरकारने २०१९ च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना' घोषीत केली. सदर योजनेनुसार देशातील २ एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपयापर्यंत दरमहा फक्त पाचशे रुपये देण्यात येणार आहेत. सदर आर्थिक मदत वाढविण्याची विनंती अण्णांनी सरकारकडे केली. याबाबत केंदीय अर्थमंत्र्यांनी सांगितले, 'सरकारची संसाधने वाढतील तशी या रकमेत वाढ केली जाईल, तसेच राज्यांनाही यात आपला वाटा देण्याबाबत आवाहन केले जाईल.'

## मजुरांना दरमहा तीन हजार पेन्शन !

देशातील असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या शेतमजूर व कामगारांना दरमहा तीन

हजार रुपये पेन्शन देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असल्याची माहिती अर्थमंत्री पियुष गोयल यांनी दिली. यासाठी 'प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना' तयार करण्यात आली असून सदर योजनेद्वारे असंघटीत क्षेत्रातील कामगारांना दरमहा १०० रुपये भरून वयाच्या ६० वर्षानंतर दरमहा तीन हजार रुपये पेन्शन दिली जाणार आहे. त्या योजनेमुळे देशातील असंघटीत क्षेत्रातील दहा कोटी कामगारांना फायदा मिळणार आहे. शेतमजुरांना पेन्शन देण्याची तसेच पिकविमा योजनेच्या निकषात बदल करून अंमलबजावणी करणे, पीक कर्जावर चक्रवाढ व्याजाची आकारणी न करणे, निवडणूक कार्यपद्धतीत सुधारणा करणे इत्यादी मागण्यांबाबत केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबाबतची सविस्तर माहिती दि. ३ फेब्रुवारी २०१९ च्या पत्रान्वये पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी अण्णांना दिली आहे. वरील सर्व मागण्यांबाबत सखोल चर्चा झाली.

## अण्णांचे समाधान झाले

भारतीय किसान महासंघाचे अध्यक्ष सरदार जगजितसिंह यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह चंदीगड हरियाणा येणे अण्णांच्या उपोषण व आंदोलनाच्या समर्थनार्थ आमरण उपोषण सुरू केले होते. त्यामुळे अण्णा म्हणाले, ''माझे समाधान झाले आहे. परंतु माझे सहकारी सरदार जगजित सिंह यांनीही माझ्यासोबत उपोषण सोडले पाहिजे अशी भूमिका घेतली. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंह यांनी जगजित सिंह यांचेशी भ्रमणध्वनीवर संपर्क करून चर्चा केली व उपोषण सोडण्याबाबत त्यांचेही मत वळविले. त्यांचे सोबतची चर्चा दीड तास चालली त्यामुळे बैठक लांबली होती. राज्यभरात व देशातही अन्य काही ठिकाणी कार्यकर्ते आमरण व लाक्षणिक उपोषणास बसले होते. त्या सर्वांना उपोषण सोडण्याचे आवाहन करण्यात आले.

## अण्णा हजारे ही राष्ट्रीय संपत्ती – मुख्यमंत्र्यांची संयुक्त पत्रकार परिषद

अण्णांशी विविध मागण्यांवर तब्बल साडेसहा तास चर्चा झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले की, ''गेल्या सात दिवसांपासून अण्णांचे उपोषण सुरू होते. सरकार त्यांच्याशी वेळोवेळी संपर्कात होतेच. अण्णा हजारे ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्यांची देशाला गरज आहे. त्यांच्या सर्व मागण्या मान्य झाल्याने त्यांना उपोषण सोडण्याची विनंती आम्ही केली. चर्चा प्रदीर्घ काळ चालली.

मात्र त्यातून सकारात्मक तोडगा निघाला याचे समाधान आहे. या चर्चेत पोपटराव पवार यांचीही मोठी मदत झाली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले. अण्णांना साथ देताना राळेगणच्या ग्रामस्थांनीही संयमाने आंदोलने केली. त्यांचेही आभार. अण्णांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्याला आम्ही लेखी उत्तर दिले आहे. त्यावर ठरल्याप्रमाणे कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांसोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना अण्णा म्हणाले, ''लोकपाल, लोकायुक्त, कृषिमूल्य आयोग व शेतकरी, शेतमजुरांच्या अन्य मागण्यांवर समाधानकारक चर्चा होऊन तोडगा निघालेला आहे. मला तसे पत्र मिळाले आहे. ते मी पूर्ण वाचले. ते मला मान्य आहे त्यामुळे मी आंदोलन मागे घेत आहे. तसेच राज्य व देशातील सर्व कार्यकर्त्यांनी आंदोलन मागे घ्यावे असे आवाहन करीत आहे.

## ग्रामसभेचे अध्यक्षपद हे माझ्यासाठी भाग्याचा दिवस - मुख्यमंत्री

पहिल्यांदाच ग्रामसभेचा अध्यक्ष झालो. तेही राळेगणसिद्धीचा. हा भाग्याचा दिवस असल्याचे सांगून मुख्यमंत्री झालो पण ग्रामसभेचा अध्यक्ष कोणी केलंच नाही. आज मात्र ग्रामसभेचा अध्यक्ष होण्याची संधी मिळाली तीही अण्णांच्या बाजूला बसून! हा देखील सन्मान असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

ग्रामसभेचे इतिवृत्त लिहून ठेवा. मी ग्रामसभेचा अध्यक्ष झालो होतो हे म्हातारपणात मला पाहता येईल. त्यासाठी ग्रामसभेच्या इतिवृत्ताची एक प्रत मला द्या, असे मुख्यमंत्री म्हणाले, तेव्हा पोपटराव पवार यांनी पंतप्रधान झाल्यावर फडणवीस यांना ही प्रत कामाला येईल, अशी टीपण्णी केली. त्यास मुख्यमंत्र्यांनीही दाद दिली.

लोकहिताच्या या मागण्यांसाठी दिल्लीत व राळेगण येथे आंदोलने केली. आठ वर्षे झाली, मागण्या मान्य होत नाहीत म्हणून मी या निर्णयाप्रत आलो होतो की, जगाचा निरोप घ्यायचा. मात्र उपोषण सुरू झाल्यावर राळेगणसिद्धी परिवार, तालुका, जिल्ह्यातील व देशभरातील कार्यकर्त्यांच्या प्रेमामुळे निर्णय बदलला.

त्यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, 'राळेगणसिद्धीत आज निर्धार करून आलो होतो. काहीही झाले तरी जोपर्यंत अण्णांचे उपोषण संपत नाही, तोपर्यंत राळेगण सोडायचं नाही. अण्णांच्या आश्रमातच रहायचं ठरवून आलो होतो. महाराष्ट्राला व देशाला अण्णांची गरज आहे. अण्णा भावनिक आहेत. त्यांचे जीवन लोकांना समर्पित आहे. प्राण त्यागण्याचा निर्णय त्यांनी भावनेतूनच घेतला होता. माझी अण्णांना विनंती

आहे की तुम्ही जिवंत राहून लोकांना मार्गदर्शन देऊन देशाला व राज्यात अपेक्षित परिवर्तन घडवू शकता. आमचं चुकलं तर आमचा कान ओढा, आम्हाला तुम्ही वडिलांप्रमाणे आहात. आम्हाला रागवा परंतु असा जीवन त्यागाचा निर्णय कधीही बोलू नका. तुमचा शंभरावा वाढदिवस साजरा करण्याची संधी आम्हाला मिळावी अशी आमची सर्वांची इच्छा आहे.

## अण्णांनी उपोषण सोडले !

अण्णांचे समाधान झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी केंद्रीय कृषिमंत्री सोमपाल शास्त्री, आदर्श गाव योजनेचे अध्यक्ष पोपटराव पवार, राळेगणसिद्धीच्या सरपंच प्रभावती पठारे यांच्या उपस्थितीत तोलाबाई पठारे या ज्येष्ठ महिलेच्या हस्ते लिंबू पाणी घेत आपले गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेले उपोषण सोडले. एका ऐतिहासिक विजयी जनआंदोलनाची समाप्ती झाली. अण्णा म्हणाले, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली राळेगणसिद्धीची ग्रामसभा ही मीनी व मूळ जन संसद आहे. ती देशातील प्रत्येक गावच्या ग्रामसभेचे प्रतिनिधीक रूप आहे. या देशातील जनता ही मालक असून जनसंसद ही दिल्लीतील संसदेपेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण ती संसदेची निर्माती आहे. या आंदोलनाचे यश हे देशातील व राज्यातील जनतेचे यश असल्याची भावना अण्णांनी व्यक्त केली.

राज्यातील व देशातील सर्व कार्यकर्त्यांनी आपआपल्या परीने आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला. उपोषणे केली. राळेगणमधील शाळेच्या लहान मुलांनी राळेगणकडे धाव घेतली. माझ्यावर प्रेम केले. त्यामुळे माझा निर्णय बदलला असल्याचे भावूक उद्‌गार अण्णांनी उपोषण मागे घेतल्यानंतर काढले. तुमच्या प्रेमाने मला माझ्या निर्णयापासून मागे खेचून आणले आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनांची पूर्ती झाल्याचे मला माझ्या डोळ्यांनी पाहता यावे, यासाठी थोडे थांबायचे असा निर्णय घेतला. ८१ व्या वर्षी माझ्या आयुष्यातला हा बोनस आहे. ईश्वर सगळं करून घेतो. त्यामुळे हे संपलं नाही. अजून खूप काही करायचं आहे. असे भावनिक मत अण्णांनी व्यक्त केले. अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयावर राळेगणसिद्धीच्या आंदोलनाचे निवेदन प्रोटोकॉलचे कारण देत सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्विकारले नव्हते. लोकशाहीमध्ये जनता ही मालक असून सरकारी यंत्रणेतील सर्व अधिकारी कर्मचारी

व लोकप्रतिनिधी सेवक आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांनी निवेदन स्विकारले पाहिजे. यासाठी यापुढे सरकार आता शासन आदेश काढून ही प्रोटोकॉल पद्धत बंद करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

यावेळी ग्रामसभेत उपस्थितांचे माजी सरपंच जयसिंग मापारी यांनी स्वागत केले. सामाजिक कार्यकर्ते सुरेश पठारे यांनी प्रास्ताविक केले. तर सूत्र संचालन सुभाष पठारे यांनी केले. यावेळी उपसरपंच लाभेश औटी, कार्यकर्ते दादा पठारे, दत्ता आवारी, अमोल झेंडे, अन्सार शेख, संदीप पठारे व राळेगणसिद्धीतील सर्व ग्रामस्थ, महिला, युवक, विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जनआंदोलनात नगर जिल्हा आघाडीवर

भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाच्या वतीने व विविध समविचारी संघटनांच्या वतीने नक्षर जिल्ह्यात सर्वाधिक आंदोलने करण्यात आली. आंदोलनाचे नेतृत्व राज्य सचिव अशोक सब्बन व ॲड्. कारभारी गवळी यांनी केले. संगमनेर तालुक्यात इंजि. नामदेव घुले, संजय देशमुख, सचीन साळुंके, असीफ शेख, यादवराव पावसे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन, जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले.

श्रीरामपूर येथे रंजन लोखंडे, निर्मला ओहळ, कर्जत येथे मा. को. साळवे, आशिष बोरा, शब्बीर पठाण, अण्णा येळपणेकर, राहुरी येथे कुमार डावखर, बापुसाहेब कदम, रमेश ससाणे, शेवगाव येथे अशोक ढाकणे, बाळू जायभाय, जामखेड येथे शेख फकीर महंमद, संतोष पवार, कोपरगाव येथे शंकरराव फटांगरे, लक्ष्मण सताळे, अकोले येथे हेरंब कुलकर्णी, संतोष मुर्तडक, कॉ. अजित नवले, राहता येथे जार्धन शेजूळ, सोमनाथ दरंदले, ज्ञानेश्वर चौधरी, आझाद इनामदार (पुणतांबा), नेवासा येथे रामराव पाटील भदलगे, कारभारी गरड, पाथर्डी येथे म्हातारदेव ढाळे, ॲड्. शंकरराव डाळींबकर, नगर तालुक्यात राळेगण म्हसोबा येथे चंद्रकांत साळवे, संजय पवार, अशोक सब्बन, डोंगरगण येथे सरपंच कैलास पठारे, पारनेर येथे संजय वाघमारे, मौजे नारायण डोह येथे पोपटराव साठे इत्यादींच्या नेतृत्वाखाली आंदोलने झाली.

नगर शहरात अपना घर संघटनेतर्फे, भारतीय जनसंसदेतर्फे विविध लक्षवेधी आंदोलने करण्यात आली. चिचोंडी पाटील येथे सुधीर भद्रे, अशोक कोकाटे, पाचरणे, श्रीगोंदा येथे वृक्षमित्र आबासाहेब मोरे, इत्यादींनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

## पंजाबमधील चंदीगड येथे सरदार जगजित सिंह यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

चंदीगड सेक्टर २५ मध्ये रॅली मैदानावर पंजाबच्या शेतकऱ्यांनी अण्णांच्या उपोषण व आंदोलनाच्या समर्थनार्थ भारतीय किसान युनियन सिद्धूपूर व टीम अण्णांचे सदस्य सरदार जगजित सिंह उल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण व बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले. उपोषणास बसलेले जगजितसिंह आणि थामन करनवीर यांची प्रकृती पाचव्या दिवशी बिघडली होती. आमरण उपोषणास बसलेल्या नेत्याचे वजन ७ ते ८ किलोंनी घटले. आंदोलनात सर्वाधिक शेतकरी सहभागी झाले होते. पोलीसांनी आंदोलन स्थळी पंजाब व हरियाणातून येणाऱ्या शेतकऱ्यांच्या गाड्या आडवल्या. शेतकऱ्यांना मारहाण केली. चंदीगड पोलीस प्रशासनाच्या अन्यायी भूमिकेचा निषेध करण्यासाठी ५० शेतकरी आमरण उपोषणास बसले.

चंदीगड पोलीस प्रशासनास पत्राद्वारे स्थानिक पोलीसांच्या आडमुठ्या व दमनकारी धोरणाबद्दल कळविले. लोकशाही व संवैधानिक अधिकारानुसार शांततेत आंदोलन शेतकरी करीत आहेत. तरी पोलीस प्रशासनाने आपली भूमिका भदलली नाही. रॅली ग्राउन्डवर हजारो शेतकरी यांनी आंदोलनात सहभाग घेतला.

उत्तर प्रदेशातील करप्शन फ्री इंडियाचे संस्थापक प्रवीण भारतीय, आशुतोष शर्मा, करणवीर सिंह, सुनील लाल, रमा रमन, सुशील भट्ट यांनी आंदोलनापूर्वी राळेगणसिद्धी येथे येऊन अण्णांची भेट घेतली व आंदोलनात सक्रीय सहभाग घेण्याचे आश्वासन दिले. बुलंद शहर व उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी जनआंदोलन उभारले. तसेच उत्तर प्रदेशातील १९ जिल्ह्यात धरणे आंदोलन करण्याचा निर्णय जिल्हाध्यक्ष मास्टर दिनेश नागर, अलोड नागर, आशुतोष शर्मा, मनीष भाटी, हरेंद्र कसाना, निशांत तिवारी, दीपक भाटी, अरूण कसाना, कृष्ण कुमार, सरजीत कसाना, प्रेम प्रधान, कपील गुर्जर, सुभेदार मामचंद सिंह इत्यादींनी घेतला.

## राज्यात जनआंदोलन

३० जानेवारी महात्मा गांधीजी यांच्या पुण्यतिथी निमित्त अण्णांनी पुकारलेल्या जनआंदोलनाच्या समर्थनार्थ राज्यातील २९ जिल्ह्यात धरणे, मोर्चे, उपोषण, घंटानाद व विविध आंदोलने करण्यात आली. रामराव बोरडे, पोपट रसाळ (औरंगाबाद),

सुरेश गाडगे, नारायण पवार (कोल्हापूर), शिवनाथ कुंभारे, विजय खरवडे (गडचिरोली), विठ्ठल बदरवल, विजय शर्मा (चंद्रपूर), लतिफ शेख, विजय दोधा पाटील (जळगाव), देवानंद चित्राल, शिवशंकर गायकवाड (जालना), सुनील शिंदे, अलंकार वारघडे (ठाणे), सुनील मुरकुटे व बाळासाहेब दौंडे (येवला), सोमनाथ आव्हाड (सिन्नर), प्रभाकर खराटे (दिंडौरी), दत्तात्रय मोरे (किळवण), शिवाजी दौंडे (चांदवड जि. नाशिक), रोहीदास जाधव (परभणी), गजानन मोहीते (पालघर), सुभाष ठाकरे (वाडा), निखिल भानुशाली (वाडा), दर्शना नासदे (वसई), राधेश्याम जगताप, प्रकाश पोरवाल (पुणे), निलेश शिंदे (शिरूर), माणिक सुपनार (हवेली), प्रकाश पाचरणे (खेड), संदीप गुंड (दौंड), जनार्दन पांढरमिसे (इंदापूर), ढोणे (पुरंदर), चिंतामणी पासलकर (वेल्हे), प्रकाश पोरवाल (मावळ जि. पुणे), भागवत पनाड (लोणार), अविनाश पसारकर (मेहकर), राजेंद्र शेळके (चिखली), विजय निकम (शेगाव), सुखदेव इंगळे (सिंदखेड राजा, जि. बुलढाणा), विजय शिंदे (सांगली), रविंद्र हजारे (वासगाव), आकाराम शिसाळ (पलुस), कल्पना इनामदार (जत), सांगोला कटफळ, देवेखिंडी, वाळेखिंडी, कोकटळे, मिरज जि. सांगली, नारायण शिंदे (मीरज), बाळासाहेब हाके, संदीप जगताप, शशीकांत जाधव (सातारा), हनुमंत मोरे (फुलरण), संजय माने (कोरेगाव), शशीकांत जाधव (पाटण), सत्वशील शेळके (खंडाळा), ज्ञानेश्वर फलटण धायगुडे व सय्यद मीर (हिंगोली), विठ्ठल गिरी (वसमत), सुधाकर चौधरी (मंगरूळ पीर), योगेश देशमुख (मानोरा), सतीश राऊत (कारंजा जि. वाशिम), शेख हानीफ (लातूर), मुंढे व नाशीर (केज), प्रकाश पाटील (वडवणी), ॲड्. अजित देशमुख (बीड), चंद्रवीर सावळे (धुळे), विजय शिंदे (सिंदखेडा), एकनाथ पाटील, सईद सय्यद (शहादा), संजय भांबरे (साक्री जि. धुळे,) दत्ता कोकरे (माळशिरस जि. पुणे), झटाम (मसाळा), शेख (श्रीवर्धन), श्री कुरंदा (तुळजापूर), प्रा. अरूण बोबडे, ॲड्. संजय माने, मनोज खरे (उस्मानाबाद), काटकर (परंडा), चिगुडे चिलगुडे (वाशी), प्रा. डॉ. कोंपलवार, ॲड्. धोंडीबा पवार, ॲड्. गोविंद कोत्तावार, दिगुतुमवाड, एम. आर. जाधव, भागवत पुप्पलवाड (नांदेड), आरळीकर साहेबराव, पुरुषोत्तम अमीलकंठवार, मोराती ममीलवाड, पांपटवार, मोतीराम पवार (मुखेड), डॉ. अशोक सिद्धेवाड (नांदेड), पांडुरंग कंधारे, माधव वडजे, व्यंकट जाधव (कंधार), दिगंबर शिंदे, डॉ. मोरे कालीदास (लोहा), निलप्पा

निमडगे (हदगाव), विठ्ठल रेड्डी, डॉ. श्रीनिवास के. शेट्टीवार, जी. पी. मिसाळे (धर्माबाद), शेख युनुस (किनवट), इंजि. विश्वंभर पवार (भोकर), लक्ष्मीकांत मुळे (अर्धापूर), धनाजी देशमुख, शेखर अमृतवार, विनोद बोरजे (देगलूर), पंढरी गडपवार देगलूर, माधव मामा कोकुर्ले, विठ्ठल वडपत्रे, चन्नावार, प्रभाकर लखपत्रेवार (नायगाव), भावेश पटेल (मुंबई), अल्लाउद्दीन शेख (पनवेल), शंकर बगांडे (मुंबई), एकनाथ पाटील (नंदुरबार), सईद सय्यद (शहादा), बडवाईक (भंडारा), रफीक लखानी (अकोला), विलास चावरे (आलपूर, जि. अमरावती), जयानंद मठकर सिंधुदूर्ग, के. डी. पवार, मनीष पांडे, प्रभाकर कोंढाळकर, राधेश्याम जगताप (पुणे) इत्यादी प्रमुख कार्यकर्त्यांनी आपापल्या जिल्ह्यात आंदोलनाचे नेतृत्व केले.

## देश पातळीवर जनआंदोलन

अण्णांच्या उपोषण व आंदोलनाच्या समर्थनार्थ दादरी, भिवानी, सिरसा येथे सुरेश शर्मा, नवीन जयहिंद (हरियाणा), सरदार जगजीत सिंह, करनवीर थमन, परमजीत सिंह चंदीगड (पंजाब), सुशील भट, अनुज शर्मा, जयकांत मिश्रा, मनींद्र जैन जंतरमंतर (दिल्ली), प्रविण सिंह सचिवालय (दिल्ली), कमांडर यशवंत, (द्वारका-दिल्ली), अक्षय कुमार, (भुवनेश्वर बेहजोई (उडीसा), प्रवीण भारतीय, नारायण द्विवेदी, सुरेंद्रसिंग भाटी, सुनील फौजी (बुलंद शहर), वाराणशी, मथुरा, सितापूर, डॉ, राकेश रफीक, राजेंद्र सिंग राठोड, जर पुरुष राजेंद्र सिंह (खजुराहो), विष्णुकांत शर्मा (ग्वालीयर), डॉ. सुनीलम (भोपाळ-मध्यप्रदेश), तरूण उप्पल (श्रीनगर), एस. चंद्रशेखर), नकवी हैद्राबाद (तेलंगणा), सी. के. मेनन, राजेंद्र भाई (बेंगलोर), राम नाईक (धारवाड-कर्नाटक), मृत्युंजय स्वामी, विजय मर्चंट, मनीष ब्रह्मभट्ट (भावनगर, अहमदाबाद-गुजरात), प्रशांत शर्मा अलवार, दशरथ कुमार (कोटा, गंगानगर-राजस्थान), शुक्ला पटणा, चंपारण्य (बिहार), संजय सिसोदिया (पटणा), हनुमानग्रह (अर्नाकुलम-केरळ), दिव्याजौती सैकिया (गुवाहटी-आसाम), भोपाल सिंह चौधरी (उत्तराखंड), सेरफी फ्रैंगो (अरूणाचल प्रदेश), अमरनाथ भाई (वाराणशी-उत्तरप्रदेश), रविकृष्ण मूर्ती चेन्नई (तमिळनाडू), गुरु स्वामी मदुराई, राजश्री गोस्वामी (कोलकत्ता)-प. बंगाल), मनज्योत सिंग कोहली (जम्मू काश्मीर), कृष्णपाल यादव (बुलंद शहर, उत्तर प्रदेश), राजेंद्र कुंभोज (जयपूर-राजस्थान), प्रदीप सिंह बहादूरगड (पंजाब), इत्यादी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली वेळोवेळी जनआंदोलन करण्यात आले.

## राज्यात सशक्त लोकायुक्त कायद्यासाठी मसुदा समितीची निवड

महाराष्ट्र लोकायुक्त आणि उपलोकायुक्त अधिनियम १९७१ राज्यात दि. २ ऑक्टोबर १९७२ पासून अंमलात आला. महाराष्ट्रात २५ ऑक्टोबर १९७२ पासून लोकायुक्त आणि उपलोकायुक्त कार्यालयाच्या कामकाजास सुरुवात झाली.

महाराष्ट्र शासन किंवा शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या किंवा महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखालील महामंडळे, कंपन्या यासारख्या काही प्राधिकारी संस्थांतर्फे करण्यात आलेल्या प्रशासकीय कार्यवाहीसंबंधीच्या जनतेच्या गाऱ्हाण्यांची आणि लाचलुचपत अभिकथनाच्या तक्रारींची चौकशी या अधिनियमाच्या तरतुदीनुसार लोकायुक्त आणि उपलोकायुक्त करीत होते.

१९७२ पासून असलेल्या या तपास यंत्रणेची माहिती ४६ वर्षे झाली तरीही सामान्य जनता, शेतकरी यांना नव्हती. किंबहूना या सर्व यंत्रणा मुख्यमंत्री व मंत्री यांच्या आखत्यारीखाली, नियंत्रणाखाली कार्यरत आहेत. त्यामुळे हे एक प्रकारचे बुजगावणेच होते. सामान्य माणसाला, शेतकरी व शेतमजुरांना न्याय देण्यासाठी सक्षम अशा स्वायत्त यंत्रणेची गरज होती. अण्णांच्या जनआंदोलनामुळे ४६ वर्षानंतर केंद्र शासनातर्फे लोकपाल आणि लोकायुक्त अधिनियम २०१३ संमत करण्यात आला. भारताचे राष्ट्रपती यांनी १९ मार्च २०१९ मंगळवार रोजी न्या. पिनाकी चंद्र घोष यांची भारताचे पहिले लोकपाल म्हणून नियुक्ती केली.

केंद्रीय लोकपाल अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन राज्यात सक्षम लोकायुक्त नियुक्त करावा अशी अण्णांची मागणी होती. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुधारीत अधिनियमाचा मसुदा तयार करण्यासाठी संयुक्त मसुदा समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला.

### संयुक्त मसुदा समिती खालील प्रमाणे आहे–

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २) | अण्णासाहेब हजारे | सदस्य |
| ३) | उमेशचंद्र सारंगी | सदस्य |
| ४) | माधव गोडबोले | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५) | ॲड्. श्याम असावा | सदस्य |
| ६) | अपर मुख्य सचिव (गृह) | सदस्य |
| ७) | प्रधान सचिव (विधी व न्याय) | सदस्य |
| ८) | न्या. संतोष गडे | विशेष नियंत्रित |
| ९) | जॉनी जोसेफ | विशेष नियंत्रित |
| १०) | अपर मुख्य सचिव | सदस्य सचिव |

सदर समितीने तीन महिन्यात आपला अहवाल सादर करावा असे ठरले.

## देशाच्या पहिल्या लोकपालपदी मा. न्या. पिनाकी चंद्र घोष यांची नियुक्ती

पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन, सरन्यायाधीश रंजन गोगोई व ख्यातनाम विधिज्ञ मुकुल रोहतगी यांचा समावेश असलेल्या निवड समितीने लोकपालच्या अध्यक्ष पदासाठी न्या. पिनाकी चंद्र घोष यांचे नाव निश्चित केले.

सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. पिनाकी चंद्र घोष हे भारताचे पहिले लोकपाल बनले आहेत. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याकडून न्या. घोष यांची नियुक्ती करण्यात आली. न्या. घोष यांच्या निवडीमुळे १९६६ नंतर अण्णांच्या नेतृत्वाखाली झालेल्या जनआंदोलनाला यश मिळाले.

## न्या. पिनाकी चंद्र घोष यांचा परिचय

कोलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश न्या. शंभू चद्र घोष यांचे न्या. पिनाकी चंद्र घोष हे पुत्र आहेत. पिनाकी चंद्र घोष यांचा जन्म कोलकत्ता येथे २८ मे १९५२ साली झाला. त्यांचे शिक्षण सेंट झेवियर्स कॉलेज कोलकत्ता येथून झाले. ते कॉमर्स ग्रॅज्युएट आहेत. पुढे त्यांनी कोलकत्ता विद्यापिठातून एल. एल. बी. पूर्ण केले. कोलकत्ता उच्च नायायालयातून 'अटॉर्नी ॲट-लॉ' पदवी मिळवली. ३० नोव्हेंबर १९७६ ला बार कौन्सिल प. बंगालचे सदस्य झाले व कोलकत्ता येथे आपल्या वकीली व्यवसायाची सुरूवात केली. पुढे त्यांनी कोलकत्ता उच्च न्यायालयातच न्यायाधीश म्हणून काम केले. आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणूनही त्यांनी काम केले.

८ मार्च, २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पदभार घेतला.

ते मे २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त झाले. २९ जून २०१७ पासून राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. न्या. पिनाकी चंद्र घोष यांनी केंद्राचे प्रमुख न्यायाधीश म्हणून तमिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जयललीता आणि त्यांच्या सहकारी शशिकला यांचे विरुद्ध उत्पन्नापेक्षा अधिक संपत्ती धारण केलेबाबतच्या प्रकरणात निकाल दिला. त्यांच्या निकालाने मा. मुख्यमंत्री जयललीता यांच्या सहकारी श्रीमती शशिकला यांना तुरूंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. देशात गाजलेल्या बाबरी मस्जिद विध्वंस प्रकरणी भारतीय जनता पक्षाचे नेते लालकृष्ण आडवाणी, उमा भारती आणि मुरली मनोहर जोशी यांच्या विरोधातील आरोप कायम केले.

तमिळनाडू येथील जल्ली कट्टू आणि बैलगाडी दौड़ सारख्या पारंपारिक स्पर्धा या पशुसाठी हिंसक असल्याचे ठरवले व अशा स्पर्धांवर प्रतिबंध घालण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला.

## १२ व्या शतकातील ऐतिहासिक जनआंदोलनाची यशस्वी सांगता

महात्मा गांधीजींच्या नंतर स्वत:ला गांधी विचारांचे पाईक व वारसदार समजणारे बुद्धीवादी नेते लोककल्याणासाठी गांधीजींनी आपल्या उभ्या आयुष्यात केलेल्या लोकसंघर्षापासून कोसो दूर राहिले. गांधी विचाराकडे बहुसंख्य नेते व जनतेनेही पाठ फिरवली.

वैचारिक तत्वज्ञानाऐवजी व्यावहारिक सिद्धांताकडे वळून आपले भौतिक जीवन सुखकर करण्याच्या धावपळीमध्ये सामील झाले. त्यामुळे भारतीय संस्कृतीतील नीती, नाती व मानवी मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला. सामूहिक हितापेक्षा व्यक्तिगत हिताला प्राधान्य देणारा व्यक्तिकेंद्रीत, आत्मकेंद्रीत समाज निर्माण झाला. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात प्रचंड विषमतेसाठी दिवसेंदिवस श्रीमंत व गरीब असे विभाजन होत चालले आहे. कोट्यावधी लोकांचे दिवसाचे उत्पन्न शंभर रुपयेही नाही. ४० कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या खाली जीवन जगत आहेत. देशात भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. जादुई भौतिक विकास होऊनही देशातील जनतेला शुद्ध पाणी, सकस अन्न व सुरक्षित निवारा, सुदृढ आरोग्य व समान दर्जाचे गुणवत्तापूर्ण मोफत व सक्तीचे शिक्षण आम्ही देऊ शकलो नाही.

अशा वेळी महात्मा गांधीजी यांनी दाखविलेल्या सत्याच्या मार्गावरून चालत, अहिंसेची कास धरलेल्या अल्पशिक्षित व देशातील एका साध्या सैनिकाने राळेगणसिद्धी सारखे आदर्श गाव व नागरिक निर्माण केले. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील शाश्वत विकासाचे 'मॉडेल' देशाला दिले.

पुढे राज्यातील व देशातील जनतेच्या कल्याणासाठी गांधीजींच्या असहकार व सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करून जनआंदोलने उभी करून जनतेच्या प्रश्नासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करणारे गांधीवादी अण्णा खऱ्या अर्थाने देशाचे जननायक झाले. ग्रामसभा, माहितीचा अधिकार, शेती व शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारचे धोरण व केंद्रात सशक्त लोकपाल व राज्यात लोकायुक्त अशा विविध कल्याणकारी समाज निर्मितीच्या मागण्यांसाठी अण्णांनी महात्मा गांधीजींच्या अहिंसक मार्गाने देशातील जनतेच्या हृदयाला हात घालत त्यांच्यातील सुप्त शक्तीला आवाहन केले. गांधीजींची सत्याग्रह, आंदोलन व उपोषणासारखी हत्यारे वापरून स्वत: आत्मक्लेश सोसून, सरकारला झुकवणारा 'महानायक' २१ व्या शतकाने देशाला दिला. हे ऐतिहासिक सत्य देश कधीही विसरू शकणार नाही.

निष्कलंक जीवन व स्वच्छ प्रतिमा असलेल्या, आपल्या शांत, संयमित, निरपेक्ष वृत्ती व कृतीमधून राज्य व केंद्र सरकारला हादरे देणाऱ्या गांधीवादी अण्णांचा उदय हा जनतेसाठी प्रेरणा व उर्जा स्त्रोत ठरला आहे.